# द्वितीय वर्ष वाणिज्य

## सत्र - III (CBCS)

# व्यावसायिक अर्थशास्त्र - III
# स्थूल अर्थशास्त्र

## विषय कोड : UBCOMFSIII.4

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्राध्यापक सुहास पेडणेकर**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक रविंद्र द. कुलकर्णी**
प्र-कुलगुरु,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवार**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्रकल्प व अभ्यास समन्वयक :** : **प्रा. राजश्री पंडित**
साहाय्यक प्राध्यापक आणि साहाय्यक संचालक,
प्रभारी वाणिज्य विभाग प्रमुख
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**लेखक** : **डॉ. मुक्ता पोटे**
एस.के. सोमैया कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
विद्याविहार, मुंबई

: **प्रा. शुभांगी वर्तक**
रामनिरजंन झुनझुनवाला महाविद्यालय,
घाटकोपर, मुंबई

: **प्रा. राजश्री पंडित**
साहाय्यक प्राध्यापक आणि साहाय्यक संचालक,
प्रभारी वाणिज्य विभाग प्रमुख
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**सप्टेंबर २०२१, मुद्रण - १, ISBN - 978-93-91735-03-6**

**प्रकाशक :** संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

**अक्षर जुळणी व मुद्रण** : मुंबई युनिव्हर्सिटी प्रेस,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०००९८

# अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **प्रकरण - १** | |
| १. | प्रस्तावना : समग्रलक्षी अर्थशास्त्र | ०१ |
| २. | व्यापार चक्रे | २१ |
| | **प्रकरण - २** | |
| ३. | केन्सच्या अर्थशास्त्रीय मुलभूत संकल्पना | ३० |
| ४. | गुंतवणूक | ५४ |
| | **प्रकरण - ३** | |
| ५. | केन्स कालखंडानंतरचा व्यापक अर्थशास्त्रीय बदल | ७० |
| ६. | मंदीयुक्त भावफुगवटा | ७८ |
| | **प्रकरण - ४** | |
| ७. | पैसा, किंमती व भाववाढ | ९१ |
| ८. | पैशाची मागणी | १०४ |


❖❖❖❖

**BUSINESS ECONOMICS III**
**SEMESTER - III (CBCS)**
**ELEMENTS OF MACROECONOMICS**

## Preamble

An overall approach to macroeconomics is to examine the economy as a whole. This course is an introduction to the basic analytical tools of macro economics to evaluate macro economic conditions such as inflation, unemployment and growth. It is designed to make system of overall economy understandable and relevant. The aim is to provide a clear explanation of many aspects of aggregate economic variables to inspire a consistent way of thinking about key macroeconomic phenomena. It intends to familiarize the commerce students with basic concepts of macroeconomics and with certain common features of economic occurrence in the real world.

| Sr. No. | Modules / Units |
|---|---|
| 1 | **Introduction** |
| | • Macroeconomics: Meaning, Scope and Importance.<br>• Circular flow of aggregate income and expenditure and its Importance- closed and open economy models<br>• The Measurement of National Product: Meaning and Importance of National Income Accounting- conventional and Green GNP and NNP concepts -National Income and<br>• Economic Welfare.<br>• Trade Cycles: Features and Phases<br>• Classical Macro economics : Say’s law of Markets - Features, Implications and Criticism |
| 2 | **BASIC CONCEPTS OF KEYNESIAN ECONOMICS** |
| | • The Principle of Effective Demand: Aggregate Demand and Aggregate Supply<br>• Consumption Function: Properties, Assumptions and Implications<br>• Investment function and Marginal Efficiency of capital<br>• Investment Multiplier effect on Income and Output: Assumptions, Working, Leakages, Criticism and Importance - paradox of thrift<br>• Relevance of Keynesian theory tools to the developing countries |
| 3 | **POST KEYNESIAN DEVELOPMENTS IN MACRO ECONOMICS** |
| | • The IS-LM model of integration of commodity and money markets<br>• Inflation and unemployment : Philips curve<br>• Stagflation : meaning, causes, and consequences |

| | |
|---|---|
| | • Supply side economics : Basic propositions and critical appraisal |
| 4 | **MONEY, PRICES AND INFLATION** |
| | • Money Supply: Determinants of Money Supply - Factors influencing Velocity of Circulation of Money<br>• Demand for Money : Classical and Keynesian approaches and Keynes' liquidity preference theory of interest - Friedman's restatement of Demand for money<br>• Money and prices : Quantity theory of money - Fisher's equation of exchange - Cambridge cash balance approach<br>• Inflation : Demand Pull Inflation and Cost Push Inflation - Effects of Inflation- Nature of inflation in a developing economy - policy measures to curb inflation- monetary policy and inflation targeting |

**Reference Books :**


- Ackley.G (1976), Macro Economic Theory and Policy, Macmillan Publishing Co. New York
- Ahuja. H.L., Modern Economics — S.Chand Company Ltd. New Delhi.
- Blanchard Olivier (2000), Macro Economics, Englewood Elitt, Prentice Hall
- Bouman John, Principles of Macro Economics
- Dornbush, Rudiger, Fisher Stanley and Startz, Richards Macroeconomics, Nineth edition 2004 Tata-Mac Graw Hill, New Delhi.
- Dwivedi, D.N. (2001), Macro Economics: Theory and Policy, Tata-Mac Graw Hill, New Delhi.
- Friedman Hilton (1953) Essays in Positive Economics, University of Chicago Press, London.
- Gregory .N. Mankiw, Macroeconomics, Fifth Edition (2002) New York:Worth Publishers
- Jhingan, M.L., Principles of Economics — Vrinda Publications (P) Ltd.
- Shapiro, E (1996), Macro-Economic Analysis , Galgotia Publication, New Delhi.
- Vaish .M.C. (2010) Macro Economic Theory 14th edition, Vikas Publishing House(P) Ltd.


❖❖❖❖

**प्रकरण - १**

# १

# प्रस्तावना : समग्रलक्षी अर्थशास्त्र

**घटक रचना :**

१.१ प्रस्तावना
१.२ सूक्ष्म आणि समग्र अर्थशास्त्र
१.३ समग्रलक्षी अर्थशास्त्राची व्याप्ती
१.४ समग्रलक्षी अर्थशास्त्राचे महत्त्व
१.५ समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या मर्यादा
१.६ उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह
१.७ बंदिस्त अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह
  १.७.१ द्विक्षेत्रीय (दोन क्षेत्रीय) उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह
  १.७.२ त्रिक्षेत्रीय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह
  १.७.३ खुल्या (मुक्त) अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह
१.८ राष्ट्रीय उत्पन्न
१.९ राष्ट्रीय उत्पन्नाच्या व्याख्या
१.१० राष्ट्रीय उत्पन्नाच्या संकल्पना
१.११ राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन
  १.११.१ राष्ट्रीय उत्पन्न मापनाच्या पद्धती
१.१२ राष्ट्रीय उत्पन्न मापनातील अडचणी
१.१३ सारांश
१.१४ प्रश्न

## १.१ प्रस्तावना

इतर सामाजिक शास्त्रांप्रमाणेच अर्थशास्त्र हे सुध्दा एक मान्यता पावलेले सामाजिक शास्त्र असून त्यामध्ये मानवाच्या आर्थिक वर्तनाचा अभ्यास केला जातो. मानवी गरजा अमर्यादा असून त्या गरजांची पुर्तता करणारी साधने मात्र मर्यादित असल्याने मानवला आपल्या आर्थिक जीवनात अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. अशावेळी अमर्यादा गरजा व मर्यादित साधने यांचा मेळ घालून महतम समाधान मिळविण्यासाठी मानवाकडून केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचा आणि तिच्या आर्थिक वर्तणूकीचा अभ्यास अर्थशास्त्र केला जातो.

मानवाच्या या आर्थिक वर्तनाचे विश्लेषण करण्याच्या अनेक पध्दती आहेत. परंतू अर्थशास्त्रात या पध्दतींपैकी पुढील दोन पध्दती महत्वपूर्ण विश्लेषण पध्दती म्हणून मान्यता पावलेल्या आहेत.

अ) सुक्ष्म अर्थशास्त्र - (Micro Economics)
ब) समग्र अर्थशास्त्र - (Macro Economics)

## १.२ सुक्ष्म आणि समग्र अर्थशास्त्र

सुक्ष्म अर्थशास्त्रालाच अंशलक्षी, व्यष्टी किंवा वैयक्तीक अभ्यास पध्दत या नावांने ओळखले जात असून सुक्ष्म - अर्थशास्त्र ही अर्थशास्त्रीय विश्लेषणाची एक महत्वाची शाखा मानली जाते. प्रां. रॅग्नर फ्रिश यांनी १९३३ मध्ये मध्ये सर्वप्रथम सुक्ष्म व समग्र अर्थशास्त्र या शब्दप्रयोगांचा वापर केला.

सुक्ष्म किंवा अंशलक्षी अर्थशास्त्र (Micro) हा शब्द ग्रीक भाषेतील Mikros या शब्दापासून बनलेला असून त्याचा अर्थ अत्यंत लहान किंवा छोटा असा होतो. याऊलट समग्र किंवा स्थूल अर्थशास्त्र अर्थशास्त्र (Macro) हा शब्द ग्रीक भाषेतील Makros या शब्दापासून बनलेला असून त्याचा अर्थ अत्यंत मोठा, व्यापक किंवा विशाल असा होतो.

**समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या व्याख्या :-**

समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या काही महत्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) प्रा. के. इ. बोल्डिंग :-**

"समग्रलक्षी अर्थशास्त्राचा संबंध वैयक्तिक परिमाणांशी येत नाही तर ते समग्र परिमाणांशी संबंधित असते, वैयक्तिक उत्पन्नाशी नसून राष्ट्रीय उत्पन्नाशी असतो, विशिष्ट वस्तूच्या किंमतीशी येत नाही तर सर्वसाधारण किंमत पातळीशी येतो; तसेच व्यक्तिगत उत्पादनाशी नसून राष्ट्रिय उत्पादनाशी येतो."

**२) प्रा. गार्डनर :-**

"समग्रलक्षी अर्थशास्त्र हे आर्थिक परिमाणांचा समग्र पातळीवर विचार करुन ते आर्थिक जीवनाच्या समग्र बाबींशी संबंधित असते."

**३) प्रा. मॅकॉनेल :-**

"देशाच्या अर्थव्यवस्थेच्या रचनेची सर्वसाधारण रुपरेषा आणि ज्या प्रमुख समग्रांची मिळून अर्थव्यवस्था तयार झालेली असते त्या समग्रांमधील संबंध यांच्याशी समग्रलक्षी अर्थशास्त्राचा संबंध येतो."

**समग्रलक्षी अर्थशास्त्राची वैशिष्टये :-**

वरील व्याख्यांच्या सहाय्याने स्थूल अर्थशास्त्राची पूढील वैशिष्टये दिसून येतात.

१) समग्रलक्षी अर्थशास्त्रात संपूर्ण अर्थव्यवस्थेचा समग्रपणे अभ्यास केला जातो.

२) समग्रलक्षी अर्थशास्त्र हे सर्वसाधारण समतोलावर आधारित असते.

३) समग्रलक्षी अर्थशास्त्रात वैयक्तिक चलांच्या (Variables) अभ्यासाला महत्व नाही.


४) समग्रलक्षी अर्थशास्त्र हे अधिक व्यापक आहे.

५) समग्रलक्षी अर्थशास्त्रात एकूणाचा अभ्यास केला जातो.

## १.३ समग्रलक्षी अर्थशास्त्राची व्याप्ती (SCOPE OF MACRO ECONOMICS)

व्याप्तीच्या दृष्टीने सुद्धा सुक्ष्म अर्थशास्त्र व समग्र अर्थशास्त्र यात मुलभूत फरक आहे. सुक्ष्म अर्थशास्त्रात एका घटकाचा एका व्यक्तीच्या उत्पन्न, उपभोग, राहणीमान, बचत, गुंतवणूक पातळीचा तसेच एका वस्तूचे उत्पादन किंमत इ. विचार व अभ्यास केला जातो तर समग्र लक्षी अर्थशास्त्रात देशाचे एकूण उत्पादन, उत्पन्न, बचत गुंतवणूक किंमत एकूण राजकोषीय धोरण, मौद्रीक धोरण, अंतरराष्ट्रीय व्यापार इ. चा व्यापक स्वरुपात अभ्यास केला जातो. अशा समग्र अर्थशास्त्राची व्याप्ती पुढील तक्त्याद्वारे अधिक स्पष्ट करता येईल.

**समग्रलक्षी अर्थशास्त्राची व्याप्ती**




समग्रलक्षी अर्थ शास्त्राच्या व्याप्ताचे सविस्तर स्पष्टीकरण पुढील प्रमाणे देता येईल.

### १. उत्पन्न व रोजगार सिद्धांत:

समग्रलक्षी अर्थशास्त्रात देशातील उत्पन्न पातळी व रोजगार पातळीचा अभ्यास करतांनी ती कशावर अवलंबून असते व तीच्या मध्ये कशामूळे बदल होतात याचा विचार केला जातो. या शिवाय उपभोग, गुंतवणूक फलन यांचा ही अभ्यास केला जातो. तसेच या अंतर्गत येणारे व्यापारचक्राचे सिद्धांत ही उत्पन्न व रोजगार विषयक सिद्धांताचा भाग ठरतात.

### २. सामान्य मुल्य स्तराचा सिद्धांत:

ज्यात मुद्रामुल्याचे सिद्धांत तसेच चलनवाढ, चलनघट, इ. चा ही अभ्यास केला जातो.

**३. आर्थिक विकासाचे सिद्धांत:**

साधारणत: दुसऱ्या महायुद्धानंतर विकासाचे अर्थशास्त्र ही एक नवीन शाखा विकसीत झाली. ह्या अंतर्गत विकसनशील देश व विकसीत देशा संदर्भात लागू पडणाऱ्या आर्थिक विकास व अधिक वृद्धीच्या अनेक प्रश्नांचा अभ्यास यात केला जातो.

**४. समष्टी वितरण सिद्धांत:**

राष्ट्रीय उत्पन्नाचे उत्पादनाच्या चारही घटकात म्हणजे भूमी, श्रम, भांडवल व संयोजन यामध्ये खंड, वेतन, व्याज आणि नफा या स्वरुपात कशा प्रकारे विभाजन केले जाते म्हणजे उत्पादन घटकांना मिळणारे मोबदले ठरविण्यासाठी समग्रलक्षी अर्थशास्त्र उपयोगी पडते.

**५. आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धांत:**

आंतरराष्ट्रीव्यापार सिद्धांतांची चर्चासुद्धा समग्रलक्षी अर्थव्यवस्थेत होत असताना दिसून येते.

या शिवाय व्यवहारतोल व विनिमयदर देशात आर्थिक वृद्धी कोणत्या घटकांमुळे घडून येऊ शकते. या संदर्भात सुद्धा योग्य विश्लेषण समग्रलक्षी अर्थशास्त्रात केले जाते.

**६. व्यवहारतोल आणि विनिमय दर:**

एका विशिष्ट कालखंडात एका देशाने इतर देशांबरोबर केलेल्या दृश्य वस्तू व अदृश्य सेवांच्या आयात निर्यातीचा व्यवहार यांचा समावेश यात होतो. व्यवहारतोल तुटीचा आहे की वाढाव्याचा त्यावरुन त्यांच्या व्यवहाराची दिशा ठरत असते. अर्थात व्यवहारतोलावर विनिमय दराचा प्रभाव पडतो. विनिमय दर म्हणजे दोन देशातील चलनांची ज्या दराने देवाण घेवाण होते. तो दर होय. या सर्व बाबींचा अभ्यास समग्रलक्षी अर्थशास्त्रात होतो.

**७. आर्थिक वृद्धी:**

आर्थिक वृद्धी आणि वृद्धी विषयक सिद्धांत हा सुद्धा समग्रलक्षी अर्थशास्त्राचा महत्त्वाचा अभ्यास विषय आहे. अर्थात विकसनशील देशांबाबतीत हे सिद्धांत आर्थिक विकासाचे सिद्धांत म्हणून ओळखले जातात.

अशा प्रकारे समग्रलक्षी अर्थशास्त्र समग्र पातळीवर अनेक बाबीचा अभ्यास करते. परिणामी ह्या अर्थशास्त्राची व्यापकता खूप अधिक आहे.

## १.४ समग्रलक्षी अर्थशास्त्राचे महत्त्व (IMPORTANCE OF MACRO ECONOMICS):

**१. सरकारला उपयुक्त:**

देशाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाला अनेक प्रकारची धोरणे राबवावी लागतात. सरकारला आर्थिक धोरण निश्चित करतांना एका विशिष्ट एककाचा विचार न करता एकूण समूहाचा विचार करावा लागतो. समग्रलक्षी अर्थशास्त्रात सर्व एककांचा सामुहीक विचार व अभ्यास केला जात असल्यामुळे आर्थिक धोरण ठरवितांना सरकारला त्याचा उपयोग होतो.

**२. संचालन समजून घेणे:**

सूक्ष्म अर्थशास्त्रात वैयक्तिक पातळीवर एक एक घटकांचा अभ्यास केला जात असल्यामुळे संपूर्ण अर्थव्यवस्थेचे स्वरुप समजू शकत नाही. परंतु समग्रलक्षी अर्थशास्त्रात सर्वच एककांचा एकत्रित अभ्यास केला जात असल्याने अर्थव्यवस्थेचे संचालन संपूर्णपणे समजून घेण्यासाठी मदत होते.

**३. सूक्ष्म अर्थशास्त्रास उपयुक्त:**

सूक्ष्म अर्थशास्त्रात अभ्यासले जाणारे नियम हे समग्रलक्षी अर्थशास्त्रावर आधारित आहेत. उदा. सूक्ष्म अर्थशास्त्रातील मागणीचा नियम मांडताना प्रामुख्याने समाजातील अनेक व्यक्तींच्या मागणीचा अभ्यास करावा लागतो आणि आढळणाऱ्या या सर्वसामान्य प्रवृत्तीवरुन मागणीचा नियम तयार केला गेला. अर्थात नियमाची पडताळणीसुद्धा समुहाच्या अनुभवावरच आधारित असते. अशा प्रकारे समग्रलक्षी अर्थशास्त्र सूक्ष्म अर्थशास्त्रास मदत करते.

**४. विश्लेषण अधिक उपयुक्त:**

सूक्ष्म अर्थशास्त्राच्या अभ्यासातर्गत काही संकल्पनांचे स्पष्टीकरण हे अवास्ताविक गृहीतावर आधारित दिसून येते. उदा.. पूर्ण रोजगार, पूर्ण स्पर्धा इ. परंतु समग्रलक्षी अर्थशास्त्रात संपूर्ण आर्थिक घटकांचा एकत्र अभ्यास केला जात असल्याने त्यांचा पाया अवास्तव गृहीतावर नसल्याने ते विश्लेषण अधिक उपयुक्त ठरते.

**५. राष्ट्रीय प्रश्न सोडविण्यासाठी:**

समग्रलक्षी अर्थशास्त्र देशातील सर्वच बाबींचा एकत्रितपणे अभ्यास करीत असल्यामुळे देशाला भेडसावणारे विविध प्रश्न समस्या उदा. व्यापार चक्र, बेरोजगारी, घटते. राष्ट्रीय उत्पन्न इ. प्रश्न सोडविण्यासाठी विविध उपायात्मक मार्ग सुचविण्याचे कार्य समग्रलक्षी अर्थशास्त्र करते.

**६. अर्थव्यवस्थेच्या कामगिरीचे मूल्यमापन:**

समग्रलक्षी अर्थशास्त्रामुळे देशाचे एकूण राष्ट्रीय उत्पन्न किती आहे, त्याचे अर्थव्यवस्थेतील विविध उत्पन्न गटातील लोकांमध्ये कशा पद्धतीने विभाजन झालेले आहे हे समजून घेता येत असल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नाच्या सहाय्याने अर्थव्यवस्थेच्या कामगिरीचे मूल्यमापन शक्य होते.

**७. विरोधाभासाचे स्पष्टीकरण:**

सूक्ष्म अर्थशास्त्रात वैयक्तिक पातळीवर काढलेले निष्कर्ष हे पूर्णपणे समग्रलक्षी अर्थशास्त्रात जसेच्या तसे लागू पडत नाहीत. उलट यातून विरोधाभास स्पष्ट करण्याचे काम समग्रलक्षी अर्थशास्त्र करते. उदा. सूक्ष्म लक्षी अर्थशास्त्रानुसार एका उद्योगसंस्थेच्या बाबतीत रोजगार वाढ करतांना वेतन कपात करुन जास्तीत जास्त लोकांना रोजगार पुरविणे शक्य असते. परंतु समग्रलक्षी पातळीवर पूर्ण देशातील उद्योगधंद्यातील वेतन कपात केल्याने रोजगार वाढण्याऐवजी घटण्याची शक्यता अधिक असते. अशा प्रकारचा विरोधाभास अधिक चांगल्याप्रकारे स्पष्ट करण्याचे कार्य समग्रलक्षी अर्थशास्त्र करते.

### ८. आर्थिक स्थैर्य:

अर्थव्यवस्थेच्या गतिशील विकासासाठी आर्थिक स्थैर्याची आवश्यकता असते. त्यासाठी आर्थिक समस्या सोडविणे गरजेचे असते. समग्रलक्षी अर्थशास्त्राने जागतिक महामंदीनंतरच्या काळात आर्थिक समस्या सोडविण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.

### ९. व्यावसायिकांना उपयुक्त:

देशातील एकूण व्यावसायिक पर्यावरणावर देशातील एकूण रोजगार, राष्ट्रीय उत्पन्न, एकूण मागणी, व्यापार चक्रातील तेजी तसेच मंदी, देशाचे मौद्रीक धोरण तसेच राजकोषीय धोरण इ. चा परिणाम होत असतो. अर्थात या सर्वाबाबत पूर्व अंदाज बांधून व्यावसायिक प्रगती साधण्यासाठी समग्रलक्षी अर्थशास्त्र उपयुक्त ठरते.

### १०. आर्थिक विकास:

समग्रलक्षी अर्थशास्त्रात देशातील एकूण साधनसामग्रीची उपलब्धता, त्यांची कार्यक्षमता, देशातील एकूण उत्पन्न, उत्पादन, रोजगार यात वाढ करण्याच्या दृष्टीने योजनांची आखणी व अमंलबजावणी विकासात्मक धोरणांच्या प्रकल्पांची आखणी, अंमलबजावणी इ. गोष्टी आर्थिक विकासाची पातळी वाढवितात.

एकूणच समग्रलक्षी अर्थशास्त्रामुळे संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या सर्वांगीण बाबीचे ज्ञान होऊन अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी आर्थिक धोरणांची आखणी व अंमलबजावणी करणे तसेच विविध समस्यांवर उपाय सुचविणे व त्या सोडविणे शक्य होते.

## १.५ समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या मर्यादा (LIMITATIONS OF MACRO ECONOMICS)

### १. अतिसामान्यीकरण:

वैयक्तिक पातळीवरील अनुभवांचे अतिसामान्यीकरण केल्यास निघणारे निष्कर्ष हे विरोधाभासात्मक ठरतात. कारण एका व्यक्तीबाबत एखादी बाब योग्य असली तरी ती संपूर्ण समुहाला तशीच फायदेशीर ठरेल असे नाही. उदा. एका उद्योगसंस्थेतील मजुरीचा दर कमी करुन रोजगार वाढविता येईल. परंतु सर्वच उद्योगसंस्थातील म्हणजेच उद्योगधंद्यातील श्रमिकांची मजूरी कमी केल्यास त्याचा उलट परिणाम होऊन उत्पन्न कमी होऊन त्यांची मागणी कमी . परिणामी उत्पादन कमी व बेरोजगारी वाढेल.

### २. समुहाच्या रचनेकडे दुर्लक्ष:

समुहातील प्रत्येक एकक हा दुसऱ्याहून भिन्न असतो. अशा वेळी समग्रलक्षी अर्थशास्त्राचे निर्णय वैयक्तिक एककाच्या संदर्भात चूकीचे ठरतात. उदा. वैयक्तिक पातळीवर बचत करणे हा गुण ठरतो. परंतु सामुहीक पातळीवर मोठ्या प्रमाणात बचत केली गेली तर बाजारातील एकूण मागणी कमी होऊन मंदीची परिस्थिती निर्माण होऊ शकते.

### ३. सारख्याच प्रभावाचा अभाव:

तेजीच्या काळात वाढत्या किंमतीमुळे उपभोक्त्याला जरी तोटा होत असला तरी उत्पादक व व्यापारी यांना फायदा होतो. म्हणजेच सामुहिक प्रवृत्तीचा सर्वत्र सारखाच प्रभाव पडत नाही.

**४. विवेचनात अडचणी:**

एकातील बदलानुसार संपूर्ण प्रवृत्तीचे मोजमाप करणे अडचणीचे असते. परिणामी समग्रलक्षी पद्धतीचे विवेचन करणे अडचणीचे जाते.

**५. चुकीचे निष्कर्ष:**

काही वेळा सामुहीक अभ्यासातून काढलेले निष्कर्ष हे नवीन धोरण योजनांची आवश्यकता नाही असे दर्शवितात. परंतु प्रत्यक्षात मात्र त्यांची आवश्यकता असते. उदा. शेतमालाच्या किंमती १०टक्के कमी झाल्या तर उद्योगातील मालाच्या किंमती १०टक्के वाढल्या तर सामान्य मूल्यस्तरावर परिणाम न झाल्यामुळे समग्रलक्षी विश्लेषणानुसार नवीन धोरणाची आवश्यकता भासणार नाही. परंतु प्रत्यक्षात मात्र अशा परीस्थितीत शेतकऱ्याच्या मदतीसाठी शासनाला नवीन धोरण व योजना स्विकारणे आवश्यक ठरते.

**६. सांख्यीकीय अडचणी:**

समग्रलक्षी अर्थशास्त्राचा अभ्यास हा मोठ्या प्रमाणात सांख्यिकीय माहितीदर आधारीत असतो. विशेषत: विकसनशील देशांमध्ये अशा प्रकारची माहिती अचूक व वेळेवर मिळणे खूप अडचणीचे जाते. परिणामी समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या योग्य व कार्यक्षम वापरावर मर्यादा पडतात.

## १.६ उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह

कोणत्याही उत्पादनाच्या प्रक्रियेत वस्तू व सेवांच्या निर्मितीसाठी श्रम, भूमी, भांडवल आणि संयोजक या उत्पादनाच्या घटकांची आवश्यकता बासते, मोबदल्यात त्यांना अनुक्रमे वेतन, खंड, व्याज आणि नफा मिळते. अर्थव्यवस्थेत उत्पादन संस्था आणि कुटुंबसंस्था या दोन संस्था असून उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह हा या दोन संस्थांमध्ये परस्पर फिरत असतो. तथापी उत्पन्नाचा हा चक्राकार प्रवाह मुक्त आणि बंदिस्त अर्थव्यवस्थेत कशा प्रकारे फिरतो हे पुढीलप्रकारे स्पष्ट करता येईल.

## १.७ बंदिस्त अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह


बंदिस्त अर्थव्यवस्था असतांना उत्पन्नाचा चक्रिय प्रवाह हा पुढील दोन प्रकारे सतत फिरत राहतो.

### १.७.१ द्विक्षेत्रीय (दोन क्षेत्रीय) उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह :-

द्विक्षेत्र म्हणजेच अर्थव्यवस्थेतील कुटुंबसंस्था आणि उत्पादन संस्था ही दोन महत्वाची क्षेत्रे असून कुटुंबसंस्थेकडून उत्पादन संस्थेकडे वस्तू व सेवांची मागणी केली जाते व उत्पादन संस्था कुटुंबसंस्थांना वस्तू व सेवांची निर्मिती करुन त्यांची किंमत स्वीकारुन वस्तू - सेवांचा पुरवठा करतात.

त्याचवेळी उत्पादन संस्थांना वस्तू - सेवांच्या निर्मितीसाठी श्रम, भूमी, भांडवल व संयोजक हे उत्पादनाचे घटक आवश्यक असतात. हे घटक कुटुंबसंस्था उत्पादन संस्थाकडे पुरवितात. त्यांच्या मोबदल्यात अनुक्रमे वेतन, खंड, व्याज आणि नफा अशी उत्पादन संस्था किंमत देत असतात.

म्हणजेच राष्ट्रीय उत्पन्न कुटुंबसंस्थेनेकडून उत्पादन संस्थांकडे आणि उत्पादन संस्थांकडून पुन्हा कुटुंबसंस्थेकडे सतत प्रवाहीत होत असतो. म्हणूनच त्याला द्विक्षेत्रीय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह असे म्हणतात. उत्पन्नाचा हा चक्राकार प्रवाह पुढील प्रमाणे दर्शविता येईल.




**आकृती क्रमांक १.१**

**द्विक्षेत्रीय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह**


वरील आकृतीव्दारे असे दिसून येते की कुटुंबसंस्था उत्पादन संस्थांना श्रम, भूमी, भांडवल आणि संयोजक हे उत्पादनाचे घटक पुरवितात तर त्यांना मोबदल्याच्या स्वरुपात उत्पादन संस्था अनुक्रमे वेतन, खंड, व्याज आणि नफा देतात. तसेच उत्पादन संस्था वस्तू - सेवांची निर्मिती करतात व ते कुटुंबसंस्थांना पुरवितात तर त्यांची किंमत कुटुंबसंस्था उत्पादन संस्थांना देत असतात.

अशा प्रकारे कुटुंबसंस्था आणि उत्पादन संस्था यांमध्ये उत्पन्नाचा प्रवाह चक्राकार स्वरुपाने सतत सुरु राहतो.

### १.७.२ त्रिक्षेत्रीय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह :-

द्विक्षेत्रीय अर्थव्यवस्थेत कुटुंबसंस्था आणि उत्पादन संस्था यांच्यात उत्पन्नाचा प्रवाह सतत चक्राकर स्वरुपात सुरू असतो. परंतू त्रिक्षेत्रीय अर्थव्यवस्थेत कुटुंबसंस्था आणि उत्पादन संस्था याबरोबरच शासनसंस्थांचा देखिल समावेश होतो.

उत्पन्नाचा हा चक्राक्रार प्रवाह वरील ३ क्षेत्रांमध्ये कसा प्रवाहीत होते ते पुढील आकृतीद्वारे स्पष्ट करता येईल.




**आकृती क्रमांक १.२**

**त्रिक्षेत्रीय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह**

वरील ३ क्षेत्रामार्फत उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह कशा पध्दतीने प्रवाहीत होतो हे पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

### अ) कुटुंबसंस्था :-

कुटुंबसंस्था उत्पादन संस्थांकडे श्रम, भूमी, भांडवल व संयोजक हे उत्पादनाचे घटक पुरवितात त्या मोबदल्यात उत्पादन संस्था त्यांना वेतन, खंड, व्याज व नफा देतात. आपल्या नफ्यापैकी काही रक्कम ते बँका किंवा वित्तीय संस्थांमध्ये बचतीच्या स्वरुपात गुंतवितात व विशिष्ट मर्यादेपेक्षा अधिक उत्पन्नावर सरकारकडे कर (Tax) भरतात. शासन संस्था देखिल कुटुंबसंस्थांना वेतन व हस्तांतरीत उत्पन्नदेखिल प्राप्त होत असते.

### ब) उत्पादन संस्था :-

उत्पादन संस्था कुटुंबसंस्थांकडून होत असलेल्या उत्पादनाच्या घटकांचा खंड, वेतन, व्याज, नफा देतात तसेच उत्पादन संस्था निर्माण करीत असलेल्या वस्तू सेवाचा कुटुंबसंस्था व शासन संख्यांना पुरवठा करतात व त्यांच्या मोबदल्यात वस्तू सेवांची किंमत स्वीकारतात.

बँका, वित्तीयसंस्था यांच्या मार्फत उत्पादन कार्यासाठी अवश्यक भांडवलाची उभारणी केली जाते व मर्यादापेक्षा जास्त नफ्यावर सरकारकडे करांचा भरणा करतात. बदल्यात शासन देखिल त्यांच्याकडून वस्तू सेवांची खरेदी करुन वस्तू-सेवांची किंमत उत्पादन संस्थांना देत असतात.

### क) शासनसंस्था :-

शासनसंस्था कुटुंबसंस्थेकडून उत्पादनाचे घटक होते बदल्यात त्यांना वेतन, मजूरी, निवृत्ती वेतन, हस्तांतरीत उत्पन्न देते. तसेच कुटुंबसंस्थेच्या अतिरिक्त उत्पन्नावर कर (Tax) आकारते.

शासनसंस्था उत्पादन संस्थेकडून वस्तू व सेवांसाठी मागणी करते तसेच उत्पादन संस्थाकडून अतिरिक्त नफ्यावर करांची आकारणी केली जाते.

### १.४.३ खुल्या (मुक्त) अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह


वरील व्दिक्षेत्रीय आणि त्रिक्षेत्रीय प्रतमान बंदिस्त अर्थव्यवस्थेतील प्रतिमान मानले जाते कारण या प्रतिमानात फक्त एकाच देशातील कुटुंबसंस्था उत्पादनसंस्था आणि शासनंस्थांच्या विचार करण्यात आलेला आहे.

परंतु आधूनिक अर्थतज्ञांच्या मते सध्या जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरणाच्या काळात देशा-देशांमधील परस्पर संबंध अधीक व्यापक व गुंतागुंतीचे बनलेले असून या परिस्थितीमध्ये विदेशी व्यापाराचा समावेश केल्याशिवाय उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहाचे विश्लेषण करणे अशक्य आहे. म्हणजेच मुक्त अर्थव्यवस्थेच्या परिस्थितीत कुटुंबसंस्था, उत्पादन संस्था, शासनसंस्था या बरोबरच परकीय क्षेत्राचा देखील समावेश होतो. म्हणूनच त्याला चतु:क्षेत्रीय प्रतिमान (Four Sector Model) असेही म्हणतात.

**व्याख्या :-**

"जेव्हा उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहामध्ये स्वदेशातील आर्थिक व्यवहारांबरोबरच विदेशी / परकीय देशाबरोबर होणाऱ्या आयात व निर्यातीचा समावेश होतो. तेव्हा त्याला खुल्या (मुक्त) अर्तव्यवस्थेतील चतु:क्षेत्रिय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह असे म्हणतत."

चतु:क्षेत्रीय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह पुढील आकृतीद्वारे स्पष्ट करता येईल.




**आकृती क्रमांक १.३**

**चतु : क्षेत्रीय खुल्या अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह**

## १.८ राष्ट्रीय उत्पन्न (NATIONAL INCOME)

राष्ट्रीय उत्पन्न ही प्रवाही संकल्पना असून स्थूल अर्थशास्त्रात (MacroEconomics) राष्ट्रीय उत्पन्नाचे विश्लेषण महत्त्वाचे असते. साधारणतः एका वर्षात तयार होणाऱ्या वस्तू व सेवांचे दुहेरी मोजमाप न होऊ देता केलेले मापन म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न असते. भारतात १ एप्रील ते ३१ मार्च पर्यंत आर्थिक वर्ष मोजले जात असून याच कालखंडात देशात विविध क्षेत्रातून निर्माण होणाऱ्या सर्व वस्तु व सेवांची मोजणी करुन राष्ट्रीय उत्पन्न काढले जाते. साधारणतः औद्योगिक वस्तु म्हणजे फॅन, टेबल, खुर्ची, ऊ.ऱ., फ्रीज, मोटारगाडी इत्यादींना समजले जाते. तर शेती वस्तु म्हणजे गहुं, ज्वारी, बाजरी, तांदुळ, मका वगैरे असतात आणि सेवा म्हणजे शिक्षण, दळणवळण वाहतूक, बँका, विमाकंपन्या इत्यादीना म्हटले जाते. या सर्व वस्तु आणि सेवांची एका विशीष्ट कालखंडातील मोजणी म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय. म्हणून राष्ट्रीय उत्पन्न ही संकल्पना स्थुल अर्थशास्त्रात महत्त्वपूर्ण मोजली जाते. राष्ट्रीय उत्पन्नावरुन आपल्याला आपल्या देशाची प्रगती व इतर देशांची प्रगती यांची तुलना करता येते. देशांतील एकूण मागणी एकूण पुरवठा, एकूण रोजगार, एकूण उत्पन्न एकूण खर्च व एकूण उत्पादन समजते. राष्ट्रीय उत्पन्न हा आर्थिक विकासाचा एक महत्त्वपूर्ण निकष असतो. त्यावरुन आपल्या देशातील लोकांच्या राहणीमानाची कल्पना येते. शेती, उद्योग व सेवा क्षेत्रातून किती उत्पन्न प्राप्त झाले हे समजते. राष्ट्रीय उत्पन्न व दर डोई उत्पन्नावरच देशाचा आर्थिक विकास अवलंबून असतो.

स्वातंत्र्य पूर्व काळात दादाभाई नौरोजी, शाह आणि खांबाटा, फिंडले, शिरास, वाडिया आणि जोशी, डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव आणि आर. सी. देसाई इत्यादीनी राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन केले होते. दादाभाई नौरोजींच्या मते स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात दरडोई उत्पन्न २० रुपये होते. स्वातंत्र्यानंतर १९५०-५१ मध्ये ते २५५ रुपये एवढे झाले. तर २०११-१२ मध्ये ते ६०,००० रुपयापेक्षा अधिक होते. थोडक्यात राष्ट्रीय उत्पन्नावरुन अनेक प्रश्नांची उकल होते. म्हणून राष्ट्रीय उत्पन्न हा समग्रलक्षी अर्थ शास्त्रातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण घटक होय.

## १.९ राष्ट्रीय उत्पन्नाच्या व्याख्या (DEFINITIONS OF NATIONAL INCOME)

### १) डॉ. मार्शल:

''प्रतिवर्षी एखाद्या देशातील श्रम व भांडवल या नैसर्गीक साधनसामग्रीच्या सहाय्याने मूर्त आणि अमूर्त अशा वस्तू व सेवांचे जे एकूण उत्पादन केले जाते. ते राष्ट्रीय उत्पन्न होय.''

### २) प्रा. पिगू:

''देशातील उत्पादनापैकी ज्या उत्पादनाचे मोजमाप पैशाच्या स्वरुपात केले जाते त्याला राष्ट्रीय उत्पन्न असे म्हणतात अर्थात या मध्ये परकीय देशामधून मिळावीलेल्या उत्पन्नाचाही समावेश होतो.''

### ३) प्रा फिशर:

''विशिष्ट काळातील देशातील लोकांनी प्रत्यक्ष उपभोगलेल्या वस्तु आणि सेवा म्हणजे त्या देशाचे त्या वर्षाचे राष्ट्रीय उत्पन्न होय.''

**४) राष्ट्रीय उत्पन्न समीती:**

''एका विशिष्ट कालखंडात देशात तयार होणाऱ्या वस्तु व सेवा यांचे दुहेरी मोजमाप न होऊ देता केलेले मापन म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय.'' या समितीमध्ये प्रा. पी.सी. महालनोबीस प्रा. गाडगीळ, डॉ. व्ही. के आर. व्ही. राव यांचा समावेश होता.

**५) डॉ. कोलीन क्लार्क:**

''राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे एका विशिष्ट काळात उत्पादन केल्या जाणाऱ्या वस्तु व सेवा यांचे दुहेरी मापन टाळून पैशात काढलेले मुल्य होय.''

याशिवाय कुझनेट प्रा. सॅम्युएलसन डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव इत्यादीनी देखील राष्ट्रीय उत्पन्नाच्या व्याख्या दिलेल्या आहेत.

## १.१० राष्ट्रीय उत्पन्नाच्या संकल्पना (CONCEPTS OF NATIONAL INCOME)

राष्ट्रीय उत्पन्न ही संकल्पना साठा नसून प्रवाही आहे. त्यामध्ये सातत्याने बदल होत असतो. एका विशीष्ट कालखंडात ते मोजले जाते. देशात तयार होणाऱ्या एकूण वस्तू व सेवांचे मापन केल्यास एकूण उत्पादन प्राप्त होते. त्या एकूण उत्पादनाचे पैशात मूल्य व्यक्त केल्यास ते एकूण राष्ट्रीय उत्पन्न प्राप्त होते. तर देशातील एकाचा खर्च हे दुसऱ्याचे उत्पन्न असते. म्हणून असे म्हटले जाते. एकूण उत्पादन्ꣳ एकूण उत्पन्नꣳ एकूण खर्च होय. राष्ट्रीय उत्पन्नाच्या संकल्पना पुढील प्रमाणे.

१) स्थूल राष्ट्रीय उत्पादन (GNP)
२) निव्वळ राष्ट्रीय उत्पादन (NNP)
३) स्थुल देशांतर्गत उत्पादन (GDP)
४) निव्वळ देशातंर्गत उत्पादन (NDP)
५) दरडोई उत्पन्न (PCI)
६) वैयक्तीक उत्पन्न (PI)
७) व्ययशक्य उत्पन्न (DI)

**१) स्थूल राष्ट्रीय उत्पादन (Gross National product):**

एका विशिष्ट कालखंडात किंवा वर्षात देशात तयार झालेल्या वस्तु आणि सेवा यांचे दुहेरी मापन न होऊ देता केलेले मोजमाप म्हणजे स्थुल राष्ट्रीय उत्पादन होय. यालाच एकूण राष्ट्रीय उत्पादन असेही म्हणतात. स्थुल राष्ट्रीय उत्पादनात फक्त अंतीम वस्तु व सेवांचा विचार केला जातो. स्थूल राष्ट्रीय उत्पादनाचे मोजमाप करतांना घसारा (अजिर्म्रॅग्दह) विचारात घेतला जात नाही. समजा भारतात २०१०-११ मध्ये शेती, उद्योग, व्यापार, दळणवळण, वाहतूक बँका व इतर सर्व क्षेत्रातून २५ लाख कोटी रुपये किंमतीच्या वस्तु व सेवांची निर्मिती झाली असेल तर भारताचे एकूण राष्ट्रीय उत्पन्न २५ लाख कोटी रुपये होय. वस्तुच्या किंमतीतील वाढ किंवा घटीमुळे हा आकडा कमी जास्त होत असतो. स्थुल राष्ट्रीय उत्पादनात देशातील वस्तु व सेवांबरोबरच देशाच्या नागरीकांनी देशाच्या बाहेर उत्पादन केलेल्या वस्तु व सेवा यांचाही समावेश केला जातो. याशिवाय परकीय देशात केलेल्या गुंतवणूकीपासून मिळालेल्या उत्पन्नाचा आणि

परकीय नागरीकांना पुरवीलेल्या सेवा व त्यापासून मिळालेल्या उत्पन्नाचा समावेश एकूण राष्ट्रीय उत्पादनात केला जातो. अर्थात परकीय देशातून मिळालेले उत्पन्न धन किंवा ऋण देखील असू शकते. स्थूल राष्ट्रीय उत्पन्न हे सूत्रारुपाने पुढील प्रमाणे मांडता येईल.

GNP = GDP + Export - Import

स्थूल राष्ट्रीय उत्पादन = देशांतर्गत उत्पादन + निर्यात - आयात.

## २) निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न (Net National Income):

निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न ही देशात राष्ट्रीय उत्पन्नाची एक महत्त्वपूर्ण संकल्पना होय. देशात एका विशिष्ट कालखंडात तयार होणाऱ्या सर्व वस्तु व सेवांचा समावेश स्थुल राष्ट्रीय उत्पन्नात केला जातो. हे या सर्व वस्तु व सेवांची निर्मिती करण्यासाठी विविध प्रकारची यंत्रसामग्री, इमारती व इतर अनेक भांडवली साधनांचा वापर करावा लागतो. विशिष्ट कालावधीनंतर या भांडवली साधनांची झीज होत असते. ती झीज भरुन काढण्यासाठी विशिष्ट रक्कम बाजूला काढून ठेवावी लागते. तिला घसारा (Depreciaction) असे म्हणतात. हा घसारा स्थूल राष्ट्रीय उत्पादनातून वजा केल्यास जे उत्पन्न प्राप्त होते. त्यालाच निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न असे म्हणतात.

उदा. समजा एका विशिष्ट कंपनिच्या झेरॉक्स मशिनचे आयुर्मान १० वर्षाचे आहे आणि त्या मशीनची किंमत १,००,००० रुपये आहे तर दहा वर्षानंतर ती मशीन निकामी होऊन त्या जागी नवीन झेरॉक्स मशीन बसवावे लागेल. तेव्हा त्याच्या खरेदीसाठी प्रत्येक वर्षी रुपये १०,००० घसारा म्हणून बाजूला काढून ठेवावे लागतील. यालाच घसारा असे म्हणतात. अशा प्रकारे प्रत्येक भांडवली साधनांचा घसारा म्हणून जी रक्कम बाजूला काढून ठेवली जाते. ती स्थुल राष्ट्रीय उत्पादनातून वजा केल्यास निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न प्राप्त होते हेच आपण सुत्ररुपाने पुढील प्रमाणे दर्शवू.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न | = | स्थुल राष्ट्रीय उत्पादन | - | घसारा |
| NNP | = | GNP | - | Depreciation |

''एका विशिष्ट कालखंडात देशात उत्पादन होणाऱ्या अंतिम वस्तु व सेवांच्या एकूण उत्पादनातून घसारा वजा केल्यास जे उत्पन्न प्राप्त होते. त्याला निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न असे म्हणतात.''

## ३) स्थुल देशांतर्गत उत्पादन (Gross Domestic Product - GDP):

राष्ट्रीय उत्पन्नाची ही संकल्पना अत्यंत समर्पक असून जगातील बहुतेक देशात या संकल्पनेचा वापर केला जातो.

**व्याख्या :**

देशात एका विशिष्ट कालखंडात (आर्थिक वर्षात) देशातील सर्व उत्पादक घटकांच्या साह्याने देशाच्या भौगोलीक सीमारेषेच्या आत उत्पादित केलेल्या वस्तु व सेवा यांचे पैशातील मुल्य म्हणजे स्थुल देशांतर्गत उत्पादन होय.

म्हणजेच देशाच्या भौगोलीक सिमारेषेच्या आत देशातील व परकीय नागरीकांनी निर्माण केलेल्या वस्तु व सेवा यांचे एकूण मुल्य म्हणजे स्थूल देशांतर्गत उत्पादन होय.

हेच आपण सुत्ररुपाने पुढीलप्रमाणे स्पष्ट करु.

**स्थूल देशांतर्गत उत्पादन = स्थूल राष्ट्रीय उत्पादन - भारतीय नागरीकांचे विदेशातील उत्पादन मुल्य + विदेशी नागरिकांचे भारतातील उत्पादन मुल्य होय.**

म्हणजेच स्थूल देशांतर्गत उत्पादन म्हणजे स्थुल राष्ट्रीय उत्पादनातून भारतीय नागरीकांनी विदेशातून मिळवीलेले उत्पन्न वजा केले जाते तर विदेशी नागरीकांनी भारतात निर्माण केलेले उत्पन्न जमा केले जाते. उञ्ञ ही संकल्पना अलीकडील काळात अत्यंत महत्त्वपूर्ण मानाली जात असून अर्थशास्त्रज्ञ, प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी, राज्यकर्ते, बँका, व वित्तीय संस्था या संकल्पनेचा वापर मोठ्या प्रमाणावर करतात. या संकल्पनेमुळे देशाच्या वास्तव स्थितीचे दर्शन घडते.

### ४) निव्वळ देशातंर्गत उत्पादन (Net Domestic Product NDP):

स्थुल राष्ट्रीय उत्पादन उञ्ञ असो किंवा स्थुल देशांतर्गत उत्पादन GDP असो या दोन्ही उत्पादनात घसारा हा महत्त्वाचा असतो. ज्या प्रमाणे स्थुलराष्ट्रीय राष्ट्रीय उत्पादनातून घसारा वजा केल्यास निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न (NNP) मिळते. अगदी त्याच प्रमाणे स्थुल देशांतर्गत उत्पादनातून (GDP) घसारा वजा केल्यास निव्वळ देशांतर्गत उत्पादन (NDP) मिळते म्हणून सुत्ररूपाने हे पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| NDP | = | GDP | - | D |
| निव्वळ देशांतर्गत उत्पादन | = | स्थुल देशांतर्गत उत्पादन | - | घसारा |

घसारा म्हणजे भांडवली साधनांची झीज झाल्यास त्याची पूनर्स्थापना करण्यासाठी सुरवातीपासून केलेली विशिष्ट तरतूद होय. भांडवली साधनाच्या उत्पादनातू विशिष्ट रक्कम दरवर्षी बाजूला काढून ठेवली जाते. तिलाच घसारा म्हटले जाते.

### ५) दरडोई उत्पन्न (Per Capital Income PCI):

राष्ट्रीय उत्पन्नाच्या संकल्पनेतील सर्वात लोकप्रीय संकल्पना म्हणजे दरडोई उत्पन्न होय. देशातील एकूण राष्ट्रीय उत्पन्नाला देशातील एकूण लोकसंख्येने भाग दिल्यास जे उत्पन्न प्राप्त होते. त्यालाच दरडोई उत्पन्न असे म्हणतात. सुत्र रूपाने हे पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

$$\text{दरडोई उत्पन्न} = \frac{\text{एकूण राष्ट्रीय उत्पन्न}(\text{Total national Income})}{\text{एकूण लोकसंख्या}(\text{Total Population})}$$

$$PCI = \frac{NI}{TP}$$

दरडोई उत्पन्न हे आर्थिक विकासाचे एक मापदंड होय. दरडोई उत्पन्नावरुन देशातील लोकांच्या आर्थिक स्थितीची कल्पना येते. आपल्या देशातील लोकांचे दरडोई उत्पन्न व इतर देशातील लोकांचे दरडोई उत्पन्न यांची तुलना करता येते. ज्याचे उत्पन्न कमी आहे. त्यांचे उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न केला जातो. भारतात स्वातंत्र्यापुर्वी दादाभाई नौरोजीने भारताचे दरडोई उत्पन्न २० रुपये होते असे दर्शवीले होते, तर स्वातंत्र्यानंतर १९५०-५१ मध्ये दरडोई उत्पन्न २५५रुपये एवढे होते. २०११-१२ मध्ये भारताचे दरडोई उत्पन्न ६०,००० रुपयांपेक्षा जास्त आहे. म्हणजेच भारतात प्रगती होत आहे हे यावरुन स्पष्ट होते.

### ६) वैयक्तीक उत्पन्न (Personal Income PI):

राष्ट्रीय उत्पन्नातील ही देखील एक महत्त्वपूर्ण संकल्पना होय. वैयक्तीक उत्पन्नालाच व्यक्तिगत उत्पन्न असेही म्हणतात.''एका विशिष्ट कालखंडात देशातील व्यक्तिंना सर्व मार्गांनी पैशाच्या स्वरुपात मिळालेले उत्पन्न म्हणजे वैयक्तिक उत्पन्न होय.''

वैयक्तिक उत्पन्नात व्यक्तिंना मिळणारे वेतन, बँकेतील पैशावर मिळणारे व्याज, लाभांश, घर भाड्याने दिल्यास ते भाडे, जमीनीपासून मिळणारा खंड, निवृत्ती वेतन, बेकारी भत्ता व इतर सर्व मार्गानी मिळणाऱ्या उत्पन्नाचा समावेश केला जातो.

### ७) व्ययशक्य /खर्च योग्य उत्पन्न (Disposable Income):

व्यक्तीला मिळणारे सर्वच्या सर्व उत्पन्न खर्च करता येण्या जोगे नसते. व्यक्तीला विविध मार्गानी जे उत्पन्न मिळते त्या उत्पन्नावर प्राप्ती कराच्या तरतूदी प्रमाणे कर भरावा लागतो. अर्थात प्राप्ती कराचे दर उत्पन्नाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर वेगवेगळे आकारले जातात. सध्या ते दर १०टक्के, २० टक्के व ३० टक्के असे आहेत. व्यक्तीला मिळणाऱ्या एकूण उत्पन्नातून प्राप्ती कर वजा केल्यास जे उत्पन्न शिल्लक राहते त्याला खर्च करता येण्यासारखे किंवा व्ययशक्य उत्पन्न असे म्हणतात. थोडक्यात खर्च योग्य उत्पन्न म्हणजे व्यक्तीकडील असे उत्पन्न की जे त्या व्यक्तीला खर्च करता येते. म्हणजेच व्यक्तीच्या एकूण उत्पन्नातून कराची रक्कम वजा केल्यास जे उत्पन्न शिल्लक राहते. ते व्ययशक्य उत्पन्न होय.

उदा.: समजा अशोक या व्यक्तीचे २०१०-११ या आर्थिक वर्षाचे एकूण उत्पन्न ५,००,००० रुपये आहे आणि शासनाने त्यावर १०टक्के प्राप्तीकर आकारल्यास अशोकला पाच लाख रुपयांवर १०टक्के प्रमाणे ५०,००० रुपये शासनाला प्राप्तीकर भरावा लागेल म्हणजे अशोक जवळ ५,००,०००-५०,००० = ४,५०,००० शिल्लक राहतील यालाच खर्च योग्य उत्पन्न असे संबोधले जाते. हेच आपण सुत्ररुपाने पुढील प्रमाणे स्पष्ट करु.

व्यय शक्य उत्पन्न = एकूण उत्पन्न - प्राप्तीकर
Disposable Income = Total Income - Income Tax

शासनाचा कर भरल्यानंतर जे उत्पन्न शिल्लक राहते. तेवढेच उत्पन्न व्यक्तीला खर्च करता येते.

## १.११ राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन (MEASUREMENTS OF NATIONALINCOME)

विशिष्ट कालखंडात देशात तयार होणाऱ्या सर्व वस्तु व सेवा यांची दुहेरी मोजमाप न होऊ देता केलेले मापन म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय. अशी राष्ट्रीय उत्पन्नाची व्याख्या करण्यात येते. देशातील विविध घटक उदा. उत्पादक, उपभोक्ते, ग्राहक, विक्रेते, शासन, देशी व विदेशी नागरीक उद्योजक व इतर सर्व लोक सकाळी उठल्यापासून संध्याकाळी झोपेपर्यंत काहींना काही आर्थिक क्रिया करत असतात. वस्तुंचे निर्माते व विक्रेते वस्तु व सेवांची विक्री करतात. तर त्या वस्तू व सेवांच्या उपभोग घेणारे त्या खरेदी करतात. म्हणजे अर्थव्यावस्थेत आर्थिक व्यवहार सातत्याने चालू असतात. या आर्थिक व्यवहाराचे योग्य मापन करणे आवश्यक असते. म्हणजेच देशात निर्माण झालेल्या वस्तु व सेवांचे पैशातील मुल्याचे मापन करणे किंवा उत्पादनाच्या सर्व घटकांना मिळणाऱ्या मोबदल्याचे मापन करणे किंवा देशातील लोकांनी केलेल्या खर्चाचे मापन करणे आवश्यक असते. यातूनच राष्ट्रीय उत्पन्न मापनाच्या पद्धती अस्तीत्वात आल्या.

### १.११.१ राष्ट्रीय उत्पन्न मापनाच्या पद्धती (Methods of Measurements ofNational Income) :

राष्ट्रीय उत्पन्न मापनाच्या तीन प्रमुख पद्धती आहेत. त्या पुढील प्रमाणे.

१) उत्पादन पद्धत (Production Method)

२) उत्पन्न पद्धत (Income method)

३) खर्च पद्धत (Expenditare Method)

### १) उत्पादन पद्धती (Production Method):

या पद्धतीने देशातील राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना देशातील विविध क्षेत्रातून निर्माण होणाऱ्या सर्व वस्तु व सेवांचे पैशात मुल्य मोजले जाते. उदा. शेती, उद्योग, व्यापार, वाहतूक दळणवळण, सेवा, बँका, खाणकाम इत्यादी विविध क्षेत्रात निर्माण झालेल्या अंतीम वस्तु व सेवांच्या उत्पादनाची बेरीज केली जाते. यातून जे एकूण उत्पन्न प्राप्त होते, त्यातून घसाऱ्याची रक्कम वजा केली जाते. जे उत्पन्न प्राप्त होते. त्यालाच स्थुल राष्ट्रीय उत्पन्न असे म्हणतात. अर्थात स्थुल राष्ट्रीय उत्पादनात विदेशातून मिळणाऱ्या निव्वळ उत्पन्नाचा देखील समावेश केला जातो.

थोडक्यात या पद्धतीनुसार मिळणारे राष्ट्रीय उत्पन्न = देशातील सर्व क्षेत्रातील अंतीम वस्तु व सेवांच्या उत्पादनाचे मूल्य + विदेशातून मिळणारे निव्वळ उत्पन्न - घसारा होय.

उदा. भारतात २०११-१२ या आर्थिक वर्षात सर्व क्षेत्रातील अंतीम वस्तु व सेवांच्या उत्पादनाचे पैशातील अंतिम मूल्य हे ११०० कोटी रुपये आहे. तसेच भारताला विदेशातून मिळणारे निव्वळ उत्पन्न ४०० कोटी रुपये आहे आणि घसारा हा ३०० कोटी रुपये असेल तर उत्पादन पद्धतीनुसार येणारे राष्ट्रीय उत्पन्न ११०० + ४०० = १५००-३०० = १२०० कोटी रुपये होय.

थोडक्यात उत्पादन पद्धतीने राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना अंतीम वस्तू व सेवांचे मूल्य विचारात घ्यावे लागते. दुहेरी मापन टाळावे लागते. तसेच भारतीय नागरीकांनी विदेशातून

मिळवीलेले उत्पन्न मिळवावे लागते तर या स्थुल राष्ट्रीय उत्पन्नातून घसाऱ्याची रक्कम वजा करावी लागते. घसारा हा यंत्रसामग्रीचा झीज खर्च असतो.

**२) उत्पन्न पद्धती (Income Method):**

राष्ट्रीय उत्पन्न मापनाची ही दुसरी महत्त्वाची पद्धती होय. या पद्धतीनुसार देशातील सर्व व्यक्ती व संस्थाना मिळणाऱ्या उत्पन्नाची बेरीज केली जाते. थोडक्यात ''देशातील उत्पन्नाच्या सर्व घटकांना मिळणारा मोबदला म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय.'' देशात उत्पादनाचे भुमी, श्रम, भांडवल व संयोजन हे चार घटक असून यांना अनुक्रमे खंड, वेतन व्याज व नफा या स्वरुपात मोबदला प्राप्त होत असतो. म्हणून उत्पादन घटकांना मिळणाऱ्या मोबदल्याची बेरीज म्हणजे उत्पन्न पद्धतीनुसार येणारे राष्ट्रीय उत्पन्न होय. यालाच घटक खर्चानुसार राष्ट्रीय उत्पन्न असे देखिल म्हणतात. प्रा. आर. जी लिप्से यांच्या मते भुमी + श्रम + भांडवल + संयोजन उत्पादनाच्या या चारही घटकांना मिळणारा मोबदला म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय. उदा. समजा उत्पादनाच्या या चारही घटकांना अनुक्रमे ५००० + ४००० + ३००० + २००० कोटी रुपये मोबदला प्राप्त होत असेल तर एकूण राष्ट्रीय उत्पन्न = १४००० कोटी रुपये असेल. अर्थात हे राष्ट्रीय उत्पन्न विशिष्ट आर्थिक वर्षातील असेल, अर्थात यामध्ये विदेशी स्त्रोतापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा समावेश केला जातो. तर हस्तांतरण उत्पन्न वजा केला जातो.

**३) खर्च पद्धती (Expendliture method):**

राष्ट्रीय उत्पन्न मापनाची ही तिसरी पद्धती होय. या पद्धतीनुसार एका विशिष्ट आर्थिक वर्षात देशात होणाऱ्या एकूण खर्चाचे मापन केले जाते. देशातील सर्व ग्राहक, खाजगी व्यक्ती, शासकीय संस्था, उद्योग व व्यावसाय संस्था इत्यादी उपभोग व गुंतवणूकीवर खर्च करत असतात त्या सर्वांचे मापन करुन राष्ट्रीय उत्पन्न मिळते. यामध्ये प्रामुख्याने पुढील चार प्रकाराच्या खर्चाची बेरीज केली जाते.

**अ) उपभोग खर्च :**

यामध्ये वस्तु व सेवा खरेदी करण्यासाठी केलेला खर्च विचारात घेतला जातो.

**ब) खाजगी गुंतवणूक खर्च:**

देशातील उद्योग व व्यावसाय संस्थांनी आपल्या उद्योग वाढीसाठी केलेला भांडवली खर्च विचारात घेतला जातो. उदा. यंत्रासामग्री, तंत्रज्ञान, जागा इत्यादी साठी केलेला खर्च विचारात घेतला जातो.

**क) परकीय गुंतवणूक:**

आयात वस्तूंचे उत्पादन विदेशात होते. तर निर्यात वस्तु व सेवांचे उत्पादन स्वदेशात होते. म्हणून निर्यातीतून आयात वजा केल्यास जे उत्पन्न शिल्लक राहते ते निव्वळ विदेशी गुंतवणूक होय. याचा समावेश खर्च पद्धतीने राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना केला जातो.

**ड) शासकीय खर्च:**

शासन विविध वस्तू व सेवांची खरेदी करण्यासाठी खर्च करते. अर्थात हा खर्च उपभोग खर्च तसेच भांडवली खर्च देखील असतो. म्हणून शासकीय खर्चाचा राष्ट्रीय उत्पन्नात समावेश केला जातो. म्हणून खर्च पद्धतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न = उपभोग खर्च + गुंतवणुक खर्च ± परकीय गुंतवणूक + शासकीय खर्च होय.

## १.१२ राष्ट्रीय उत्पन्न मापनातील अडचणी (DIFFICULTIES IN MEASURESMENT OF NATIONAL INCOME)

एका विशिष्ट कालखंडात देशात तयार वस्तु व सेवांचे दुहेरी मापन न होऊ देता केलेले मोजमाप म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय. परंतु राष्ट्रीय उत्पन्न प्रत्यक्षात मापन करताना अनेक अडचणी येतात. देशात करोडो लोक लाखो वस्तू व सेवांची निर्मिती करतात. ते लोक साक्षर आणि निरक्षर अशा दोन्ही प्रकारचे असतात. ते आपल्या सर्वच व्यवहाराची नियमित नोंद ठेवतीलच याची शाश्वती नसते. शिवाय कर टाळणे किंवा चुकविण्यासाठी देखील उत्पन्नाची संपूर्ण माहिती दिली जात नाही. यास्तव राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना अनेक अडचणी येतात त्या पुढील प्रमाणे.

### १) वस्तू विनिमय पद्धतीचे अस्तित्वः

भारतात आजही अनेक आर्थिक व्यवहार करतांना वस्तू विनिमय पद्धतीचा वापर केला जातो. उदा. बलुतेदारी व्यावस्थेमध्ये वस्तू देवून सेवा घेतली जात असते किंवा वस्तू ठेवून वस्तू घेतली जाते. अशा वस्तुविनिमय व्यवहाराचे पैशात मापन केले जात नाही. त्यामुळे वास्तव राष्ट्रीय उत्पन्न कमी येण्याची शक्यता असते.

### २) दुहेरी मापनाची समस्या :

याचा अर्थ असा की देशातील सर्व अंतीम वस्तु व सेवांची किंमत राष्ट्रीय उत्पन्नात घेणे आवश्यक असते. परंतु अर्थव्यवस्थेत अशा अनेक वस्तु असतात की ज्यांची दोन किंवा त्यापेक्षा जास्त वेळा मोजमाप होण्याची शक्यता असते. उदा. शेतकरी कापूस व्यापाऱ्याला विकतो. व्यापारी तो कापूस कापड गिरणी मालकाला विकतो. गिरणी मालक कापड तयार करुन ग्राहकाना विकतो. म्हणजे शेतकरी, व्यापारी व गिरणीमालक अशी तीन ठिकाणी कापूस विकला गेल्यामुळे त्याचे दोन तीन वेळा मूल्य विचारात घेतले जाते त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात प्रचंड वाढ झालेले दिसून येते.

### ३) मोठे असंघटित क्षेत्रः

भारतात अनेक लघु, कुटीर व अतिलहान उद्योग संघटीत क्षेत्राकडून चालविले जातात. संघटीत क्षेत्रात चालणाऱ्या उद्योग व्यवसायाच्या उत्पन्नाची नोंद करणे शक्य असते. परंतु असंघटित क्षेत्रातील चालणारे लहान मोठे उद्योजक स्वतः आपल्या व्यवसायाची व उत्पन्नाची नोंद ठेवत नाहीत. शिवाय त्यांनी निर्माण केलेल्या एकूण उत्पादनापैकी फार मोठा भाग ते स्वतःच्या उपभोगासाठी वापरतात. उदा. शेतकरी, लघु व कुटीर उद्योजक यांनी उत्पादन केलेला माल स्वतःच्या उपभोगासाठी देखील वापरतात. म्हणून असंघटित क्षेत्रातील राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करणे अडचणीचे असते.

### ४) व्यवसायानुसार उत्पन्नाचे मापन करणे कठीण :

भारतात एकच व्यक्ती एका वर्षात वेगवेगळ्या उद्योग व्यवसायात काम करते. उदा. भारतीय शेतकरी काही दिवस शेतात काम करतो तर काही दिवस उद्योगात काम करतो तर काही दिवस इतर छोटा मोठा व्यावसाय करतो. अशा परिस्थीतीत त्याच्या उत्पन्नाची विविध व्यवसायात पाहणी करणे कठीण असते. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नाचे योग्य मापन होत नाही.

#### ५) काळा पैसा :

भारतात काळी व पांढरी अर्थव्यवस्था अस्तीत्वात आहे. काळ्या पैशाची निर्मिती चोऱ्या करणे, तस्कऱ्या करणे, उत्पन्न लपवून ठेवणे, कमी दाखवीणे यातून होते. प्रा. गुप्ता एस. यांच्या अभ्यासाप्रमाणे भारतात काळ्या पैशाचे प्रमाण जवळ जवळ ५०टक्के एवढे आहे. हा सर्व पैसा राष्ट्रीय उत्पन्न मापनात दर्शविला जात नाही. त्यामुळे एकूण राष्ट्रीय उत्पन्न कमी येते.

#### ६) विश्वसनिय माहितीचा अभाव :

भारतात राष्ट्रीय उत्पनाच्या मापनाची विश्वसनीय अशी पद्धती अस्तित्वात नाही. भारतीय सांख्यीकीय संघटना ज्या विविध भागाकडून आकडेवारी गोळा करते. त्या विभागांनी दिलेली माहिती विश्वसनीय नसते. उदा. ऊस, कापूस, धान्य या बाबत माहिती असते तर भाजीपाला व फळ प्रक्रिया बाबत माहिती उपलब्ध नसते. अनेक डॉक्टर, वकील, चार्टड अकौंटंट क्लास चालवीणारे आपल्या उत्पन्नाची योग्य ती माहिती देत नाहीत. या शिवाय छोटे-छोटे व्यावसायीक व उद्योजक आपल्या उत्पन्नाची सर्व माहीती देत नाहीत. परिणामी राष्ट्रीय उत्पन्न मापनात अनेक अडचणी येतात.

#### ७) बदली उत्पन्नाचा हस्तांतरीत उत्पन्नात समावेश केला जात नाही:

शासकीय व निमशासकीय निवृत्ती धारकांना मिळणारे निवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी व इतर प्रकारचे भत्ते यांचा राष्ट्रीय उत्पन्नात समावेश केला जात नाही. कारण हे निवृत्ती धारकांचे उत्पन्न असले तरी शासनाचा तो खर्च असतो. म्हणून अशा उत्पन्नाचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात केला जात नाही.

#### ८) अमौद्रिक व्यवहार :

ज्या वस्तु व सेवांची खरेदी विक्री पैशाच्या साह्याने केली जाते. अशा व्यवहाराचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात केला जातो. परंतु भारतात अनेक व्यवहार पैशाच्या साह्याने केले जात नाहीत. आजही ग्रामीण भागात अनेक लोक स्वतःचे घर स्वतःच तयार करतात. तर शेतकरी भाजीपाला धान्य, दुध, कुकूटपालन व्यावसाय करतात तेव्हा या सर्व वस्तू स्वतःच्या उपभोगासाठी देखील वापरतात. परंतू त्याचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात केला जात नाही.

या शिवाय राष्ट्रीय उत्पन्नाची नेमकी स्पष्ट व्याख्या कोणती ? मापनाची योग्य पद्धती कोणती ? आणि योग्य व स्पष्ट संकल्पना कोणती अशा संकल्पनात्मक अडचणी देखील येतात.

वरील प्रमाणे विविध अडचणी राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना येतात.

## १.१३ सारांश (CONCLUSION)

देशाच्या एकूण परिस्थितीचा आढावा घेण्याच्या दृष्टीने स्थूल अर्थशास्त्र महत्त्वाचे ठरते आणि अशा या स्थूल अर्थशास्त्रात राष्ट्रीय उत्पन्नाचे विश्लेषण महत्त्वाचे ठरते. देशाच्या प्रगतीचे मापन करणाऱ्या ह्या विविध संकल्पनांना खूप महत्त्व आहे.

देशाच्या प्रगतीच्या मापनाचा एक दंडक असलेल्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या मापनाच्या सुद्धा काही प्रमुख पद्धती आहेत की ज्याच्या सहाय्याने प्रगतीचा आढावा घेता येतो. परंतु भारतासारख्या देशात ह्या मापनात सुद्धा अडचणी दिसून येतात.

## १.१४ प्रश्न (QUESTIONS)

१) समग्रलक्षी अर्थशास्त्र म्हणजे काय ?

२) समग्रलक्षी अर्थशास्त्राची व्याप्ती थोडक्यात स्पष्ट करा.

३) समग्रलक्षी अर्थशास्त्राचे महत्त्व व मर्यादा थोडक्यात लिहा.

४) राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे काय ? त्याच्या विविध व्याख्या स्पष्ट करा.

५) राष्ट्रीय उत्पन्नाच्या विविध संकल्पनांवर सविस्तर चर्चा करा.

६) राष्ट्रीय उत्पन्न मापनाच्या प्रमुख पद्धती कोणत्या ?

७) राष्ट्रीय उत्पन्न मापनातील अडचणीवर भाष्य करा.

८) राष्ट्रीय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह म्हणजे काय ?

९) बंदिस्त अर्थव्यवस्थेतील द्विक्षेत्रीय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह स्पष्ट करा.

१०) बंदिस्त अर्थव्यवस्थेतील त्रिक्षेत्रीय उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहावर चर्चा करा.

११) खुल्या अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह म्हणजे काय ? या अर्थव्यवस्थेतील चतुःक्षेत्रीय चक्राकार प्रवाह स्पष्ट करा.

❖❖❖❖

# २

# व्यापार चक्रे (TRADE CYCLES)

**घटक रचना :**

२.० उद्दिष्ट्ये
२.१ व्यापार चक्रे
२.२ व्यापारचक्राची वैशिष्ट्ये
२.३ व्यापार चक्रांच्या अवस्था
२.४ ‘से’ यांचा बाजारपेठेचा नियम
  २.४.१ से यांच्या सिद्धांताची गृहीतत्त्वे
  २.४.२ से यांच्या सिद्धांतावरील टिका
२.५ सारांश
२.६ प्रश्न

## २.० उद्दिष्ट्ये

- बाजार चक्राचा अर्थ समाजवून घेणे.
- व्यापार चक्राच्या अवस्थांचा अभ्यास करणे.
- से यांच्या बाजारपेठेचा नियम सविस्तर अभ्यासणे.

## २.१ व्यापारचक्रे (TRADE CYCLES)

समग्र अर्थशास्त्रातील व्यापारचक्र ही एक महत्वाची संकल्पना असून अर्थव्यवस्थेत होणाऱ्या आर्थिक चढ-उतारांना व्यापारचक्रे असे म्हणतात. अर्थव्यवस्थेत कार्यरत असलेल्या काही गतिमान शक्ती वेगवेगळ्या प्रकारचे आर्थिक चढ-उतार निर्माण करतात. त्यांच्या वैशिष्टयांनुसार त्यांचे वेगवेगळया प्रकारांमध्ये वर्गीकरण केले जाते. अशा चक्रीय चढ-उतारांना व्यापारचक्रे असे म्हणतात.

व्यापारचक्रे ही संकल्पना समजण्यासाठी पुढील व्याख्यांचा विचार करता येईल.

**व्याख्या :-**

**१) प्रा. हॅबरलर :-**

“व्यापारचक्र म्हणजेच उत्तम किंवा वाईट व्यापाराची, तेजी किंवा मंदीच्या कालावधीतील स्थित्यंतरे (बदल) होय.”

**२) मिचेल :-**

"एकूण आर्थिक व्यवहारातील चढ-उतारांना व्यापारचक्रे असे म्हणतात."

**३) प्रा. बेनहॅम :-**

"व्यापारचक्र वैभव व भरभराटीचा असा एक कालावधी आहे की त्यानंतर मंदीचे आगमन स्वाभाविक असते."

**४) प्रा. जे. एम्.केन्स :-**

"व्यापारचक्रे म्हणजेच उच्च व्यापाराच्या परिस्थितीत दिसून येणारी वाढत्या किमती व बेकारीची स्थित्यंतरे आणि अल्प व्यापारातील घटत्या किंमती व उच्च बेकारीतील स्थित्यंतरे होय."

## २.२ व्यापारचक्रांची वैशिष्टये

व्यापारचक्रांच्या वरील विविध व्याख्यांद्वारे त्यांची वैशिष्टये किंवा गुणधर्म पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

**१) चक्रीय बदल :-**

व्यापारचक्रांचे परिणाम हे चक्रीय स्वरुपाचे असतात. तेजी नंतर मंदी व मंदीनंतर पुन्हा तेजीची परिस्थिती निर्माण होत असते. परंतू अर्थव्यवस्थेतील वेगवेगळ्या क्षेत्रांवर कमी अधिक प्रमाणात त्यांचा परिणाम होत असतो.

**२) निश्चित कालावधी :-**

व्यापारचक्रे ही एका विशिष्ट कालावधीशी संबंधीत असतात कारण तेजी आणि मंदीचे चक्र हे विशिष्ट कालावधीत पूर्ण होत असते. तेजी किंवा मंदी ही चिरकाळ टीकणारी नसते.

**३) व्यापारचक्रे लाटांप्रमाणे असतात :-**

समुद्रातील भरती - ओहोटी प्रमाणे अर्थव्यवस्थेत देखिल तेजी आणि मंदीचे चक्र सुरु असते. ज्याप्रमाणे भरतीनंतर आहोटी येते तसेच तेजीनंतर मंदी ठरलेली असते.

**४) व्यापारचक्रांची बदल सारखेच नसतात :-**

तेजी - मंदीमूळे घडून येणारे बदल सर्वत्र सारखेच दीसून येत नाही. वेगवेगळ्या क्षेत्रांवर ते वेगवेगळया प्रमाणात दीसून येतात. व्यापार चक्रांच्या अवस्थांमध्ये भांडवली वस्तूंच्या क्षेत्रात घडून येणारे बदल उपभोग्य वस्तूंच्या उदयोगांच्या क्षेत्रातील बदलांपेक्षा जास्त प्रमाणात घडून येतात.

**५) अर्थव्यवस्थेतील सर्वसाधारण घटना :-**

व्यापारचक्र ही अर्थव्यवस्थेत घडून येणारी एक सर्वसामान्य घटना असते. योग्य उपायांद्वारे त्यांचे नियमन करता येते.

**६) व्यापार चक्रांचे चढ-उतार समान नसतात :-**

व्यापारचक्रांमधील चढ-उतार हे समान दीसून येत नाही तर तेजी व मंदीमधील चढ उतार हे वेगवेगळे असू शकतात. तेजीतून मंदीकडे जाण्यासाठी लागणारा कालावधी मंद असतो. याउलट अर्थव्यवस्था मंदीतून तेजीकडे लवकर मार्गक्रमण करते.

**७) सर्व समावेशक :-**

तेजी आणि मंदी ही सर्वसमावेशक असतात. म्हणजेच ती देशाच्या सर्वच भागात अस्तित्वात असते.

**८) व्यापारचक्रे आंतरराष्ट्रीय स्वरुपाचे असतात :-**

तेजी - मंदीची चक्रे ही साथीच्या रोगाप्रमाणे एका देशातून इतर देशांमध्ये पसरतात.

**९) व्यापारचक्रांची तीव्रता सारखी नसते :-**

वर्तमानकालीन व भूतकालीन व्यापारचक्रे ही कालवधीच्या दृष्टीने समान नसतात. तसेच व्यापारचक्रांची तीव्रता ही सर्वत्र, सर्वकाळ समान नसते.

**१०) व्यापारचक्रांचे वेगवेगळे टप्पे (अवस्था) असतात :-**


व्यापार चक्रांचे तेजी, घसरण, मंदी व पुनरुज्जीवन या अवस्था क्रमाने दीसून येतात.

## २.३ व्यापार चक्रांच्या अवस्था (PHASE OF TRADE CYCLES)

'Measuring Business Cycles' या ग्रंथात प्रा. मिचेल यांनी व्यापारचक्रांच्या पुढील चार प्रमुख अवस्था सांगितल्या आहेत.

१) तेजी (Prosperity)
२) घसरण (Recession)
३) मंदी (Depression)
४) पुनरुज्जीवन (Recovery)

व्यापार चक्रांच्या या वरील अवस्था पुढील आकृतीद्वारे समजून घेता येतील.




**आकृती क्रमांक २.१**

आकृतीमध्ये OX अक्षावर कालावधी तर OY अक्षावर आर्थिक उलाढाल दर्शविलेली आहे. आकृतीतील लाटांप्रमाणे भासणारा भाग हा असे दर्शवितो की तेजी नंतर अर्थव्यवस्थेत घसरणीला सुरुवात होते व अर्थव्यवस्था मंदीत पोहोचते. कालांतराने आर्थिक उलाढालींचा वेग वाढून मंदी संपून पुनरुज्जीन व तेजीकडे वाटचाल सूरु होते.

व्यापारचक्रांच्या वरील चार अवस्था पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

**१) तेजी :- (Prosperity)**

तेजीच्या अवस्थेलाच भरभराटीची अवस्था असेही म्हणतात. तेजीच्या अवस्थेत अर्थव्यवस्थेतील आर्थिक घडामोडींचा वेग वाढलेला असतो. उत्पादन, उत्पन्न, रोजगार, गुंतवणूक, नफा, किंमत इ. मध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दीसून येते. लोकांच्या उत्पन्नाता वाढ घडून येते. त्यातून लोकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावतो, लोकांची विविध वस्तूसेवांसाठीची मागणी वाढते. या वाढलेल्या मागणीच्या पुर्ततेसाठी उत्पादनात वाढ घडवून आणावी लागते. त्यासाठी गुंतवणूक वाढवावी लागते. त्यातून कर्जासाठी मागणी वाढते. त्यातून बँका व वित्तीय संस्थांची भरभराट होते. बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होतो. तेजीच्या या अवस्थेत उत्पादन क्षमतेचा पुरेपुर वापर होतो.

परंतू तेजीची ही अवस्था दीर्घकाळ टिकणारी नसते तेजीच्या अतिरेकातूनच पुढे घसरणीच्या अवस्थेला प्रारंभ होतो.

**२) घसरण :- (Recession)**

व्यापारचक्रांच्या या अवस्थेत अर्थव्यवस्थेतील उत्पादन, उत्पन्न, रोजगार, गुंतवणूक, मागणी इ. चल घटकांमध्ये घसरण होण्यास सुरुवात होते. मागणीत घट घडून आल्याने उत्पादन प्रक्रियेचा वेग मंदावतो त्यातून रोजगारीचे प्रमाण घटून बेकारी वाढू लागते. त्यातून लोकांचे उत्पन्न कमी राहून मागणीत घट घडून येते. मागणीच्या अभावामुळे गुंतवणूकीत घट घडून येते परिणामतः व्याजदर घटून वस्तूंच्या किंमती कमी होऊ लागतात. त्यातून अल्प नफ्याची समस्या निर्माण होते. व अर्थव्यवस्था मंदीच्या दीशेने वाटचाल करु लागते.

**३) मंदी :- (Depression)**

या अवस्थेत उत्पादन, उत्पन्न, रोजगर, बचत, गुंतवणूक, व्याजदर इ. चल घटकांमध्ये मोठ्या प्रमाणात घट झालेली दिसून येते. वस्तूंच्या किंमती मोठ्या प्रमाणात घटू लागतात. घसरणीच्या वरील अवस्थेत कमी होत चाललेला नफा मंदीच्या अवस्थेत ऋण होऊ लागतो. परिणामतः तोट्यातील उदयोगधंदे बंद पडू लागतात या अवस्थेत अर्थव्यवस्था कुंठीतावस्थेत आलेली असते. परंतू ही अवस्थादेखिल कायमस्वरुपी नसते. मंदीच्या अवस्थेत पुन्हा आशादायी वातावरण निर्माण होऊन अर्थव्यवस्था पुनरुज्जीवनाच्या अवस्थेकडे वाटचाल करु लागते.

**४) पुनरुज्जीवन :- (Recovery)**

ही व्यापारचक्रांची शेवटची अवस्था आहे. या अवस्थेत अर्थव्यवस्था मंदीतून पुन्हा तेजीकडे वाटचाल करु लागते. वस्तूंच्या मागणीत वाढ होऊ लागल्याने उत्पादन, रोजगार, उत्पन्न, बचत, गुंतवणूक, उपभोग, किंमती, व्याजदर तसेच नफा वाढून अर्थव्यवस्था गतीमान होऊन पुन्हा तेजीच्या अवस्थेत प्रवेश करते.

## २.४ 'से' यांचा बाजारपेठेचा नियम (SAY'S LAW OF MARKETS)

**रोजगार विषयक सनातनी विचार:**

सनातनवादांच्या मते अर्थव्यवस्थेत नेहमी पूर्ण रोजगाराची परिस्थिती असतेच कदाचीत अर्थव्यवस्थेतील पूर्ण रोजगाराची परिस्थीती घडून जरी बेकारी निर्माण झाली तरी निर्माण झालेली अशी बेकारी फार अल्पकाळ टिकते व पुन्हा अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगाराची परिस्थिती प्रस्थापित होते. त्यामुळे सनातनवाद्यांच्या मते अर्थव्यवस्थेत कायमपणे बेकारीची परिस्थीती कधीच नसते. नेहमी असते ती पूर्ण रोजगारीची परिस्थितीच होय. त्यामुळे अर्थव्यवस्थेत बेकारी असणे ही गोष्ट संभवनीय नाही. याच विचारसरणीला सनातनवाद्यांच्या रोजगारविषयक सिद्धांत असे म्हणतात.

१९ व्या शतकातील फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ जे. बी. से यांनी आपल्या Treatiseon Political Economic या ग्रंथात बाजारपेठेचा सिद्धांत मांडला. त्याच्यामते "प्रत्येक पुरवठा आपली मागणी निर्माण करीत असतो." (Supply creates itsown demand) सामान्यता एकूण पुरवठ्याएवढी एकूण मागणी असते याचाच अर्थ अर्थव्यवस्थेत जेवढ्या वस्तूचे उत्पादन होते व बाजारात वस्तूचा पुरवठा होतो. त्यासर्व वस्तूला मागणी येवून मागणी व पुरवठा याचा आपोआप समतोल साधला जातो. याचाच अर्थ मागणी व पुरवठा या दोन्ही शक्ती समान असतात असे 'से' यांनी गृहीत धरले आहे. वस्तूचा उत्पादनामुळे उत्पादन घटकांना व्याज, नफा, खंड व वेतन या रुपाने उत्पन्न मिळत आणि हे उत्पन्न उत्पादित वेळेवर वस्तूची खरेदी करायला पुरेशी असते किंवा हे उत्पन्न वस्तूच्या किंमती एवढे असते आणि म्हणूनच जेवढे उत्पादन होते तेवढीच मागणी असते. उत्पादन प्रक्रियेमुळे निर्माण होणाऱ्या उत्पादन घटकांच्या प्रवाहामुळे मागणी निर्माण होते असे सनातनवादी अर्थशास्त्रज्ञाना वाटते.

दिर्घकाळात सर्वच वस्तूंच्या मागणी आणि पुरवठ्यात समतोल साधला जात असला तरी अल्पकाळात काही तत्कालीन कारणामुळे असमतोल निर्माण होतो. हा तत्कालीन असमतोल दुर करुन परत समतोल प्रस्थापित करण्याचे कार्य किंमत करते. या तत्कालीन असमतोलाची जाणीव बाजारात किंमतीच्या रुपाने होते व किंमतीतील हा बदल लक्षात घेऊन उत्पादक आपल्या उत्पादनात योग्य तो बदल करतो उदाहरणार्थ काही कारणामुळे तांदळाचा पुरवठा मागणीपेक्षा जास्त झाला की तांदळाच्या किंमती घसरतात व उत्पादकांना सूचना मिळते की तांदळाचा पूरवठा कमी केला पाहिजे. उत्पादक त्यानुसार तांदळाचा पुरवठा कमी करुन आपली चूक सूधारतात व तांदळाच्या मागणी पूरवठ्यात समतोल प्रस्थापित होतो.

वस्तूच्या उत्पादनात दोन क्रिया अंतर्भूत असतात.

१) वस्तूचे उत्पादन करणे

२) उत्पादन घटकांच्या रोजगारीमुळे त्यांना उत्पन्न मिळणे.

या दोन क्रिया अशा प्रकारे घडून येतात की प्रत्येक पुरवठा मागणी निर्माण करतो.

$\Delta O = \Delta Y - \Delta E$

$\Delta O$ = उत्पादामधील वाढ

$\Delta Y$ = उत्पन्नातील वाढ

$\Delta E$ = खर्चातील वाढ

उत्पादनातील वाढीमुळे लोकांच्या उत्पन्न पातळीमध्ये वाढ होते. त्यामुळे उपभोग खर्चात ही वाढ होते. अशा प्रकारे चक्राकार प्रवाहामुळे पूर्ण रोजगार प्रस्थापित होतो.

**तात्पूरते क्षेत्रीय असमानता:**


जे. बी. से यांच्या मतानुसार भांडवलशाही अर्थव्यवस्थेत दीर्घकाळात सर्वसाधारण समतोल निर्माण होत असला तरी काही काळासाठी क्षेत्रीय असमतोल निर्माण होणे शक्य असते काही वेळा उत्पादकानी केलेल्या चुकीच्या अंदाजामुळे काही वस्तूचा पुरवठा काही काळासाठी मागणीपेक्षा जास्तही होऊ शकतो किंवा कमीही होऊ शकतो परंतू पूर्ण रोजगारामुळे निर्माण झालेला असमतोल आपोआप नाहीसा होतो. खालील आकृतीच्या सहाय्याने अधिक स्पष्ट केले आहे.

**तात्पुरते क्षेत्रीय असमतोल:**

जे. बी. से यांच्याप्रमाणे भांडवलशाही अर्थव्यवस्थेत दीर्घकाळात सर्वसाधारण समतोल निर्माण होतो. कारण काही वेळा असमतोल निर्माण होण्याची शक्यता संयोजकानी केलेल्या चुकीच्या अंदाजामुळे एखाद्या वस्तूचा पुरवठा काही वेळा मागणीपेक्षा जास्तही होतो किंवा कमीही होण्याची शक्यता असते. परंतू अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार असल्यामुळे क्षेत्रीय समतोल आपोआप नष्ट होतो. उदा. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत एखाद्या वस्तुचा पुरवठा मागणीपेक्षा जास्त झाला असेल तर त्यावेळी दुसऱ्या एखाद्या वस्तूच्या उत्पादनासाठी उत्पादन घटक कमी पडून उत्पादन मागणीपेक्षा कमी झालेले असेल. विविध बाजारपेठांपैकी एखाद्या मागणीपेक्षा पुरवठा जास्त झालेला असतो. तर त्याचवेळी दुसऱ्या एखाद्या बाजारपेठेत मागणीपेक्षा पुरवठा कमी असतो अशा प्रकारचे क्षेत्रीय असमतोल तात्पूरत्या स्वरुपाचे असून किंमत यंत्रणेद्वारे ते आपोआप नाहीसे होतात. व दीर्घकाळात समतोल आपोआप साध्य होतो. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत सर्वच बाजारपेठांत सर्वच वस्तूंचा पुरवठा मागणीपेक्षा जास्त झालेला आहे. मागणी कमी असल्यामुळे मालाचा उठाव कमी होऊन सर्वच बाजारपेठांमध्ये न खपलेल्या मालाने भरलेल्या आहेत. अशी परिस्थिती कधीच निर्माण होत नाही. अत्यूत्पादनाची स्थिती अशक्य असते. त्याचा परिणाम म्हणजे सामान्य बेकरीसुद्धा अशक्य असते. सर्व उत्पादन साधने पूर्ण रोजगारीच्या स्थीतीत असतात.

**बचत गुंतवणूकीमध्ये समानता:**

से यांच्या मतानुसार बचत आणि गुंतवणूकीत समानता आणण्याचे काम व्याज करते. व्याजदरातील बदल पैशाची बचत व गुंतवणूक निश्चित करते. यासाठी व्याजाचा दर लवचिक असला पाहिजे व्याज हे बचत करण्याचा मोबदला आहे. जेव्हा बचत ही गुंतवणूकीपेक्षा जास्त होते तेव्हा व्याजदर कमी होतो. परिणामत: भांडवल स्वस्त होते व गुंतवणूक वाढण्याची प्रवृत्ती दिसून येते. गुंतवणूकीला प्रेरणा मिळून त्यात वाढ होऊ लागते आणि बचतीचे प्रमाण कमी होऊ लागते. बचत आणि गुंतवणूक यात समानता प्रस्थापित होऊन व्याजदर स्थिरावते.




**आकृती २.२**

आकृतीत दाखवल्याप्रमाणे OX अक्षावर बचत व गुंतवणूक आणि OY अक्षावर व्याजदर दर्शविला आहे. समाजाची बचत व गुंतवणूक OX ही आहे. तर HH या रेषेने बचत व गुंतवणूकीत समानता प्रस्थापित झाल्याने OR हा व्याजदर निश्चित होतो. जेव्हा समाजाच्या बचतीत वाढ होते तेव्हा नवीन बचत वक्र $S_1S_1$ असा नवीन वक्र तयार होतो व तो गुंतवणूक वक्रास HH वक्रास $E_1$ मध्ये छेदतो त्यामुळे $E_1$ हा नवीन समतोल बिंदू असून व्याजदर OR, पर्यंत कमी होतो अशा प्रकारे अर्थव्यवस्थेत बचत व गुंतवणूकीत समानता व्याजदरामुळे होते व त्यामुळे अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार प्रस्थापित होतो.

### किंमत व वेतन यातील बदल:

पैशातील वेतन व वास्तव वेतन यांचा परस्पर प्रत्यक्ष संबंध असतो. पैशातील वेतनात वाढ झाली तर वास्तव वेतनात वाढ होते व जर पैशातील वेतन कमी झाले तर वास्तव वेतन कमी होते म्हणूनच श्रमीक वास्तव वेतनाचा आग्रह धरतात. से यांनी असे गृहीत धरले आहे की वेतनदरातील लवचिकतेमुळे मजूरांच्या मागणी व पुरवठ्यात समतोल साधला जाऊन पूर्ण रोजगाराची परिस्थिती निर्माण होते.

### २.४.१ से यांच्या सिद्धांताची गृहीतत्वे:

१) बाजारात पूर्ण स्पर्धा आहे.

२) व्याजदर लवचिक असल्यामुळे बचत नेहमी गुंतवणूकीबरोबर असते.

३) वस्तू व सेवांच्या किंमती सरासरी खर्चाबरोबर आणि मजूरीचे दर सीमांत उत्पादकतेबरोबर असतात.

४) पैशाचा प्रवाह सतत चालू असतो. त्यामुळे बचत म्हणजे भांडवली वस्तूसाठी केलेला खर्च असतो.

५) अर्थव्यवस्थेत खूली अर्थव्यवस्था आहे.

६) सरकारचा कूठलाही हस्तक्षेप नाही.

७) मागणी व पुरवठा यातील समतोलाद्वारे उत्पादन घटकाच्या आणि वस्तूच्या किंमती ठरतात.

८) अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार प्रस्थापित झाला आहे.

९) किंमत, वेतन आणि व्याज यांच्यात लवचिकता असते.

१०)दिर्घकाल विचारात घेतला आहे.

### २.४.२ से यांच्या सिद्धांन्तावरील टिका:

**१) अवास्त गृहीतके :**

से यांनी बाजारात पूर्ण स्पर्धा असते असे गृहीत धरले आहे पण ते चूकीचे आहे. प्रत्यक्षात बाजारात अपूर्ण स्पर्धा किंवा मक्तेदारी आढळून येते.

**२) अल्पकाळ महत्वाचा :**

से यांनी आपल्या सिद्धांन्तात दिर्घकाळाचा विचार केला आहे. परंतू केन्स यांच्या मते अल्पकाळ महत्वाचा आहे. कारण अल्पकाळ शाश्वत आहे.

**३) व्याजदर लवचिक नसतो :**

सनातनी अर्थशास्त्रज्ञाच्यामते व्याजाचे दर लवचिक असल्यामुळे बचत व गुंतवणूक यामध्ये समतोल साधला जातो. केन्स यांच्यामते प्रत्यक्षात व्याजाचे दर लवचिक नसतात आणि व्याजाच्या दरावर बचती व गुंतवणूका अवलंबून नसतात.

**४) पुर्ण रोजगार ही अपवादात्मक परिस्थीती आहे :**

केन्स यांच्यामते पूर्ण रोजगाराची परिस्थिती अपवादात्मक असते केन्स आपल्या सिद्धांतात सर्वसाधारणपणे समतोल पूर्ण रोजगारापेक्षा कमी रोजगार असताना साधला जातो.

**५) पैशाच्या मुल्य संग्रहणाकडे दूलर्क्ष :**

सनातनी अर्थशास्त्रज्ञांनी पैशाच्या विनिमय माध्यमाच्या कार्यावर भर दिया आहे. त्यांनी पैशाच्या मुल्य संग्रहणाच्या कार्याकडे दुर्लक्ष केले आहे. पैसा केवळ खर्च करण्याकरीता नसून भविष्याची तरतूद म्हणून केली जाते.

**६) अर्थव्यवस्था आपोआप चालणारी नसते:**

सनातनी अर्थशास्त्रज्ञांनी निर्हस्तक्षेप नितीचा आवलंब केला आहे. परंतू अर्थव्यवस्था आपोआप चालणारी नसते आपोआप चालणारी स्वंयनिर्भर अर्थव्यवस्था हे तत्व केन्सला मान्य नाही. त्याच्यामते भांडवलशाही अर्थव्यवस्थेची समाजरचनाच अशी असते की त्यात गरीब व श्रिमंत असे दोन वर्ग असतात. श्रीमंताकडे भरपूर संपत्ती असल्याने संपत्तीचा सर्वभाग उपभोगावर खर्च करतात. गरिबांना उत्पदना अभावि किमान गरजाही भागवता येत नाहीत अशा वेळी सरकारी हस्तक्षेप महत्वाचा असतो. त्यामूळे संपत्तीचे वितरण योग्य प्रकारे केले जाते.

**७) मंदीची परिस्थीती ही वास्तवता आहे:**

अर्थव्यवस्थेत मंदीची परिस्थिती निर्माण होणार नाही हे से यांचे मत अवास्तव असल्याने जागतिक महामंदीने सिद्ध केले. १९२९-३० च्या महामंदीच्या काळात मागणी घटत जाऊन किंमती घटत गेल्या व बेकारी वाढली म्हणजेच मंदी ही वास्तव घटना आहे.

**८) एकूण मागणीच्या कमतरतेची शक्यता:**

सनातनी अर्थशास्त्रज्ञांच्या मते मजूरीच्या दरात कपात केल्यास उत्पादनखर्च कमी होऊन वस्तूच्या किंमती कमी होतील परंतू केन्सच्या मते समग्रलक्षी दृष्टीकोनातून पाहिल्यास मजूरीच्या दरात कपात केल्यास समाजातील फार मोठ्या वर्गाचे उत्पन्न घटेल. त्यामुळे खरेदीशक्ती कमी होऊन एकूण मागणीत घट होते.

### २.४.३ सेच्या सिद्धांताचा सारांश :

१) पूरवठा मागणीला जन्म देतो अर्थव्यवस्थेचे कार्य चालू असताना प्रत्येक घटकाचे समायोजन होते.
२) उत्पादनात वाढ होत जाते तसतसे उत्पादन घटकाचे उत्पन्न वाढते व नवीन मागणी निर्माण होऊन वाढीव उत्पादन विकले जाते.
३) बेकारी निर्माण होत नाही बेकारी निर्माण झाली तर ती तात्पूरत्या स्वरूपाची असते व काही काळानंतर ती आपोआप नष्ट होते.
४) अर्थव्यवस्था कोणत्याही बाह्य प्रोत्साहनाशिवाय कार्यरत असते.

## २.५ सारांश

अर्थव्यवस्थेत कार्यरत असलेल्या काही गतिमान शक्ती वेगवेगळ्या प्रकारचे आर्थिक चढ-उतार निर्माण करतात. त्यांच्या वैशिष्टयांनुसार त्यांचे वेगवेगळया प्रकारांमध्ये वर्गीकरण केले जाते. अशा चक्रीय चढ-उतारांना व्यापारचक्रे असे म्हणतात.

‘Measuring Business Cycles’ या ग्रंथात प्रा. मिचेल यांनी व्यापारचक्रांच्या पुढील चार प्रमुख अवस्था सांगितल्या आहेत.

१) तेजी (Prosperity)
२) घसरण (Recession)
३) मंदी (Depression)
४) पुनरुज्जीवन (Recovery)

१९ व्या शतकातील फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ जे. बी. से यांनी आपल्या Treatiseon Political Economic या ग्रंथात बाजारपेठेचा सिद्धांत मांडला. त्याच्यामते “प्रत्येक पुरवठा आपली मागणी निर्माण करीत असतो.” (Supply creates itsown demand) सामान्यता एकूण पुरवठ्याएवढी एकूण मागणी असते याचाच अर्थ अर्थव्यवस्थेत जेवढ्या वस्तूचे उत्पादन होते व बाजारात वस्तूचा पुरवठा होतो. त्यासर्व वस्तूला मागणी येवून मागणी व पुरवठा याचा आपोआप समतोल साधला जातो. याचाच अर्थ मागणी व पुरवठा या दोन्ही शक्ती समान असतात असे ‘से’ यांनी गृहीत धरले आहे.

## २.६ प्रश्न

१. व्यापार चक्र म्हणजे काय ? त्याची विविध वैशिष्ट्ये कोणती ?
२. व्यापार चक्रांच्या विविध अवस्थांवर सविस्तर चर्चा करा.
३. ‘से’ यांचा बाजारविषयक सिद्धांत सविस्तर स्पष्ट करा.

❖❖❖❖

**प्रकरण - २**

# ३

# केन्सच्या अर्थशास्त्रीय मुलभूत संकल्पना

**घटक रचना :**


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रस्तावना

३.२ परिणामकारक / प्रभावी मागणी

 ३.२.१ परिणामकारक मागणीचे तत्त्व

 ३.२.२ परिणामकारक मागणी ठरविणारे घटक

 ३.२.३ परिणामकारक मागणीचे निर्धारण

 ३.२.४ अपूर्ण रोजगार पातळीचा समतोल

 ३.२.५ परिणामकारक किंवा प्रभावी मागणीचे महत्त्व

३.३ उपभोग फलन

 ३.३.१ उपभोग फलनाचे प्रकार

 ३.३.२ सीमांत उपभोग प्रवृत्तीची वैशिष्ट्ये

 ३.३.३ सीमांत उपभोगप्रवृत्तीचे महत्त्व

 ३.३.४ केन्सच्या उपभोगफलनाची गृहीतके

 ३.३.५ उपभोग फलनावर परिणाम करणारे घटक

३.४ भांडवलाची सीमांत लाभक्षमता

 ३.४.१ भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेवर परिणाम करणारे घटक

 ३.४.२ भांडवलाच्या सीमांत लाभक्षमतेवरील टीका

३.५ बचत

 ३.५.१ बचतीचा अर्थ

 ३.५.२ बचतीबाबतचे विविध दृष्टिकोन

 ३.५.३ बचत व व्याजदर यातील संबंध

३.६ सारांश

३.७ प्रश्न

## ३.० उद्दिष्ट्ये

- परिणामकारक / प्रभावी मागणीचे तत्त्व, घटक, निर्धारण व महत्त्व समजून घेणे.
- उपभोग फलनाच्या प्रकारांचा अभ्यास करणे.
- सीमांत उपभोग प्रवृत्तीची वैशिष्ट्ये व महत्त्व अभ्यासणे.
- केन्सच्या उपभोग फलनाची गृहितके अभ्यासणे.
- उपभोग फलनावर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.
- भांडवलाच्या सीमांत लाभ क्षमतेवर परिणाम करणारे घटक अभ्यासणे.
- बचत, बचतीचा अर्थ, बचतीबाबतचे विविध दृष्टिकोन, बचत व व्याजदर यातील संबंध अभ्यासणे.

## ३.१ प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणात प्रामुख्याने भांडवलाची सीमांत कार्यक्षमता/लाभक्षमता तसेच त्याच्याशी संबंधीत असे विवध घटक म्हणजेच बचत, गुंतवणुक, गुणक व प्रवेग यांचा सविस्तर अभ्यास करणार आहोत. त्यानुसार त्याचे स्पष्टीकरण पुढील प्रमाणे देता येईल.

## ३.२ परिणामकारक / प्रभावी मागणी (EFFECTIVE DEMAND)

या प्रकरणात आपण परिणामकारक मागणी किंवा प्रभावी मागणी या केन्सच्या कल्पनेची चर्चा करणार आहोत. केन्सने आपल्या आर्थिक विश्लेषणात ज्या ज्या कल्पना मांडल्या त्यामध्ये परिणामकारक मागणी किंवा प्रभावी मागणी ही कल्पना सर्वात महत्वाची कल्पना समजली जाते. प्रा. डीलार्ड म्हणतात की,"केन्सच्या रोजगारविषयक सिद्धांताची तर्कसंगत सुरवात ही त्याच्या परिणामकारक मागणीच्या तत्वापासून होते.

परिणामकारक मागणी किंवा प्रभावी मागणी म्हणजे काय? नेहमीच आपण इच्छा व्यक्त करणे म्हणजे मागणी म्हणतो परंतू इच्छा म्हणजे मागणी नव्हे. परंतू जेव्हा इच्छेला खरेदी शक्तीचे व पैसा खर्च करण्याची मानसिक तयारीचे पाठबळ लागते तेव्हाच इच्छीत वस्तू खरेदी करता येते. केन्सने वस्तू खरेदी करण्याची इच्छा व वस्तूची मागणी यामध्ये फरक करुन सांगितला आहे. केन्स म्हणतात की केवळ इच्छा म्हणजे मागणी नव्हे. तर जेव्हा वस्तू खरेदी करण्याच्या इच्छेला वस्तू खरेदी करण्यासाठी लागणाऱ्या आर्थिक व्यक्तीचे व पैसा खर्च करुन वस्तू खरेदीच्या मानसिक तयारीचे पाठबळ लाभते तेव्हाच त्या इच्छेला मागणी म्हणजे परिणामकारक मागणी असे म्हणतात. परिणामकारक मागणीसाठी तीन गोष्टींची गरज आहे. १) वस्तू खरेदी करण्याची इच्छा पाहिजे २) वस्तू खरेदी करण्यासाठी लागणारा आवश्यक पैसा पाहिजे म्हणजे आर्थीक कूवत पाहिजे. ३) पैसा खर्च करण्याची मानसिक तयारी पाहिजे. केन्सने जो मागणीचा विचार केला तो संपूर्ण समग्राची मागणीचा विचार केला. समग्रलक्षी अर्थशास्त्रात संपूर्ण समाजाचा विचार केला जातो. व्यक्तीचा विचार केला जात नाही म्हणून परिणामकारक मागणीचा सिद्धांत मांडताना केन्सने समग्रलक्षी अर्थशास्त्राचा विचार केला आहे. संपूर्ण समाजाची एकूण मागणी विचारात घेतली आहे. परिणामकारक मागणी म्हणजे संबंध समाजाची वस्तू व सेवांना असलेली

एकूण मागणी होय. त्यामूळे परिणामकारक मागणी ही समाजाकडून विविध वस्तू व सेवांवर जेवढा एकूण पैसा खर्च केला जातो तो आकडा दर्शवतो त्यामुळे परिणामकारक मागणी = एकूण खर्च होय. समाजाने विविध वस्तू व सेवाच्या खरेदीसाठी पैसा खर्च केला तो पैसा वस्तू व सेवांचे उत्पादन करणाऱ्या समाजातील उत्पादन घटकांच्या हातात खंड वेतन व्याज व नफा चा स्वरुपात जातो परिणामकारक मागणी म्हणजे वस्तू व सेवांची पैसा खर्च करुन खरेदी करण्याची समाजाची मागणी होय. त्यामुळे समाजाची जेवढी परिणामकारक मागणी असते. तेवढे उत्पादक उत्पादन निर्माण करुन समाजात आणतो. परिणामकारक मागणी ही रोजगार निर्माण करते यामुळे परिणामकारक मागणी = रोजगार असेही आपणास म्हणता येईल.

परिणाम कारक मागणी = एकूण खर्च
= एकूण राष्ट्रीय उत्पन्न
= एकूण उत्पादन
= रोजगार

### ३.२.१ परिणामकारक मागणीचे तत्व (The principle of EffectiveDemand):

परिणामकारक मागणीमुळे रोजगार निर्माण होतो याचा अर्थ अर्थव्यवस्थेत रोजगार निर्माण होणे ही बाब परिणामकारक मागणीवर अवलंबून असते. त्यामुळे केन्सने असे प्रतिपादन केले की अर्थव्यवस्थेत जर परिणामकारक मागणीची कमतरता असेल तर अर्थव्यवस्थेत बेकारी निर्माण होते. त्यामुळे त्याने पूढे असे ही प्रतिपादन केले की अर्थव्यवस्थेतील बेकारी दूर करावयाची असेल तर परिणामकारक मागणीत वाढ घडवून आणणे हा एकमेव उपाय आहे. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत नेहमी बेकारी आढळून येते. परंतू प्रभावी मागणीची कमतरता असेल तर बेकारी निर्माण होत असते. याचा अर्थ भांडवलशाही अर्थव्यवस्थेत परिणामकारक मागणीची कमतरता आहे. याचे कारण ज्या प्रमाणात राष्ट्रीय उत्पन्न वाढले असेल त्यापेक्षा कमी उपभोग वाढतो कारण राष्ट्रीय उत्पन्न वाढल्याने लोकांच्या हाती जेवढा पैसा जातो त्यातील सगळा पैसा उपभोगावर खर्च करत नाहीत. तर त्यातील काही भाग उपभोगावर खर्च करतात व शिल्लक पैशाची बचत करतात अशा प्रकारे देशात जेवढे राष्ट्रीय उत्पन्न वाढले असेल तेवढा उपभोग वाढत नाही. त्यामुळे अर्थव्यवस्थेत राष्ट्रीय उत्पन्न व उपभोग यामध्ये तफावत निर्माण होते आणि परिणामकारक मागणीची कमतरता निर्माण झाली की देशात बेकारी निर्माण होते म्हणून केन्सने असे सुचवले आहे की राष्ट्रीय उत्पन्न व उपभोग यांच्यामध्ये जेवढी तफावत पडलेली असते तेवढ्या रकमेची वास्तव गुंतवणूक केली की जेवढ्या परिणामकारक मागणी कमतरता निर्माण झालेली असते तेवढी परिणामकारक मागणी अर्थव्यवस्थेत भरुन निघते आणि अशा प्रकारे परिणाम कारक मागणीची कमतरता भरून निघाली की देशातील बेकारी दूर होते.

### ३.२.२ परिणामकारक मागणी ठरविणारे घटक (Determinates ofEffective Demand):

परिणामकारक किंवा प्रभावी मागणी ठरविणारे घटक दोन आहेत १) एकूण मागणी फल (Aggregate Demand Function) आणि २) एकूण पुरवठा फल (Aggregate Demand Function)

### १) एकूण मागणी फल (Aggregate Demand Function):


भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील प्रत्येक उत्पादक आपल्या उत्पादीत वस्तूला किती मागणी येईल व त्यावस्तूंची विक्री केल्यानंतर किती उत्पन्न मिळेल याचा अंदाज बांधतो व

अपेक्षित उत्पन्नातून अपेक्षीत खर्च वजा केल्यानंतर नफा शिल्लक राहतो. एकूण मागणी म्हणजे अर्थव्यवस्थेत रोजगाराच्या वेगवेगळ्या पातळी असताना, त्या वेगवेगळ्या पातळ्यांना जेवढे उत्पादन निर्माण होऊ शकते तेवढे उत्पादन विकून त्याच्या विक्रीपासून जेवढे उत्पन्न अपेक्षिले असेल तेवढे अपेक्षिलेले उत्पन्न दर्शविणारे कोष्टक किंवा पत्रक म्हणजेच एकूण मागणी फल होय.

**एकूण मागणी फलन पत्रक**

| रोजगाराची पातळी (लाखात) | मागणी किंमत (कोटी रुपयांत) |
|---|---|
| १ लाख | १० कोटी रु. |
| २ लाख | १५ कोटी रु. |
| ३ लाख | २० कोटी रु. |
| ४ लाख | २५ कोटी रु. |
| ५ लाख | ३० कोटी रु. |

वरील कोष्टकात रोजगारीच्या पातळीत वाढ झाल्यास एकूण मागणी किंमत वाढते उलट रोजगार पातळीत घट झाल्यास एकूण मागणी किंमत घटते जेव्हा ५ लाख लोकांना रोजगार दिला जातो तेव्हा ३० कोटीची गुंतवणूक होते अशा रितीने एकूण मागणी फलन म्हणजे निनिराळ्या रोजगारीच्या पातळीमुळे निर्माण झालेल्या उत्पादनाची विक्री फलन येणाऱ्या अपेक्षीत किमतीचे कोष्टक होय रोजगारात वाढ होईल त्याप्रमाणे अपेक्षीत उत्पन्न वाढते. कारण रोजगार वाढल्याने उत्पादन वाढते व त्यावर होणारा ग्राहकाचा खर्च वाढतो.




**आकृती क्र. ३.१ रोजगार पातळी**

आकृतीत दाखवल्याप्रमाणे एकूण मागणी वक्र हा जेवढे अधिक कामगार कामावर घेतले जातात तेवढे अपेक्षित उत्पन्न जास्त राहते म्हणून उत्पादन वाढतना रोजगार व उत्पन्न या दोहोंत वाढ होते.


## २) एकूण पुरवठा फल (Aggregate Supply Function):

एकूण पुरवठा फल म्हणजे अर्थव्यवस्थेत रोजगाराच्या वेगवेगळ्या पातळ्या असतातना त्या वेगवेगळ्या पातळ्यांना जेवढे उत्पादन होऊ शकते तेवढे उत्पादन विकून त्याच्या विक्रीपासून जेवढे उत्पन्न मिळणे आवश्यक आहे तेवढे आवश्यक उत्पन्न दर्शविणारे कोष्टक किंवा पत्रक म्हणजे एकूण पुरवठा वक्र होय.

उत्पादक उत्पादन घटकांना कामावर घेत असताना वस्तूचे उत्पादन करताना येणारा एकूण खर्च भरुन निघावा अशी उत्पादकाची अपेक्षा असते या किमान अपेक्षित किंमतीला केन्स एकूण पूरवठा किंमत म्हणतात. एकूण पूरवठा किंमत ही वस्तूंच्या उत्पादन खर्चाइतकी असते. रोजगाराची पातळी वाढली असता उत्पादनखर्च वाढतो व रोजगारीची पातळी कमी झाली असता एकूण पूरवठा किंमत कमी होते निरनिराळ्या रोजगारीच्या पातळीला असलेल्या निरनिराळ्या पुरवठा किंमती दर्शविणाऱ्या कोष्टकाला एकूण पुरवठा कोष्टक असे म्हणतात.

**एकूण पुरवठा कोष्टक (Aggregate Supply Schedule)**

| रोजगारावर असलेल्या श्रमीकांची संख्या | एकूण पुरवठा किंमत |
|---|---|
| १ लाख | १५ कोटी रु. |
| २ लाख | २० कोटी रु. |
| ३ लाख | २५ कोटी रु. |
| ४ लाख | ३० कोटी रु. |
| ५ लाख | ३५ कोटी रु. |





**आकृती ३.२**

वरील आकृतीत OX अक्षावर रोजगारी आणि OY अक्षावर एकूण पुरवठा किंमत दर्शविली आहे. एकूण पुरवठा वक्र O बिंदूतून निघून तो डावीकडून उजवीकडे जातो म्हणजेच तो धनात्मक आहे. कारण रोजगारीच्या पातळीत जशजशी वाढ होत जाते तसतशी एकूण पुरवठा किंमत सुद्धा वाढत जाते. एका मर्यादेनंतर एकूण पुरवठा किंमतीचा वक्र OY अक्षावर समांतर होतो. आकृतीत P बिंदूनंतर उभा O (Vertical) झाला आहे. याचा अर्थ या बिंदूच्या पलीकडे

रोजगारीत वाढ करणे अशक्य आहे. कारण श्रमिकांच्या संख्येत वाढ केली तरी उत्पादनात वाढ होऊ शकत नाही. अर्थव्यवस्था जेव्हा पूर्ण रोजगारीच्या पातळीला पोहचते तेव्हा अल्पकाळात एकूण खर्चात बदल झाला तरी उत्पादनात वाढ होत नाही. व याचा परिणाम म्हणजे चलनवाढ होय.

### ३.२.३ परिणामकारक मागणीचे निर्धारण (Determination ofeffective Demand):

ज्या रोजगारीच्या पातळीला एकूण मागणी किंमत व एकूण पुरवठा किंमत समान असतात ती रोजगाराची पातळी संतूलनावस्थेत असते. एकूण मागणीमुळे जास्तीत जास्त अपेक्षित उत्पन्न दर्शविले जाते व एकूण पुरवठ्यामुळे किमान अपेक्षित उत्पन्न दर्शविले जाते. एकूण मागणीवक्र व एकूण पुरवठा वक्र परस्परांना ज्या उत्पन्नाला छेदतात त्या उत्पादनाच्या संबंधात रोजगाराची पातळी निश्चित होते या छेदन बिंदूला अनुसरून असलेली मागणी म्हणजे प्रभावी मागणी होय.





**आकृती ३.३**

आकृतीत दाखवल्याप्रमाणे एकूण मागणीवक्र व एकूण पुरवठा वक्र एकमेकांना E बिंदूत छेदतात याचाच अर्थ जास्तीत जास्त अपेक्षित उत्पन्न आणि किमान अपेक्षित उत्पन्न दोन्ही समान होतात E बिंदूत उत्पन्न उत्पादन व रोजगार यांचा समतोल झाला आहे जर उत्पादन OQ पेक्षा कमी झाले तर म्हणजेच $OQ_2$ इतके झाले तर मागणी $SQ_2$ व पुरवठा OD झाला तर उद्योगसंस्थेला SD इतका अधीक फायदा होईल या अतिरिक्त लाभामुळे उत्पादन वाढून रोजगार वाढेल. केन्सच्या मते उत्पादन व रोजगार यांचा सरळ प्रत्यक्ष व प्रमाणशीर संबंध असतो समजा उत्पादन OQ पेक्षा $OQ_1$ इतके आहे तर उद्योगसंस्थेला MN एवढा तोटा होईल. त्यामुळे उत्पादक उत्पादन कमी करतील व रोजगार कमी होईल EQ ही समतोलाची रोजगार पातळी ठरेल. याचाच अर्थ जोपर्यंत एकूण मागणी फल हे एकूण पुरवठा फलापेक्षा अधिक असते तेपर्यंत रोजगारास वाढ करणे योग्य ठरते.

### ३.२.४ अपूर्ण रोजगार पातळीचा समतोल (Under-EmploymentEquilibrium):

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत कमाल नफ्याच्या उद्देशाने वस्तूचे उत्पादन केले जाते. त्यामुळे केन्सच्यामते भांडवलशाही अर्थव्यवस्थेत रोजगाराची पातळी ही पूर्ण रोजगारीच्या पातळीपेक्षा कमी असते याचाच अर्थ अर्थव्यवस्थेत अपूर्ण रोजगार असतानाही एकूण मागणी फलन आणि एकूण पुरवठा फलन या दोन्हीमध्ये समांतर प्रस्थापित होणे शक्य असते केन्स यांच्यामते पूर्ण रोजगाराची स्थिती ही अपवादात्मक असून अपूर्ण रोजगाराचा समतोल ही सामान्य घटना आहे.




**आकृती ३.४**

आकृतीत दाखवल्याप्रमाणे एकूण मागणीवक्र व एकूण पुरवठा वक्र एकमेकांना E बिंदूत छेदतात व OQ एवढा रोजगार निर्माण होतो परंतू अर्थव्यवस्थेत रोजगार हवी असणारी मानसे $OQ_1$ एवढी आहेत. परंतू E बिंदूत समतोल असल्याने OQ एवढ्या लोकांना रोजगार प्राप्त होतो म्हणजेच $OQ_1$ एवढे लोक बेकार राहतात म्हणूनच केन्सच्यामते ही समतोलाची अवस्था पूर्ण रोजगारीची असेलच असे नाही. अशा स्थितीत पुर्ण रोजगार निर्माण होण्यासाठी अपेक्षित उत्पनात वाढ झाली पाहिजे असे घडल्यास एकूण मागणीवक्र व हा नवीन मागणी वक्र एकूण पुरवठा वक्रास $E_1$ या ठिकाणी छेदून परिणामकारक मागणी दर्शवितो त्यामुळे $OQ_1$ एवढ्या बेकार लोकांना रोजगार प्राप्त होतो.

अशा रितीनी केन्सने गुंतवणूकीचे दोष दाखवले आहेत नफ्याचा अभावामुळे गुंतवणूक वाढत नाही. यासाठी खऱ्या अर्थाने पूर्ण रोजगार प्रस्थापित होऊन बेकारी नष्ट होण्यासाठी सरकारने हस्तक्षेप करुन गुंतवणूक वाढ केली पाहिजा. केन्स यांनी पुरवठा फलनापेक्षा मागणी फलनाला अधिक महत्व दिले. पूर्ण रोजगार निर्माण करण्यासाठी सरकारी खर्च व गुंतवणूक आवश्यक असते.

### ३.२.५ परिणामकारक किंवा प्रभावि मागणीचे महत्त्व (Importance ofeffective demand):

**१) 'से' च्या बाजारपेठ नियमाचा अपूरेपणाः**

'से' च्या बाजारपेठेच्या नियमाचे खंडन केले आहे पुरवठा स्वतःची मागणी निर्माण करत नाही. कारण केन्सच्या मते वाढलेले सर्वच उत्पन्न समाज उपभोगावर खर्च करत नाही किंवा बचत केलेली सर्वच उत्पन्न सर्वच गुंतवले जाईल असे नाही. त्यामुळे समाजाचा एकूण प्रत्यक्ष खर्च (एकूण मागणी किंमत) उत्पादनापेक्षा कमी होते आणि अशा प्रकारे मागणीत होणारी न्यूनता समाजात रोजगारीची पतळीही कमी करेल.

**२) अपूर्ण रोजगार समतोलः**

भांडवशाही अर्थव्यवस्थेत अपूर्ण रोजागराच्या स्थितीत समतोल साह्य करण्यासाठी गुंतवणूकीत सातत्यपूर्ण वाढ होणे आवश्यक आहे.

**३) रोजगार निर्धारण करणारे घटकः**

परिणामकारक मागणीतील वाढ ही रोजगार निर्मीतीला प्रोत्साहन देण्याचे काम करते. इच्छा, आर्थिक शक्ती व मानसिक तयारी यामुळे प्रभावी मागणी निर्माण होते हे तिन्ही घटक जेव्हा प्रभावी होतील तेव्हाच प्रभावी मागणी निर्माण होते.

**४) गुंतवणूकीचे अन्यन्य साधारण महत्वः**

केन्सने आपल्या सिद्धान्तात गुंतवणूकीला सर्वात जास्त महत्व दिले आहे. गुंतवणूक उत्पादन वाढीला प्रेरणा देतात उत्पादन घटकाची मागणी वाढते. उत्पन्नात वाढ होते म्हणून गुंतवणूक होणे महत्वाचे आहे.

**५) भांडवलाची सिमान्त कार्यक्षमताः**

भांडवलाची सिमान्त कार्यक्षमता हा घटक उत्पादकाच्या नफ्यासंबंधीच्या अपेक्षा व भांडवली वस्तूंचा पूर्नःस्थापन खर्च या दोहोंवर अवलंबून असतो.

**६) सरकारी हस्तक्षेपः**

प्रभावी मागणीत वाढ घडवून आणण्यासाठी मुख्यतः गुंतवणूक खर्च वाढविणे आवश्यक आहे. गुंतवणूक कमी झाल्यास परिणामकारक मागणीत न्यूनता निर्माण होऊन बेरोजगार निर्माण होते ती दूर करण्यासाठी सरकारने हस्तक्षेप करुन गुंतवणूक खर्च वाढवला पाहिजे.

**७) संपन्नतेत विरोधाभासः**

प्रभावी मागणी ही संकल्पना आधुनिक भांडवलशाही व संपन्न देशातील एका विरोधाभासाचे स्पष्टीकरण देते "संपन्नतेत विषमता" (poverty amongstplenty) ह्या विरोधाभासाचे स्पष्टीकरण येथे सापडते संपन्न देशात उत्पादन आधिक प्रमाणात होते. परंतू त्याच बरोबर ह्या राष्ट्रात बेकारीची टांगती तलवारही दिसून येते याचे कारण म्हणजे अशा राष्ट्रात समाजाचे उत्पन्न वेगाने वाढते. परंतू उपभोगात तेवढी वाढ होत नाही. बचत वाढते परंतू ही बचत गुंतवणूक खर्चात वाढ करीत नाही. कारण पूर्वीच ह्या राष्ट्रात गुंतवणूक अधिक झालेली असते. बचत गुंतवली न गेल्यामुळे प्रभावी मागणी कमी होते आणि त्याचबरोबर उत्पादन कमी व बेरोजगारी वाढते.

## ३.३ उपभोग फलन (CONSUMPTION FUNCTION)

उपभोग फलन म्हणजे उत्पनात बदल झाला असता उपभोग खर्चात जो बदल होतो त्यातील गुणोत्तराला उपभोगफलन असे म्हणतात. सुरवातीला उत्पन्न आणि खर्च समान असतो. कारण उत्पन्न अतिशय कमी असते. उत्पन्न जसजसे वाढत जाते तसतशी उपभोगखर्चात वाढ होते. पण एका विशिष्ठ मर्यादेपर्यंत एका विशिष्ठ मर्यादेनंतर उत्पन्नात वाढ होत गेली असता उपभोग खर्चात वाढ होते पण ती घटत्या प्रमाणात असते कारण उत्पन्नाचा काही भाग बचतीकडे वळवला जातो.

प्रभावी मागणीच्या संतुलनात एकूण मागणी किंमत आणि एकूण पुरवठा किंमत यांच्या संतुलनामुळे प्रभावी मागणीचे संतूलन होते. उत्पादकांची एकूण अपेक्षा/एकूण प्राप्तीचा विचार करुन उत्पादन करतात. त्यामुळे उत्पादनावर खर्च करण्याची उपभोक्त्याची क्षमता किवा प्रवृत्ती ही विचारात घ्यावी लागते. रोजगाराच्या माध्यमातून प्राप्त होणारे उत्पन्न किती आणि कोणत्या प्रमाणात खर्च केले जाते त्यावर उपभोग प्रवृत्ती महत्वाची आहे.

प्रभावी मागणी ही उपभोग खर्चावर अवलंबून असते. उपभोग खर्च अधिक तर प्रभावी मागणी अधिक असते. प्रभावी मागणी ही जरी एकूण मागणी किंमत आणि एकूण पुरवठा किंमत यांच्या संतुलनातून होते. प्रभावी मागणीवर उपभोगखर्चाचा प्रभाव पडतो. उपभोग खर्चावर रोजगार पातळीचा प्रभाव पडतो. देशातील सर्वच श्रमिकांना रोजगार प्राप्त झाला की उत्पादकाचे उत्पन्न वाढते, उत्पादन वाढले की उत्पादन विक्रीच्या विक्रिपासूनची अपेक्षित प्राप्ती वाढते. एकूण प्राप्ती वाढली की श्रमीकांचे उत्पन्न वाढते आणि श्रमिकांचा उपभोग वाढतो. त्यामुळे प्रभावी मागणी उपभोगाशी निगडीत आहे.

उपभोगफलन म्हणजे उत्पन्न आणि उपभोगामध्ये आढळून येणारा संबंध होय. उपभोगप्रवृत्ती आणि उत्पन्नात फलनात्मक संबंध असतो कारण उत्पन्न वाढले की उपभोग वाढतो. उत्पन्न कमी झाल्यास उपभोग कमी होतो. उपभोग प्रवृत्ती दोन घटकांशी संबंधीत असते १) उत्पन्न (Y) २) उपभोग (C) आणि फलनासाठी (F) सूत्ररुपात

C = F(Y)
C = उपभोग
F = कार्यात्मक संबंध
Y = उत्पन्न

उपभोगफलनाची संकल्पना अर्थतज्ञ जे. एम केन्स यांनी १९३६ मध्ये रोजगार, व्याज आणि पैसा विषयक सर्वसाधारण सिद्धांन्त हा ग्रंथ लिहला.

केन्सने उपभोग हा उपभोगखर्च या अर्थाने वापरला आहे. समाजास प्राप्त होणाऱ्या उत्पनातून समाज उपभोगावर खर्च करतो. त्यामुळे संबंधित समाजाच्या उत्पन्नातून समाजाचा उपभोग खर्च होतो. खर्च व उत्पन्न यांचा संबंध असतो. उपभोग प्रवृत्तीच्या व्याख्या -

१) ''उपभोग प्रवृत्ती ही व्यक्तीचे उत्पन्न आणि खर्च करण्याचे प्रमाण दर्शविणारे प्रमाण होय.''
२) ''उपभोग प्रवृत्ती म्हणजे विशिष्ट उत्पन्नाच्या स्तराला ते उत्पन्न व त्या उत्पन्नातून होणारा उपभोग खर्च ह्याच्यातील सहसंबंध होय.'' केन्स
३) ''उपभोग प्रवृत्ती म्हणजे उत्पन्न आणि खर्च यांचा संबंध सागणारे प्रमाण होय.''


**उपभोगफलन पत्रक :**

निरनिराळ्या उत्पनाच्या पातळ्या असताना लोक उत्पनातील किती भाग उपभोगावर खर्च करण्यास तयार असतात हे उपभोगफलन पत्रकाच्या सहाय्याने दर्शविले आहे.

**उपभोग फलन कोष्टक**

| उत्पन्न (कोटी रु.)(Y) | उपभोग (कोटी रु.) (C) | बचत (S) कोटीत (S) |
|---|---|---|
| ० | १५ | -१५ |
| ५० | ५० | ०० |
| ७५ | ६० | १० |
| १०० | ७५ | १५ |
| १२५ | ९५ | २० |
| १५० | १२० | २५ |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की उत्पन्न शून्य असताना उपभोग २५ कोटी होता याचा अर्थ शिल्लक बचत उपभोगासाठी वापरली जाते. उत्पन्न २५ कोटी रु. उपभोग ५० कोटी रु. मात्र जसजशी उत्पन्नात वाढ होत जाते तसतसे उपभोगावरील खर्च वाढत जातो मात्र तो घटत्या दराने वाढतो. उत्पन्नात होणाऱ्या वाढी बरोबर बचत वाढत जाते जेव्हा उत्पन्न १५० कोटी रुपये होते तेव्हा उपभोगावरील खर्च १२० कोटी रुपये होते बचत २५ कोटी रुपयाची होते. उपभोगातील वाढ उत्पन्नातील वाढीपेक्षा कमी असते म्हणून जसजसे उत्पन्न वाढत जाते तसतशी उत्पन्नातील वाढ व उपभोग खर्चातील वाढ यातील तफावत वाढत जाते यालाच बचत म्हणता येईल.




**आकृती ३.५**

आकृतीत दाखवल्याप्रमाणे OX अक्षावर उत्पन्न व OY अक्षावर उपभोग दाखवला आहे OS ही रेषा ४५ अंशाचा कोन करुन काढली आहे. K बिंदूत उत्पन्न आणि उपभोग समान आहे.

याचाच अर्थ K बिंदूत बचत शून्य आहे. पूढे जसजसे उत्पन्नात वाढ होत जाते. तसतसे उपभोग खर्चात देखील वाढ होते मात्र ती वाढ घटत्या प्रवृत्तीची दिसून येते. उत्पन्न OM झाले असता उपभोग N1M एवढा घेतला जातो व बचत NN1 एवढी केली जाते. उत्पन्न OM वरून OM1 एवढे झाले असते बचत DD1 एवढी होते अशा तऱ्हेने उत्पन्नात होणाऱ्या वाढीबरोबर उपभोग + बचत या दोन्हीत वाढ होताना दिसून येते. अल्पकाळात उपभोग प्रवृत्ती स्थिर असते असे केन्सचे मत आहे.

### ३.३.१ उपभोग फलनाचे प्रकार :

उपभोग फलनाचे पूढीलप्रमाणे दोन प्रकार आहेत अ) सरासरी उपभोग प्रवृत्ती व (ब) सीमांत उपभोग प्रवृत्ती

### अ) सरासरी उपभोग प्रवृत्ती (Average propensity to consume):

एका विशिष्ट कालावधीत एकूण उपभोग खर्चाचे एकूण उत्पन्नाशी जे प्रमाण असते ते म्हणजे सरासरी उपभोग प्रवृत्ती होय. यासाठी एकूण उपभोग खर्चाला एकूण उत्पन्नाने भागले असता सरासरी उपभोग प्रवृत्ती मिळते.

सूत्ररुपाने,

$$\text{सरासरी उपभोग प्रवृत्ती} = \frac{\text{एकूण उपभोग खर्च}}{\text{एकूण उत्पन्न}}$$

$$APC = \frac{C}{Y} \frac{Consumption\ Expenditure}{Income}$$

समजा एका विशिष्ट वेळी राष्ट्रीय उत्पन्न ८०० कोटी रुपये असून उपभोग खर्च ७०० कोटी रु असेल तर सरासरी उपभोग प्रवृत्ती

$$\frac{७००}{८००} = ०.८७ \text{ राहील}$$

**सरासरी उपभोग प्रवृत्तीचे महत्व:**

सरासरी उपभोग प्रवृत्तीवरून सरासरी बचत प्रवृत्तीची कल्पना येते. कारण एकूण उत्पन्न हे उपभोग व बचत यांच्या बेरजेबरोबर असते. याशिवाय उपभोग वस्तूंसाठी समाजाची मागणी किती आहे. याची कल्पना सरासरी उपभोग प्रवृत्तीवरून येते.

### ब) सीमांत उपभोग प्रवृत्ती (Marginal Propensity to Consume):

एकूण उपभोगात होणाऱ्या बदलाचे एकूण उत्पन्नात होणाऱ्या बदलाशी असणारे प्रमाण म्हणजे सीमांत उपभोगप्रवृत्ती होय. उपभोगात होणाऱ्या बदलाला उत्पन्नात होणाऱ्या बदलाने भागिले असता सीमांत उपभोग प्रवृत्ती (MPC) मिळते.

$$\text{सीमांत उपभोग प्रवृत्ती} = \frac{\text{एकूण उपभोगात होणारा बदल}}{\text{एकूण उत्पन्नात होणारा बदल}}$$

$$MPC = \frac{\Delta C}{\Delta Y}$$

समजा एकूण उत्पन्न ८०० कोटी रु. असताना ७०० कोटी रु उपभोग खर्च होता. एकूण उत्पन्न वाढीस ९०० कोटी रु. झाले असताना एकूण उपभोग वाढून ७८० कोटी रु. झाला. एकूण उत्पन्नात पूर्वीपेक्षा १०० कोटी रुपयांनी वाढ झाली व त्यामुळे एकूण उपभोगात पूर्वीपेक्षा ८० कोटी रुपयांनी वाढ झाली. याकरीता पूढीलसुत्राचा वापर करता येईल.

$$\text{सीमांत उपभोग प्रवृत्ती} = \frac{\Delta C}{\Delta Y} = \frac{\text{एकूण उपभोगात होणारा बदल}}{\text{एकूण खर्चात होणारा बदल}}$$

अशा प्रकारे येथे सीमांत उपभोग प्रवृत्ती ही एकूण उत्पन्नातील अतिरिक्त वाढ व एकूण उपभोगातील अतिरिक्त वाढ यातील संबंध व प्रमाण दर्शविते.

### ३.३.२ सीमांत उपभोग प्रवृत्तीची वैशिष्ट्येः

१) सीमान्त उपभोग प्रवृत्ती ही नेहमीच धनात्मक असते. कारण एकूण उत्पन्नात वाढ होत असताना एकूण उपभोग खर्चातही वाढ होत असते.

२) सीमांत उपभोग प्रवृत्ती नेहमी ० पेक्षा अधिक १ पेक्षा कमी राहील कारण एकूण उत्पन्नात होणाऱ्या वाढीच्या मानाने एकूण उपभोग खर्चात होणारी वाढ ही कमी असते. एकूण उपभोग खर्चात होणारी वाढ ही कमी कमी होत असल्याने सीमांत उपभोग प्रवृत्ती घटत जाते. या कारणामुळे उपभोग-प्रवृत्ती दर्शन वक्र खालून वर जाताना व OX अक्षाकडे झूकत जातो. उत्पन्नात झालेली संपूर्ण वाढ उपभोगावर खर्च झाली असती तर सीमांत उपभोग प्रवृत्ती एक आली असती. अशा वेळी उत्पन्नातील वाढ उपभोगातील वाढ असे समीकरण तयार झाले असते.

३) गरीबवर्गाची सीमांत उपभोगप्रवृत्ती ही श्रीमंत वर्गाच्या सीमांत उपभोग प्रवृत्तीपेक्षा जास्त असते. श्रीमंत वर्गाच्या मूलभूत गरजा पूर्ण झालेल्या असतात व त्यामुळे त्यांच्या उत्पन्नात झालेल्या वाढीचा कमी भाग उपभोगावर खर्च होतो. म्हणून श्रीमंताचे उत्पन्न वाढत असताना उपभोगाचे प्रमाण कमी होते. म्हणून श्रीमंतांचे उत्पन्न वाढत असताना उपभोगाचे प्रमाण कमी होते व बचतीचे प्रमाण वाढते. उलट गरीब वर्गाच्या मूलभूत गरजासूद्धा पूर्ण होत नाहीत कारण त्याचे उत्पन्न कमी असते म्हणून जेव्हा त्याच्या उत्पन्नात वाढ होते तेव्हा त्या उत्पन्नाचा मोठा भाग उपभोगावर खर्च होतो. म्हणून सीमांत उपभोग प्रवृत्ती ही जास्त असते.

४) श्रीमंत देशापेक्षा आर्थिकदृष्ट्या गरीब देशांची उपभोग प्रवृत्ती जास्त असते.

५) उत्पन्नातील वाढीबरोबर सरासरी व सीमांत उपभोग प्रवृत्ती दोन्ही ऱ्हास पावतात. परंतु सीमांत उपभोग प्रवृत्ती तीव्रगतीने ऱ्हास पावते.

### ३.३.३ सीमांत उपभोगप्रवृत्तीचे महत्वः

१) उत्पन्न व उपभोगातील अंतर सीमांत उपभोग प्रवृतत्तीने समजते. जर उपभोग खर्च व उत्पन्न यातील अंतर जर गुंतवणूक खर्चामुळे भरुन काढता आले तर रोजगाराची पातळी कायम ठेवता येते.

२) अर्थव्यवस्थेचे संतूलन अपूर्ण रोजगारीच्या पातळीला का होते याची कल्पना येण्यासाठी सीमांत उपभोग प्रवृत्ती उपयुक्त ठरते.

३) सरकारला आर्थिक धोरण ठरविण्यासाठी सीमांत उपभोग प्रवृत्ती उपयूक्त ठरते. एकूण उत्पन्नाच्या वाढीचे, उपभोग आणि गुंतवणूक यामध्ये कसे विभाजन होते हे समजते.
४) विकसीत देशांच्या अर्थव्यवस्थेचे सापेक्ष स्थैर्य याविषयी सापेक्ष विवेचन करण्यास सीमांत उपभोग प्रवृत्ती कल्पना उपयुक्त ठरते.

### ३.३.४ केन्सच्या उपभोगाफलनाची गृहीतके (Assumptions of Keynes Consumption Function):

**१) सामान्य स्थितीचे अस्तित्व:**

हा नियम सामान्य स्थितीत अस्तित्वात असतो या गृहीतावर आधारीत आहे. सामान्य स्थितीत हा नियम अनुभवास येतो. युद्ध, चलनवाढ अशा असामान्य स्थितीत हा नियम अनूभवास येत नाही.

**२) खूली भांडवली अर्थव्यवस्था:**

जेथे सरकारी हस्तक्षेप नाही अशा भांडवलशाही अर्थव्यवस्थेत या नियमाचा प्रत्यय येतो.

**३) मानसशास्त्रीय व संस्थात्मक घटक स्थिर:**

उत्पन्नाचे वाटप, आवड-निवड, सवयी, सामाजिक चालीरीती, लोकसंख्या वाढ हे घटक अल्पकाळात स्थिर असतात. उपभोग केवळ उत्पन्नावर अवलंबून असतो.

### ३.३.५ उपभोग फलनावर परिणाम करणारे घटक (Factors Affecting Consumption Function):

**अ) व्यक्तीनिष्ठ घटक (Subjective Factor):**

व्यक्तीची उपभोग प्रवृत्ती ही त्याच्या मनोवृत्तीवर अवलंबून असते. अनूवंशिकता व सभोतालची परिस्थीती यामधून व्यक्तीची मनोरचना बनत असते. व्यक्तिनिष्ठ घटक व्यक्तीला आपल्या उत्पन्नातून अधिक खर्च करण्यास परावृत्त करतात.उपभोग फलनावर परिणाम करणारे व्यक्तीनिष्ठ घटक पुढीलप्रमाणे आहेत -

**१) अपत्यप्रेम :**

आपल्या मृत्यूनंतर आपल्या मूलांना संपत्ती मिळावी मुलांचे जीवन सूखी व्हावे या प्रेमापोटी व्यक्ती काटकसर करून बचत करीत असतात.

**२) व्यवसायिक हेतू :**

एखादा उद्योग किंवा व्यवसाय सूरू करण्यासाठी भांडवलाची गरज असते. त्यासाठी व्यक्ती आपल्या उत्पन्नाचा अधिक भाग बचत करुन भांडवल जमवतात. त्यामुळे उपभोग प्रवृत्तीत घट होते.

**३) प्रगतीची इच्छा:**

प्रत्येक व्यक्तीला आपली आर्थिक व सामाजिक प्रगती व्हावी अशी त्याची इच्छा असते. प्रगतीच्या त्याच्या तीव्र इच्छेने व्यक्ती आपल्या उत्पन्नातून बचत करीत असतो त्यामुळे उपभोगप्रवृत्ती कमी होते.

**४) व्याज मिळविण्याचा हेतू :**

व्याजरुपाने उत्पन्न मिळावे व आपल्या उत्पन्नात वाढ व्हावी या हेतूने आपले सर्व उत्पन्न उपभोगावर खर्च करण्याऐवजी त्यातून बचत केली जाते उपभोग खर्च कमी केला जातो.

**५) सामाजिक प्रतिष्ठा हेतू :**

समाजामध्ये श्रीमंत व्यक्तीला प्रतिष्ठा अधिक मिळावी म्हणून अधिक पैशाची बचत करुन श्रीमंत होण्याचा प्रयत्न करतात त्यामुळे बचत वाढल्यामूळे खर्च कमी होतो.

**६) राहणीमान हेतू :**

आपल्या राहणीमानात वाढ घडवून आणण्यासाठी जास्तीत जास्त उत्पन्न मिळविण्याचा व्यक्तीचा प्रयत्न असतो त्यासाठी व्यक्ती अधिक बचत करुन गुंतवणूक करते त्यामुळे उपभोग घटतो.

**७) कंजूसपणाचा हेतू :**

समाजामध्ये काही व्यक्ती कंजूस असतात. आपल्या उपभोगावर कमीत कमी पैसा खर्च करुन बचत अधिक करतात संपत्ती संचय करण्यातच त्यांना अधिक आनंद मिळतो त्यामुळे उपभोग कमी होतो.

**८) लोकसंख्या:**

देशातील लोकसंख्येची रचना, आकारमान, कूटूंबातील व्यक्ती इ. उपभोगावर परिणाम होतो लोकसंख्येचे शहरीकरण झाल्यास ग्रामीण भागातील लोकांपेक्षा त्याचा उपभोग जास्त राहतो कारण शेतीत मिळणाऱ्या अनिश्चित उत्पन्नापेक्षा शहरीभागात निश्चित पगार मिळतो. त्यामुळे त्याचा उपभोग जास्त राहतो.

**९) कर्जाचा भार:**

व्यक्तीवर कर्जाचा भार हा समाजाच्या उपभोग प्रवृत्तीवर प्रभाव पाडतो. जर व्यक्तीवर कर्जाचा भार जास्त असेल तर मूद्दल व व्याज याची परतफेड करण्यासाठी उत्पन्नाचा सर्वाधिक भाग खर्च होतो साहजिकच उपभोग प्रवृत्ती अल्प राहते.

**१०) रोकड प्राधान्यप्रवृत्ती:**

दैनंदीन हेतू, व्यापार हेतू, दक्षता हेतूने स्वत:जवळ रोख रक्कम अधिक ठेवतो. अशावेळी उपभोग प्रवृत्ती जास्त राहते उलट रोकड प्राधान्य जेवढी कमी तेवढा उपभोग कमी राहतो.

**११) टिकाऊ वस्तूचा साठा :**

लोकांजवळ टिकाऊ वस्तू भरपूर प्रमाणात असल्यास त्या वस्तू पून्ह पून्हा घेतल्या जात नाहीत. त्यामुळे उपभोग कमी राहतो. परंतु अल्पकाळ टिकणाऱ्या वस्तूचा उपभोग जास्त राहतो.

**१२) सामाजिक विम्याच्या सोयी :**

देशात जीवनविमा, भविष्यसूरक्षा विमा किंवा सामाजिक विम्याच्या सोयी उपलब्ध असतील तर विम्याचे हप्ते भरण्यासाठी लोकांच्या उत्पन्नाचा अधिक भाग वापरला जातो त्यामुळे उपभोग प्रवृत्ती घटते.

### १३) दूरदृष्टी :

भविष्यकालीन खर्चाविषयी अंदाज बांधून व्यक्ती आपल्या उत्पन्नाचा बराच भाग भविष्यासाठी शिल्लक ठेवतात. म्हातारपणाच्या काळातील खर्च, मूलांचे संगोपन शिक्षण, लग्ने इ. खर्चासाठी उत्पन्नाचा काही भाग राखून ठेवला जातो. त्यामुळे उपभोग खर्च कमी होतो.

### १४) तरतूदीचा हेतू :

भविष्यात अचानक उद्‌भवणाऱ्या अडचणींना तोंड देता यावे या हेतूने व्यक्ती आपल्या उत्पन्नाचा काही भाग शिल्लक ठेवतो आजारपणा, अपघात, बेकारी अशा स्वरुपाच्या अडचणी आकस्मितरित्या उद्‌भवतात त्याना तोंड देण्यासाठी लोक आपल्या उत्पन्नाचा काही भाग राखून ठेवतात त्यामुळे उपभोगप्रवृत्ती घटते.

### १५) स्वातंत्र्याचा हेतू :

व्यक्तीच्या जवळ भरपूर उत्पन्न झाले असता तिची आर्थिक विवंचनेतून सूटका होते. आर्थिक स्वातंत्र्याचा लाभ होतो.

### १६) अभिमान हेतू:

आपल्या कर्तृत्वाचा व संपत्तीचा हेतू दर्शविण्याच्या हेतूने व्यक्ती अधिक काम करतात बचतीच्या लोभापायी खर्च कमी होऊन उपभोग प्रवृत्ती घटते.

### ब) उपभोग फलनावर परिणाम करणारे वस्तूनिष्ठ घटक (ObjectiveFactors):

वस्तूनिष्ठ घटकाचा उपभोग प्रवृत्तीवर अधिक परिणाम दिसून येतो हे घटक पुढील प्रमाणे -

### १) किंमतपातळी:

लोकांचे उत्पन्न स्थिर असताना किंमत पातळी वाढल्यास उपभोग प्रवृत्ती घटते. उलट किंमत पातळीत घट झाली असता उपभोग प्रवृत्ती वाढते.

### २) उत्पन्नपातळी:

उत्पन्नाच्या पातळीमध्ये जसे बदल होतात तसे उपभोग प्रवृत्तीवर परिणाम होतो. उत्पन्न पातळीत वाढ झाली उपभोग वाढतो. उलट उत्पन्न कमी झाले असता उपभोग कमी होतो.

### ३) उत्पन्नाचे वाटप:

उत्पन्नाचे वाटप समाजात कसे झाले आहे यावर उपभोग प्रवृत्ती अवलंबून असते. समाजात उत्पन्नाचे वाटप समान झाले असेल तर उपभोग जास्त राहतो. उलट उत्पन्नाची वाटणी असमान झाली असेल तर गरिबांच्या वाट्याला कमी हिस्सा मिळतो. त्यामुळे उपभोग कमी होतो.

### ४) राज्य वित्तीय धोरण:

राज्यवित्तीय धोरणाचा अधिक परिणाम उपभोग प्रवृत्तीवर दिसून येतो कारण जर सरकारने जनतेवर फार मोठ्या प्रमाणावर विविध कर लादले, तसेच देशांतर्गत मोठ्या प्रमाणावर कर्ज उभारले तर लोकांच्या हातातील पैसा कमी होऊन उपभोगावरील खर्च कमी होतो. त्यामुळे उपभोग प्रवृत्ती घटते.

### ५) महामंडळाचे वित्तीय धोरण:

देशात विविध उद्योगधंदे चालवणाऱ्या महामंडळाच्या वित्तीय धोरणावर उपभोग प्रवृत्ती अवलंबून असते. उद्योगधंदे चालवणाऱ्या महामंडळाची घसारा व राखीव निधी म्हणून जास्त रक्कम बाजूला काढून ठेवली जात असेल तर भागधारकांना लाभांश कमी मिळेल. त्यामुळे त्याच्या मागणीवर परिणाम म्हणजेच उपभोग प्रवृत्ती कमी होईल.

## ३.४ भांडवलाची सीमांत लाभक्षमता (MARGINAL EFFICIENCY OF CAPITAL)

भांडवलाची सीमांत कार्यक्षमता म्हणजे नवीन भांडवली साधनांपासून अपेक्षित असणारा लाभप्रदतेचा दर होय. हा भांडवली साधनांच्या सीमांत नगापासून उत्पादन खर्च वजा जाता अपेक्षिलेला सर्वोच्च फलाचा दर होय. भांडवलीची सीमांत कार्यक्षमता ही जादा किंवा सीमांत भांडवलीची सीमांत कार्यक्षमता ही जादा किंवा सीमांत भांडवली मालमत्तेपासून मिळणारे संभाव्य उत्पन्न आणि भांडवली मालमत्तेची पुरवठा किंमत या दोन घटकांवर अवलंबून असते.

### भांडवलाच्या सीमान्त कार्यक्षमतेचा अर्थ:

वास्तव गुंतवणूकीपासून अपेक्षिलेला संभाव्य प्राप्तीचा दर असे म्हणता येईल. जेव्हा एखाद्या उत्पादक भांडवलाची एक जास्तीचा माल आपल्या उत्पादनात वापरतो. तेव्हा त्यासाठी त्याला व्याजरुपाने काही खर्च सोसावा लागतो. अशा वेळी तो उत्पादक या जास्तीच्या मात्रेपासून काही प्राप्ती किंवा लाभ अपेक्षित धरतो. थोडक्यात नव्याने गुंतविलेल्या भांडवलापासूनचा अपेक्षित प्राप्तीचा दर म्हणजे भांडवलाची सीमांत कार्यक्षमता होय.

प्रा. कुरिहारा यांच्या मते अतिरिक्त भांडवली संपत्तीची अपेक्षित प्राप्ती व त्याची पुरवठा किंमत याचे गुणोत्तर म्हणजे भांडवलाची सीमांत लाभक्षमता होय.

भांडवलाची सीमांत कार्यक्षमता ही खालील दोन घटकांवर अवलंबून असते.

१) भांडवली साधनाचे अपेक्षित उत्पन्न.

२) भांडवली साधनाची पुरवठा किंमत.

### १) भांडवली साधनांची अपेक्षित उत्पन्न:

भांडवली साधने ही टिकाउ असतात. जितका काळ ही साधने टिकतात तेवढ्या काळात या साधनाच्या सहाय्याने उत्पादन करता येते. या उत्पादनाची विक्री करुन उत्पन्न मिळवता येते. संयोजक जेव्हा जेव्हा नवीन भांडवली साधनाची निर्मिती अथवा खरेदी करतो. तेव्हा त्या साधनाच्या सहाय्याने किती निव्वळ उत्पन्न मिळते याचा विचार करतो. स्थूल उत्पन्नातून देखभालीचा खर्च व झीज खर्च वजा जाता उरलेले उत्पन्न म्हणजे निव्वळ उत्पन्न होय. अर्थात प्रत्येक वर्षाचे निव्वळ उत्पन्न सारखे नसते कारण अर्थव्यवस्थेत सतत बदल होत असतात. ह्या सर्व वर्षातील निव्वळ उत्पन्नांची बेरीज केली जाते. त्यालाच भांडवली साधनांचे अपेक्षित उत्पन्न म्हणता येईल.

### २) भांडवलाची पुरवठा किंमत:

नवीन यंत्र खरेदी करताना संयोजकाला केवळ उत्पन्नाचा विचार करुन चालत नाही. तर त्याचबरोबर त्या यंत्राची पुरवठा किंमत विचारात घ्यावी लागते. नवीन भांडवली साधनाची निर्मिती अथवा खरेदी करण्यासाठी संयोजकाला जो खर्च येतो त्याला भांडवलाची पूरवठा किंमत असे म्हणतात.

उदा. समजा एका कारखानदारास नवीन यंत्र खरेदी करावयाचे आहे त्या यंत्राची बाजारातील किंमत १,००,००० रुपये आहे. समजा त्या यंत्राचे आयुष्य १० वर्षाचे आहे. या काळात त्या यंत्राचा वापर केला असता घसारा व इतर खर्च वजा केल्यानंतर निव्वळ उत्पन्न १०,००० रुपये मिळेल. अशी अपेक्षा धरल्यास भांडवलाच्या सीमांत लाभक्षमतेवर सूत्रानुसार याचे गुणोत्तर पुढीलप्रमाणे येईल.

$$\text{भांडवलाची सीमांत कार्यक्षमता (E)} = \frac{\text{भांडवलापासूनचे अपेक्षित उत्पन्न (Q)}}{\text{भांडवलाची पुरवठा किंमत (P)}} \times १००$$

भांडवलाची सीमांत कार्यक्षमता ही पूर्ण टक्क्यात काढण्यासाठी १०० ने गुणले जाते.

$$\text{भांडवलाची सीमांत कार्यक्षमता} = \frac{१०,०००}{१,००,०००} \times १००$$

भांडवलाची सीमांत कार्यक्षमता = १०%

भांडवली साधनाची पुरवठा किंमत त्याच्या संभाव्य उत्पन्नापेक्षा अधिक असेल तर संयोजक अशा प्रकारची गुंतवणूक करणार नाही निव्वळ संभाव्य उत्पन्न हे पुरवठा किंमतीपेक्षा जास्त असेल तर नवीन गुंतवणूकीचा निर्णय घेतला जाईल. केन्सच्या मते भांडवलाची सीमांत कार्यक्षमता म्हणजे वटावाचा दर की ज्या दराने भांडवली साधनाच्या अपेक्षित प्राप्तीचे वर्तमान मूल्य त्या भांडवली साधनाच्या पुरवठा किंमतीशी समान होते.

## ३.४.१ भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेवर परिणाम करणारे घटक (Factor Influencing MEC):

भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेवर अनेक अल्पकालीन व दीर्घकालीन घटकांचा परिणाम होतो.

### अ) अल्पकालीन घटक (Short run Factors):

#### १) उपभोग प्रवृत्ती:

उपभोगात होणाऱ्या बदलांचा भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेवर परिणाम होतो. जर अल्पकाळात उपभोग प्रवृत्तीत वाढ झाल्यास भांडवलाची सीमांत कार्यक्षमता वाढेल कारण उपभोग प्रवृत्तीतील वाढीमुळे वस्तू व सेवांच्या मागणीत वाढ होऊन अपेक्षित लाभाचे प्रमाण वाढेल याउलट उपभोग प्रवृत्तीत घट झाल्यास अपेक्षित लाभाचे प्रमाण घटून भांडवलाची सीमांत कार्यक्षमता कमी होईल.

**२) अपेक्षित मागणी:**

संयोजकाने उत्पादन केलेल्या वस्तू आणि सेवांना भविष्यकाळात भरपूर मागणी येईल. अशी अपेक्षा असेल तर सीमांत लाभक्षमता जास्त असते. त्यामुळे गुंतवणूक वाढते. याउलट भविष्यात उत्पादीत वस्तू व सेवांची मागणी कमी होईल अशी अपेक्षा असेल तर भांडवलाची सीमांत कार्यक्षमता घटत जाऊन गुंतवणूक कमी होईल.

**३) करविषयक धोरण:**

सरकारच्या करविषयक धोरणाचा परिणाम भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेवर होत असतो. सरकार नवीन कर आकारणी करणार असेल जून्या कर दरात वाढ करणार असेल तर संयोजकाला लाभ मिळण्याची शक्यता कमी होते त्यामुळे भांडवलाची सीमांत कार्यक्षमता कमी राहते. याउलट सरकार कर माफी किंवा कर सवलतीच्या धोरणाचा अवलंब करणार असेल तर भांडवलाची सीमांत कार्यक्षमता वाढून गुंतवणूकीत वाढ होते.

**४) वेतनदर व व्याजदर:**

देशातील कामगाराचे वेतनदर आणि व्याजदर अधिक असतील तर उत्पादन खर्चात वाढ होऊन भांडवलाची सीमांत लाभक्षमता घटते. याउलट वेतनदर व व्याजदर कमी असतील तर उत्पादन खर्च कमी होऊन भांडवलाची सीमांत लाभक्षमता जास्त राहते.

**५) उत्पन्नातील चढउतार:**

जर उत्पन्नात वाढ झाली तर गुंतवणूक क्षमता वाढते. यामुळे भांडवलाची कार्यक्षमता वाढेल या उलट जर उत्पन्नात घट झाली तर व्यक्तीची गुंतवणूक क्षमता कमी होऊन भांडवलाची सीमांत क्षमता कमी होते.

**६) आशावादी व्यावसायिक स्थिती:**

अर्थव्यवस्थेतील आर्थिक वातावरण आशावादी असेल तर भांडवलाची सीमांत कार्यक्षमता जास्त राहील याउलट वातावरण निराशावादी असेल तर भांडवलाची सीमांत कार्यक्षमता कमी राहते.

**७) भविष्यकालीन मागणीचा अंदाज:**

आपल्या वस्तूंना भविष्यात भरपूर मागणी येईल असा जर उत्पादकाचा अंदाज असेल तर भांडवलाची सीमांत कार्यक्षमता जास्त राहील. जर भविष्यात येणारी मागणी कमी असेल तर भांडवलाची सीमांत कार्यक्षमता कमी राहील.

**८) किमती व उत्पादन खर्च:**

भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेवर भावी काळातील किंमती व उत्पादन खर्च या बाबतीतील अपेक्षित प्रवृत्तीचाही परिणाम होतो. त्यावेळी वस्तूंच्या किंमती वाढण्याची व उत्पादन खर्च कमी होण्याची शक्यता असते. त्यावेळी भांडवलाची सीमांत कार्यक्षमता जास्त राहते. याउलट किंमती कमी होण्याची व उत्पादन खर्च वाढण्याची शक्यता असल्यास भांडवलाची सीमांत कार्यक्षमता कमी राहील.

**ब) दीर्घकालीन घटक (Longrun Factors):**

**१) उत्पादन तंत्रात सुधारणाः**

उत्पादन तंत्रातील सुधारणांचाही भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेवर परिणाम होतो. उत्पादन तंत्रात सुधारणा झाल्यास कमी खर्चात उत्पादन करणे शक्य होते व नफ्याचे प्रमाण वाढते या परिस्थितीत भांडवलाची सीमांत कार्यक्षमता जास्त राहते.

**२) लोकसंख्या वृद्धीः**

लोकसंख्येत होणाऱ्या वाढीचा व घटीचा परिणाम भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेवर होतो. जर लोकसंख्या वेगाने वाढत असेल तर वस्तु व सेवांची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढते उत्पादन मोठ्या प्रमाणावर केले जाते भांडवलाची सीमांत कार्यक्षमता जास्त राहून गुंतवणूकीत वाढ होते. याउलट जर लोकसंख्येत घट होत असेल तर मागणीत घट झाल्याने अर्थव्यवस्थेतील वस्तू व सेवांचे उत्पादन कमी राहून भांडवलाची सीमांत कार्यक्षमता कमी राहते.

**३) संशोधन व विकासः**

देशातील विविध क्षेत्रात संशोधनकार्य जोरात सुरु असेल तर तंत्रज्ञान व तांत्रिक बदल मोठ्या प्रमाणावर घडून येतील त्यामूळे नवीन शोध सतत सुरु राहतील गुंतवणूकीत वाढ होईल त्यामुळे भांडवलाची सीमांत कार्यक्षमता वाढेल.

**४) उपलब्ध भांडवली साधनसंपत्तीचा वापरः**

उपलब्ध असणाऱ्या भांडवली साधनाचा किती प्रमाणात वापर केला जात आहे यावर ही भांडवलाची सीमांत कार्यक्षमता अवलंबून असते.

**५) देशातील वर्तमान स्थितीः**

देशातील वर्तमान स्थिती स्थिर शांततेची सूरक्षिततेचे वातावरण असले तर भांडवलाची सीमांत कार्यक्षमता वाढते. याउलट राजकीय अस्थिरता नैसर्गिक आपत्ती अंतर्गत अशांतता यामूळे येणारी अस्थिरता जर अधिक असेल तर भांडवलाची सीमांत कार्यक्षमता कमी असते.

**६) मागासलेल्या प्रदेशाचा विकासः**

मागासलेल्या प्रदेशाच्या विकासासाठी खाजगी भांडवलदार किंवा सरकार यांच्याकडून प्रयत्न होतो तेव्हा त्या प्रदेशात नवीन नवीन संधी उपलब्ध होतात. उद्योगधंदे शेती वाहतूक व दळणवळण पाणीपूरवठा अशा अनेक क्षेत्रात गुंतवणूकीची संधी निर्माण होऊन भांडवलाची सीमांत कार्यक्षमता जास्त राहते.

**७) व्याजदरः**

व्याजाचे दर कमी असतात तेव्हा गुंतवणूकीला प्रेरणा मिळून भांडवलाची सीमांत कार्यक्षमता वाढते याउलट व्याजदर जास्त असतील तर भांडवलाची सीमांत कार्यक्षमता कमी होते.

**८) तेजी-मंदीः**

जेव्हा देशात तेजीची स्थिती निर्माण होण्याची शक्यता असते. तेव्हा किंमती वाढत असल्याने सर्वत्र उत्साहवर्धक वातावरण असते. नवीन गुंतवणूक करण्यास सर्व उत्सूक असतात. अशा स्थितीत भांडवलाची सीमांत लाभक्षमता जास्त असते.

### ३.४.२ भांडवलाच्या सीमांत लाभक्षमतेवरील टीका:

१) केन्सने पूर्ण स्पर्धेची परिस्थिती गृहीत धरली आहे. अपूर्ण स्पर्धा अथवा इतर प्रकारच्या बाजारपेठेचा विचार केलेला नाही.
२) भांडवलाची सीमांत कार्यक्षमता ही संकल्पना अनेक अर्थाने वापरली असल्याने तिच्यावरुन निश्चित ज्ञान होत नाही.
३) भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेप्रमाणे व्याजाचा दरही अपेक्षेवर अवलंबून असतो. हे केन्सने लक्षात घेतलेले नाही. भांडवलाची सीमांत कार्यक्षमता ही संकल्पना गतिशील आहे तर व्याजाचा दर ही कल्पना स्थिर आहे. त्यामूळे केन्सच्या भांडवलाची सीमांत कार्यक्षमतेबाबतचा विचार तर्कसंगत नाही.

काही टीकाकारांच्या मते केन्सची भांडवलाची सीमांत लाभक्षमता ही संकल्पना अस्पष्ट व संदिग्ध असून त्याचे सहजासहजी आकलन होत नाही.

## ३.५ बचत (SAVING)

व्यक्तीला प्राप्त होणारे उत्पन्न व्यक्ती पूर्णपणे उपभोगावर खर्च करत नाही. व्यक्तीला स्वतःच्या भविष्यकाळाची तरतूद करावी लागते. भविष्यकालीन गरजांच्या आणि आकस्मित संकटाच्या संदर्भात व्यक्तीला प्राप्त होणाऱ्या उत्पन्नापैकी काही उत्पन्न उपभोगावर खर्च न करता बाजूला ठेवते म्हणजे बचत करते. व्यक्तीच्या दृष्टीकोनातून उत्पन्नाच्या ज्या भागाचा उपभोग घेतला जात नाही तो भाग म्हणजे बचत होय. केन्सच्या मते उपभोगावर खर्च केल्या जाणाऱ्या रकमेपेक्षा जितक्या रकमेने उत्पन्न अधिक असते त्याला बचत म्हणतात. याचाच अर्थ एकूण उत्पन्न व सेवनीय वस्तूंवर होणारा खर्च यातीलल फरक म्हणजे बचत होय.

### ३.५.१ बचतीचा अर्थ:

उत्पन्नाचा जो भाग उपभोगावर खर्च होत नाही त्यास बचत म्हटले जाते. व्यक्तीला जे उत्पन्न प्राप्त होते त्यापैकी काही भाग उपभोक्ता दैनंदीन गरजा भागवण्यासाठी खर्च करेल यालाच त्या व्यक्तीचा उपभोग खर्च म्हणता येईल.

सूत्ररुपात -

$y = C + S$
y = व्यक्तीचे उत्पन्न
c = व्यक्तीचा उपभोग खर्च
s = बचत

### ३.५.२ बचतीबाबतचे विविध दृष्टीकोन (Different views of saving):

#### १) सनातनी दृष्टीकोन:

सनातनीवादी अर्थशास्त्रज्ञानी केलेले विश्लेषण सूक्ष्मलक्षी दृष्टीकोनावर आधारलेले आहे. एका व्यक्तीच्या बाबतीत बचत करणे. गुण असल्याने समाजातील सर्व व्यक्तीने बचत करणे चांगले आहे असे त्याचे मत आहे.

सनातनवादी अर्थशास्त्रज्ञानी असे प्रतिपादन केले की व्यक्तीने बचत करणे हा व्यक्तीचा मोठा सद्‌गुण आहे. कारण व्यक्तीने बचत केली तर व्यक्तीला संकटकाळी आपल्या बचतीचा फार मोठा उपयोग होऊ शकतो. तसेच समाजातील सर्व व्यक्तीच्या बचतीची बेरीज म्हणजे समाजाची एकूण बचत होय. त्यामुळे त्यांनी असा दावा मांडला की समाजातील सर्व व्यक्तींनी आपली बचत जर वाढवली तर समाजाची एकूण बचत वाढेल. समाजाची एकूण बचत वाढली की मग समाजाच्या उत्पादक साधनात वाढ घडून येईल. समाजाच्या उत्पादक साधनात वाढ झाली की समाजातील लोकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावतो. अशा प्रकारे व्यक्तीने बचत केली की व्यक्तीचा अनेक प्रकारे फायदाच होतो. पण व्यक्तीने बचत केल्यामूळे समाजाचेही कल्याण होते.

**२) केन्सचे प्रतिपादन:**

१९३६ मध्ये General Theory of Empolyment, Interest and Money हे पूस्तक प्रसिद्ध केले. केन्सने आपल्या या पूस्तकात बचतीविषयी समग्र लिखाण केले. त्याच्यामते सनातनादी अर्थशास्त्रज्ञानी मांडलेला दृष्टीकोन चूकीचा असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले त्यांच्यामते बचत चांगली की वाईट असे म्हणणे योग्य नाही. बचतीचा उपयोग कशा प्रकारे केला जातो यावर बचत करणे चांगले आहे की नाही हे ठरवावे लागेल.

बचत ही रक्कम जर गुंतवणूकीसाठी वापरली गेली तर मागणीची कमतरता निर्माण होणार नाही कारण बचतीच्या रुपाने खर्चाच्या प्रवाहातून काढून घेतली गेलेली रक्कम गुंतवणूकीच्या रुपाने परत प्रवाहात येईल. परंतु बचत केलेली रक्कम जर गुंतवणुकीसाठी वापरली गेली नाही तर मात्र खर्चात घट होऊन प्रभावी मागणीत घट होईल. त्यातून उत्पादन व रोजगार यात घट होईल असे जर झाले तर मात्र बचत अनिष्ट आहे असे म्हणावे लागेल. केन्सने केलेले विश्लेषण समग्रलक्षी स्वरुपाचे आहे. एका व्यक्तीने केलेली बचत हा गुण असला तरी सर्व समाजाच्या दृष्टीने तो अवगुण ठरण्याची शक्यता असल्याने केन्सने स्पष्ट केले आहे. समाजातील व्यक्तींनी मोठया प्रमाणावर बचत केली तर त्यांचा उपभोगावरील खर्च कमी होतो. त्यामुळे उपभोग, वस्तुंची मागणी कमी होते.

परिणामतः उपभोग वस्तूंचे उत्पादन व या क्षेत्रातील रोजगार यात घट होते. उपभोग्य वस्तुंच्या मागणीतील घटीमुळे भांडवली वस्तूंच्या मागणीत घट होते. त्याचा प्रतिकुल परिणाम गुंतवणुकीवर होऊन गुंतवणूक घटते. उत्पादन व रोजगार यात घट होऊन अर्थव्यवस्थेत मंदीची परिस्थिती निर्माण होते.

केन्स यांच्या मते व्याजदराचा बचतीवर काही प्रमाणात परिणाम होत असला तरी ती मुख्यत्वे उत्पन्नावर अवलंबून असते. उत्पन्न पातळी गुंतवणूकीत होणाऱ्या वाढीबरोबर वाढत असल्याने बचत गुंतवणूकीवर अवलंबून राहते. गुंतवणूक म्हणजे भांडवली साधनसामुग्रीत (यंत्रसामुग्री कारखान्याची इमारत) होणारी वाढ होय. म्हणजेच गुंतवणूक ही भांडवलाच्या साठ्यात होणारी वाढ होय. विशिष्ट कालखंडातील उत्पन्नाचा उपभोगासाठी न रापरलेला भाग म्हणजे त्या काळातीलल वास्तव स्वरुपाच्या भांडवलाच्या साठ्यातील वाढ होय. बचत व गुंतवणूक यातील संबंध

उत्पन्न = उपभोग + गुंतवणूक

बचत = उत्पन्न - उपभोग

गुंतवणूक = उत्पन्न - उपभोग

येथे बचत व गुंतवणूक दोन्हीही उत्पन्नातून वजा केले असता मिळत असल्याने बचत ही गुंतवणूकीबरोबर आहे. मात्र असा बचत व गुंतवणूक यातील समतोल नेहमीच साधला जाईल असा नाही. हिशोबाच्या दृष्टीने बचत व गुंतवणुक समान असते. बचत व गुंतवणूकीत केवळ वस्तूस्थितीदर्शक समानताच नसते तर कार्यात्मक समानताही असते हे स्पष्ट करुन बचत व गुंतवणूक या संज्ञांना गतीमान अर्थ मिळवून दिला आहे.

**३.५.३ बचत व व्याजदर यातील संबंध:**

सनातनवादी अर्थशास्त्रज्ञाच्या मते बचत व गुंतवणूक यात व्याजदराद्वारे समानता प्रस्थापित होते. समजा बचत ही गुंतवणूकीपेक्षा जास्त असेल तर व्याजदरात घट होऊन गुंतवणूकीत वाढ होते व ती बचतीच्या पातळीला येते. केन्स यांच्या मते बचत व गुंतवणूक यातील समानता सनातनी अर्थशास्त्रज्ञांनी सांगितलेल्याप्रमाणे व्याजदराने प्रस्थापीत होत नाही. उत्पन्न पातळीत होणाऱ्या बदलामुळे बचत व गुंतवणूकीत समानता प्रस्थापित होते. समजा बचत गुंतवणूकीपेक्षा जास्त असेल तर गुंतवणूक कमी असल्याने लोकांचे उत्पन्न कमी होईल व बचतीत घट होईल. त्यातून बचत व गुंतवणुक यात समानता प्रस्थापित होईल. याउलट गुंतवणुक बचतीपेक्षा जास्त असेल तर गुंतवणूकीतील वाढीमुळे लोकांचे उत्पन्न वाढून त्यांची बचत करण्याची क्षमता वाढेल बचतीत वाढ होऊन बचत व गुंतवणुकीत समानता प्रस्थापित होईल.

## ३.६ सारांश

केन्सने वस्तू खरेदी करण्याची इच्छा व वस्तूची मागणी यामध्ये फरक करुन सांगितला आहे. केन्स म्हणतात की केवळ इच्छा म्हणजे मागणी नव्हे. तर जेव्हा वस्तू खरेदी करण्याच्या इच्छेला वस्तू खरेदी करण्यासाठी लागणाऱ्या आर्थिक व्यक्तीचे व पैसा खर्च करुन वस्तू खरेदीच्या मानसिक तयारीचे पाठबळ लाभते तेव्हाच त्या इच्छेला मागणी म्हणजे परिणामकारक मागणी असे म्हणतात.

परिणामकारक मागणी ही रोजगार निर्माण करते यामुळे परिणामकारक मागणी = रोजगार असेही आपणास म्हणता येईल.

परिणाम कारक मागणी = एकूण खर्च
= एकूण राष्ट्रीय उत्पन्न
= एकूण उत्पादन
= रोजगार

परिणामकारक किंवा प्रभावी मागणी ठरविणारे घटक दोन आहेत १) एकूण मागणी फल (Aggregate Demand Function) आणि २) एकूण पुरवठा फल (Aggregate Demand Function)

ज्या रोजगारीच्या पातळीला एकूण मागणी किंमत व एकूण पुरवठा किंमत समान असतात ती रोजगाराची पातळी संतूलनावस्थेत असते. एकूण मागणीमुळे जास्तीत जास्त अपेक्षित उत्पन्न दर्शविले जाते व एकूण पुरवठ्यामुळे किमान अपेक्षित उत्पन्न दर्शविले जाते. एकूण मागणीवक्र व एकूण पुरवठा वक्र परस्परांना ज्या उत्पन्नाला छेदतात त्या उत्पादनाच्या संबंधात

रोजगाराची पातळी निश्चित होते या छेदन बिंदूला अनुसरून असलेली मागणी म्हणजे प्रभावी मागणी होय.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत कमाल नफ्याच्या उद्देशाने वस्तूचे उत्पादन केले जाते. त्यामुळे केन्सच्यामते भांडवलशाही अर्थव्यवस्थेत रोजगाराची पातळी ही पूर्ण रोजगारीच्या पातळीपेक्षा कमी असते याचाच अर्थ अर्थव्यवस्थेत अपूर्ण रोजगार असतानाही एकूण मागणी फलन आणि एकूण पुरवठा फलन या दोन्हीमध्ये समांतर प्रस्थापित होणे शक्य असते केन्स यांच्यामते पूर्ण रोजगाराची स्थिती ही अपवादात्मक असून अपूर्ण रोजगाराचा समतोल ही सामान्य घटना आहे.

उपभोगफलन म्हणजे उत्पन्न आणि उपभोगामध्ये आढळून येणारा संबंध होय. उपभोगप्रवृत्ती आणि उत्पन्नात फलनात्मक संबंध असतो कारण उत्पन्न वाढले की उपभोग वाढतो. उत्पन्न कमी झाल्यास उपभोग कमी होतो. उपभोग प्रवृत्ती दोन घटकांशी संबंधीत असते १) उत्पन्न (Y) २) उपभोग (C) आणि फलनासाठी (F) सूत्ररुपात

C = F(Y)
C = उपभोग
F = कार्यात्मक संबंध
Y = उत्पन्न

उपभोग फलनाचे पूढीलप्रमाणे दोन प्रकार आहेत अ) सरासरी उपभोग प्रवृत्ती व (ब) सीमांत उपभोग प्रवृत्ती

प्रा. कुरिहारा यांच्या मते अतिरिक्त भांडवली संपत्तीची अपेक्षित प्राप्ती व त्याची पुरवठा किंमत याचे गुणोत्तर म्हणजे भांडवलाची सीमांत लाभक्षमता होय.

भांडवलाची सीमांत कार्यक्षमता ही खालील दोन घटकांवर अवलंबून असते.
१) भांडवली साधनाचे अपेक्षित उत्पन्न.
२) भांडवली साधनाची पुरवठा किंमत.

उत्पन्नाचा जो भाग उपभोगावर खर्च होत नाही त्यास बचत म्हटले जाते. व्यक्तीला जे उत्पन्न प्राप्त होते त्यापैकी काही भाग उपभोक्ता दैनंदीन गरजा भागवण्यासाठी खर्च करेल यालाच त्या व्यक्तीचा उपभोग खर्च म्हणता येईल.

सूत्ररुपात -

y = C + S
y = व्यक्तीचे उत्पन्न
c = व्यक्तीचा उपभोग खर्च
s = बचत

## ३.७ प्रश्न

१) परिणामकारक मागणी ही संकल्पना स्पष्ट करा.

२) उपभोग फलन म्हणजे काय ? त्यावर परिणाम करणारे घटक स्पष्ट करा.

३) भांडवलाची सीमांत लाभक्षमता म्हणजे काय ? पूर्ण रोजगार सिद्धांतात या संकल्पनेचे काय महत्व आहे.

४) टीपा लिहा.

१. उपभोग प्रवृत्ती

२. परिणामकारक मागणी

३. अपूर्ण रोजगार पातळीचा समतोल

४. उपभोग फलनाचे महत्त्व

५. भांडवलाची सीमांत लाभक्षमता.

६. भांडवलाच्या सीमांत लाभक्षमतेवर परिणाम करणारे घटक.

७. व्याजदर व बचतीतील संबंध स्पष्ट करा.

❖❖❖❖

# ४

# गुंतवणूक

**घटक रचना :**

४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रस्तावना

४.२ गुंतवणूकीचा अर्थ व व्याख्या

 ४.२.१ गुंतवणूकीचे प्रकार

 ४.२.२ गुंतवणूकीवर परिणाम करणारे घटक

 ४.२.३ गुंतवणूकीचे महत्त्व

४.३ गुणक

 ४.३.१ गुणकाचे प्रकार

 ४.३.२ गुणकाची गृहीत तत्त्वे

 ४.३.३ गुणकाच्या गळत्या

 ४.४.४ गुणकावरील टीका

४.४ विकसनशील देशांमध्ये केनेशियन सिद्धांत साधनांचा संबंध

 ४.४.१ पारंपारिक दृष्टिकोन

 ४.४.२ आधुनिक दृष्टिकोन

४.५ सारांश

४.५ प्रश्न

## ४.० उद्दिष्ट्ये

- गुंतवणुकीचा अर्थ व त्याचे प्रकार, त्यावर परिणाम करणारे घटक व महत्त्व यांचा अभ्यास करणे.
- गुंतवणुकीचा अर्थ, प्रकार, गृहित तत्त्वे, गळत्या व टिका समजावून घेणे.
- विकसनशील देशांमध्ये केन्सच्या सिद्धांत साधनांचा संबंध, त्यासंबंधित पारंपारिक व आधुनिक दृष्टिकोन अभ्यासणे.

## ४.१ प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणात गुंतवणूकीचा अर्थ व व्याख्या तसेच त्यांचे प्रकार, परिणाम करणारे घटक व गुंतवणुकीचे महत्त्व समजावून घेणार आहोत. तसेच त्यासंबंधीत असणारे गुणक, त्याचे प्रकार, गृहित तत्त्वे, गळत्या यांचा अभ्यास करणार आहोत. केन्सच्या मुलभूत सिद्धांत साधनांचा विकसनशील देशांमध्ये असणारा परिणाम, प्रभाव आपण या प्रकरणात अभ्यासणार आहोत.

## ४.२ गुंतवणूकीचा अर्थ व व्याख्या (MEANING AND DEFINITION OF INVESTMENT)

नेहमीच्या व्यवहारात आपण सोने चांदी खरेदी करणे. जमीन घर खरेदी करणे यासाठी वापरलेला पैसा म्हणजे गुंतवणूक असे समजतो. अनेकदा कर्जरोखे भागभांडवल तारणभाग खरेदीसाठी वापरलेला पैसा यालाही गुंतवणूक असे समजतो. परंतु केन्सच्या मते ही खरी किंवा वास्तव गुंतवणूक नव्हे तर ही वित्तीय गुंतवणूक होय. वास्तव गुंतवणूक यालाच केन्स गुंतवणूक म्हणतो. केन्सच्या मते ज्या गुंतवणूकीमूळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडून येते व अधिक लोकांना रोजगार मिळतो अशी कोणतेही गुंतवणूक ही वास्तव गुंतवणूक होय.

जोन रॉबिन्सनच्या मते गुंतवणूक म्हणजे भांडवलात वाढ होणे होय. अशी वाढ नवीन घर बांधल्याने अथवा नवीन कारखाना उभारल्याने होते. अस्तित्वात असलेल्या भांडवली वस्तूच्या साठयात प्रत्येक वर्षी जेवढी वाढ होईल ती वाढ म्हणजे गुंतवणूक होय. नवीन यंत्रसामूग्री, रस्ते, पूल, रेल्वे मार्ग, कारखान्यांची उभारणी, इत्यादीसाठी जी गुंतवणूक होते ती वास्तव गुंतवणूक होय.

अशी प्रभावी गुंतवणूक देशातील खाजगी व्यक्ती विविध संस्था बँका व सरकार यांच्याकडून केली जाते खाजगी क्षेत्रातील गुंतवणुक ही भांडवलाची सीमांत लाभक्षमता आणि व्याजदर या दोन घटकावर अवलंबून असते. सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूक ही मात्र या दोन घटकांच्या प्रभावाशिवाय निर्धारित होत असते.

### ४.२.१ गुंतवणूकीचे प्रकार (Types of Investment):

#### १) निव्वळ गुंतवणूक (Net Investment):

ज्या गुंतवणूकांमुळे नक्त भांडवलामध्ये वाढ होते त्या गुंतवणूका निव्वळ गुंतवणूका म्हणून ओळखल्या जातात.

निव्वळ गुंतवणूक - एकूण गुंतवणूका - घसारा


#### २) स्वायत्त गुंतवणूक (Autonomous Investment):

जी गुंतवणूक खाजगी उपभोगामुळे प्रभावित न होता स्वतंत्रपणे होते तिला स्वायत्त गुंतवणूक असे म्हणतात. सार्वजनिक क्षेत्रात केली जाणारी ही स्वायत्त गुंतवणूक होय. कारण अशी गुंतवणूक नफ्याच्या प्रेरणेने होत नसून ती सार्वजनिक हिताच्या दृष्टिकोनातून केली जाते. रेल्वे, शस्त्रास्त्रे, दारुगोळा इ. साहित्याचे कारखाने आर्थिक विकासाच्या व समाजकल्याणाच्या

योजना, सार्वजनिक गरजा भागविण्यासाठीच्या योजना इत्यादीसाठी केली जाणारी गुंतवणुक ही स्वायत्त गुंतवणूक होय. या गुंतवणूकीचा उत्पन्नाशी काही संबंध नसतो.

### ३) प्रेरित गुंतवणूक (Induced Investment):

ही गुंतवणूक नफ्याच्या प्रेरणेमुळे होते तिला प्रेरित गुंतवणुक म्हणता येईल. अशी गुंतवणुक खाजगी उपभोगाने प्रेरित होते. उपभोगात वाढ झाली असता प्रेरित गुंतवणूकीत वाढ होते. उपभोग घटला प्रेरित गुंतवणूक घटते. उपभोग हा उत्पन्नावर अवलंबून असतो. खाजगी भांडवलदार नफ्याच्या अपेक्षेने गुंतवणूक करत असतो.




**आकृती ४.१**

### ४) स्थूल गुंतवणूक (Gross Investment):

एका विशिष्ट कालावधीत (एका वर्षात) निश्चित भांडवली साठ्यात व कच्च्या मालात होणारी एकूण गुंतवणूक म्हणजे स्थूल गुंतवणूक होय.

### ५) वित्तीय गुंतवणूक (Financial Investment):

अशा प्रकारच्या गुंतवणूकीमूळे भांडवली साठ्यात काहीही बदल होत नाहीत. असा गुंतवणूकीत देशात सध्या अस्तित्वात असणाऱ्या वस्तूंचीच नव्याने खरेदी केली जाते. उदा. जून्या कंपन्याचे भाग विकत घेणे इ. ही केवळ वित्तीय गुंतवणूक ठरते.

### ६) सार्वजनिक गुंतवणूक:

सार्वजनिक क्षेत्रात किंवा सरकारी उपक्रमात केली जाणारी गुंतवणूक सरकार समाजाच्या गरजा भागविण्यासाठी उदा. वीज, पाणी, रस्ते, दळणवळण वाहतूक, दूरसंचार, आरोग्याच्या सुविधा अशा कारणासाठी झालेली गुंतवणूक ही सार्वजनिक गुंतवणूक होय.

### ७) नियोजित गुंतवणूक:

सरकार काही निश्चित उद्दिष्टे समोर ठेवून गुंतवणूकीचे नियोजन करुन केलेली गुंतवणूक म्हणजे नियोजित गुंतवणूक होय. साक्षरतेचे प्रमाण विशिष्ट टक्क्यांनी वाढविण्यासाठी दरवर्षी स्थूल देशान्तर्गत उत्पादनाच्या किती टक्के गुंतवणूक शिक्षणावर खर्च करायची

याबाबतचे नियोजन असते शिवाय भविष्यकालीन अंदाज बांधून उद्योजक गुंतवणूकीचे नियोजन करतात.

### ४.२.२ गुंतवणूकीवर परिणाम करणारे घटकः

खाजगी क्षेत्रातील गुंतवणुक नफ्याच्या प्रेरणेने केली जाते नफा हा

१) भांडवलाची सीमांत कार्यक्षमता व

२) व्याजाचा दर या दोन घटकावर अवलंबून असतो. सामान्यता व्याजाच्या दरात फार मोठे बदल होत नसल्याने भांडवलाच्या सीमान्त लाभक्षमतेला महत्व प्राप्त होते.

विशिष्ट वेळी किती भांडवल गुंतवणूक केली जाईल. हे भांडवलाची सीमान्त कार्यक्षमता व व्याजदर यावर अवलंबून असते जेव्हा व्याजदरापेक्षा भांडवलाची सीमांत कार्यक्षमता जास्त असते तेव्हा गुंतवणूक फायदेशीर होत असल्याने गुंतवणूकीने वाढ होते.

### ४.२.३ गुंतवणूकीचे महत्वः

केन्सच्या रोजगारविषयक सिद्धांतात गुंतवणूक फलनाला अत्यंत महत्वाचे स्थान आहे कारण देशातील रोजगार पातळी ठरविणारी प्रभावी मागणी ही उपभोग खर्च व गुंतवणूक खर्च यावरुन ठरते. अल्पकाळात उपभोग खर्च स्थिर असतो. त्यामुळे प्रभावी मागणी व रोजगारीची पातळी गुंतवणूकीत होणाऱ्या बदलानुसार ठरतात. देशातील रोजगार पातळीत वाढ होण्यासाठी, प्रभावी मागणीत वाढ होण्यासाठी गुंतवणूकीत वाढ झाली पाहिजे तरच राष्ट्रीय उत्पन्नाची व रोजगाराची पातळी टिकून राहील. म्हणूनच केन्सच्या रोजगार विषयक सिद्धान्तात गुंतवणूक फलनाचे महत्वाचे स्थान आहे.

## ४.३ गुणक (MULTIPLIER)

लार्ड केन्स यांनी आपल्या रोजगार विषयक सिद्धांतात ज्या दोन साधनाचा वापर केला त्यापैकी एक साधन म्हणजे गुणक आणि दुसरे प्रवेग होय. गुंतवणूकीचा उपभोगावर कसा परिणाम होतो. हे गुणकाचा संकल्पनेतून सांगितले. गुंतवणूकीतील मुळ वाढ आणि त्यामुळे एकूण उत्पन्नात झालेली अंतिम वाढ या दोहोंतील संबंध गुणकाच्या आधारे स्पष्ट केले आहे. गुणकाची कल्पना आर. एफ. कान्ह यांनी मांडली त्याना रोजगार गुणक म्हटले जाते. गुणवणूक व रोजगार पातळी यामधील संबंध रोजगार गुणकाच्या सहाय्याने स्पष्ट केले आहे.

गुणकाची व्याख्या गुणक म्हणजे गुंतवणूकीत होणाऱ्या बदलाचे प्राप्तीत होणाऱ्या बदलाशी गुणोत्तर होय. सुरवातीला केलेल्या गुंतवणूकीमुळे अंततः उत्पन्नामध्ये किती पटीने वाढ होईल हे गुणक सांगतो. केन्स यांच्या मते गुंतवणूकीतील प्राथमिक वाढ उपभोगात बदल घडवून आणते व उपभोगातील वाढीमुळे प्राप्तीत वाढ घडून येते. गुंतवणुकीतील बदल $\rightarrow$ उपभोगातील बदल $\rightarrow$ एकूण प्राप्तीत बदल

$$K = \frac{\Delta Y}{\Delta I}$$

$K =$ गुंतवणूक बदल

$\Delta Y =$ उत्पन्नातील बदल

$\Delta I =$ गुंतवणूकीतील बदल

$$K = \frac{\Delta Y}{\Delta I}$$

$$K = \frac{25}{5}$$

$$K = 5$$

यावरुन गुंतवणूकीतील वाढ व उत्पन्नातील वाढ यातील संख्यात्मक संबंध गुणकाच्या सहाय्याने स्पष्ट केला जातो. आरंभी गुतवणूकीत काही वाढ केल्याने एकूण उत्पन्न कितीतरी अधिक पटीने वाढलेले असते. गुंतवणूक केलेल्या उद्योगातील रोजगारी वाढते. हे लोक उपयोग्य वस्तूंची निर्मिती करणाऱ्या इतर उद्योगातील वस्तूंची मागणी करतात व त्यामुळे मुळ गुंतवणूक केलेल्या उद्योगाव्यतिरिक्त इतर उद्योगातील उत्पन्न वाढते. थोडक्यात गुंतवणूकीतील बदल व उत्पन्नातील बदल यांचे परस्परांशी असलेले प्रमाण म्हणजे गुणक होय.

### ४.३.१ गुणकाचे प्रकार:

गुणकाचे तीन प्रकार आहेत पैकी एक रोजगार गुणक व दोन विदेशी व्यापर गुणक व तीन गुंतवणूक गुणक

### १) रोजगार गुणक:

रोजगार गुणकाची कल्पना आर. एफ कान्ह यांनी मांडली. त्याच्या मते व्यवसायात (उद्योगात) गुंतवणूक केलेल्या आरंभी रोजगारात वाढ झाल्याने अंतिम एकूण रोजगारी काही पटीने वाढते ही वाढ दाखविणाऱ्या प्रमाणाला रोजगार गुणक म्हणतात.

### २) विदेशी व्यापार गुणक:

मॅकलप आणि जे. जे. पोलाक यांनी ही कल्पना मांडली एखाद्या देशाच्या आयातीपेक्षा निर्यातीत होणाऱ्या शुद्ध (Net) वाढीमुळे त्या देशाच्या उत्पन्नात घडून येणाऱ्या अंतिम वाढीच्या गुणोत्तराला विदेशी व्यापार गुणक म्हणतात.

$$Kf = \frac{\Delta Y}{\Delta X}$$

$Kf =$ विदेशी व्यापार गुणक
$\Delta Y =$ राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ (बदल)
$\Delta X =$ निर्यातीतील वाढ

### ३) गुंतवणूक गुणक:

लॉर्ड जे. एम. केन्स यांनी गुंतवणूक गुणकाची कल्पना मांडली. गुंतवणूकीतील बदलाचा उत्पन्न व रोजगारीत होणाऱ्या बदलाचे स्पष्टीकरण यात करण्यात आले.


### गुणकाचे कार्य (Working of Multiplier) :

उत्पन्नात वाढ झाली की उपभोक्ता आपल्या उत्पन्नाचा काही भाग उपभोगांवर खर्च करतो आणि उरलेल्या भागाची बचत करतो. उपभोक्ताने उपभोगावर खर्च केलेली रक्कम वेगवेगळ्या उत्पन्नघटकांना उत्पन्नाच्या रुपाने मिळते हे उत्पादनाचे घटकआपल्या वाढलेल्या उत्पन्नाचा काही भाग उपभोगावर खर्च करतात हा खर्च परत उत्पन्नात वाढ घडवून आणतो. अर्थव्यवस्थेत अशा प्रकारे उत्पन्नातून सातत्याने उपभोग्य प्रेरित केला जातो. उपभोक्ता आपल्या वाढलेल्या उत्पन्नातून किती खर्च करेल हे सीमांत उपभोग प्रवृत्तीवर अवलंबून असते. समजा


अर्थव्यवस्थेत मूळ गुंतवणूक १०० कोटी रुपयांनी केल्यास त्या उद्योगातील लोकांचे उत्पन्न १०० कोटी रुपयांनी वाढेल कारण या गुंतवणूकीमुळे कामगारांना वेतन, कच्चा मालाचा पुरवठा करणाऱ्याना त्याची किंमत, भांडवलदाराला व्याज, जमीनीचा खंड या स्वरुपात उत्पन्न मिळेल. तात्काळ १०० कोटी रुपयाचे उत्पन्न वाढेल हे उत्पन्न ज्यांना मिळाले ते लोक आपल्या वाढलेल्या उत्पन्नाचा काही भाग उपभोगावर खर्च करतील त्यामुळे त्यांची मागणी वाढेल. त्यांचे उत्पादनवाढ आणि अन्य उद्योगातील लोकांचे उत्पन्न काही प्रमाणात वाढेल. यालाच उत्पन्नातील प्रेरितवाढ असे म्हणता येईल. उत्पन्नाशी उपभोग खर्चाचे असणारे प्रमाण हे सीमांत उपभोग प्रवृत्तीवर अवलंबून असते. जर सीमांत उपयोगप्रवृत्ती जास्त असेल तर वाढलेल्या उत्पन्नाचा जास्त भाग उपयोग वस्तूसाठी खर्च होईल त्यामुळे उपभोगातील प्रेरितवाढ जास्त राहील. तेव्हा उत्पन्न १०० कोटीने वाढते. तेव्हा उपभोग ८० कोटीने वाढतो. तेव्हा दुसरी प्रेरित वाढ ८० कोटी रुपयाची होईल हे चक्र असेच चालू राहून एकूण उत्पन्नात ५०० कोटी रुपयाची वाढ होईल. तर उपभोग ४०० कोटी रुपयाने वाढेल हे खालील कोष्टकात दाखवले आहे.

| उत्पन्नातील वाढ | उत्पन्न कोटी रु. | उपभोगखर्च कोटी रु. |
|---|---|---|
| मुळ गुंतवणूकीतील वाढ | १०० | ८० |
| पहिली अवस्था | ८० | ६४ |
| दुसरी अवस्था | ६४ | ५१.२ |
| तिसरी अवस्था | ५१.२ | ४१ |
| चौथी अवस्था | ४१ | ३२.८ |
| पाचवी अवस्था | ३२.८ | २६ |
| सहावी अवस्था | २६ | २०.८ |
| **एकूण** | **५००** | **४००** |

अशा प्रकारे उत्पन्नातील वाढ → उपयोग खर्चातील वाढ → मागणीत वाढ → रोजगारीत वाढ → उत्पन्नात वाढ असा चक्रीय परिणाम सूरू होतो.




**आकृती ४.२**



**आकृती ४.३**

सीमान्त उपभोगप्रवृत्ती ही घटती असल्यामुळे जसजशी उत्पन्नात वाढ होत जाते तसतसा उपयोग खर्च कमी कमी कमी होत जातो. त्यामुळे उत्पन्नात होणारी प्रेरित वाढ ही कमी कमी होत जाते. उत्पन्नात अनेकवेळा झालेल्या प्रेरित वाढीमुळे एकूण उत्पन्न मूळ गुंतवणूकीपेक्षा कितीतरी अधिक पटीने वाढते.

आकृतीच्या सहाय्याने गुणकाचे स्पष्टीकरण केले जाते.
उत्पन्न = उपभोग + बचत y = C+ S N

मुळरेषा ४५ अंशाची आहे N बिंदूत छेदते गुंतवणूकीत वाढ झाल्याने C+I वक्र वरच्या पातळीवर सरकत सरकत असल्याने मूळ रेषेला हा वक्र $N_1$ बिंदू छेदतो म्हणजे मूळचा N समतोल बिंदू असुन नंतरचा $N_1$ हा समतोल बिंदू आहे. यावरुन गुंतवणूकीतील वाढ ($\Delta I$) Qn1 झाली असता उत्पन्नातील ($\Delta Y$) MM1 पर्यंत होत $QN_1$ पर्यंत होते $QN_1$ अंतरापेक्षा $MM_1$ हे अंतर जास्त आहे. याचा अर्थ मुळ गुंतवणूकीत केलेल्या वाढीपेक्षा अंतिक उत्पन्नातील वाढ अधिक पटीने होते. गुंतवणूकीतील बदल व उत्पन्नातील बदल यांचे परस्पराशी असलेले प्रमाण म्हणजे गुणक होय.

### ४.३.२ गुणकाची गृहीततत्त्वे:

१. सीमांत प्रवृत्ती कायम राहते.
२. प्रेरित गुंतवणूक होत नाही.
३. बंदिस्त अर्थव्यवस्था
४. अर्थव्यवस्थेत स्वायत्त गुतवणूक केली जाते.
५. अर्थव्यवस्थेत अपुर्ण रोजगाराची परिस्थिती आहे.
६. किंमती स्थिर असतात.
७. अर्थव्यवस्थेत बेकारी असते
५. गुंतवणूकीवरील उपभोग प्रवेगाच्या परिणाम विचारात घेतला जात नाही.
९. गुणकाच्या प्रक्रियेमध्ये गळती
१०. उपभोग हे चालू उत्पन्नाचे फल आहे.

### ४.३.३ गुणकाच्या गळत्या (Leakages in Multiplier):

उत्पन्न प्रवाहत अनेक गळत्या आढळतात. या गळत्यांमुळे उत्पन्न वाढीचे कार्य मंदगतीने होते. उत्पन्न प्रवाहात खालील गळत्या दिसून येतात.

**१) बचत:**

उत्पन्नात होणारी सर्व वाढ उपभोगावर खर्च करण्यात येत नाही. तर त्यातील काही भागाचा संचय करण्यात येतो. त्यामुळे गुणकाच्या कार्यावर मर्यादा पडतात.

**२) निष्क्रिय रोख रकमेचा संचय:**

लोकाची निष्क्रिय रोख रकमेचा संचय करण्याची प्रवृत्ती असते. हा संचय विनिमंय व्यवहाराचे व सट्टेबाजीच्या हेतूने केली जाते. लोकांनी मोठ्या प्रमाणावर रोखतेचा संचय केला तर याचा परिणाम उपभोगावर होतो व गुणक परिणाम सीमित होतो.

**३) कर:**

कराच्या आकारणीमुळे उपभोग खर्च कमी होतो व त्याच्या परिणाम गुणकाची कार्यक्षमता कमी होण्यात होते.

**४) जुन्या रोख्यांची खरेदी:**

वाढलेल्या उत्पन्नाचा भाग जून्या रोख्यांची खरेदी करण्यासाठी वापरला तर उपभोगावरील खर्च कमी होऊन गुणकात घट होते. तसेच जुने रोखे विकून ज्यांना पैसे मिळतात त्यांनी जर ते उपभोगावर खर्च केला नाही तर एकूण उपभोगावरील खर्च कमी होऊन गुणकाच्या कार्यावर प्रतिकूल परिणाम होतो.

**५) किंमत वाढ:**

किंमतीत वाढ झाल्यास उपयोगावरील खर्च वाढतो. पण मागणी मात्र वाढत नाही. उत्पन्नातला एक मोठा भाग निघून जातो आणि उपभोग प्राप्ती व रोजगारावर प्रभाव पाडू शकत नाही.

**६) वस्तू व सेवांची उपलब्धता:**

लोकांच्या उत्पन्नात वाढ झाली पण जर बाजारात पूरेशा प्रमाणात वस्तू सेवांची उपलब्धता झाली नाही तर सीमांत उपभोग प्रवृत्ती कमी होऊन गुणकावर मर्यादा पडते.

**७) परकीय कर्जाची परतफेड:**

वाढलेल्या उत्पन्नाच्या काही भाग परकीय कर्जाची परतफेड करण्यासाठी वापरला गेला तर उत्पन्न प्रवाह परदेशात जाऊन गुणकास गळती लागते.

**८) कर्जफेड:**

वाढलेले उत्पन्न लोकांनी जुन्या कर्जाची परतफेड करण्यासाठी वापरलेतर उत्पन्नाचा प्रवाह वेगळ्या दिशेने जाईल व उत्पन्नातील वाढीच्या प्रमाणात उपभोग खर्च वाढणार नाही. तसेच श्रीमंतांनी आपला पैसा उपभोग खर्चासाठी वापरला नाही तर उत्पन्न प्रवाहातून तेवढा पैसा कमी होईल आणि गुणकाच्या प्रभाव कमी होईल.

**९) रोजगारीची मर्यादाः**

केन्स च्या मते पूर्ण रोजगारीची मर्यादा ओलाडल्यानंतर गुंतवणूकीचा उत्पन्न वाढीचा गुणक परिणाम दिसून येत नाही. पूर्ण रोजगारीची पातळी ओलांडल्यानंतर गुंतवणूकीत वाढ झाली तरी उत्पन्नात वाढ न होता केवळ किमतीच्या पातळीत वाढ होते.

**१०) आयातः**

दुसऱ्या देशातून आयात केलेल्या वस्तूवर करण्यात आलेला खर्च प्राप्तीत अथवा रोजगारीत वाढ करीत नाही. अशा प्रकारे गुंतवणूकीद्वारे प्राप्ती झालेल्या वाढीचा काही अंश आपण वस्तूंचे देणे फेडण्यासाठी दुसऱ्या देशात जातो व यांचा उपयोग अंतर्गत उपयोग वाढीसाठी होत नाही परिणामतः गुणकाचा प्रभाव कमी होतो.

**४.३.४ गुणकावरील टीकाः**

**१. उपभोग फक्त उत्पन्नावर अवलंबून असतो :**

डयूसनबेदी यांच्या मते उपयोग हा शेजाऱ्यांचे उत्पन्न प्रदर्शन परिणाम भविष्यात निश्चित उत्पन्न मिळविण्यासाठी केला जाणारा संपत्ती संचय अशा विविध घटकावर अवलंबून असतो पण केन्सच्या मते उपयोग उत्पन्नावर अवलंबून असतो हे चूकीचे आहे.

**२. सीमांत उपभोगप्रवृत्ती म्हणजे गुणकः**

हॅबलर यांच्या मतानुसार केन्स यांचा गुणक म्हणजे सीमांत उपभोग प्रवृत्तीचे दुसरे नाव आहे.

**३. अनिश्चितताः**

गुणक हे एक गणितीय साधन असल्यामुळे त्याचा निश्चित अंदाज येत नाही.

**४. प्रवृत्ती गुंतवणूकांचा विचार केलेला नाहीः**

केन्सनी मांडलेल्या गुणवत्ता हा आणखी एक महत्त्वाचा दोष आहे. आरंभिक गुंतवणूकीतून निर्माण झालेल्या भागाचाच गुणकात समावेश केला जातो. निर्माण झालेल्या बचतीमधून केल्या जाणाऱ्या प्रवृत्ती गुंतवणूकांचा विचार गुणकात केला जात नाही. उपभोगात वाढ झाल्यामुळे या गुंतवणूका केल्या जातात. वाढलेल्या उपभोगामुळे वस्तुंची निर्मीती करण्याचा क्षेत्रातील गुंतवणूका वाढविणे आवश्यक असते.

**५. गुणकाची कल्पना स्थैतिक आहेः**

गुणक तत्वाचे विवेचन स्थिर स्वरुपाचे आहे. आधुनिक गतिमान अर्थव्यवस्थेतील बदलाचे विवेचन करण्यस ते असमर्थ ठरते.

**६. अपूर्ण रोजगाराच्या गृहीतावरः**

केन्सचे गुणक तत्त्व हे अपूर्ण रोजगाराच्या गृहीतावर आधारलेले आहे. टीकाकाराच्या मते केन्सने अपूर्ण रोजगार ही सामान्य स्थिती व पूर्ण रोजगार ही विशेष स्थिती मानली आहे. हे सयुक्तिक वाटत नाही.

**७. कालहरण:**

उत्पन्न आणि उपभोग खर्च यांच्यामध्य कालहरण नसते. असे गृहीत धरले आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र उत्पन्न मिळाल्यापासूनच खर्च होईपर्यंत काही काळ जातो.

**गुणकाचे महत्त्व:**

१) व्यापार चक्रांच्या अभ्यासास उपयुक्त केन्सने मांडलेला गुणक पूर्ण रोजगार गुणक, मूल्य गुणक, इ. वेगवेगळ्या प्रकारच्या गुणकामध्ये विकसित करण्यात आला. गुणाकांच्या सहाय्याने व्यापार चक्राचे नियंत्रण आणि व्यापारचक्राबद्दलचे अंदाज करता येतात.

२) उत्पन्न व रोजगार वाढ यांचे स्पष्टीकरण गुणकाच्या सहाय्याने उत्पन्नामध्ये व रोजगारात कशी वाढ होते. याचे स्पष्टीकरण करता येते.

३) रोजगारात वाढ करण्यासाठी गुंतवणूकीचे महत्त्व स्पष्ट करता येते. केन्सनी गुणकाच्या सहाय्याने दाखवून दिले की प्राथमीक गुंतवणूकीमुळे उत्पन्न आणि रोजगारात टप्याटप्याने कशी वाढ होते. केन्सच्या मते गुंतवणूका हा एक क्रियाशील घटक आहे. गुणक, भांडवली गुंतवणूका करुन उत्पन्न व उपभोग यांतील अंतर कसे भरुन काढता येते आणि त्यामुळे उत्पन्नात आणि रोजगारीत कशी वाढ होते यावर गुणक प्रकाश टाकतो.

४) लाभप्रेरणा सरकारी स्वायत्त गुंणवणूकीचे महत्त्व गुणकाने सिद्ध केले आहे. कारण सरकारी गुंतवणूकीमुळे देशातील उत्पन्न व रोजगारीत वाढ होते.

५) प्रा. सॅम्पूअलसन यांच्या मते तुटीचा अर्थभरणा प्रभावी कसा ठरतो चे विवेचन गुणकाच्या सहाय्याने करता येते. मंदीच्या काळात व्याजदर कमी करुन चालत नाही. कारण या काळात भांडवलाची सीमांत लाभक्षमता अत्यंत कमी असते. त्यामुळे अल्प व्याजदर गुंतवणूकीला चालना देत नाही. अशावेळी सरकारने तुटीचा अर्थभरण्याच्या मार्गाने सार्वजनिक खर्च वाढवावा. त्यामुळे उत्पन्न रोजगारीत वाढ होते.

## ४.४ विकसनशील देशांमध्ये केनेशियन सिद्धांत साधनांचा संबंध

जे. एम. केन्स यांनी त्यांच्या 'द जनरल थिअरी' (१९३६) च्या प्रकाशनातून विकसित आणि विकसनशील देशांच्या आर्थिक धोरणांवर मोठा प्रभाव पाडला. १९२९-३३ च्या महा / मोठ्या जागतिक व्यापार मंदीच्या संदर्भात १९३६ मध्ये उत्पन्न आणि रोजगाराचा केनीशियन सिद्धांत सादर केला गेला. केनीशीयन योजना / नियम हे काही प्रगत अर्थव्यवस्थांनी स्वीकारले आहेत आणि ते देश उच्च रोजगार आणि वाजवी किंमती स्थिरता प्राप्त करण्यात यशस्वी झाले. काही अर्थशास्त्रज्ञांचे मत होते की औद्योगिकदृष्ट्या प्रगत देश आणि विकसनशील देश यांच्यात असलेल्या आर्थिक रचनेतील फरकांमुळे विकसनशील देशांमध्ये केनीशीयन योजना / नियम लागू केले जाऊ शकत नाहीत. तथापि, काही आधुनिक अर्थशास्त्रज्ञांचा असा विश्वास आहे की सध्याच्या विकसनशील देशांमध्ये काही केनीशीयन संकल्पना आणि सूचना अजूनही लागू आहेत.

### ४.४.१ पारंपारिक दृष्टिकोन

पारंपारिक दृष्टिकोन हा केनीशियन अर्थशास्त्राच्या असंबंधतेच्या / अप्रासंगिकते बद्दलच्या मतांचे / दृष्टिकोनाचे स्पष्टीकरण देते.

**१) मागणीची कमतरता :** कीन्सच्या मते प्रगत देशांमधील मागणीची कमतरता आणि खरेदी (क्रय) शक्तीतील कमतरता हे त्यांच्या बेरोजगारीचे मूळ कारण आहे. परंतु अविकसित देशांमध्ये

बेरोजगारी ही मुख्यत्वेकरुन भांडवलाची कमतरता आणि रोजगाराच्या पर्याप्त संधी नसल्यामुळे आढळून आलेली उद्योजकतेतील सर्वसाधारण कमतरता यामुळे कारणांमुले उद्भवते. विकसनशील देशांमध्ये, संरचनात्मक अडचणी / मर्यादा आणि श्रमशक्तीच्या आकाराच्या तुलनेत अपुरा असलेला भांडवली साठा, यामुळे बेरोजगारी उद्भवली आहे.

सरकारी खर्च वाढवून (पैशाच्या छपाईद्वारे अर्थसहाय्य) एकत्रित / समग्र मागणी वाढविण्याचे केन्सचे धोरण हे भांडवलदार देशांच्या चक्रीय बेरोजगारीच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी बरेचसे संबंधित / प्रासंगिक आहे. परंतु हे धोरण हे विकसनशील देशांमधील लोकसंख्येतील जलद वाढ, विशेषतः ग्रामीण भागातील, भौतिक भांडवलाची कमतरता, आणि उपभोग वस्तूंची अपुरी उपलब्धता यामुळे उद्भवणारी छुपी किंवा प्रच्छन बेरोजगारीची समस्या सोडवू शकत नाही. साध्या / सोप्या शब्दांत सांगायचे तर, बेरोजगारीही मागणीच्या अभावाने / कमतरतेने होत नसल्या कारणाने, समस्येचे निराकरण हे अतिरिक्त मागणी किंवा खरेदी शक्ती निर्माण करण्याने होत नाही.

**२) स्थिरता विरुद्ध वाढ :** जे. एम. केन्स हे प्रगत भांडवलशाही देशांच्या अल्प-कालावधीतील समष्टि आर्थिक समस्यांशी संबंधित होते. परंतु कीन्सने / केन्सने दीर्घकालीन घटना असलेल्या आर्थिक विकासाच्या मुद्याकडे दुर्लक्ष केले. केनेशियन अर्थशास्त्राची ही सर्वात मोठी कमतरता आहे. म्हणून विकसनशील देशांच्या आर्थिक वाढीच्या मंद / धीमा / संथ दराच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी तसेच काही स्थूल आर्थिक धोरणे अवलंबुन वेगवान आर्थिक विकासास चालना देण्यासाठी केनेशियन सिद्धांत व धोरणे लागू केली जाऊ शकत नाहीत.

विकसनशील देशांच्या अत्यंत महत्त्वाच्या अशा आर्थिक विकासाच्या समस्येकडे केन्सने लक्ष दिले नाही  संबंधित केले नाही.

**३) केन्सच्या धोरणातील नियमांचे अप्रासंगिकता / असंबद्धता :** काही अर्थशास्त्रज्ञांच्या मते, सरकारी खर्च वाढविणे (नवीन पैसे तयार करुन) ह्या केन्सचा उपायामुळे रोजगार, उत्पादन आणि वास्तविक उत्पन्न वाढवण्याऐवजी विकसनशील देशांमध्ये महागाई होण्याची शक्यता आहे. तर सनातनवाद्यांच्या धोरणांच्या मते अशा देशांमध्ये रोजगार आणि उत्पादन वाढविण्यासाठी बचतीच्या दरात वाढ करणे आणि भांडवली निर्मिती करणे हे अधिक प्रभावी आहे. याला आवश्यक वस्तूंच्या पुरवठ्यात, मुख्यत्वेकरुन अन्नधान्य, निरंतर वाढ करुन आधारदिला गेला पाहिजे (याचे समर्थन केले गेले पाहिजे). म्हणून, अविकसित देशांमध्ये सनातनवादी पुरवठा बाजूची धोरणे ही केन्सच्या मागणीच्या बाजूच्या धोरणांपेक्षा / उपाययोजनांपेक्षा जास्त प्रस्तुत / संबंधित आहेत.

**४) गुणकांचे (Multiplier) कार्य :** विकसनशील देशांमध्ये अर्थव्यवस्थेच्या अस्तित्वात असलेल्या रचनेमुळे बेरोजगारी कमी करण्यासाठी आणि उत्पन्न वाढविण्याकरिता केनेशियन गुणक तत्त्व कार्य करीत नाही. भारतासारखे अविकसित / विकसनशील देश अजूनही शेतीप्रधान अर्थव्यवस्था आहेत. कमी उत्पादकता आणि कमी पुरवठा लवचिकता हे त्याचे मुख्य वैशिष्ट्य आहे. अशा परिस्थितीत, शेतीमधील सार्वजनिक गुंतवणूकीच्या खर्चामध्ये झालेली वाढही भिन्न प्रकारचे बहुविध गुणक प्रभाव दाखविण्याची शक्यता आहे. यामुळे कृषी मालाचा पुरवठा वाढवण्याऐवजी कृषी मालाच्या किंमतीत वाढ होईल. औद्योगिक कच्च्या मालाची कमतरता

(शेतीपासून मिळणारे) देखील परिव्ययजन्य चलनवृद्धीस / परिव्ययजन्य अतिवृद्धीस सुद्धा कारणीभूत होते. अविकसीत देशांमध्ये ग्राहक वस्तु उद्योगात जास्त प्रमाणात / अतिरिक्त क्षमता नसते. त्याचप्रमाणे, या देशात मागणीतील वाढीसप्रतीवाद म्हणून मूलभूत साधनांचा पुरवठा वाढविणे शक्य होत नाही आणि भारतासारख्या श्रम / कामगार अतिरिक्त देशांमधील मुख्य समस्या ही त्या देशातील ग्रामीण भागातील छुपी / प्रच्छन बेकारी किंवा बेरोजगारीही आहे. यामुळे, अशा देशांमध्ये रोजगार आणि उत्पादन वाढविण्यास केन्सचेगुणक तत्त्व अपयशी ठरते.

## ४.४.२ आधुनिक दृष्टिकोन

केन्सच्या अर्थशास्त्राची प्रासंगिकता / समर्पकता आधुनिक अर्थशास्त्रज्ञांना, मुख्यतः विकसनशील देशांमध्ये केन्सच्या अर्थशास्त्राची प्रासंगिकता / समर्पकता आढली आहे. पुढील मुद्दे या प्रासंगिकतेचे / समर्पकतेचे स्पष्टीकरण देतील.

**१) पुर्ण रोजगार :** इंग्लिश अभिमत संप्रदायाने कल्पना केलेल्या मुक्त स्पर्धात्मक अर्थव्यवस्थेत पूर्ण स्पर्धा / स्पर्धेकडे आपोआप पोहोचले जाईल आणि तिथे ती अर्थव्यवस्था स्थिर होईल असा विश्वास हा केन्सच्या जनरल थिअरीच्या परिणामी पूर्णपणे विस्कळीत झाला आहे. अशाप्रकारे, केन्सच्या जनरल थियरीने / सिद्धांताने निरंकुश अर्थव्यवहार वाद / निरंकुशता निती यावर मारक वार केला / कार्यवाही केली. केन्स यांनी खात्रीपूर्वक असे दर्शविले आहे की रोजगाराची पातळी वाढविण्यासाठी आणि त्यायोगे अर्थव्यवस्थेतील चढउतार टाळण्यासाठी सरकारने हस्तक्षेप करुन सकारात्मक आणि स्थिर धोरणाचे अनुसरण करावे लागेल. म्हणूनच, विकसित आणि विकसनशील या दोन्ही देशांमध्ये पूर्ण रोजगाराचे (किंवा अर्थव्यवस्थेत रोजगाराची पातळी वाढवण्याच्या उद्देशाने) उद्दिष्ट साकार करण्यासाठी सरकारकडून एक सकारात्मक आणि हस्तक्षेपवादी धोरण अवलंबले जात आहे.

**२) मागणीची कमतरता :** विकसनशील देशांमध्येही भांडवलावरील परतावा सकारात्मक असण्याची वस्तुस्थिती असून सुद्धा भांडवल निरुपयोगी राहते. वग्नेर नरक्स यांच्या मते, विकसनशील देशांत औद्योगिक वस्तूंचा देशांतर्गत बाजाराचा आकार मर्यादित असल्यामुळे गुंतवणूकीच्या उत्तेजनाप्रमाणेच कमी आहे. व्यापक प्रमाणात पसरलेले दारिद्र्य आणि कमी दरडोई उत्पन्न हे समूह उपभोग वस्तूंच्या छोट्या बाजारासाठी जबाबदार आहे. कृषी क्षेत्राच्या उत्पादनातील संथ / धीमी वाढ कृषी क्षेत्राच्या नकारात्मक वाढीमुळे ग्रामीण भागातील लोकांच्या मागणीतील मागणी कमी होणे, सार्वजनिक तसेच खाजगी क्षेत्रात गुंतवणूकीचे प्रमाण कमी होणे, निर्यातीतील घट यासारखी अनेक कारणे ही मंदीयुक्त भाव फुगवटा आणि मागणीची कमतरता यांस कारणीभूत होतात. बचतीच्या कमी दर, भांडवलाचा अपुरा साठा, पायाभूत सुविधांची कमतरता आणि कच्च्या मालाची कमतरता यासारख्या पुरवठ्यावरील / किंवा पुरवठा बाजूच्या अडचणींमुळे औद्योगिक वाढ मंदावली आहे. हे असे दर्शविते की अडथळा किंवा पीछेहाट ही मागणी आणि पुरवठा या दोन्ही बाजुंकडून आहे. म्हणून मागणीच्या कमतरतेची केन्सची संकल्पना भारतासारख्या विकसनशील देशांशी काहीशी संबंधित आहे. मागणी कमी होण्याची केन्सची संकल्पना भारताशी अंशतः संबंधित आहे.

**३) व्यवसाय गुंतवणूकीचे वर्तन किंवा व्यवहार :** केन्सच्या मते भांडवलाची सीमान्त कार्यक्षमता आणि व्याज दर हे गुंतवणूकीचे दोन महत्त्वाचे निर्धारक आहेत. अपेक्षा या व्यवसाय संस्थांच्या गुंतवणूकीच्या वागणुकीवर / व्यवहारावर परिणाम घडविण्यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.

केन्स यांनी 'पशू आत्मा / अवसान' (Animal Spirit) च्या बाबतीत गुंतवणूकीचे / वा वर्तन / व्यवहार स्पष्ट केले / केला. 'पशू आत्मा / अवसान' ही संकल्पना उद्योजकांच्या आशावाद आणि त्यांची जोखमीच्या गुंतवणूकीचे प्रकल्प हाती घेण्याची तयारी दर्शवते. म्हणून गुंतवणूक हा स्थूल आंतरदेशीय उत्पादनाचा (जीडीपीचा - ) सर्वात अस्थिर घटक आहे. केन्सने गुंतवणूकीच्या उच्च परिवर्तनास उद्योजकांच्या पशू आत्मा / अवसानाशी म्हणजेच त्यांच्या चंचल (निर्विवाद, विसंगत) अवसानाशी आणि भविष्यातील गुंतवणूकीच्या नफ्याच्या अस्थिर अपेक्षांशी जोडले. केन्सने असा दावा केला की मोठ्या गुंतवणूकीचे प्रकल्प हे सामान्यतः त्यांच्याकडून मिळणाऱ्या नफ्याची काळजीपूर्वक गणना करुन केले जात नाहीत तर उद्योजकांच्या अंतःप्रेरणाच्या जोरावर तर्कसंगत व सावध व्यक्ती निर्णय घेण्यास उशीर करतात, ज्यामध्ये प्रयत्न करण्याचा धैर्य आहे. त्याच्याकडून आकलन करण्याची संधी आहे.

भारतातील खासगी गुंतवणूकीतील नियमित घट ही 'पशू आत्मा / अवसान' च्या संदर्भात स्पष्ट केली जाऊ शकते. राजकीय अस्थिरता आणि आर्थिक अनिश्चिततेमुळे भारतातील खासगी गुंतवणूक वेळोवेळी घसरली आणि त्यामुळे गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास कमी झाला. आर्थिक सुधारणांच्या विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्याबाबतची व त्या सुरु ठेवण्याबाबतच्या अनिश्चिततेमुळे देशातील वित्तीय मालमत्ता (नवीन समभाग) आणि भौतिक मालमत्ता (वास्तविक भांडवल) या दोन्हीमधील गुंतवणूक कमी झाली.

**४) घरगुतीद्वारे गुंतवणुकीची निवड :** पैशाची मागणी हा केन्सचा सिद्धांत हे दर्शवितो / गृहीत धरतो की व्याज दर उच्च असताना लोक कमी रोख पैसे ठेवतात आणि अधिक रोखे खरेदी करतात. कमी व्याज दरावर किंवा व्याज दर कमी असेल तर ते फक्त याच्या उलट करतात. लोकांची रोखता पसंती / तरलता प्राधान्यता ही विद्यमान (चालू / वर्तमान) व्याजदरावरील दरावर तसेच भविष्यातील व्याज दराच्या बदलांबाबतच्या अनिश्चिततेवर अवलंबून असते. हे कधीकधी भारतात अनुभवले जजाते. कधीकधी, घरगुती क्षेत्राची समभागांमधील गुंतवणूक घटली आहे आणि बँक ठेवींमधील गुंतवणूक निरंतर वाढली आहे. भारतासारख्या विकसनशील देशातील लोक हे द्रव स्वरूपात मोठ्या प्रमाणात पैसे ठेवतात (रोकड शिल्लक आणि बँक ठेवीच्या स्वरूपात, धनादेशाद्वारे पैसे काढता येण्याजोग्या) आणि समभागांसारख्या आर्थिक मालमत्तेत थोडी गुंतवणूक करतात.

**५) घरगुतीद्वारे उपभोगाचे वर्तन :** भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये केन्सचे उपभोग फलन / कार्य गृहितक हे सूक्ष्म (व्यष्टि) पातळीवर आणि समष्टी पातळीवरही संबंधित / प्रस्तुत आहे. केन्सच्या परिपूर्ण उत्पन्नाच्या गृहीतक्याने किंवा गृहीतप्रमेयाने स्वयंसिद्ध केल्याप्रमाणे एखाद्या व्यक्तीचा उपभोग खर्च केवळ त्याच्या विनियोज्य उत्पन्नावर (आय) अवलंबून असते. अशा देशांमध्ये अल्पकालीन उपभोग खर्चावर व्याज दराचा फारसा परिणाम होत नाही. केन्सने सुचविल्याप्रमाणे एकूण उपभोग हा उत्पन्नाच्या वितरण पद्धतीवर आणि समुदायाच्या संपत्तीच्या साठ्यावर सुद्धा अवलंबून असतो.

**६) गुणकाचे कार्य :** भारतासारख्या विकसनशील अर्थव्यवस्थांमध्ये, केन्सचे गुणक तत्त्व आता बऱ्याच कारणांसाठी काम करते. सध्या भारतात विविध उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणात (लक्षणीय) निष्क्रिय क्षमता आहे. या व्यतिरिक्त, हरित क्रांतीच्या आंशिक यशामुळे अन्नधान्याचे उत्पादन गेल्या काही वर्षात निरंतर वाढले आहे. अशा परिस्थितीत वीजपुरवठा, कोळसा,

पायाभूत सुविधांची कमतरता आणि अर्थव्यवस्थेतील अपूर्णता यासारख्या पुरवठ्याच्या बाजूच्या गुंतवणूकीचा एक गुणक परिणाम उत्पन्न होण्याची शक्यता आहे. अशा मर्यादासाठी / अडचणींसाठी गुणकाचा खरा आकार हा उच्च सीमान्त उपभोग प्रवृत्तीने ठरविलेल्या / समर्थन दिलेल्या पेक्षा कमी असतो.

**७) वित्तीय धोरण आणि तूट वित्तपुरवठा / तुटीचे वित्त व्यवस्थापन :** केन्स नेत्याच्या नंतरच्या लेखांमध्ये पूर्ण रोजगाराचे उद्दिष्ट गाठण्यासाठी वित्तीय धोरण (कर आकारणी आणि सार्वजनिक खर्च / खर्च धोरण) यावर जोर दिला. केन्सने अशी शिफारस केली की संपूर्ण रोजगार किंवा उच्च स्तरावरील रोजगाराचे उद्दिष्ट हे फक्त चलन विषयक धोरणांऐवजी विविध करांच्या दरात फेरफार करणे / त्यांना हाताळणे आणि सार्वजनिक खर्चाच्या योग्य पद्धती यांच्याद्वारे अधिक प्रभावीपणे प्राप्त केले जाऊ शकते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे केन्सने संतुलित / समतोल अर्थसंकल्प संकल्पनेची पायाभरणी केली आणि त्याचा स्वीकार केला. देशात भरपूर बेरोजगारी अस्तित्वात असल्यास, कर दर वाढविण्याऐवजी (जे खाजगी गुंतवणूकीला ना उमेद / परावृत्त / निरुत्साही करु शकतात) केन्सने तूट वित्तपूरवठा धोरणाची शिफारस केली. केन्सच्या सिद्धांताच्या परिणामामुळे तुटीचे वित्तव्यवस्थापन किंवा अर्थसंकल्पन करणे ही एक सामान्य गोष्ट झाली आहे. विशेषतः विकसनशील देशांमध्ये ज्यातून वापरलेली भरपूर संभाव्य संसाधने आहेत आणि प्रचंड गरीबी आहे परंतु लोकांच्या कमी उत्पन्न पातळीमुळे संसाधनाचा वापर करण्यासाठी पुरेशी बचत आणि गुंतवणूक नाही.

**८) उत्पन्न विश्लेषण :** केनेशियन सिद्धांताचा आणखी एक परिणाम असा झाला आहे की आर्थिक इंद्रियगोचर अपूर्व गोष्टींकडे आणि प्रणालीकडे पाहण्याच्या संपूर्ण दृष्टिकोनामध्ये आमूलाग्र बदल घडवून आला आहे. आता उत्पन्नाचे विश्लेषण उत्पन्न पातळी (एकूण आणि दरडोई), बचत आणि गुंतवणूकीचे दर इत्यादींच्या बाबतीत विचार करणे ही एक सामान्य पद्धत झाली आहे. जवळजवळ प्रत्येक देश अशा वार्षिक उत्पन्नाचे विश्लेषण संकलित करतो आणि प्रकाशित करतो ज्यायोगे राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या कार्याचे खरे चित्र दिसते.

**९) सरकारची आर्थिक भूमिका :** केन्स यांनी मंदी / औदासिन्य आणि बेरोजगारीविरुद्ध लढा देण्यासाठी आणि किंमत स्थिरता राखण्यासाठी सरकारने स्थिरीकरण धोरणाचा अवलंब केला पाहिजे असे सुचविले. केन्सने दीर्घकालीन वाढीच्या समस्येकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले असले तरी, दीर्घ काळात किंमतीच्या वाजवी स्थिरतेसह खासगी गुंतवणूकीला अस्सल उत्तेजन देण्यासाठी आणि अर्थव्यवस्थेला स्वावलंबी वाढीसाठी सक्षम करण्यासाठी योग्य आर्थिक आणि वित्तीय धोरणे स्वीकारण्याच्या स्वरूपात सरकारी हस्तक्षेपाची आवश्यकता आहे.

विकसनशील देशातील सरकारनेही एकीकृत / एकात्मिक पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी पुरेशी गुंतवणूक केली पाहिजे कारण त्याशिवाय वेगवान आर्थिक वाढ शक्य होणार नाही. पुरेशा पायाभूत सुविधांमुळे खासगी क्षेत्राला आर्थिक वाढीमध्ये येणाऱ्या पुरवठ्याच्या बाजूच्या अडचणी दूर करता येतील. अमर्त्य सेन यांनी सुचविल्याप्रमाणे सरकारने शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्यासारख्या सामाजिक पायाभूत सुविधांमध्येही गुंतवणूक केली पाहिजे.

या संदर्भात एक संबंधित मुद्दा लक्षात घेतला जाऊ शकतो. प्रगत देशांमध्ये, सरकारी खर्च हा कर्ज घेण्यायोग्य निधी / कर्ज देय रक्कम वळवून आणि गुंतवणूकीचे दर वाढवून खासगी

गुंतवणूकीस अडथळा आणतो. याला ‘क्रॉडिंग आउट इफेक्ट’ म्हणून ओळखले जाते. परंतु विकसनशील देशांमध्ये पायाभूत गुंतवणूकीवरील सरकारी खर्चामुळे पुरवठ्यातील अडचणी दूर करुन किंवा होऊन खासगी गुंतवणूकीला चालना मिळते. याला ‘क्रॉडिंग इन इफेक्ट’ म्हणून ओळखले जाते. सार्वजनिक गुंतवणूक ही केवळ खासगी क्षेत्रात उत्पादित झालेल्या वस्तू व सेवांना मागणी निर्माण करीत नाही तर पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करुन अर्थव्यवस्थेची वाढ सुलभ करते कारण त्या अभावी भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये आर्थिक वाढीस मोठा अडथळा निर्माण होत आहे.

प्रगत देशांमध्ये सरकारी खर्च आणि खासगी गुंतवणूक स्पर्धात्मक स्वरूपाच्या आहेत तर विकसनशील देशांमध्ये ते पूरक आहेत.

**निष्कर्ष :** जे. एम. केन्स यांनी जवळजवळ सर्व विकसनशील देशांमधील आर्थिक विचारांवर खोलवर परिणाम केला आहे.

## ४.५ सारांश

केन्सच्या मते ज्या गुंतवणूकीमूळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडून येते व अधिक लोकांना रोजगार मिळतो अशी कोणतेही गुंतवणूक ही वास्तव गुंतवणूक होय.

जोन रॉबिन्सनच्या मते गुंतवणूक म्हणजे भांडवलात वाढ होणे होय. अशी वाढ नवीन घर बांधल्याने अथवा नवीन कारखाना उभारल्याने होते. अस्तित्वात असलेल्या भांडवली वस्तूच्या साठयात प्रत्येक वर्षी जेवढी वाढ होईल ती वाढ म्हणजे गुंतवणूक होय. नवीन यंत्रसामूग्री, रस्ते, पूल, रेल्वे मार्ग, कारखान्यांची उभारणी, इत्यादीसाठी जी गुंतवणूक होते ती वास्तव गुंतवणूक होय.

लार्ड केन्स यांनी आपल्या रोजगार विषयक सिद्धांतात ज्या दोन साधनाचा वापर केला त्यापैकी एक साधन म्हणजे गुणक आणि दुसरे प्रवेग होय. गुंतवणूकीचा उपभोगावर कसा परिणाम होतो. हे गुणकाचा संकल्पनेतून सांगितले. गुंतवणूकीतील मुळ वाढ आणि त्यामुळे एकूण उत्पन्नात झालेली अंतिम वाढ या दोहोंतील संबंध गुणकाच्या आधारे स्पष्ट केले आहे. गुणकाची कल्पना आर. एफ. कान्ह यांनी मांडली त्याना रोजगार गुणक म्हटले जाते. गुणवणूक व रोजगार पातळी यामधील संबंध रोजगार गुणकाच्या सहाय्याने स्पष्ट केले आहे.

केन्स यांच्या मते गुंतवणूकीतील प्राथमिक वाढ उपभोगात बदल घडवून आणते व उपभोगातील वाढीमुळे प्राप्तीत वाढ घडून येते. गुंतवणुकीतील बदल $\rightarrow$ उपभोगातील बदल $\rightarrow$ एकूण प्राप्तीत बदल

$$K = \frac{\Delta Y}{\Delta I}$$

$K =$ गुंतवणूक बदल
$\Delta Y =$ उत्पन्नातील बदल
$\Delta I =$ गुंतवणूकीतील बदल

उत्पन्नात वाढ झाली की उपभोक्ता आपल्या उत्पन्नाचा काही भाग उपभोगांवर खर्च करतो आणि उरलेल्या भागाची बचत करतो. उपभोक्ताने उपभोगावर खर्च केलेली रक्कम वेगवेगळ्या उत्पन्नघटकांना उत्पन्नाच्या रुपाने मिळते हे उत्पादनाचे घटकआपल्या वाढलेल्या उत्पन्नाचा काही भाग उपभोगावर खर्च करतात हा खर्च परत उत्पन्नात वाढ घडवून आणतो. अर्थव्यवस्थेत अशा प्रकारे उत्पन्नातून सातत्याने उपभोग्य प्रेरित केला जातो. उपभोक्ता आपल्या वाढलेल्या उत्पन्नातून किती खर्च करेल हे सीमांत उपभोग प्रवृत्तीवर अवलंबून असते.

उत्पन्न प्रवाहत अनेक गळत्या आढळतात. या गळत्यांमुळे उत्पन्न वाढीचे कार्य मंदगतीने होते. उत्पन्न प्रवाहात खालील गळत्या दिसून येतात.

## ४.५ प्रश्न

१) गुंतवणूकीचे विविध प्रकार स्पष्ट करा.

२) गुणक ही संकल्पना सविस्तर स्पष्ट करा ?

३) विकसनशील देशांमध्ये केनेशियन सिद्धांत साधनांचा परिणाम स्पष्ट करा.

४) टीपा लिहा.

   १. गुंतवणूकीचे निर्धारण घटक

   २. गुणकप्रक्रियेतील गळती

   ३. प्रवेगतत्व स्पष्ट करा

❖❖❖❖

प्रकरण - ३

# ५

# केन्स कालखंडानंतरचा व्यापक अर्थशास्त्रीय बदल

**घटक रचना :**


५.० उद्दिष्ट्ये

५.१ प्रस्तावना

५.२ वस्तू बाजार आणि IS वक्र

५.३ मुद्रा बाजार व LM वक्र

५.४ IS - LM एकत्रित संतूलन

५.५ IS - LM वक्रातील बदल

५.६ फिलिप्स वक्र

५.७ सारांश

५.८ प्रश्न


## ५.१ प्रस्तावना

IS - LM प्रतिमान आपल्याला वस्तू बाजार (Goods Market) व मुद्रा बाजार (Money Market) यांचा संयोग दिसून येतो. वस्तू बाजारात उत्पन्न पातळीचा खर्चावरील खर्चाचा उत्पादन निश्चितीवरील परिणाम लक्षात घेतला जातो. म्हणजेच IS - LM प्रतिमान खर्च, उत्पन्न, व्याजदर, गुंतवणूक पातळी ही वस्तूबाजार मुद्रा बाजार यांच्या संयुक्त संतूलनातून साध्य होते.

IS - LM प्रतिमान हे प्रा.जे. आर. हिक्स यांनी १९३७ मध्ये विकसित केले. त्यानंतरच्काळात हैन्सन, पॅटीन्कीन, मॉडिग्लिआनी इ. अर्थतज्ञांनी त्यामध्य महत्वाची भर घातली. हिक्सने आपल्या लेखाद्वारे वस्तूबाजार व मुद्राबाजार यांचा एकाच उत्पन्न आणि व्याजदर पातळीला समतोल कसा साध्य होतो तो घए - थ्श प्रतिमानाद्वारे स्पष्ट केले आहे. ह्यासाठी हिक्सने वस्तूबाजारासाठी घए वक्राचा तर मुद्राबाजारासाठी थ्श वक्राचा वापर केलेला आहे.

## ५.२ वस्तू बाजार आणि IS वक्र


प्रा. हिक्स च्या मते व्याजाचा दर आणि गुंतवणूक यामध्ये परस्पविरोधी संबंध दिसून येतो म्हणजेच अधिक व्याजदराला गुंतवणूक कमी राहते तर कमी व्याजदर हा गुंतवणूकीला आकर्षित करतो.

व्याजदरातील बदलांमुळे गुंतवणूक पातळी व उत्पन्नपातळीत व्यस्त प्रमाणात बदल घडून येतात. उदा. व्याजदर वाढल्यास कर्जे महाग बनल्याने गुंतवणूकीचे प्रमाण कमी राहते परीणामतः एकूण मागणीत घट होऊन उत्पन्न पातळीदेखिल कमी राहते. याऊलट व्याजदर घटल्यास, गुंतवणूक वाढ व त्यातून एकूण मागणी वाढून उत्पन्न पातळीमध्ये देखिल वाढ घडून येते.

**IS वक्र – व्याख्या**

"वेगवेगळ्या व्याजदराला उत्पन्नाची वेगवेगळी पातळी दर्शविणाऱ्या बिंदूचा मार्ग की जो वस्तूबाजारातील बचत = गुंतवणूक (I = S) दर्शवितो असा वक्र म्हणजेच IS वक्र होय".

IS वक्र पुढील आकृतीद्वारे स्पष्ट करता येईल.




**आकृती क्रमांक ५.१**

आकृतीच्या वरील भागात OX अक्षावर उत्पन्न व OY अक्षावर बचत व गुंतवणूक दर्शविलेली आहे. S - S हा बचत वक्र असून तो धनात्मक स्वरुपाचा आहे. कारण वाढत्या उत्पन्ना बरोबर बचतदेखील वाढत जाते.

आकृतीच्या खालच्या भागात OX अक्षावर उत्पन्न व OY अक्षावर व्याजदर दर्शविलेला आहे. व्याजदर $OR_1$ असतांना I I या गुंतवणूक वक्रावर $E_1$ बिंदूत $OY_1$, उत्पन्नपातळी निश्चित झालेली आहे. व्याजदर $OR_1$ व उत्पन्न पातळी $OY_1$ यांच्या सहाय्याने आकृतीच्या खालच्या भागात Aहा बिंदू प्राप्त होतो.

व्याजाचा दर $OR_2$ अस कमी झाल्यास गुंतवणूक वाढून गुंतवणूकीचा वक्र $I_2$ - $I_2$ असा वरच्या दिशेने सरकून $E_2$ बिंदूत संतूलन प्रस्थापित होऊन उत्पन्न पातळी $OY_2$ निश्चित होते.

त्याच्या आधारे आकृतीच्या खालील भागात व्याजदर $OR_2$ उत्पन्न पातळी $OY_2$ दर्शविणार B हा बिंदू प्राप्त होतो.

वस्तूबाजारात समतोल प्रस्थापित झालेला असतांना म्हणजेच गुंतवणूक व बचत समान असतांना (I = S) वेगवेगळ्या व्याजदराला असणारी उत्पन्न पातळी दर्शविणारे A आणि B हे बिंदू एकत्र जोडल्यास IS हा ऋणात्मक वक्र प्राप्त होतो.

IS वक्र असे स्पष्ट करतो की व्याजदर घटतांना गुंतवणूक वाढून उत्पन्न पातळीसुद्धा वाढत जाते.

## ५.३ मुद्रा बाजार व LM वक्र

मुद्रा बाजारातील समतोल त्याचवेळी साध्य होता, ज्यावेळी मुद्रेसाठी असलेली मागणी व मुद्रेचा पुरवठा समान बनतो. लॉर्ड लेन्स यांच्या मते मुद्रेसाठी असणारी मागणी ही पुढील ३ हेतूंने केली जाते.


१) व्यवहार हेतू.
२) दक्षता हेतू.
३) सट्टेबाजीचा हेतू.

व्यावहार हेतू व दक्षता हेतूने पैशासाठी केली जाणारी मागणी ही उत्पन्नाच्या समप्रमाणात बदलते. म्हणजेच उत्पन्न वाढल्यास व्यावहार हेतूने व दक्षता हेतूने पैशासाठी केली जाणारी मागणी वाढते तर उत्पन्न कमी झाल्यास ती कमी होते.

सट्टेबाजीच्या हेतूने पैशासाठी केली जाणारी मागणी व्याजदराच्या व्यस्त प्रमाणात बदलते.

अल्पकाळात पैशाचा पुरवठा स्थिर असतो असे मानलेले आहे. म्हणून पैशाचा पुरवठा वक्र OY अक्षांस समांतर राहले.

ज्या बिंदूत पैशाची मागणी व पैशाचा पुरवठा समान बनतो. त्या बिंदूत मुद्रा बाजार संतूलन प्रस्थापित होते. अशावेळी वेगवेगळ्या व्याजदराला असलेली उत्पन्न पातळी पत्र वक्राद्वारे पुढील प्रमाणे दर्शविता येईल.



**आकृती क्रमांक ५.२**


वरील आकृतीत उत्पन्नपातळी $OY_1$ असतांना $E_1$ बिंदूत पैशासाठीची मागणी (Ld) व पैशाचा पुरवठा (SM) यांच्या समतोलाद्वारे व्याजदर $OR_1$ प्राप्त होतो. त्याद्वारे व्याजदा $OR_1$ व उत्पन्न पातळी $OY_1$ यांच्या आधारे A बिंदू प्राप्त होतो.

उत्पन्न $OY_2$ असे वाढल्यास पैशाची मागणी वाढून $Ld_1$ अशी बनते नवीन संतूलन $E_2$ बिंदूत प्रस्थापित होऊन व्याजदर $OR_2$ व उत्पन्न $OY_2$ याद्वारे B बिंदू प्राप्त होतो.

अशा प्रकारे मुद्राबाजार समतोलावस्थेत असतांना वेगवेगळ्या व्याजदराला असणारी उत्पन्न पातळी दर्शविणारे A - व B हे बिंदू एकत्र जोडल्यास धनात्मक स्वरुपाचा जो वक्र मिळतो त्यालाच LM वक्र म्हटले जाते.

## ५.४ IS - LM एकत्रित संतूलन

वरील विवेचनावरुन वस्तूबाजार व IS वक्र तसेच मुद्राबाजार व LM वक्राची प्राप्ती कशी होते हे दिसून येते. आता वस्तूबाजार IS व मुद्राबाजार (LM) यांच्याद्वारे IS-LM संतूलन व संतूलीत व्याजदराची निश्चिती कशी होते हे स्पष्ट करता येईल.



**आकृती क्रमांक ५.३**


वरील आकृतीमध्ये E या संतूलन बिंदूमध्ये पैशाची मागणी व पैशाच्या पुरवठा जेथे संतूलित असतो तो मुद्राबाजारातील LM वक्र बचत व गुंतवणूक ज्या ठिकाणी समान बनते तो वस्तू बाजारातील IS वक्र परस्परांना छेदतात. म्हणून E बिंदू वस्तू बाजार व मुद्राबाजारतील एकत्रित संतूलन (IS = LM) प्रस्थापित होऊन संतूलित व्याजदर OR व संतूलित उत्पन्नाची पातळी OY निश्चित होतो.

राजकोषिय धोरणाचा (Fiscal Policy) एक भाग म्हणून किंवा मौद्रिक धोरणाचा (Monetary Policy) एक भाग म्हणून जर IS किंवा LM वक्रात कोणताहि बदल झाला तर वरील संतूलन बदलून व्याजदर आणि उत्पन्न पातळीदेखील बदलेले हेच पूढीलप्रमाणे दर्शविता येईल.

## ५.५ IS - LM वक्रातील बदल

**राजकोषिय धोरण आणि IS वक्राचे स्थलांतर :-**

सरकारच्या राजकोषिय धोरणामुळे घ्ए वक्रात कशा प्रकारे बदल घडून येतात हे पुढील आकृतीद्वारे स्पष्ट करता येईल.




**आकृती क्रमांक ५.४**

सरकारच्या राजकोषिय धोरणाचा एक भाग म्हणून जर सरकारने सार्वजनिक खर्चात वाढ किंवा करांमध्ये (Tax) घट घडवून आणली तर लोकांचे उत्पन्न वाढून वस्तू बाजारातील मागणी वाढेल परीणामतः IS वक्र वरच्या दिशेने $IS_1$ असा सरकेल.

या उलट जर सरकारने सार्वजनिक खर्चात घट किंवा करांच्या प्रमाणात वाढ घडवून आणली तर लोकांचे उत्पन्न घटून वस्तूबाजारातील मागणी घटून IS वक्र $IS_2$ असा खालच्या दिशेने सरकेल.

**मौद्रिक धोरण आणि LM वक्राचे स्थलांतर :**

मौद्रिक धोरणातील बदलामुळे LM वक्रात होणारे बदल पुढील आकृतीद्वारे स्पष्ट करता येतील.




**आकृती क्रमांक ५.५**

मौद्रिक धोरणाचा एक भाग म्हणून पैशाच्या पुरवठ्यात घट करण्यात आली LM वक्र $LM_1$ असा डाविकडे सरकतो.


याउलट मौद्रिक धोरणाचा परिणाम म्हणून पैशाच्या पुरवठ्यात वाढ घडून आल्यास LM वक्र $LM_2$ असा उजव्या बाजूस सरकतो.

## ५.६ फिलिप्स वक्र

चलनवाढ व बरोजगारी यामध्ये व्यस्त संबंध असून ज्यावेळी चलनवाढ उच्च प्रमाणात असते. त्यावेळी बेरोजगारीचा दर अल्प असतो, याऊलट ज्यावेळी चलनात कमी प्रमाणात असते. त्यावेळी बेरोजगारीचा दर प्रचंड असतो. असे मत प्रा. फिलिप्स यांनी मांडले. फिलिप्स यांनी इस. १८६१-१९५७ या काळातील इग्लंड या देशातील श्रमिकांच्या वेतनदराचा सखोल अभ्यास करुन असा निष्कर्ष काढला की इग्लंलमध्ये चलनवाढ आणि बेरोजगारी यामध्ये सहसंबंध असून तो व्यस्त प्रमाणात बदलणारा आहे.

चलनवाढ ज्यावेळी जास्त त्यावेळी बेरोजगारी कमी व चलनवाढ ज्यावेळी कमी त्यावेळी बेरोजगारी अधिक अशी विरोधी परिस्थिती असल्याने सरकारपुढे एक महत्वाचा प्रेच निर्माण होतो व तो म्हणजेच चलनवाढ आणि बेरोजगारी ह्या दोन्ही समस्याच आहेत. परंतू समजा सरकारचा उद्देश महागाई कमी करणे हा असेल तर सरकारला काही प्रमाणात बेकारी सहन करावी लागेल आणि जर बेरोजगारी कमी करायची असेल तर चलनवाढीला सामोरे जावे लागेल. अशावेळी सरकारला काही प्रमाणात चलनवाढ सहन करुन बेरोजगारीचा दर कमी करता येणे शक्य आहे.

प्रा. फिलिप्स यांनी चलनवाढ आणि बेरोजगारीचा दर यातील परस्पर संबंध स्पष्ट करण्यासाठी एका वक्राचा आधार घेतला. या वक्रालाच फिलिप्स वक्र असे म्हणतात. फिलिप्स वक्र हा चलनवाढ व बेरोजगारी यातील व्यस्त संबंध दर्शवितो. हेच पुढील आकृतिद्वारे स्पष्ट करता येईल.




**बेरोजगारीचा दर**

**आकृती क्रमांक ५.६**

वरील आकृतीत OX अक्षावर बरोजगारीचा दर व OY अक्षावर चलवाढीचा दर दर्शविला आहे 'ब' बिंदू हा नैसर्गिक बेरोजगारीचा दर दर्शवितो. या पातळीला चलनवाढीचा दर शून्य असतो.

सरकारच्या समग्र धोरणाद्वारे जर अर्थव्यवस्थेत एकूण मागणीत वाढ घडून येते त्यामुळे चलनवाढ घडून येते ही चलनवाढ च-$च_१$ अशी दिसून येते परंतू त्यामुळे उत्पादनात वाढ व रोजगार संधीमध्ये वाढ घडून आल्याने बेरोजगारीचा दर ब-$ब_१$ असा घटलेला दिसून येतो.

याचाच अर्थ सरकारला बेरोजगारी कमी करायची असेल तर भाववाढ सहन करावी लागेल. अशा प्रकारे फिलिप्स यांनी फिलिप्स वक्रा द्वारे बेरोगारी व चलनवाढ यातील व्यस्त संबंध स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## ५.७ सारांश

प्रा. हिक्स च्या मते व्याजाचा दर आणि गुंतवणूक यामध्ये परस्पविरोधी संबंध दिसून येतो म्हणजेच अधिक व्याजदराला गुंतवणूक कमी राहते तर कमी व्याजदर हा गुंतवणूकीला आकर्षित करतो.

**IS वक्र – व्याख्या**

"वेगवेगळ्या व्याजदराला उत्पन्नाची वेगवेगळी पातळी दर्शविणाऱ्या बिंदूचा मार्ग की जो वस्तूबाजारातील बचत = गुंतवणूक (I = S) दर्शवितो असा वक्र म्हणजेच IS वक्र होय".

मुद्रा बाजारातील समतोल त्याचवेळी साध्य होता, ज्यावेळी मुद्रेसाठी असलेली मागणी व मुद्रेचा पुरवठा समान बनतो. लॉर्ड लेन्स यांच्या मते मुद्रेसाठी असणारी मागणी ही पुढील ३ हेतूंने केली जाते.

१) व्यवहार हेतू.
२) दक्षता हेतू.
३) सट्टेबाजीचा हेतू.

चलनवाढ व बरोजगारी यामध्ये व्यस्त संबंध असून ज्यावेळी चलनवाढ उच्च प्रमाणात असते. त्यावेळी बेरोजगारीचा दर अल्प असतो, याऊलट ज्यावेळी चलनात कमी प्रमाणात असते. त्यावेळी बेरोजगारीचा दर प्रचंड असतो. असे मत प्रा. फिलिप्स यांनी मांडले.

## ५.८ प्रश्न

१) IS - LM प्रतिमान स्पष्ट करा.
२) IS व LM वक्रांतील स्थलांतर कसे होते ते स्पष्ट करा.
३) बेरोजगारी आणि चलनवाढ यातील संबंध फिलिप्स वक्राद्वारे स्पष्ट करा.

❖❖❖❖

# ६

# मंदीयुक्त भावफुगवटा

**घटक रचना :**


६.० उद्दिष्ट्ये

६.१ प्रस्तावना

६.२ मंदीयुक्त भावफुगवटा अर्थ

६.३ मंदीयुक्त भावफुगवट्याची कारणे

६.४ मंदीयुक्त भावफुगवट्याचे परिणाम

६.५ पुरवठ्याच्या बाजूचे अर्थशास्त्र : मूलभूत प्रस्ताव आणि निर्णायक / टिकाकुशल दृष्टिकोन

६.६ पुरवठ्याच्या बाजूच्या अर्थशास्त्राचे मुख्य प्रस्ताव

६.७ पुरवठा बाजूच्या अर्थशास्त्रातील टीका

६.८ निष्कर्ष

६.९ सारांश

६.१० प्रश्न


## ६.० उद्दिष्ट्ये

- मंदीयुक्त भावफुगवटा म्हणजे काय याचा अभ्यास करणे.
- मंदीयुक्त भावफुगवटा कारणे कोणती ते तपासणे.
- मंदीयुक्त भावफुगवटा परिणाम अभ्यासणे.
- पुरवठ्याच्या बाजूच्या अर्थशास्त्रीय घटकांचे टीकात्मक अभ्यास करणे.

## ६.१ प्रस्तावना

केनीशियन अर्थशास्त्रात चलनवाढीशी / भाववाढीशी लढा देण्यासाठी किंवा बेरोजगारीची समस्या सोडवण्यासाठी मागणी व्यवस्थापन धोरणांचा (आर्थिक आणि वित्तीय धोरणे) अवलंब करण्याच्या महत्त्वावर जोर देण्यात आला. केन्सचे असे मत होते की जेव्हा देश पूर्ण रोजगार अवस्थेला पोहोचतो तेव्हाच चलनवाढ / भाववाढ / महागाई होते. याचा अर्थ असा होतो की महागाई आणि बेरोजगारी एकाच वेळी अस्तित्वात येऊ शकत नाहीत.

तथापि, फिलिप्स वक्राने महागाई आणि बेरोजगारी यांच्या दरम्यान एक व्यस्त संबंध स्थापित केला. देशाला एकाच वेळी किंमत स्थिरता आणि पूर्ण रोजगार मिळविणे शक्य नव्हते.

त्यामुळे धोरणकर्त्यांसमोर कोंडीची (दुविधा / पेचप्रसंग) परिस्थिती आली. बेरोजगारीचा दर वाढू दिला तरच महागाईचा दर कमी होऊ शकतो आणि महागाईचा दर वाढू दिला तरच बेरोजगारीचा दर कमी करता येईल.

## ६.२ मंदीयुक्त भावफुगवटा

१९७० च्या दशकात जगातील बहुतेक प्रगत भांडवलशाही देशांना मंदीयुक्त भावफुवटाचा समस्येचा सामना करावा लागला. या नवीन समस्येचे निराकरण करण्यात केनीशियन धोरणात्मक उपाय अयशस्वी झाले / ठरले. याचा परिणाम म्हणून अर्थशास्त्राची नवीन शाळा उदयास आली. हे पुरवठा बाजूचे अर्थशास्त्र म्हणून ओळखले जाते जे मंदीयुक्त भावफुगवटा या समस्यसेशी लढण्यासाठी एकूण पुरवठ्याच्या व्यवस्थापनावर ताण ठेवते / जोर देते (म्हणजे, स्थिरतेच्या / कुंठिततेच्या दरम्यान महागाई).

मंदीयुक्त भावफुगवटा या शब्दाचा अर्थ असा आहे की अशी स्थिती जी स्थिरता आणि चलनवाढ सह-अस्तित्त्वात / एकत्र असतात. कमी आर्थिक वाढ, वाढती बेरोजगारी आणि महागाईचा उच्च दर हे त्याचे वैशिष्ट्य आहे. हे फिलिप्स वक्राच्या निष्कर्षाच्या विरुद्ध आहे, जे महागाई आणि बेरोजगारीमधील व्यस्त संबंध दर्शविते. यामध्ये आपल्याला किंमतीच्या पातळीत सातत्याने झालेली वाढ आणि बेरोजगारीचे वाढलेले प्रमाण यांना सामोरे जावे लागते.

मंदीयुक्त भावफुगवटा म्हणजे स्थिर / कुंठित अर्थव्यवस्थेतील महागाई आणि बेरोजगारीतील सहजीवन होय. “मंदीयुक्त भावफुगवटा” ही संज्ञा व तिचा पहिलाच वापर हा १९६० दशकात युनायटेड किंगडम मधील आर्थिक तणावाच्या वेळी लेन मकलीलड यानी केला जेव्हा ते हाऊस ऑफ कॉमन्समध्ये बोलत होते. त्यावेळी ते एकीकडे महागाई आणि दुसरीकडे अर्थव्यवस्था ठप्प (स्थिरता / कुंठितता) पडण्याविषयी बोलत होते आणि त्यास ठप्प परिस्थिती असे संबोधत होते. तेलाच्या संकटानंतरच्या १९७० च्या दशकात मंदीच्या काळातील वर्णनासाठी ही संज्ञा पुन्हा वापरण्यात आली, जेव्हा अमेरिकेने मंदीचा सामना केला तेव्हा नकारात्मक स्थूल आंतरदेशीय उत्पादनात पाच चतुर्थांश वाढ आणि १९७३ मध्ये महागाई द्विगुणित झाली आणि १९७४ मध्ये दोन अंकापर्यंत पोहोचली तर मे १९७५ पर्यंत बेरोजगारी ९% पर्यंत पोहोचली.


## ६.३ मंदीयुक्त भावफुगवट्याची कारणे

मंदीयुक्त भावफुगवट्याच्या कारणांबद्दल अर्थशास्त्रज्ञांच्यात एकमत नाहीत.

काहीजणांचे असे म्हणणे आहे की पुरवठा धक्के / धोके किंवा परीव्ययजन्य हे मंदीयुक्त भावफुगवट्यास जबाबदार असणारे प्रमुख घटक आहेत तर जिथे इतरांचे म्हणणे होते की मंदीयुक्त भावफुगवट्यास जबाबदार असणारे प्रमुख घटक आहेत तर जिथे इतरांचे म्हणणे होते की मंदीयुक्त भावफुगवटा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या असामान्य आर्थिक घटनेमागील मुख्य कारण म्हणजे मागणीजन्य हे आहे. मंदीयुक्त भावफुगवटा होण्यास कारणीभूत असलेले घटक खालीलप्रमाणे आहेत.

**१) पुरवठा धोका / धोके (तेलाच्या किंमतीत वाढ) :**

मंदीयुक्त भावफुगवटा म्हणजे स्थिर अर्थव्यवस्थेतील महागाई आणि बेरोजगारीतील सहजीवन होय. बेरोजगारीचा उच्च दर म्हणजे उत्पादनाचा कमी दर ऑक्टोबर १९७३ मध्ये ओपेक विक्रय नियंत्रण संघाकडून कच्च्या तेलाच्या किंमतीत अचानक वाढ झाल्यामुळे होणाऱ्या प्रतिकूल पुरवठा धक्का या पार्श्वभूमीवर मंदीयुक्त भावफुगवटा होण्याची समस्या उद्भवली. तेलाच्या किंमतीत एकाच वेळी जवळजवळ ३०० टक्क्यांनी वाढ झाल्याने तेल आयात करणाऱ्या देशांमध्ये उत्पादन खर्चात वाढ झाली आणि परिणामी कित्येक वस्तूंच्या किंमतीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली. याचे कारण म्हणजे मोठ्या संख्येने / प्रमाणात उद्योगांमध्ये तेल हे मुख्य किंवा सहाय्यक / दुय्यम निवीष्टी म्हणून वापरले जाते.




**आकृती ६.१**

वरील आकृतीमध्ये वास्तविक जीडीपी (स्थूल आंतरदेशीय उत्पादन Y) / उत्पादन उद्दिष्टी हे (AS) हा एकत्रीत पुरवठा वक्र आहे आणि एडी (AD) हा एकत्रीत मागणी वक्र आहे. जेथे एडी (AD) वक्र आणि ए एस (AS) वक्र एकमेकांना छेदतात त्या ठिकाणी म्हणजे इ (E) या बिंदुपाशी अर्थव्यवस्था समतोल साधते. समतोल बिंदू ई (E) वर, अर्थव्यवस्थेतील उत्पादन हे ओ एम (OM) आहे आणि किंमत पातळी ओ पी (OP) आहे. तेलाच्या किंमतीत वाढ होण्यासारख्या पुरवठा धक्क्यामुळे अर्थव्यवस्थेत वस्तू आणि सेवा बनविण्याच्या उत्पादन खर्चात वाढ होते. त्यामुळे (AS) वक्र हा ए एस वरुन एएस१ ($AS_1$) कडे वर सरकत जातो. आता इ१ ($E_1$) हा नवीन समतोल बिंदु मिळतो. त्यामुळे किंमतीत ओडी पासून ओपी१ (OP to $OP_1$) पर्यंत वाढ होते आणि उत्पादनात ओएम पासून ओएम१ (OM to $OM_1$) पर्यंत घट होते. यामध्ये अर्थव्यवस्थेत उत्पादनात घट होण्याचा / ते कमी होण्याचा अनुभव येतो म्हणजेच, वाढती बेरोजगारी आणि किंमतीत वाढ म्हणजेच चलनवाढ. उत्पादन खर्चात वाढ झाल्याने उत्पादन कमी होते आणि उत्पादन कमी झाल्यामुळे आणि खर्चात वाढ झाल्याने किंमत पातळी वाढली. त्यामुळे तिथे मंदीयुक्त भावफुगवटा होतो. उत्पादनात आणि रोजगारात घट आणि त्याचवेळी महागाई चलनवाढ उत्पादन खर्चात वाढ झाल्याने उत्पादन कमी होते आणि उत्पादन कमी झाल्यामुळे आणि खर्चात वाढ झाल्याने किंमत पातळी वाढली. त्यामुळे तिथे मंदीयुक्त भावफुगवटा होतो. उत्पादनात आणि रोजगारात घट आणि त्याचवेळी महागाई चलनवाढ उत्पादनात घट झाल्यामुळे बेरोजगारी होते आणि देशाला मंदीच्या समस्येला सामोरे जावे लागते.

अर्थात जास्त किंमत आणि कमी मागणी (उत्पन्नात घट झाल्यामुळे) या समस्येचा सामना करावा लागतो.

### २) परीव्ययजन्य :

उपरोक्त कारणां व्यतिरिक्त अनेक घटकांमुळे उत्पादन खर्चात वाढ होते. इतर घटक म्हणजे वेतनातील वाढ, कच्च्यामालाच्या आणि इतर साधनांच्या किंमतीतील वाढ यामुळे सुद्धा खर्चात वाढ होते. पायाभूत / आधारभूत संरचना अडथळ्यांमुळे ही / कोंडीमुळेही खर्च वाढतो.

### ३) कमी उत्पादन क्षमता :

कामगार संघटना आणि शासनाच्या कामगार कायद्यांद्वारे कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या संरक्षणामुळे कामगार उत्पादकता केवळ कमीच नसते तर त्यात घट होऊ शकते. जर कामगार संघटनांमध्ये मजबूत / प्रखर सौदा शक्ती असेल तर - ते कमी आर्थिक वाढीच्या काळातही अधिक पगारासाठी सौदे करण्यास सक्षम असतील. उच्च वेतन हे महागाईचे महत्त्वपूर्ण कारण आहे. त्याचप्रमाणे, जर एखाद्या अर्थव्यवस्थेस उत्पादकता कमी झाल्याचा अनुभव आला - कामगार अधिक अकार्यक्षम झाले तर खर्च वाढतो आणि उत्पादन कमी होते.

### ४) सामाजिक फायदे :

बेरोजगारी लाभ, गरीबांना वस्तू व सेवांचा मोफत पुरवठा, अन्न सुरक्षा योजना, किमान मूलभूत उत्पन्न योजना इत्यादी सामाजिक फायद्याच्या स्वरूपात मिळणारे लाभ हे गरिबांकडून काम करुन घेण्याचे कोणतेही बंधन न घेता त्यांना उत्पन्न देतात आणि त्यामुळे महागाईची समस्या निर्माण होते. हे फायदे अधिक मागणी (चलनवाढ) आणि वस्तू आणि सेवांची कमतरता (स्थिरता / मंदीयुक्त भावफुगवटा) निर्माण करतात.

### ५) अत्यधिक नियमन :

कठोर कामगार कायदे आणि उत्पादन आणि वितरण यावर अत्यधिक नियंत्रण आणणारे सरकारी धोरण यांच्या परिणामामुळे वस्तूंची उपलब्धता कमी होते आणि त्याच वेळी किंमतीत वाढ होते.

### ६) उच्च कर :

सरकार अतिरिक्त महासुलासहित आपला खर्च वाढवते. उच्च करांमुळे उत्पादन खर्च वाढतो ज्यामुळे पुरवठा आणि / किंवा मागणीवर परिणाम होऊ शकतो.

### ७) चलनविषयक धक्के :

स्वस्त / सुलभ चलनविषयक धोरण ज्यायोगे अर्थव्यवस्थेमध्ये कमी खर्चात जास्त पैसा आणला जातो ज्यामुळे महागाई होते.

### ८) तुटीची वित्तव्यवस्था / तुटीचा वित्तपुरवठा :

शासनाच्या महसुलापेक्षा जास्त खर्च केल्यामुळे वस्तू आणि सेवांची जास्त मागणी होते ज्यामुळे उच्च किंमती मिळतात.

**९) धोरण बदल :**

लोकशाही सरकारे मतदानावर लक्ष ठेवून मूलभूत उत्पन्न धोरण, शेतकरी कर्जमाफी, नि:शुल्क वीज, खरेदी किंमतीत वाढ आणि पगार व वेतनात वाढ यासारखे लोकप्रिय धोरणात्मक उपाय लागू करु शकतात. या सर्व उपाययोजनांमुळे मागणीच्या वाढीच्या तुलनेत वस्तू व सेवांच्या उत्पादनात कमी वाढ झाली आहे.

**१०) संरचनात्मक बेरोजगारीत वाढ :** पारंपारिक उद्योगात घट झाल्यास आपल्याकडे अधिक संरचनात्मक बेरोजगारी आणि कमी उत्पादन मिळू शकते. अशाप्रकारे जरी महागाई देखील वाढत असेल तरी आपल्याला जास्त बेरोजगारी मिळू शकेल.

**११) अमेरिकेतील कारणे :**


कृषी उत्पादनांचा पुरवठा कमी होणे, डॉलरची उदासिनता / मंदी, वेतन आणि किंमत नियंत्रण निर्मूलन हे देखील अमेरिकेमधील पुरवठा हादऱ्यास / धक्यास जबाबदार आहेत ज्यामुळे मंदीयुक्त भावफुगवटा होतो. १९६० च्या उत्तरार्धात व्हिएतनामच्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकने मोठा लष्करी खर्च केल्यामुळे १९७० च्या दशकाच्या सुरुवातीच्या काळात महागाईचा दर वाढण्याची अपेक्षा कामगारांना केली होती. त्यामुळे कामगार संघटनांनी जास्त वेतनाची मागणी केली आणि जास्त वेतन मिळवण्यात यश मिळविले ज्यामुळे नंतर खरेदी शक्ती वाढल्यामुळे महागाईची समस्या निर्माण झाली. यामुळे पद याच्या परिणामामुळे खर्च जास्त झाला / वाढला, उत्पादन घसरले आणि एकूण पुरवठा वक्र डावीकडे सरकला ज्यामुळे शेवटी मंदीयुक्त भावफुगवटा झाला.

## ६.४ मंदीयुक्त भावफुगवट्याचे परिणाम

- मंदीयुक्त भावफुगवटा म्हणजे कुंठित (अवरुद्ध, गतिशून्य, स्थिर) अर्थव्यवस्थेतील महागाई आणि बेरोजगारीचे सहजीवन होय. कुंठित अर्थव्यवस्थेमध्ये महागाई ही मंदीयुक्त भावफुगवट्याची परिस्थिती आहे. त्यामुळे महागाई आणि मंदीशी संबंधित सर्व नकारात्मक बाबी यात आहेत. फिलिप्स वक्राच्या निष्कर्षाकडे (अनुमानाकडे) दुर्लक्ष करणारी ही एक विचित्र परिस्थिती आहे.
- ही अशी परिस्थिती आहे जिथे अर्थव्यवस्था कुंठित (अवरुद्ध, गतिशून्य, स्थिर) असते. उद्दिष्टि / उत्पादन आणि रोजगार रखडलेले / कुंठित आहेत, वाढत नाहीत, तरीही किंमती सतत वाढत जातात.
- उत्पादन आणि रोजगाराच्या बाबतीत अर्थव्यवस्था मंदीच्या स्थितीत आहे. याचा अर्थ अर्थव्यवस्था ही कुंठित (अवरुद्ध, गतिशून्य, स्थिर) स्थिर स्थितीत आहे.
- बेरोजगारी वाढत असताना, किंमत वाढीमुळे मिळणाऱ्या प्रोत्साहनांना गुंतवणूक प्रतिसाद देत नाही. गुंतवणूकीत घट झाल्यामुळे वस्तू आणि सेवांचे उत्पादन कमी होते.
- येथे पडझडीचे / अध:पतनाचे दुष्टचक्र आहे. गुंतवणूक कमी झाल्याने किंवा गुंतवणूकीत घट झाल्यामुळे उत्पादन घटते आणि परिणामी पुन्हा उत्पन्न कमी होते किंवा घटते. यामुळे बचतीत घट होते आणि नंतर गुंतवणूकीत घट होते.

➢ वर स्पष्ट केलेल्या परिस्थितीमुळे खरेतर किंमतीत घट झाली पाहिजे. पण त्याउलट किंमतीची पातळी वाढते. तथापि, ही महागाई जास्त गुंतवणूक आणि रोजगार आकर्षित करत नाही.

चलनवाढ आणि बेरोजगारीमधील सममूल्यनाचा अर्थव्यवस्थेला फायदा होत नाही. जेथे लोक महागाई आणि बेरोजगारीच्या दुहेरी समस्यांपासून त्रस्त असतात तेथे संबंध थेट असतो. उत्पादन आणि पुरवठा कमी होतो, ज्यामुळे उत्पन्न आणि रोजगार कमी केले जातात आणि त्याचवेळी किंमतींना वर ढकलले. अधिक उत्पादन आणि रोजगाराला प्रोत्साहित करण्यासाठी कोणत्याही अतिरिक्त पैशाच्या पुरवठ्यामुळे वस्तूंच्या आणि सेवांच्या पुरवठ्याकडून अगदी अल्प प्रतिसाद मिळत केवळ किंमतींमध्ये वाढ होईल. खालील आकृती ही उत्पादन / उद्दिष्टि आणि किंमत वरील परिणाम स्पष्ट करते.




**आकृती ६.२**

वरील आकृतीत X एक्स अक्षावर उत्पादन / उद्दिष्टि दर्शविली जाते आणि Y अक्षावर किंमत पातळी दर्शविली जाते. मूळ एकत्रित मागणी वक्र $AD_1$ हा मूळ एकत्रीत पुरवठा वक्र $AS_1$ यास $E_1$ या समतोल बिंदूवर / बिंदुपाशी छेदतो. उत्पादन / उद्दिष्टि $OY_1$ आहे आणि किंमत $OP_1$ आहे. एकूण पुरवठा वक्र डावीकडे म्हणजेच $AS_2$ पर्यंत डावीकडे सरकतो. नवीन समतोल बिंदू $E_2$ आहे. उत्पादन $OY_1$ हे $OY_2$ पासून पर्यन्त कमी होते आणि किंमत ही $OP_1$ पासून $OP_2$ पर्यंत वाढते. येथे अर्थव्यवस्था ही कुंठितता (अवरुद्ध, गतिशून्य, स्थिर) (उत्पादनात घसरण) आणि चलनावाढ (वाढत्या किंमती) या दोन्ही गोष्टींचा अनुभव घेते. या परिस्थितीला मंदीयुक्त भावफुगवटा असे म्हणतात.

जर आपण फिलिप्स वक्राद्वारे परिस्थितीबद्दल चर्चा केली तर आपल्याकडे वर सरकत जाणारा पुरवठा वक्र असतो जिथे किंमतीची पातळी आणि बेरोजगारी एकत्र वाढतात.

जर आपण फिलिप्स कर्व्हद्वारे परिस्थितीबद्दल चर्चा केली तर आमच्याकडे वरची उतार पुरवठा वक्र असेल जिथे किंमतीची पातळी आणि बेरोजगारी एकत्र वाढतात.

अर्थव्यवस्थेला अडचणीतून बाहेर काढण्यासाठी सरकारला अशा उपाययोजनांचे मिश्रण अवलंबण्याची आवश्यकता असू शकते ज्याचा एकाच वेळी महागाईवर आणि वस्तू व सेवांचे उत्पादन उत्तेजित करण्यावर परिणाम होतो. आर्थिक, वित्तीय आणि इतर उपाययोजनांचा विवेकी उपयोग अंमलात आणणे आवश्यक आहे.

## ६.५ पुरवठ्याच्या बाजूचे अर्थशास्त्र : मूलभूत प्रस्ताव आणि निर्णायक / टिकाकुशल दृष्टिकोन (SUPPLY SIDE ECONOMICS BASIC PROPOSITIONS AND CRITICAL APPROACH)

पुरवठा बाजूचे अर्थशास्त्र ही अशी विचारधारा आहे जी दीर्घकाळ चालणाऱ्या एकूण पुरवठ्यास उत्तेजन देण्यासाठी वित्तीय धोरणाच्या वापरास प्रोत्साहित करते. पुरवठा बाजूचे अर्थशास्त्रज्ञ हे लोकांना जास्त काम करण्यास आणि अधिक लोकांना काम करण्यास उद्युक्त करण्यासाठी कर दरात घट करण्यास आणि भांडवल निर्मितीला उत्तेजन देण्यासाठी गुंतवणूक कर जमा / पत प्रदान करण्यास समर्थन देतात.

महामंदी पासून मानक आर्थिक नमूना म्हणून काम करीत असलेला केनिशियनिझमचा तारा १९७० च्या दशकात कमी / निस्तेज होत चालला होता, कारण घटणारी वाढ आणि वाढती महागाई यांना रोखण्यासाठी तो संघर्ष करीत होता - ज्यास मंदीयुक्त भावफुगवटा म्हणून ओळखले जाते - ज्याने अनेक प्रगत अर्थव्यवस्था त्रस्त / ग्रस्त झाल्या. ही संधी लक्षात घेत, पुरवठा बाजूची तत्त्वे प्रतिरोधक म्हणून ढकलत नवउदारमतवादी एक पाऊल टाकत पुढे आले. सर्वात प्रसिद्ध / महत्त्वाचे म्हणजे, हा नवीन सिद्धांत 'रीगनॅमिक्स' किंवा ट्रिकल-डाऊन चा पक्का पाया / मूलभूत तत्त्व ठरले - अमेरिकेचे ४० वे अध्यक्ष रोनाल्ड रेगन यांनी पाठपुरावा केलेले आर्थिक धोरण.


अध्यक्ष रेगन आणि रिपब्लिकन समकालीनांनी श्रीमंत गुंतवणूकदार आणि उद्योजकांच्या करात मोठ्या प्रमाणात कपात केल्याने त्यांना बचत आणि गुंतवणूकीसाठी प्रोत्साहन दिले जाते आणि एकूणच अर्थव्यवस्थेमध्ये असे आर्थिक फायदे होतात जे खालपर्यंत झिरपत जातात ही वादग्रस्त कल्पना लोकप्रिय केली (लोकांना रूचेल / आवडेल / समजेल अशी प्रकारे मांडली). वरील सिद्धांतावर आपली भूमिका स्पष्ट करण्यासाठी त्यांनी अनेकदा वाढती / चढती भरती सर्व बोटींना उचलून धरते. असे सुभाषित (म्हण / सूत्र / वचन) उद्धृत केले.

पुरवठा बाजूचे अर्थशास्त्र हा एक असा आर्थिक सिद्धांत आहे जो हे सिद्ध करतो की श्रीमंत (मातबर) लोकांसाठी केलेली कर कपात ही त्यांची बचत आणि गुंतवणूक क्षमता वाढवते जी एकूणच संपूर्ण अर्थव्यवस्थेमध्ये खालपर्यंत झिरपत जाते. पुरवठा बाजूच्या अर्थशास्त्राचे उद्दिष्टित उद्दिष्ट म्हणजे अर्थव्यवस्थेतील स्थूल आर्थिक घटनांचे स्पष्टीकरण देणे आणि स्थिर आर्थिक विकासासाठी धोरणे देऊ करणे.

पुरवठा बाजूच्या अर्थशास्त्राचे तीन आधारस्तंभ म्हणजे कर धोरण, नियामक धोरण आणि चलन विषयक धोरण. पुरवठा बाजूच्या अर्थशास्त्राचा मुख्य (गाभा) मुद्दा असा आहे की उत्पादन (म्हणजेच वस्तू आणि सेवांचा पुरवठा) हे आर्थिक वाढ निश्चित करण्यासाठी महत्त्वाचे आहे तर याच्या विरुद्ध केनेशियन अर्थशास्त्र किंवा मागणी (मागणीच्या) बाजूचे अर्थशास्त्राचा

असा विश्वास आहे की पुरवठ्या ऐवजी अर्थव्यवस्थेतील मागणीची पातळी किंवा वस्तूची मागणी (खर्चणे) हा आर्थिक वाढ निश्चित करण्याचा सर्वात महत्त्वाचा व जोमदार घटक आहे.

पुरवठा-बाजूच्या अर्थशास्त्राचा भर (केंद्रबिंदू) हा समतोलाच्या समष्टि (समग्र) आर्थिक समतोलाच्या पुरवठा बाजूवर आहे. पुरवठा बाजूच्या अर्थशास्त्रानुसार, एकूण पुरवठा वक्र उजवीकडे हलवून मंदीयुक्त भावफुगवट्याची अल्प मुदतीची समस्या नियंत्रित केली जाऊ शकते.




**आकृती ६.३**

वरील आकृतीत मूळ एकत्रीत मागणी वक्र $AD_1$ हा मूळ समतोल बिंदू $E_1$ एकत्रित पुरवठा वक्र $AS_1$ ला छेदतो. एकूण उत्पादन $OY_1$ आहे आणि एकूण किंमतपातळी $OP_1$ आहे. प्रतिकूल पुरवठा धक्क्यामुळे खर्च आणि किंमती वाढवतात आणि त्यामुळे सुरुवातीला एकूण पुरवठा वक्र $AS_1$ पासून $AS_2$ पर्यंत डावीकडून सरकतो. त्यामुळे परीव्ययजन्य खर्च दबावामुळे एकूण उत्पादन हे पासून पर्यंत खाली येते. आता योग्य पुरवठा व्यवस्थापन धोरणे स्वीकारुन एकूण पुरवठा वक्र च्या उजवीकडे हलवून समस्या सोडविली जाऊ शकतात. परिणामी, एकूण उत्पादन मूळ स्तरावर म्हणजे वर परत येते आणि किंमत पातळी देखील पासून पर्यंत खाली घसरते. पुरवठ्याच्या बाजूचे देखील अर्थव्यवस्थेच्या दीर्घ मुदतीच्या वाढीवर भर देतात. वाढीचे मुख्य निर्धारक म्हणजे कामगारांचा पुरवठा, बचतीचा दर आणि गुंतवणूकीचा दर. कर कपात स्वरूपात आर्थिक प्रोत्साहन देऊन यांच्यात वाढ करता येते.

## ६.६ पुरवठ्याच्या बाजूच्या अर्थशास्त्राचे मुख्य प्रस्ताव

पुरवठ्याच्या बाजूच्या अर्थशास्त्राचे मुख्य (महत्त्वाचे) प्रस्ताव खालीलप्रमाणे आहेत.

**१) कामावरील प्रयत्नांवर कर कपातीचा परिणाम :**

एक वेळेनंतर / बिंदुनंतर सीमांत कराच्या दराच्या वाढीमुळे लोकांची काम करण्याची इच्छा कमी होते. सीमांत दरामधील कपात ही करानंतरचे उत्पन्न वाढवून आणि लोकांना कमी विश्रांती आणि कठोर परिश्रम (म्हणजे सामान्य तासांपेक्षा जास्त काळ काम करा) करण्यासाठी आवश्यक ते उत्तेजन / आमिष देवून कामगारांचा पुरवठा वाढविते. त्याचप्रमाणे निगम

उत्पन्नावरील किरकोळ दरामधील घट ही रोजगारावर असलेल्या कामगारांचे करा नंतरचे उत्पन्न वाढविते. हे व्यवसाय संस्थाना अधिक श्रम वापरण्यास प्रवृत्त करेल. कामगारांच्या पुरवठ्यातील आणि मागणीतील वाढीमुळे एकूण उत्पादन वाढेल.

**२) बचतकर्ता आणि गुंतवणूकदारांना प्रोत्साहन :** सीमांत कर दर कमी (कपात) केल्यास लोकांना अधिक बचत करण्यास उद्युक्त करण्यात येईल आणि व्यावसायिक कंपन्यांना अधिक गुंतवणूक करण्यास प्रोत्साहित केले जाईल. करामध्ये कपात केल्याने घरगुती व्याज उत्पन्न वाढेल आणि व्यावसायिक कंपन्यांद्वारे वापरलेल्या (उपयोगात आणलेल्या) भांडवलाला निव्वळ परतावा मिळेल. खरं तर, गुंतवणूकीवरील उत्पन्नावरील करात कपात, जसे की नफा, अधिक गुंतवणूक करण्यास आणि जास्त जोखीम घेण्यास उद्युक्त करते. परिणामी भांडवल निर्मितीचे वेग वाढेल. भांडवलाच्या साठ्यात वाढ झाल्याने कामगारांची उत्पादनक्षमता वाढेल आणि श्रम खर्चात घट होईल. परिणामी महागाईचा दर कमी होईल. या व्यतिरिक्त, भांडवल संचय (जमा) होण्याच्या दरामध्ये वाढ झाल्यामुळे अर्थव्यवस्थेच्या उत्पादन क्षमतेचा विस्तार होईल. हे दोन घटक एकत्रितपणे पुरवठा वाढीस कारणीभूत ठरतात. म्हणून एकूण पुरवठा वक्र उजवीकडे स्थलांतर करतो (हलतो). परिणामी, एकूण उत्पादन वाढेल, बेरोजगारीचे दर खाली येतील आणि किंमतीची पातळी खाली येईल.

**३) अप्रत्यक्ष करांचे परिव्ययजन्य प्रभाव :**

केनिशियन अर्थशास्त्रज्ञांनी केवळ व्यक्ती आणि कंपन्यांवरील आयकर सारख्या थेट करांचा विचार केला. अशा करांमुळे लोकांचे विनियोज्य उत्पन्न (आय) कमी होते आणि त्यामुळे मागणीचे सेवन आणि गुंतवणूकीचे घटक कमी होते. परिणामी महागाई नियंत्रणात आणता येईल. याउलट, पुरवठ्याच्या बाजूच्यानी (पुरवठा बाजूचा विचार करणाऱ्यांनी) विक्री कर, उत्पादन शुल आणि वर्धित मूल्य कर (व्हॅट) किंवा वस्तू व सेवा कर (जीएसटी) यासारखे अप्रत्यक्ष कर विचारात घेतले. असे कर व्यवसाय खर्चाचा एक भाग आहेत. म्हणून जर सरकारने वाढता खर्च (सार्वजनिक क्षेत्राच्या विस्ताराच्या धोरणाचा भागाच्या रूपात) वाचवण्यासाठी वस्तू आणि कच्च्या मालावर अतिरिक्त कर लादल्यास अर्थव्यवस्थेत खर्च-दबाव / परीव्ययजन्य दबाव निर्माण होईल. मजुरीदर / वेतन दर किंवा तेलाच्या किंमतीतील वाढ यासारखे अप्रत्यक्ष कर हे पुरवठा धक्का म्हणून कार्य करतात आणि एकूण पुरवठा वक्र डावीकडे हलवून मंदीयुक्त भावफुगवट्यास कारणीभूत ठरतात. म्हणून, केनिशियन अर्थशास्त्रात प्रत्यक्ष कर हे महागाई विरोधी उपाय म्हणून काम करीत असताना, अप्रत्यक्ष कर अर्थव्यवस्थेत खर्च-दबाव आणून पुरवठा बाजूनी महागाई निर्माण करतात.


**४) समांतर अर्थव्यवस्था :**

उच्च कर हे कर चुकवणे आणि कर टाळण्यास प्रोत्साहित करतात आणि शेवटी समांतर अर्थव्यवस्थेचा उदय करण्यास कारणीभूत ठरतात. बऱ्याच देशांमध्ये ही समांतर अर्थव्यवस्था ही अधिकृत अर्थव्यवस्थेइतकी मजबूत असते. जेव्हा करांचे दर खूप जास्त असतात, तेव्हा व्यक्ती आणि व्यावसायिक संस्था या कर न भरण्याचा आणि टाळण्याचा प्रयत्न करतात. करामध्ये कपात केल्याने कर अनुपालन वाढेल आणि कराचा महसूल वाढेल.

**५) कर दर आणि कर महसूल :**

पुरवठा बाजूच्या अर्थशास्त्राचा मुख्य युक्तिवाद असा आहे की कर कमी केल्याने समष्टि आर्थिक समस्येचे निराकरण केले जाऊ शकते. १९७४ मध्ये आर्थर लाफरने ‘लाफर

कर्व्ह' च्या माध्यमातून कर दर आणि कराच्या महसूलातील / उत्पन्नातील संबंध स्पष्ट केला. आर्थर लाफरने सांगितल्याप्रमाणे, करांच्या दरात वाढ होण्याची शक्यता आहे, कारण प्रतिबंधक / अप्रेरक परिणाम हे खरंतर कर महसूल कमी करतात. करांचे दर शून्य किंवा १०० टक्के असतील तर कर महसूल शून्य होईल या तर्कशास्त्रावर / युक्तीवादावर लाफरने आपला तर्क मांडला. जर ते दर शून्य असते तर कोणताही कर वसूल केला जाणार नाही हे नक्की. जर ते १०० टक्के असतील, तर एखाद्या व्यक्तीचे सर्व उत्पन्न सरकारकडून घेतले जाईल. त्यामुळे तेथे काम करण्यास प्रोत्साहन / प्रेरणा राहणार नाही आणि म्हणून करासाठी उत्पन्नच असणार नाही. वास्तविक जगातील कर दर शून्यापेक्षा जास्त परंतु १०० टक्क्यांहून कमी असल्याने लाफेरने असा निष्कर्ष काढला आहे की असा एक कर दर असला पाहिजे जिथे महसूल जास्तीत जास्त असेल. करांचे दर जसजसे वाढत जातात तसतसे महसूलही वाढत जातो. मग तो अधिकतम / महत्तम जागी पोहोचेल आणि जर कराचा दर पुढे आणखी वाढविला गेला तर कर महसुलात घट होईल. हे खालील आकृतीत स्पष्ट केले आहे.




**आकृती ६.४**

कर दर वाढल्यामुळे कर महसूलही वाढतो. वरील आकृतीमध्ये a या बिंदुपाशी कर महसूल अधिकत्तम आहे. जर कराचा दर आणखी वाढविला गेला तर कर महसूल कमी होण्यास सुरुवात होते.

कर कपात लोकांना मेहनत करण्यासाठी प्रोत्साहित करते आणि अधिक बचत होते व त्यामुळे महसूल वाढतो. त्याचप्रमाणे कर कपात व्यावसायिक कंपन्यांना अधिक गुंतवणूक करण्यासाठी आणि अधिक जोखीम घेण्यास प्रोत्साहन देते. परिणामी, एकत्रित पुरवठा वक्र उजवीकडे वळतो आणि मंदीयुक्त भावफुगवटा नियंत्रणात आणला जातो.

कर कपातीचे धोरण आणखी दोन कारणांसाठी महसूल वाढवते.

१) हे कर कपात धोरण कर अनुपालन लादते आणि कर चुकवणे आणि टाळण्याचे प्रमाण कमी करते. बरेच लोक राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र (नॅशनल सेव्हिंग सर्टिफिकेट) खरेदी करतात आणि सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी (पीपीएफ) मध्ये पैसे ठेवतात कारण ते करमुक्त असतात.

२) राजकोषीय उत्तेजनामुळे जर रोजगार वाढत असेल तर बेरोजगारी नुकसान भरपाई किंवा रोख अनुदानाच्या स्वरूपात सरकारचा हस्तांतरण खर्च कमी होईल. तर, सरकारचा निव्वळ महसूल (= कर - हस्तांतरण) वाढेल.

## ६.७ पुरवठा बाजूच्या अर्थशास्त्रावरील टीका (CRITICISM OF SUPPLY SIDE ECONOMICS)

पुरवठा बाजूच्या अर्थशास्त्राच्या मुख्य प्रस्तावांवर अनेक अर्थशास्त्रज्ञांनी टीका केली आहे.

१) **कर कपातीची अकार्यक्षमता :** उत्पन्नाच्या (वेतनाच्या) उच्च कर पातळीमुळे कामाच्या प्रयत्नात वाढ होण्याची शक्यता नाही कारण उच्च उत्पन्न पातळीवर लोक आरामास / फुरसतीस प्राधान्य देतात. एखाद्या व्यक्ती कमी काम करण्याची शक्यता आहे. ती व्यक्ति कमी काम करेल आणि तरीही राहणीमानाचा तोच दर्जा राखेल. व्याज उत्पन्नावरील करामधील कपातीचा परिणाम तसाच असेल. लोक अधिक बचत करणार नाहीत आणि खरतर बचत देखील कमी करु लागतील. डब्ल्यू. जे. बाऊमोल (W.J.Baumol) यांनी असे निदर्शनास आणून दिले की जर एखाद्या व्यक्तीने एखाद्या विशिष्ट हेतूसाठी बचत केली असेल किंवा त्याच्या मनात बचतीची विशिष्ट लक्ष्य पातळी असेल तर व्याज दरामध्ये वाढ झाल्याने बचत कमी होईल. व्याज करामध्ये कपात करणे हे बचतीवरील व्याज वाढविण्याच्या समान / समातुल्य आहे. सांख्यिकीय अभ्यास असे सूचित करतात की कर कपात केल्याने कामगार पुरवठा किंवा घरगुती बचत यांच्यात कमी प्रमाणात वाढ होते.

२) **अर्थसंकल्पीय तुटीतील वाढ :** करात कपात केल्याने सरकारी खर्च कायम राहून अर्थसंकल्पातील तूट वाढण्याची शक्यता आहे. तूट मुद्रीकरणामुळे चलनवाढ / महागाई होण्याची शक्यता आहे, म्हणजेच सरकारला कर्ज देण्यासाठी मध्यवर्ती बँकेने नवीन पैसे तयार करणे. अर्थव्यवस्था तापल्याने चलनवाढ खात्रीपूर्वक होणार आहे. मिल्टन फ्रीडमन फ्राईडमन यांनी या पुरवठा बाजूच्या अर्थशास्त्रावर टीका केली कारण त्यांचे असे म्हणणे आहे की कर कमी केल्याने कर महसूल कमी होतो पण तूट वाढते.


३) **वाढती असमानता :** करांमध्ये कपात केल्यामुळे समाजातील केवळ श्रीमंत (धनवान) व समृद्ध घटकांनाच फायदा होईल, जे वेतन, व्याज आणि लाभांश अशा विविध स्त्रोतांकडून उत्पन्न मिळवितात. इक्विटी शेअर्स आणि रिअल इस्टेटमधील गुंतवणूकीतून ते भांडवली नफा देखील मिळवितात. यामुळे उत्पन्न आणि संपत्तीच्या असमानतेच्या प्रमाणात वाढ होईल (कारण उत्पन्न स्वतःच संपत्तीचे स्त्रोत आहे). दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर श्रीमंत अधिकाधिक श्रीमंत होत जातील, तर गरिबांची आर्थिक परिस्थिती तशीच राहील किंवा अगदी खालावेल.

४) **क्रुगमनची टीका :** क्रूगमन यांनी असे सांगितले की पुरवठा बाजूच्या अर्थशास्त्रज्ञांना अध्यक्ष रेगेन यांच्या कारकिर्दीत त्यांच्या सिद्धांताच्या प्रयोग करण्याची संधी मिळाली परंतु दुर्दैवाने ते अपयशी ठरले.

५) **गॅब्रॅथ टीका :** जॉन केनेथ गॅलब्रॅथ यांनी असे निदर्शनास आणले की पुरवठा बाजूचे अर्थशास्त्र हे केवळ आर्थिक धोरणाकडे जाणाऱ्या गुदगुल्यांचेच आवरण होते, जुनी व त्यापेक्षा कमी मोहक पिढी याला 'घोडे आणि चिमणी सिद्धांत' म्हणतात. If you feed the horse enough oats, some will pass through the road for the sparrows.

As it was humorously put, 'water-trickles down but money trickles up'. जर तुम्ही घोड्याला पुरेशी ओट्स दिली तर काही चिमण्यांसाठी रस्त्यावरुन जातील. हे विनोदी पद्धतीने ठेवले होते तसे, 'पाण्याच्या गुणा खाली पण पैशाचे ट्रिक्स अप'.

६) **महागाईची शक्यता :** पुरवठ्याच्या बाजूच्यानीही करातील किरकोळ कपातीने होणाऱ्या महागाईच्या शक्यतेकडे दुर्लक्ष केले आहे. वैयक्तिक करात कपात केल्यास विनियोग्य उत्पन्न वाढून खर्च वाढले. त्याचप्रमाणे कॉर्पोरेट उत्पन्न (नफा) करात कपात केल्यास गुंतवणूकीचा खर्च वाढेल. परिणामी, एकत्रित खाजगी मागणी (सी + आय) वाढेल आणि एकत्रित मागणी वक्र उजवीकडे सरकेल. हे खालील आकृतीमध्ये स्पष्ट केले आहे.




**आकृती ६.५**

In diagram (a), the aggregate demand curve shifts to the right from $AD_1$ to $AD_2$.. It causes the demand pull inflation as Keynesian thought. Due to this shift in the demand curve the price level rises from $OP_1$ to $OP_2$ in spite of an increase in real (or aggregate output).

आकृती (अ) मध्ये, एकत्रित मागणी वक्र हा $AD_1$ पासून $AD_2$..पर्यंत उजव्या बाजूस सरकतो. त्यामुळे हा बदल केनेशियन विचारांनुसार मागणीजन्य चलनवाढीस कारणीभूत ठरतो. मागणी वक्रातील या बदलांमुळे वास्तविक स्थूल आंतरदेशीय उत्पादनामध्ये (किंवा एकूण उत्पादन) वाढ होऊनही, किंमत पातळी ही $OP_1$ पासून $OP_2$ पर्यंत वाढते.

तथापि, पुरवठ्याच्या बाजूच्यानी असे निदर्शनास आणून दिले की कर कमी केल्याने अर्थव्यवस्था उत्तेजित होईल आणि पॅनेल (बी) मध्ये दर्शविल्याप्रमाणे एकूण पुरवठा वक्र $AS_1$ वरुन $AS_2$ वर जाईल. तथापि, कर कपातीचे पुरवठा बाजूचे परिणाम हे त्यांच्या मागणी-बाजूच्या परिणामांपेक्षा अधिक मजबूत असल्याने किंमतीच्या पातळीत फारच कमी वाढ होते परंतु वास्तविक स्थूल आंतरदेशीय उत्पादनामध्ये $Y_1$ ते $Y_2$ पर्यंत भरीव वाढ होते. परिणामी, बेरोजगारीचा दर खाली घसरेल. म्हणून, प्रवेगक चलनवाढीच्या गैरहजेरीत सुद्धा अर्थव्यवस्था उच्च रोजगार वाढीस सक्षम होईल. अशाप्रकारे, मंदीयुक्त भावफुगवट्याची अडचणी ही जरी पूर्णपणे नाही तरी मोठ्या प्रमाणावर टाळली जाऊ शकते.

## ६.८ निष्कर्ष

अल्पकाळामध्ये कर कपातीचे मागणी बाजूचे परिणाम हे त्यांच्या पुरवठा-बाजूच्या परिणामांपेक्षा अधिक मजबूत होतील. म्हणून, कर कपात ही अर्थव्यवस्थेतील चलनवाढीच्या दबावाचा प्रवेग वाढण्याची शक्यता नाही. कर कपात केल्याने एकूण मागणीत लगेच / तत्काळ वाढ होते. परंतु त्यांचे पुरवठा-बाजूचे परिणाम हे फक्त दीर्घकाळातच जाणवू शकतील. म्हणून पुरवठा बाजूची धोरणे ही अल्पकाळात किंमत स्थिरता आणि पूर्ण रोजगार मिळविण्यासाठी वापरली जाऊ शकत नाहीत. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर, पुरवठा - बाजूची धोरणे ही केनिशियन अल्पकालीन स्थिरीकरण धोरणाचा पर्याय नसतात. तथापि, पुरवठा बाजूची धोरणे ही दीर्घ काळामध्ये वेगवान आर्थिक वाढ साध्य करण्यासाठी वापरली जाऊ शकतात.

## ६.९ सारांश

मंदीयुक्त भावफुगवटा या शब्दाचा अर्थ असा आहे की अशी स्थिती जी स्थिरता आणि चलनवाढ सह-अस्तित्त्वात / एकत्र असतात. कमी आर्थिक वाढ, वाढती बेरोजगारी आणि महागाईचा उच्च दर हे त्याचे वैशिष्ट्य आहे. हे फिलिप्स वक्राच्या निष्कर्षाच्या विरुद्ध आहे, जे महागाई आणि बेरोजगारीमधील व्यस्त संबंध दर्शविते. यामध्ये आपल्याला किंमतीच्या पातळीत सातत्याने झालेली वाढ आणि बेरोजगारीचे वाढलेले प्रमाण यांना सामोरे जावे लागते.

काहीजणांचे असे म्हणणे आहे की पुरवठा धक्के / धोके किंवा परीव्ययजन्य हे मंदीयुक्त भावफुगवट्यास जबाबदार असणारे प्रमुख घटक आहेत तर जिथे इतरांचे म्हणणे होते की मंदीयुक्त भावफुगवट्यास जबाबदार असणारे प्रमुख घटक आहेत तर जिथे इतरांचे म्हणणे होते की मंदीयुक्त भावफुगवटा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या असामान्य आर्थिक घटनेमागील मुख्य कारण म्हणजे मागणीजन्य हे आहे.

पुरवठा बाजूचे अर्थशास्त्र ही अशी विचारधारा आहे जी दीर्घकाळ चालणाऱ्या एकूण पुरवठ्यास उत्तेजन देण्यासाठी वित्तीय धोरणाच्या वापरास प्रोत्साहित करते. पुरवठा बाजूचे अर्थशास्त्रज्ञ हे लोकांना जास्त काम करण्यास आणि अधिक लोकांना काम करण्यास उद्युक्त करण्यासाठी कर दरात घट करण्यास आणि भांडवल निर्मितीला उत्तेजन देण्यासाठी गुंतवणूक कर जमा / पत प्रदान करण्यास समर्थन देतात.

## ६.१० प्रश्न

१. मंदीयुक्त भावफुगवटा अर्थ स्पष्ट करा.
२. भावफुगवटा कारणे कोणती ते उदाहरणांदाखल स्पष्ट करा.
३. मंदीयुक्त भावफुगवटाचे परिणाम कोणते याचे स्पष्टीकरण द्या.
४. पुरवठ्याच्या बाजूच्या अर्थशास्त्राची सखोल चर्चा करा.

❖❖❖❖

**प्रकरण - ४**

# ७

# पैसा, किंमती व भाववाढ

**घटक रचना :**

७.० उद्दिष्ट्ये
७.१ प्रस्तावना
७.२ पैसा - अर्थ आणि व्याख्या
७.३ पैशाचा पुरवठा
७.४ पैशाच्या पुरवठ्यात समाविष्ठ घटक
७.५ पैशाचा पुरवठा निर्धारित करणारे घटक
७.६ पैशाचा भ्रमणवेग
७.७ पैशाचा भ्रमणवेग निर्धारित करणारे घटक
७.८ पैशाची मागणी
७.९ पैशाच्या मागणीचा लॉर्ड केन्सचा सिद्धांत (रोखता पसंती सिद्धांत)
७.१० पैशाच्या मागणीबाबत फ्रिडमन यांचा दृष्टिकोन
७.११ सारांश
७.१२ प्रश्न

## ७.० उद्दिष्ट्ये

- पैशाचा पुरवठा ही संकल्पना अभ्यासने.
- पैशाच्या पुरवठ्यावर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.
- पैशाचा भ्रमणवेग ही संकल्पना जाणून घेणे.
- पैशाच्या मागणीचे विविध दृष्टीकोन समजून घेणे.
- पैशाच्या मागणीचा लॉर्ड केन्सचा सिध्दांत अभ्यासणे.

## ७.१ प्रस्तावना

सर्व प्रकारच्या आर्थिक व्यवहारामध्ये पैसा हा एक अत्यंत महत्वाचा घटक आहे. तसेच अर्थशास्त्रीय विश्लेषणामध्ये पैसा हे मूल्यमापनाचे माध्यम म्हणून वापरले जाते. त्यामुळेच पैसा हा

सुक्ष्म आणि समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या अभ्यास प्रक्रियेतील एक मध्यवर्ती घटक आहे. सर्वप्रकारच्या मानवी आर्थिक व्यवहारामध्ये पैशाला अनन्यसाधारण महत्व आहे.

पैसा हा प्रत्येक अर्थव्यवस्थेतील विनिमयाचे कायदेशीर माध्यम म्हणून महत्वाची भूमिका पार पाडतो. तथापी काळानुसार त्यांचे स्वरुप बदलत गेले. पैशाला विधिग्राह्य चलन असेही म्हटले जाते कारण कोणत्याही अर्थव्यवस्थेतील पैशाला त्या – त्या देशातील कायदयाचा आधार असतो.

## ७.२ पैसा – अर्थ आणि व्याख्या

अर्थव्यवस्था ही भांडवलशाही लोकशाही मिश्र स्वरुपाची जरी असली तरी ही कोणत्याही अर्थव्यवस्थेतील कोणताही व्यवहार पैशाशिवाय पूर्ण होवू शकत नाही. म्हणजेच संपूर्ण जगभरात अर्थव्यवस्थेत पैशाला अन्यय साधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. कारण पैशाने मानवी जीवनाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि धार्मिक अशा प्रत्येक क्षेत्रात प्रवेश केलेला आहे. थोडक्यात पैसा हा सर्व आर्थिक व्यवहाराचा केंद्रबिंदू मानला जातो. पैशाच्या व्याख्या खालीलप्रमाणे :-

**पैशाच्या व्याख्या :**

**१) प्रा. हाम :**

"विनिमयाचे माध्यम आणि मूल्यमापनाचे कार्ये करणारी वस्तु म्हणजेच 'पैसा' होय."

**२) प्रा. काऊथर :**

"जी वस्तु विनिमयाचे माध्यम म्हणून स्वीकारली जाते आणि त्याच बरोबर जी मूल्यमापन व मूल्यसंचय असे ही कार्य करते, ती वस्तु म्हणजेच 'पैसा' होय."

**३) प्रा. वॉकर :**

"पैशाची कार्य करणारी वस्तु म्हणजेच 'पैसा' होय."

**४) प्रा. सेलिगमन :-**

"ज्या वस्तुला सर्वांमार्फत मान्यता मिळाली असते असे कोणतीही वस्तु म्हणजे 'पैसा' होय."

## ७.३ पैशाचा पुरवठा (SUPPLY OF MONEY)

अर्थशास्त्रात पैशाच्या पुरवठ्याचा अभ्यास अनेक वर्षांपासून करण्यात येत असला तरीही त्या संदर्भात अर्थशास्त्रज्ञांमध्ये एकवाक्यात दिसून येत नाही. काही अर्थतज्ञांच्या मते पैशाचा पुरवठा म्हणजे विशिष्ट कालखंडात विनिमयाचे साधन म्हणून उपयोगात आणलेला पैशाचा साठा होय.

या मतानुसार एकूण नाणी व कागदी चलन, मागणीदेय ठेवी यांचे एकत्रिकरण म्हणजे पैशाचा पुरवठा होय. अलीकडील काळात पैशाच्या पुरवठ्यात मुदत ठेवी, बचत ठेवी, कायम ठेवी, पोस्टातील ठेवी, शेअर्समध्ये गुंतविलेला पैसा या सर्वाचा समावेश होतो.

**व्याख्या :**

"एका विशिष्ट वेळी देशाच्या अर्थव्यवस्थेतील लोकांजवळ उपलब्ध असलेली पैशाची एकूण गोळाबेरीज म्हणजे पैशाचा पुरवठा होय."

पैशाच्या पुरवठ्यात समाविष्ठ असलेले घटक पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

## ७.४ पैशाच्या पुरवठ्यात समाविष्ठ घटक (CONSTITUENTS OF MONEY SUPPLY)

पैशाच्या पुरवठ्यातील समाविष्ट घटकांचा अभ्यास पुढील वेगवेगळ्या दृष्टीकोनांद्वारे अभ्यासता येईल.

**A) सनातन दृष्टीकोन (संकुचित मुद्रा) :**

सनातन पंथी अर्थतज्ञांनी पैशाच्या विनिमय माध्यम या कार्यावर भर देऊन पैशाच्या पुरवठ्यात पुढील दोन गोष्टींचा समावेश केला.

१) लोकांजवळील चलन (कायदेशिर नाणी आणि नोटा)
२) व्यापारी बँकांजवळील मागणीदेय ठेवी.

अशा पध्दतीने लोकांकडील एकूण चलन (Currency) आणि बँकांकडील मागणीदेय ठेवी (Demandable Deposits) मिळून पैशाचा पुरवठा व्यक्त करता येतो. यालाच $M_1$ असे संबोधले जाते. परंतू पैशाच्या पुरवठ्याची ही व्याख्या संकुचित समजली जाते.

**B) आधुनिक दृष्टीकोन (असंकुचित मुद्रा) :**

पैशाच्या आधुनिक दृष्टीकोनात पुढील वेगवेगळया दृष्टीकोनांचा विचार करावा लागतो.

**१) मौद्रिक दृष्टिकोन (प्रा. मिल्टन फ्रिडमन) :**

प्रा. मिल्टन फ्रिडमन यांनी पैशाच्या या दृष्टीकोनानुसार पैशाची व्याख्या व्यापक स्वरुपात केली आहे. त्यांनी याद्वारे पैशाच्या मूल्यसंचयनाच्या कार्यावर भर दिलेला आहे. फ्रिडमन यांच्या मते पैशाच्या पुरवठ्यात चलनी नोटा, नाणी याबोरबरच बँकांकडील मागणीदेय बचत ठेवी, चालू ठेवी, मुदत ठेवी यांचाही समावेश केलेला आहे. फ्रिडमन यांच्या मते अशा पध्दतीने व्यापारी बँकांजवळील मुदत ठेवी यांच्यामध्ये पैशाइतकीच रोखता असल्याने पैशाच्या पुरवठ्यात यांचा समावेश केलेला आहे.

**२) गर्ले आणि शॉ यांचा दृष्टीकोन :**

प्रा. गर्ले आनि शॉ यांनीदेखिल पैशाच्या पुरवठ्याची व्यापक स्वरुपात व्याख्या केलेली आहे. त्यांच्या मते पैशाच्या पुरवठ्यात फ्रिडमन यांनी सांगितलेल्या घटकांबरोबर बँकांच्या बचत,

मुदत ठेवीबरोबरच इतर वित्तिय संस्थांकडील ठेवी, कर्ज देणाऱ्या संघटनांकडील ठेवी, गृहनिर्माण सोसायटीकडील बचती इ. चा ही समावेश होणे आवश्यक आहे.

पैशाच्या पुरवठ्याच्या वरील दृष्टीकोनांबरोबरच पैशाच्या पुरवठ्याच्या संकल्पना व त्यामध्ये होणारे बदल यांची विश्लेषण करण्याच्या हेतूने रिझर्व्ह बँकेने १९७७ पासून पैशाच्या पुरवठ्याच्या पुढील - चार संकल्पना स्विकारलेल्या आहेत.

**१) $M_1$ :** $M_1$ या संकल्पनेला संकुचित पैसा (Narrow Money) असे सुद्धा म्हटले जाते. $M_1$ या संकल्पनेमध्ये प्रामुख्याने लोकांकडे असलेला रोख पैसा म्हणजे चलन की ज्यामध्ये धातुची नाणी व कागदी चलनाचा उपयोग होतो. त्याचप्रमाणे बँकांकडे असलेली मागणी देय ठेवी व रिझर्व बँकेकडील इतर ठेवीचा समावेश केला जातो.

**२) $M_2$:** $M_2$ ही संकल्पना पैशाची असंकुचित संकल्पना मानली जाते. $M_2$ या संकल्पनेमध्ये $M_1$ मध्ये समाविष्ट असलेले चलन, मागणी देय ठेवी इतर ठेवीच्या बरोबरच पोस्टामध्ये उपलब्ध असलेल्या बचत ठेवीचा देखील समावेश केला जातो. कारण ग्रामीण भागात बँकांच्या सुविधा उपलब्ध नसल्याने पोस्ट ऑफिसेसमार्फत ग्रामीण भागातील बचत एकत्रीत केली जाते.

**३) $M_3$ :** $M_3$ ही संकल्पना देखील पैशाची असंकुचित संकल्पना / व्यापंक संकल्पना मानली जाते. $M_3$ या संकल्पनेमध्ये $M_1$ मधील चलन, मागणी देय ठेवी इतर ठेवीच्या बरोबरच बँकामध्ये विशिष्ट मुदतीसाठी ठेवण्यात येणाऱ्या बँकामध्ये विशिष्ट मुदतीसाठी ठेवण्यात येणाऱ्या मुदत ठेवीचा देखील समावेश केला जातो.

**४) $M_4$ :** $M_4$ या संकल्पनेत $M_3$ या संकल्पनेतील सर्व बाबीबरोबरच पोस्टातील एकुण ठेवीचा देखील समावेश केला जातो.

## ७.५ पैशाचा पुरवठा निर्धारीत करणारे घटक (DETERMINANTS OF MONEY SUPPLY)

पैशाचा पुरवठा निर्धारीत करणारे काही नियंत्रणात्मक तर काही इतर घटक पुढील प्रमाणे सांगता येतील.

### १) उच्चशक्ती पैसा (High Powered Money) :

कोणत्याही देशातील पैशाचा पुरवठा निर्धारीत करण्यामध्ये उच्चशक्ती पैशाची भूमिका अत्यंत महत्वाची ठरते. कारण उच्चशक्ती पैशामध्ये पतनिर्मितीला चालना देण्याची क्षमता असते. त्यामुळे देशातील पैशाच्या पुरवठ्यात मोठी वाढ घडून येते.

### २) लोकांची रोख रक्कम जवळ बाळगण्याची प्रवृत्ती :

जर देशातील लोकांची रोखता पसंती अधिक असेल तर बँकाकडे ठेवींच्या स्वरुपात पैसा कमी राहून पतनिर्मिती कमी होऊन पैशाच्या पुरवठ्यात घट होते.

याऊलट जर लोकांनी पैसा रोख स्वरुपात स्वत:जवळ बाळगण्याऐवजी बँकाकडे ठेवींच्या स्वरुपात ठेवल्यास बँकांची पतनिर्मिती क्षमता वाढून पैशाचा पुरवठा वाढतो.

**३) सरकारी अंदाजपत्रक :**

सरकारच्या अंदाजपत्रकाचे प्रामुख्याने शिलकीचे अंदाजपत्रक, तूटीचे आणि संतूलित अंदाजपत्रक असे तीन प्रकारात वर्गीकरण केले जाते. ज्यावेळी सरकार शिलकीचे किंवा वाढव्याचे अंदाजपत्रक मांडते तेव्हा सरकार कर आणि करांच्या व्यतीरीक्त इतर मार्गाने जमा केलेला सर्व पैसा खर्च करते त्यामुळे पैशाचा पुरवठा घटतो. याउटल तूटीच्या अंदाजपत्रकामुळे नवीन चलन छपाई आणि विदेशी कर्जामूळे देशातील पैशाच्या पुरवढ्यात वाढ होते.

**४) पैशाचा भ्रमणवेग :-**

जेव्हा पैशाचा भ्रमणवेग अधिक असतो, तेव्हा पैशाच्या पुरवठ्यात वाढ होते. याऊलट कमी असेल तर पैशाच्या एकूण पुरवठ्यात घट होते.

**५) राखिव निधीचे प्रमाण :-**

मध्यवर्ती बँक देशातील व्यापारी बँकांना रोख राखिव निधी (CRR) व वैधनिक रोखता निधी (SLR) चे प्रमाण ठरवून देतो. CRR व SLR मध्ये वाढ केल्यास बँकांकडील ठेवीपैंकी अधिक रक्कम मध्यवर्ती बँकेजवळ जमा झाल्याने बँकांची कर्जे देण्याची म्हणजेच पतनिर्मितीची क्षमता घटल्याने पैशाच्या पुरवठ्यात घट होते.

याऊलट CRR व SLR च्या प्रमाणातील घट ही पैशाच्या पुरवठ्यात वाढ घडवून आणते.

**६) खुल्या बाजारातील रोख्यांची खरेदी – विक्री :**

देशातील सरकारने देशांतर्गत कर्ज उभारण्यासाठी मध्यवर्ती बँकेद्वारे सार्वजनिक कर्जरोख्यांची विक्री केल्यास जनतेचा पैसा सरकारी कर्जरोख्यांमध्ये गुंतल्याने पैशाचा पुरवठा घटतो.

याऊलट सरकारी कर्जरोख्यांची परतफेड केल्यास व्याज आणि मुद्दल रक्कम परत मिळाल्याने पैशाच्या पुरवठ्यात वाढ होते.

**७) बँकदरातील बदल :**

ज्या दराने मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांना कर्जे देतो त्यास बँकदर म्हणतात. समजा मध्यवर्ती बँकेने बँकदरात वाढ केली तर कर्जावरील व्याजदरात वाढ झाल्याने बँकांची पतनिर्मिती घटते व पैशाचा पुरवठा कमी होतो.

याऊलट बँकदर घटल्यास मध्यवर्ती बँकेची कर्जे स्वस्त झाल्याने बँकांची पतनिर्मिती क्षमता वाढून पैशांचा पुरवढा वाढतो.

## ७.६ पैशाचा भ्रमणवेग (VELOCITY OF CIRCULATION OF MONEY)

Velocity या इंग्रजी शब्दाचा अर्थ गती किंवा वेग असून Circulation या शब्दाचा अर्थ भ्रमण असा होतो. म्हणून Velocity of Circulation of Money म्हणजेच पैशाचा परिचलन किंवा पैशाचा भ्रमण वेग होय. त्यालाच पैशाची गतीशीलता असाही शब्द प्रयोग वापरला जातो.

कोणत्याही देशातील पैशाचा पुरवठा लक्षात येण्यासाठी पैशाचा भ्रमणवेग ही संकल्पना विचारात घेतली जाते. पैशाच्या एका नगाचा विचार केल्यास असे दिसून येते की विशिष्ट कालावधीमध्ये पैशाचा हा नग एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे फिरत राहतो किंवा हस्तांतरीत होत राहतो. अर्थव्यवस्थेतील पैशाचा हा फिरण्याचा वेग म्हणजेच पैशाचा भ्रमणवेग होय.

**व्याख्या :**

१) "पैशाचे एक परिमाण विशिष्ट कालखंडात जितक्या वेळा वापरले जाते ती संख्या म्हणजे पैशाचा भ्रमण वेग होय."

२) "एका विशिष्ट कालखंडात पैशाचा एकक जितक्या वेळा वस्तू आणि सेवांच्या खरेदीसाठी वेगवेगळ्या व्यक्तींकडून पुन्हा पुन्हा हस्तांतरीत होतो ती सरासरी संख्या म्हणजेच पैशाचा भ्रमणवेग होय."

उदा. :- समजा १००० रुपयाची एक नोट एक महिन्यात २० वेळा खर्च झाली तर तीचा भ्रमणवेग २० परंतू तीच्यामुळे पैशाचा एकूण पुरवठा मात्र (१००० × २०) २०,००० रु. एवढा असेल.

## ७.७ पैशाचा भ्रमणवेग निर्धारीत करणारे घटक

पैशाच्या भ्रमणवेगावर पुढील घटक परिणाम करतात.

### १) उत्पन्न मिळविण्याचा कालावधी :

जर व्यक्तीला मिळणारे उत्पन्न ठराविक कालावधीमध्ये प्राप्त होत असेल.

उदा. दर दिवशी, दर आठवड्याला, दर महिन्याला तर अशा परिस्थितीमध्ये विशिष्ठ कालावधीनंतर उत्पन्न मिळविण्याची हमी असल्याने लोकांची खर्च प्रवृत्त जास्त राहते. त्यामुळेच पैशाचा भ्रमणवेग देखील जास्त राहतो.

याउलट उत्पन्न मिळविण्याचा कालावधी अनियमित अनिश्चित असेल भविष्य काळासाठी पैसा रोख स्वरुपात जवळ ठेवण्यासाठी वृत्ती वाढत जाते. म्हणजे खर्चाचे प्रमाण कमी राहत असल्याने पैशाचा भ्रमणवेग देखील कमी राहतो.

**२) पैसे देण्याच्या पध्दती :**

पैसे देण्याच्या पध्दती देखील पैशाचा भ्रमणवेग अवलंबून असतो. दर दिवशी / दर हप्त्याला पैसे दिल्यास पैसा खर्च करण्याचि प्रवृत्ती जास्त असते. त्यामुळेच पैशाचा भ्रमण वेग जास्त राहतो.

याउलट एक रक्कमी पैशाचे व्यवहार तर होत असतील तर पैसा खर्च करण्याचे प्रमाण कमी राहत असल्याने पैशाचा भ्रमणवेग देखील कमी राहतो.

**३) राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप :**

राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाटपावर देखील पैशाचा भ्रमणवेग अवलंबून असतो. अर्थव्यवस्थेमध्ये श्रीमंत लोकांच्या सर्वच्या सर्वच्या सर्व गरजा पूर्ण झालेल्या असल्याने त्यांची बचत करण्याची प्रवृत्ती कमी असल्याने पैशाचा भ्रमणवेग देखील जास्त राहतो.

**४) उद्योगधंदयामधील तेजी – मंदीची परिस्थिती :**

देशातील उदयोगधंदयाच्या परिस्थितीचा देखील पेशाच्या भ्रमणवेगावर परिणाम झालेला दिसून येतो. अर्थव्यवस्थेमध्ये तेजीची परिस्थिती असताना / उदयोगांची भरभराट असताना पैशाचे व्यवहार त्वरीत आणि जलद गतीने होत असल्याने पैशाचा भ्रमणवेग जास्त राहोत.

याउलट मंदीची परिस्थिती असेल तर उधारीचे व्यवहार वाढत असल्याने पैशाच्या भ्रमणाचा वेग कमी लागतो.

**५) बँकांची परिस्थिती :**

विकसित देशामध्ये वित्तीय व्यवस्था जर मजबूत असेल तर बँकामार्फत केले जाणारे पैशाचे व्यवहार वाढत जात असल्याने पैशाचा भ्रमणवेग जास्त राहतो.

**६) पैशाच्या व्यवहाराची साधने :**

जर अर्थव्यवस्थेमध्ये पैशाच्या दळणवळणाची साधने आधूनिक स्वरुपाची असतील तर पैसा कमीत-कमी वेळेत, कमीत-कमी खर्चात एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सहजपणे हस्तांतरीत होत असल्याने पैशाचा भ्रमणवेग जास्त राहतो.

**७) रोखता हेतु :**

पैसा रोख स्वरुपात जवळ बाळगण्याची लोकांची प्रवृत्ती जास्त असेल तर अशा लोकामार्फत खर्च देखील मोठ्या प्रमाणात केला जातो. त्यामुळेच अशा लोकांच्या बाबतीत पैशाचा भ्रमणवेग जास्त राहतो.

## ७.८ पैशाची मागणी

प्रत्येक शास्त्रामध्ये जसे काही महत्त्वाचे शोध लागलेले आहेत तसाच पैशाचा शोध हा अर्थशास्त्रातील एक महत्वाचा शोध मानला जातो. पैशाद्वारे सर्वच देवाण घेवाणी चे व्यवहार होत असल्याने सर्वाकडून पैशासाठी मागणी केली जाते. वस्तूप्रमाणेच पैशालासुध्द मागणी असते.

परंतू फरक एवढाच की वस्तू स्वतः उपयोगी असते तर पैसा मात्र उपयोगी वस्तूंच्या खरेदीसाठी पैशाला मागणी केली जाते. पैशाच्या या वैशिष्टयामुळेच असे म्हटले जाते की ‘We can not eat money but we can not eat without money’ म्हणजेच आपण पैसा खाऊ शकत नाही परंतू पैसा नसेल तर इतर काहीच खाऊ शकत नाही. यावरुन पैशाचे महत्व दिसून येते. म्हणूनच पैशाच्या मागणीविषयीचे वेगवेगळे दृष्टीकोन पुढीलप्रमाणे सांगता येतात.

**पैशाच्या मागणीचे दृष्टीकोन**

- **सनातनी दृष्टीकोन**
- **आधुनिक (केन्सचा) दृष्टीकोन**
- **मिल्टन फ्रिडमन दृष्टीकोन**

### A) पैशाच्या मागणीचा सनातनी दृष्टीकोन :

सनातनी अर्थतज्ञांच्या मते पैसा हा केवळ एक विनिमयाचे माध्यम आहे. म्हणजेच पैसा ही स्वतः उपभोग्य वस्तू नसून पैसा उपभोग्य वस्तूंच्या खरेदीचे साधन आहे. म्हणूनच सनातनवादी अर्थतज्ञांच्या मते पैशाला वस्तू – सेवांप्रमाणे प्रत्यक्ष मागणी नसून ती अप्रत्यक्ष स्वरुपाची असते. सनातनवादयांच्या मते अर्थव्यवस्थेतील पैशाची मागणी ही त्या देशातील विशिष्ट कालखंडातील वस्तू-सेवांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारांवरुन समजू शकते. परंतू सनातन वादी अर्थतज्ञांनी पैशाच्या मागणीचा विचार व्यक्तीगत न करता संपूर्ण समाजाच्या मागणीचा विचार केल्याने हे विश्लेषण एकतर्फी व अपूर्ण स्वरुपाचे आहे.

### B) पैशाच्या मागणीचा आधूनिक दृष्टीकोन :

आधुनिक अर्थशास्त्राचे जनक प्रा. जे. एम. केन्स यांनी १९३६ मध्ये लिहिलेल्या आपल्या ‘The General Theory of Employment, Interest and Money’ या ग्रंथात पैशाच्या मागणीविषयीचे आपले विचार मांडले. त्यांच्या मते पैशामध्ये सर्वाधिक रोखता असल्याने लोक पैशाला मागणी करतात. म्हणजेच लोकांना पैसा रोख स्वरुपात जवळ बाळगणे अधिक पसंत असते कारण या रोखतेच्या आधारे ते कोणत्याही वस्तू-सेवांची केव्हाही खरेदी करु शकतात. या रोकड पसंती मूळेच लोकांमार्फत पैशाला मागणी केली जाते.

प्रा. लॉर्ड केन्स यांच्या मते लोक आपल्याजवळ पैसा रोख स्वरुपात जवळ बाळगतात ते पूढील तीन हेतूंमूळे.

१) व्यवहार हेतू.
२) भविष्यकालीन तरतूदीचा हेतू.
३) सट्टेबाजीचा हेतू.

### C) मिल्टन फ्रिडमनचा पैशाच्या मागणीचा दृष्टीकोन :


लॉर्ड केन्स नंतर आलेल्या प्रा. मिल्टन फ्रिडमन, प्रा. बाऊमोल यासारख्या अर्थतंज्ञांना केन्सचे पैशाच्या मागणीचे वरील ३ हेतू अवास्तव वाटत होते. कारण वरील तीनही हेतूने पैशाला केली जाणारी मागणी ही उत्पन्नपातळी आणि व्याजदराने प्रेरीत झालेली आहे. परंतू आधूनिक

अर्थतज्ञांच्या मते अर्थव्यवस्थेतील पैशाची मागणी ही अर्थव्यवस्थेतील पैशाच्या साठ्यावर अवलंबून असते.

प्रा. मिल्टन फ्रिडमन यांच्या मते पैशाच्या मागणीवर किंमत पातळी हा घटक परिणाम करतो. म्हणजेच किंमत पातळी व पैशाची मागणी यामध्ये प्रत्यक्ष व प्रमाणशीर संबंध असल्याने या दोघांमध्ये समान दिशेने बदल होतात. म्हणजेच किंमत पातळी वाढल्यास पैशाची मागणी वाढते व किमंत पातळी घटल्यास पैशाच्या मागणीत घट होते.

## ७.९ पैशाच्या मागणीचा लॉर्ड केन्सचा सिध्दांत (रोखता पसंती सिध्दांत )

'The General Theory of Employment, Interest and Money' या ग्रंथात १९३६ मध्ये लॉर्ड केन्स यांनी पैशाच्या मागणीचा 'रोखता पसंती सिध्दांत' मांडला लोकांची रोख रक्कम जवळ बाळगण्याची मानसिक प्रवृत्ती म्हणजेच रोखता पसंती होय. ही रोखता पसंती पुढील ३ हेतूंने प्रेरीत असते.




**A) व्यवहार हेतू :**

पैसा हे विनिमयाचे माध्यम म्हणून कार्य करीत असतो. त्यामुळे व्यवहार हेतूने पैशासाठी मागणी केली जाते. लोकांचा खर्च दररोज होत असतो. मात्र लोकांचे उत्पन्न दररोज न मिळता ठराविक कालावधीनंतर प्राप्त होत असते. म्हणून दैनंदिन व्यवहार पूर्ण करण्यासाठी व्यक्ती स्वतः जवळ काही रोख पैसा जवळ बाळगत असतो. दैनंदिन व्यवहार पूर्ण करण्यासाठी लोकांमार्फत पैशाला मागणी केली जाते.

व्यवहार हेतूने पैशाची मागणी पुढील २ प्रकारे वर्गीकृत करता येते.

१) उत्पन्न हेतु.

२) व्यवसाय हेतु.

**१) उत्पन्न हेतु :**

उपभोक्त्याना वस्तु आणि सेवाच्या खरेदिसाठी तसेच दैनंदिन खर्च भागविण्यासाठी रोख पैशाला मागणी करावी लागते. उपभोक्त्याकडून पैशाला होणारी मदत त्याच्या उत्पन्नावर अंवलबून असते. व्यक्तीचे उत्पन्न जसे-जसे वाढत जाते. तस-तशी व्यक्तीची पैशाची मागणी वाढत जाते.

**२) व्यवसाय हेतू :**

व्यवसाय हेतूचा संबध व्यापारी / उदयोजकाशी येतो. उपभोकत्याप्रमाणेच व्यापाऱ्यांना देखील स्वतः जवळ दैनंदिन व्यवहार पूर्ण करण्यासाठी पैशाला मागणी करावी लागते. ज्या व्यापाऱ्यांची दैनंदिन उलाढाल जास्त असेल त्याची पैशासाठी मागणी जास्त राहते.

याउलट उलाढालीचे प्रमाण कमी असेल. अशा व्यापाऱ्याची पैशाची मागणी कमी राहते.

**B) दक्षता हेतू :-**

भविष्यकाळात उदभवणाऱ्या संकटाना सामोरे जाण्यासाठी लोक स्वतःजवळ पैसा रोख स्वरुपात जवळ ठेवणे पसंत करतात. आपल्याला भविष्य पूर्णता अज्ञात असेत म्हणजेच भविष्यकाळाबद्दल निश्चित अंदाज व्यक्त करता येत नाही. कारण, प्रत्येकाचा भविष्यकाळ अनिश्चित आणि अंधकारमय असतो. पैशाच्या आधारे मूल्यसंचय करता येत असल्याने भविष्यातील आपत्ती / संकट निवारण्यासाठी लोक पैशाला मागणी करतात.

व्यक्तीच्या दृष्टीने भविष्यकाळामध्ये आजारपण, अपघात, दुदैवी घटना, बेरोजगारी, वृध्दत्व, मृत्यू, धार्मिक कार्य अशा प्रकारच्या घटना निर्माण होवू शकतात. अशा परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी लोक स्वता : जवळ पैसा रोख स्वरुपात बाळगतात. म्हणजेच ते पैशाला मागणी करतात. जर अशा संकटाची शक्यता जास्त असेल तर दक्षता हेतूने पैशाची मागणी जास्त केली जाते.


याउलट संकटाची शक्यता कमी असेल तर दक्षता हेतूने पैशाची मागणी कमी राहते.

**C) सट्टेबाजी / परिकल्पन हेतू :**

लॉर्ड केन्स यांच्या मते वरील २ हेतू बरोबर पैशाची मागणी करण्याचा तिसरा हेतु म्हणजेच सट्टेबाजीचा हेतू होय. काही लोक सट्टेबाजी करुन नफा मिळविण्यासाठी पैशाची मागणी करतात. मध्यस्थ, सावकार, कर्ज व्यवहार करणारे दलाल हे व्याजदरानुसार पैशाची मागणी कमी – जास्त प्रमाणात करीत आहेत. बदलत्या व्याजदराचा फायदा घेण्यासाठी असे सावकार पैशाला मागणी करीत असतात.

भांडवल बाजारातील शेअर्स व कर्जरोख्यांच्या किंमतीत सतत बदल होत असतात. या बदलांचा फायदा घेण्याच्या उद्देशाने काही मध्यस्थ स्वतःजवळ रोख पैसा बाळगतात अर्थात अशा या सैंबोंजीच्या हेतूने पैशासाठी केली जाणारी मागणी ही व्याजदरावर अवलंबून असते व ती व्याजदराच्या व्यस्तप्रमाणात बदलते.

म्हणजेच व्याजदरात वाढ झाल्यास सट्टेबाजीच्या हेतूने पैशाला केली जाणारी मागणी घटते व व्याजदरात घट झाल्यास सट्टेबाजीच्या हेतूने पैशासाठी केली जाणारी मागणी वाढते. याचाच अर्थ सट्टेबाजीच्या हेतूने पैशाला केली जाणारी मागणी व्याजदराच्या व्यस्त प्रमाणात बदलते म्हणजेच व्याजदर व सट्टेबाजीच्या हेतूने पैशाला केली जाणारी मागणी यामध्ये ऋणात्मक स्वरुपाचा संबंध असतो. हेच पुढील आकृतीद्वारे स्पष्ट करता येईल.




आकृती ७.१

वरील आकृतीत OX अक्षावर सट्टेबाजीच्या हेतूने पैशासाठी केली जाणारी मागणी तर OY अक्षावर व्याजाचा दर दर्शविलेला आहे. LD हा रोखतेचा मागणी वक्र असून तो ऋणात्मक उताराचा दर्शविला आहे कारण सट्टेबाजीच्या हेतूने पैशासाठी केली जाणारी मागणी ही व्याजदराच्या व्यस्त प्रमाणात बदलते.

सुरवातीस व्याजदर $OR_1$ असा जास्त असतांना पैशापासून मिळणारे उत्पन्न अधिक मिळत असल्याने पैसा जवळ बाळगण्याचे प्रमाण म्हणजेच पैशाचे मागणी $OM_1$ अशी कमी राहते. परंतू व्याजदर $OR_2$ असा घटल्यास पैशाची मागणी वाढून $OM_2$ अशी राहते.

व्याजाचा दर $OR_3$ या विशिष्ट पातळीपर्यंत कमी झाल्यास हा वक्र पुढे न सरकता तो OX अक्षाला समांतर बनतो कारण एका विशिष्ट पातळीला व्याजदर कमी झाला तर पैसा कर्जाऊ देऊन कोणताच फायदा होत नसल्याने सट्टेबाजी पैसा स्वतःजवळ रोख स्वरुपात बाळगणे पसंत करतात यालाच लॉर्ड केन्स यांनी ‘रोखतेचा सापळा’ (Liquidity Trap) असे म्हटले आहे.

## ७.१० पैशाच्या मागणीबाबत फ्रिडमन यांचा दृष्टीकोन (FRIEDMAN'S APPROACH)

शिकागो पंथीय अर्थशास्त्रज्ञ मिल्टन फ्रिडमन यांनी पैशाच्या मागणीविषयी जो सिद्धांत मांडला आहे. तो पैशाची मागणी ठरवताना पैशाच्या भुमिकडे विशेष लक्ष देतो. पैशाची एकूण मागणी ठरवताना पैशाची भूमिका महत्त्वाची असते व त्यामुळे एकूण राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होत असते.

फ्रिडमनच्या मतानुसार पैशाच्या मागणीची उत्पन्न लवचिता ही एकापेक्षा जास्त असते. म्हणजेच उत्पन्न पातळीत ज्या दराने वाढ किंवा घट होते त्याचा परिणाम म्हणून पैशाची मागणी त्यापेक्षा जास्त दराने वाढते किंवा घटते. पैसा हा एक संपत्तीचा प्रकार असून त्याचे इतर कोणत्याही प्रकारच्या संपत्तीत रुपांतर करता येते. म्हणून देशाची मागणी ही भांडवली वस्तुंच्या मागणीचाच एक प्रकार आहे.

**पैशाच्या मागणीवर परिणाम करणारे घटक :** फ्रिडमन यांच्या मते पैशाच्या मागणीवर पुढील घटक परिणाम करतात.

**१) किंमत पातळी:**

फ्रिडमन यांच्या मते किमंत पातळी व पैशाची मागणी यात प्रत्यक्ष व प्रमाणशीर संबंध असल्यामुळे या दोहोत समान दिशेने बदल होतात. म्हणजेच किंमतीची पातळी वाढल्यास पैशाची मागणी वाढते व किंमत पातळीत घट झाल्यास पैशाच्या मागणीत देखील घटक होते.

**२) अर्थव्यवस्थेतील वास्तव उत्पादन व उत्पन्न पातळी:**

फ्रिडमन यांच्या मतानुसार वास्तव उत्पन्न पातळी व पैशाची मागणी यात एकाच दिशेने बदल होतात. म्हणजेच उत्पादनात वाढ झाल्यास पैशाच्या मागणीतही वाढ होते. व उत्पादन घट झाल्यास पैशाच्या मागणीत ही घट होते वास्तव उत्पन्न वाढले की पैशाची मागणी वाढते. कारण वास्तव उत्पन्न वाढीबरोबर लोकांचे राहणीमान वाढते व राहणीमान वाढीचा परिणांम पैशाची मागणी अधिक वाढते.

**३) व्याज दर:**

मिल्टन फ्रिडमन यांच्या मते व्याजदर व पैशाची मागणी यामध्ये व्यस्त स्वरुपाचा संबंध असतो. म्हणजे व्याजदरात वाढ झाल्यास पैशाची मागणी घटते व व्याजदरात घट झाल्यास पैशाची मागणी वाढते.

**४) सामान्य किंमत पातळीच्या दरातील बदल:**

फ्रिडमन यांच्या मते सामान्य किंमतीच्या पातळीतील बदल आणि पैशाचे मूल्य यांच्यातील संबंध व्यस्त स्वरुपाचा असतो कारण भाव वाढीच्या काळात पैशाचे मूल्य घटत असते. फ्रिडमनच्या मते वरील सुरुवातीच्या दोन घटकात आणि पैशाच्या मागणीत सम दिशेने बदल होतात. तर नंतर दोन घटकात आणि पैशाच्या मागणीत व्यस्त दिशेने बदल होतात.

सांराश फ्रिडमनच्या मते संपत्ती विविध स्वरुपात धारण करता येते. उदा. पैसा, रोखे, शेअर्स, भौतिक वस्तू आणि मानवी भांडवल इत्यादि. व्यक्ती वरील प्रकारात आपल्या संपत्तीचे विभाजन करुन जास्तीत जास्त समाधान मिळविण्याचा प्रयत्न करते.

फ्रिडमन यांचे पैशाच्या मागणीचे फलन पुढीलप्रमाणे:-

$$MD = F\left(P, rb, re, \frac{1}{P}, \frac{dp}{dt}, W, y, u\right)$$

येथे

md = पैशाची मागणी

P = सामान्य किंमत पातळी

rb = रोख्यापासून मिळणारे उत्पन्न

re = शेअर्स वरील बाजार व्याज दर.

$\left(\frac{1}{P}, \frac{dp}{dt}\right)$ भौतिक संपत्तीवरील मानवी भांडवलाशी गुणोत्तर

Y = एकूण संपत्ती

U = संपत्ती धारण करणाऱ्याच्या आवडीनिवडीवर परिणाम करणारे, उपयोगिता निर्धारीत करणारे चल.

F = फलन

फ्रिडमन यांच्या मते पैशाची मागणी ही वास्तव शिलकीसाठी असते. त्यांची ही पैशाची मागणी फलनाची संकल्पना अनुभवजन्य पुराव्यावर आधारलेली आहे. पैशाची मागणी ही कायम उत्पान्नावर आधारलेली असून व्यक्तीचे उत्पन्न जसजसे वाढत जाते. तसतशी पैशांची मागणी वाढत जाते. असे फ्रिडमल यांचे मत आहे.

## ७.११ सारांश (CONCLUSION)

अर्थव्यवस्थेतील सर्व गरजांची पूर्तता ही पैशामुळेच होत असल्याने पैशाची मागणी केली जाते. परंपरागत अर्थशास्त्रज्ञाच्या मते पैसा हे एक व्यवहार पुर्ततेचे साधन असल्याने विनिमयाच्या हेतूने त्याला मागणी केली जाते. नवसनातवादी अर्थशास्त्रज्ञांच्या मते पैशाच्या मूल्य संग्रह या गुणधर्मामुळे पैशाला मागणी असते. केन्स सारख्या अर्थशास्त्रज्ञाने पैशाच्या मागणीचे प्रामुख्याने तीन महत्त्वाचे हेतू विचारात घेतले. तर फ्रिडमन सारख्या अर्थशास्त्रज्ञाने पैशाच्या मार्गाचा विचार करताना पैशाच्या भूमिकेला महत्त्व दिले आहे.

## ७.१२ प्रश्न

१. पैशाच्या मागणी बाबत सनातनवादी दृष्टीकोन स्पष्ट करा.

२. पैशाच्या मागणीबाबत असलेल्या नवसनातनवादी दृष्टीकोनाची चर्चा करा.

३. टीपा लिहा.

अ) पैसा.

ब) पैशाचा भ्रमण वेग

क) पैशाचा पुरवठा

ड) $M_1$ आणि $M_4$

४. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.

अ) पैशाच्या पुरवठ्यात समाविष्ठ असलेले घटक कोणते ?

ब) पैशाचा पुरवठा निर्धारीत करणारे घटक स्पष्ट करा.

क) पैशाच्या भ्रमणवेगावर परिणाम करणारे घटक.

ड) 'रोखता पसंती सिध्दांत' सविस्त स्पष्ट करा.

❖❖❖❖

# ८

# पैशाची मागणी

**घटक रचना :**

८.० उद्दिष्ट्ये

८.१ प्रस्तावना

८.२ पैशाच्या मागणी बाबत परंपरागत / सनातनवादी दृष्टिकोन

  ८.२.१ चलन संख्यामान सिद्धांत

८.३ पैशाच्या मागणीचा नवसनातनवादी दृष्टिकोन

  ८.३.१ केंब्रीज समीकरणे किंवा रोख शिल्लक दृष्टिकोन (Cambridge equations or Cash Balance Approach) नवसनातनवादी दृष्टिकोन (New Classical Approach)

८.४ प्रस्तावना

८.५ चलनवाढ

८.६ भाववाढीचे / चलनवाढीचे प्रकार

  ८.६.१ वस्तूच्या किंमत वाढीच्या दरावरुन पुढील चार प्रकार पडतात

  ८.६.२ शासकीय हस्तक्षेपावरुन भाववाढीचे प्रकार

  ८.६.३ काळानुसार भाववाढ

  ८.६.४ मागणी प्रेरित

  ८.६.५ खर्च प्रेरित चलनवाढ / भाववाढ

८.७ चलनवाढीची कारणे

८.८ चलनवाढीचे परिणाम

८.९ चलनवाढ नियंत्रण

  ८.९.१ चलनविषयक / मौद्रिक उपाय

  ८.९.२ राजकोषीय / राज्यवित्तीय उपाय

  ८.९.३ इतर उपाय

८.१० सारांश

८.११ प्रश्न

## ८.१ उद्दिष्ट्ये (OBJECTIVES)

- पैशाच्या मागणी बाबतच्या विविध अर्थशास्त्रांच्या दृष्टीकोनांचा अभ्यास करणे.
- सनातनवादी दृष्टीकोनात फिशर यांच्या चलन संख्यामान सिद्धांताची सविस्तर चर्चा करणे.
- नवसनातनवादी दृष्टीकोनात केंद्रित समीकरणे पडताळून पहाणे
- चलनवाढ ह्या संकल्पनेचा अभ्यास करणे
- चलनवाढीच्या विविध प्रकारांची चर्चा करणे.
- चलनवाढीची कारणे तपासणे
- चलनवाढीचा परिणाम जाणून घेणे
- चलनवाढ रोखण्यासाठी मौद्रीक व राजकोषिय उपाध्ंची अंमलबजावणे करणे.

## ८.२ प्रस्तावना (INTRODUCTION)

पैशाच्या मागणीचे विवेचन अनेक अर्थशास्त्र ज्ञानी केलेले आहे. यामध्ये प्रामुख्याने -

१) पैशाच्या मागणीबाबत सनातनवादी दृष्टीकोन
२) पैशाच्या मागणीबाबत नवसनातनवादी दृष्टीकोण
३) पैशाच्या मागणीबाबत केन्सचा दृष्टीकोन
४) पैशाच्या मागणीबाबत फ्रिडमन यांचा दृष्टीकोन

इत्यादी दृष्टीकोनांचा समावेश होतो.

प्रस्तुत प्रकरणात आपण वरील दृष्टीकोनाचा अभ्यास करणार आहोत.

पैसा हा अर्थशास्त्रातील सर्वात मोठा शोध होय. लहानांपासून वृद्धांपर्यंत सर्वांना पैसा हवा हवासा असतो. कारण मानवाचे बहुतेक व्यवहार हे पैशाच्या सहाय्याने पूर्ण केले जातात. म्हणून समाजातील सर्व नागरिकांकडून पैशासाठी मागणी असते तर पैशाचा पुरवठा किंवा निर्मिती करण्याचे अधिकार मात्र मध्यवर्ती शासन व मध्यवर्ती बँकेलाॅंद असतात. विशेषतः मध्यवर्ती बँक शासनाच्या सल्ल्यानुसार व मौद्रीक धोरणाची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी पैशाच्या पुरवठ्यात वाढ किंवा घट करत असते.

वस्तूच्या मागणी प्रमाणाचे पैशाला देखील मागणी असते. फरक एवढाच की वस्तू स्वतः उपयोगी असते तर पैशाची उपयोगी वस्तूची खरेदी करण्यासाठी मागणी केली जाते. पैसा ही स्वतःउपयोगी वस्तू नसून उपयोगी वस्तूंच्या खरेदी साठी पैशाची मागणी केली जाते. म्हणून असे म्हटले जाते की पैसा आपण खाऊ शकत नाही. परंतु पैशाशिवाय वस्तू व सेवांची खरेदी करु शकत नाही. यास्तव पैशाच्या मागणी बाबतचे विविध दृष्टीकोन पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतील

## ८.२ पैशाच्या मागणी बाबत परंपरागत / सनातनवादी दृष्टीकोन (CLASSICAL APPROACH)

परंपरागत अर्थशास्त्रज्ञांनी पैशाला महत्त्व दिलेले नव्हते. त्यांच्या मते पैशाला प्रत्यक्ष मागणी नसून पैसाही स्वतः उपभोगाची वस्तु नाही. परंतु उपयोगी वस्तु प्राप्त करुन देण्याची शक्ती पैशामध्ये आहे. पैशाला फक्त विनिमयाचे साधन म्हणून मागणी असते. पैशाच्या साहाय्याने इतर वस्तु व सेवा खरेदी करण्यासाठी पैशाला मागणी असते. पैसा पूर्णतः तटस्थ असतो. त्याला स्वतः साठी मागणी नसते. इतर वस्तु व सेवांची खरेदी करण्यासाठी पैशाला मागणी असल्यामुळे एखाद्या देशात एका वर्षात पैशाची मागणी किती आहे ते त्या देशात पैशाच्या साहाय्याने केल्या जाणाऱ्या व्यवहारावरुन ठरते. पैशामध्ये जेवढे जास्त व्यवहार केले जातील तेवढी पैशाला मागणी जास्त असते असे पारंपारीक अर्थशास्त्रज्ञांचे मत होय.

परंपरागत अर्थशास्त्रज्ञांच्या मतानुसार पैशाच्या मागणीचे परिणाम व्यक्तीनिष्ठ घटकांवर अवलंबून नसुन ते वस्तुनिष्ठ घटकांवर अवलंबून आहेत. परंपरागत अर्थशास्त्रानी पैशाच्या मागणीचा विचार व्यक्तीगत न करता संपूर्ण समाजाच्या मागणीचा विचार केल्यामुळे हे विश्लेषण एकतर्फी आणि अपूर्ण स्वरुपाचे आहे.

### १) सनातनवादी दृष्टीकोन (Classical approaches):

**पैशाचे मूल्य :**

पैशाचे मूल्य ही संकल्पना पैशाच्या खरेदी शक्तीशी संबंधित असते. म्हणजेच पैशाच्या एका परिमाणात जेवढ्यावस्तु व सेवांचे नग खरेदी करता येतात ती नग संख्या म्हणजे पैशाचे मूल्य होय. पैशाची खरेदी शक्ती ही किंमत पातळीवर अवलंबून असते. किंमत पातळी जास्त असल्यास पैशाची खरेदी शक्ती कमी असते व किंमत पातळी कमी झाल्यास पैशाची खरेदी शक्ती जास्त असते. म्हणजेच पैशाचे मूल्य हे किंमत पातळीच्या व्यस्त प्रमाणात बदलते. हे आपण सुत्र रुपाने पुढील प्रमाणे पाहू.

सूत्र

$$VM = \frac{1}{P} \text{ (Value of Money)}$$

येथे $V_M$ = पैशाचे मूल्य (Value of Money)

P = किंमत पातळी (Price Level)

### ८.२.१ चलन संख्यामान सिद्धांत (The Quantity Theory of Money):

यालाच विनिमय दृष्टीकोन किंवा व्यवहार दृष्टीकोन (Transaction approach) असे म्हणतात.

पैशाचे मूल्य कसे ठरते याचे स्पष्टीकरण करण्यासाठी विविध सिद्धांत मांडले गेले. त्यामध्ये फिशर यांचा विनिमय दृष्टीकोन महत्त्वाच मानला गेला. आयार्व्हिंग फिशर यांनी १९११ मध्ये The Purchasing Power of Money हा ग्रंथ प्रसिद्ध करुन त्यामध्ये चलन संख्यामान सिद्धांत स्पष्ट करण्यासाठी विनिमय समिकरण मांडले. पैशाच्या विनिमय माध्यम या कार्यावर

विशेष भर देऊन चलन संख्या आणि वस्तुंची संख्या यामधील संबंध स्पष्ट केले. त्यांच्या मते पैशाचे मूल्य म्हणजे पैशाची खरेदी शक्ती होय. पैशाच्या साहाय्याने जेवढ्या वस्तु व सेवा खरेदी करता येतात. त्यालाच पैशाची खरेदी शक्ती म्हणतात. पैशाचे मूल्य वस्तुंच्या किंमत पातळीवर अवलंबून असते. त्यांच्या मते पैशाचा साठा वाढेल तशी किंमत पातळी वाढेल आणि पैशाचे मूल्य कमी होईल म्हणजेच पैशाचा साठा व किंमत पातळी एकाच दिशेने बदलतात तर पैशाचे मूल्य आणि किंमत पातळी व्यस्त प्रमाणात बदलतात. इतर परिस्थिती कायम असताना पैशाची संख्या दुप्पट केली असता वस्तुच्या किंमती दुप्पट होतात व पैशाचे मूल्य निमपट होते.

**सिद्धांताची परिभाषा:**

**१) जे.एस. मिल :** ''इतर परिस्थिती कायम असतांना पैशाचे मूल्य हे पैशाच्या परीमाणाच्या विरुद्ध दिशेने बदलते. त्यामुळे पैशाच्या परिमाणातील प्रत्येक वाढीबरोबर पैशाचे मूल्य तेवढेच घटते व पैशाच्या परिमाणातील प्रत्येक घटीमुळे पैशाचे मूल्य त्याच प्रमाणात वाढते.''

**२) प्रा. फिशर :** ''इतर परिस्थिती कायम असताना पैशाच्या परिमाणात होणाऱ्या प्रत्येक बदलामुळे मूल्य पातळीत प्रत्यक्षपणे बदल होतात.''

**सिद्धांताचे स्पष्टीकरण:**

प्रा. फिशर यांच्या मते पैशाचे मूल्य हे पैशाच्या मागणी व पुरवठ्यावर अवलंबून असते. परंतु पैशाची मागणी अल्पकाळात स्थिर असते. म्हणून पैशाच्या पुरवठ्याचाच पैशाच्या मूल्यावर परिणाम होतो म्हणून पैशाची मागणी व पुरवठा यांचे थोडक्यात स्पष्टीकरण पुढील प्रमाणे.

**अ) पैशाची मागणी (Demand for Money) :**

फिशरच्या सिद्धांतांत पैशाची मागणी इ्ऊ ने दर्शविली जाते. फिशरच्या मते पैशाला मागणी ही फक्त विनिमय व्यवहारासाठी असते. इतर वस्तु व सेवांची खरेदी करण्यासाठी आपण पैशाला मागणी करतो. म्हणजे पैशाला प्रत्यक्ष मागणी नसते. यास्तव एखाद्या देशात पैशाला असणारी मागणी किती हे त्या देशातील सर्व वस्तु सेवा यांच्या परिमाणाला त्यांच्या किंमतीने गुणले म्हणजे समजते. सूत्र रुपाने हे आपणास पुढील प्रमाणे दाखविता येईल.

पैशाची मागणी = PT

P.T. येथे

P = किंमत पातळी

T = वस्तु व सेवा यांचे परिमाण

P आणि T चा गुणाकार केल्यास आपणास पैशाची मागणी किती हे कळून येते.

**ब) पैशाचा पुरवठा (Supply of Money) :**

फिशरच्या सिद्धांतात पैशाचा पुरवठा MV ने दर्शविला जातो. भारतात पैशाचा पुरवठा करण्याचे कार्य केंद्र सरकार व मध्यवर्ती बँक करते. हा पैशाच्या पुरवठा किती करावयाचा या बाबत निर्णय केंद्र सरकारच्या मौद्रिक धोरणावर अवलंबून असतो. या धोरणानुसार केल्या जाणाऱ्या पुरवठ्याला M द्वारे दर्शविण्यात येते. येथे सरकार व मध्यवर्ती बँकेने निर्माण केलेल्या कायदेशीर पैशाच्या पुरवठ्याचा भ्रमणवेग लक्षात घेणे आवश्यक असते. पैशाला भ्रमणवेग म्हणजे

पैशाचे एक परिमाण एका दिवसात किती वेळा हस्तांतरीत होते. उदा. एक रुपया एका दिवसात दहा वेळा हस्तांतरीत झाला तर त्या रुपयाचा भ्रमण १० होय. हा भ्रमणवेग व कायदेशीर पैसा यांच्या गुणाकारास पैशाचा एकूण पुरवठा असे संबोधले आहे. सुत्ररुपाने

पैशाचा पुरवठा = MV असे मांडले जाते.
M = पैशाचे एकूण परिमाण (Quantity of Money)
V = पैशाचा भ्रमण वेग (Velocity of Money)

वरीलप्रमाणे पैशाच्या मागणी पुरवठ्याचा विचार करुन फिशरने पुढील प्रमाणे समिकरण मांडले आहे.

सूत्र MV = PT = पैशाचा पुरवठा = पैशाची मागणी, हे समीकरण पुढीलप्रमाणे मांडता येईल.

$$P = \frac{MV}{T}$$

वरील समिकरणात फिशरने पत पैशाचा विचार केलेला नव्हता फक्त कायदेशीर पैशाचाच विचार केलेला होता. अलीकडील काळात पतपैशाला अत्यंत महत्त्व प्राप्त झालेले आहे. म्हणून फिशरने आपल्या समीकरणात सुधारणा करुन नवीन समीकरण पुढील प्रमाणे मांडले.

$$P = \frac{MV + M^1V^1}{T}$$

जेथे,
M1 = पत पैसा
V 1= पत पैशाचा भ्रमणवेग
M = पैशाचा पुरवठा
V = पैशाचा भ्रमणवेग
T = वस्तु व सेवा यांचे परिमाण
P = किंमत पातळी

वरिल समिकरणात P ची किंमत M, V, $M^1$, $V^1$, T या घटकांवर अवलंबून असते मात्र फिशरने V, $M^1$, $V^1$, T हे सर्व घटक अल्पकाळात स्थिर मानले असुन फक्त M या घटकांमुळेच किंमत किंमत पातळी बदलते असे म्हटले आहे. त्यांच्या मते पैशाचा पुरवठ्यात दुप्पट झाल्यास किंमत पातळी दुप्पट होते व पैशाचे मूल्य निमपट होते व पैशाचा पुरवठा निमपट झाल्यास किंमत पातळी निमपट होते व पैशाचे मूल्य दुप्पट होते. फिशरच्या समीकरणात किंमत घालून पैशाच्या मुल्यात होणारे बदल आपणास स्पष्ट करता येतील.

उदाहरणार्थ :-
समजा
M = २० को. रु.
V = ४
$M^1$ = ४० को. रु.
$V^1$ = १०
T = ६० को.रु.

तर किंमत पातळी व पैशाचे मूल्य काय राहिल ?

$$P = \frac{MV + M^1V^1}{T}$$

$$P = \frac{20 \times 4 + 40 \times 10}{60}$$

$$P = \frac{80 + 400}{60}$$

$$P = \frac{480}{60}$$

P = 8 ही किंमत पातळी होय

यावरुन आपणास पैशाचे मूल्य काढता येईल

$$\text{पैशाचे मूल्य} = \frac{1}{\text{किंमत पातळी}} = \frac{T}{MV + M'V'}$$

$$\text{पैशाचे मूल्य} = \frac{60}{20 \times 4 + 40 \times 10}$$

$$= \frac{60}{80 + 400}$$

$$= \frac{60}{480}$$

$$= \frac{1}{8}$$ हे पैशाचे मूल्य होय.

II) समजा आपण M आणि M1 चे परिणाम दुप्पट केल्यास आणि V, $V^1$ व T स्थिर मानल्यास किंमत पातळी P दुप्पट होऊन पैशाचे मूल्य निमपट होईल.

समजा M = ४० को रु.

M' = ८० को. रु.

V = ४

V' = १०

T = ६० को.रु.

तर

$$P = \frac{MV + M^1V^1}{T}$$

$$P = \frac{40 \times 4 + 80 \times 10}{60}$$

$$P = \frac{160 + 800}{60}$$

$$P = \frac{960}{60}$$

P = 16 रुपये ही किंमत पातळी होय. यावरून पैशाचे मुल्य काढता येईल.

$$\text{पैशाचे मूल्य} = \frac{1}{\text{किंमत पातळी}}$$

$$= \frac{T}{MV + M'V'}$$

$$= \frac{60}{40 \times 4 + 80 \times 10}$$


$$= \frac{60}{160 + 800}$$

$$= \frac{60}{960}$$

$$= \frac{1}{16}$$ हे पैशाचे मूल्य होय.

अशा रीतीने पैशाचे परिमाण दुप्पट झाल्यास किंमत पातळी दुप्पट होते व पैशाचे मूल्य निम्मे होते वरील उदाहरणांच्या साह्याने स्पष्ट केले आहे.

पैशाचे परिमाण २० कोटी रुपये वरुन ४० कोटी रुपये झाल्यामुळे P ची किंमत ८ रुपयावरुन १६ रुपये व पैशाचे मूल्य १/८ वरुन १/१६ झाले.




**पैशाचा पुरवठा**

**आकृती क्रमांक ८.१**

हे फिशरचे समीकरण आकृतीच्या साहाय्याने स्पष्ट करता येते. वरील आकृती मध्ये ईं अक्षावर पैशाचा पुरवठा व ध्भ अक्षावर किंमतपातळी दर्शविलेली आहे व ऊं हा वक्र श व इ या मधील कार्यात्मक संबंध दर्शवितो .

पैशाचा पुरवठ्यात श१ वरुन श२ पर्यंत म्हणजे दुप्पट वाढ केल्यास किंमत पातळी ही इ१ वरुन इ२ पर्यंत दुप्पट होते. हे स्पष्ट होते.

**गृहिते :**

फिशरचा चलनसंख्यामान सिद्धांत पुढील गृहितांवर आधारित आहे.

१) पैशाचा भ्रमणवेग स्थिर आहे.
२) कायदेशीर पैसा व पत पैसा यांचे प्रमाण कायम आहे.
३) वस्तु व सेवा (T) यांचे प्रमाण कायम असते
४) वस्तु विनिमयाची संख्या कायम आहे.
५) पूर्ण रोजगाराची परिस्थिती असते.
६) पैशाला असणारी मागणी कायम असते
७) इतर परिस्थिती कायम असते.

फिशरच्या सिद्धांतावर केल्या जाणाऱ्या टीका

**१) इतर परिस्थिती स्थिर नसते:**

फिशर यांनी सिद्धांताची मांडणी करताना इतर परिस्थिती स्थिर मानली आहे. पण हे चूक आहे कारण आजच्या गतीशील अर्थव्यवस्थेत इतर परिस्थितीत सतत बदल होत असतात असे प्रा. हाम यांचे मत आहे.

**२) पूर्ण रोजगाराची चुकीची गृहिते:**

अर्थव्यवस्थेत पुर्णरोजगारी असते असे फिशर यांनी गृहीत धरले आहे. परंतु पूर्ण रोजगारीची परिस्थिती अभावानेच आढळते. त्यामुळे व्यवहारात यांचा उपयोग होत नाही.

**३) सर्वच्या सर्व उत्पन्न खर्च केले जात नाही:**

या सिद्धांतात लोकांचे सर्व उत्पन्न खर्च केले जाते असे गृहीत धरले आहे. पण ते चुकीचे आहे. कारण समाज आपल्या उत्पन्नाचा काही भाग भविष्य काळातील तरतुदीसाठी राखून ठेवतो.

**४) व्याजदराचा विचार नाही:**

फिशरने आपल्या सिद्धांतात व्याजदराचा अजिबात विचार केलेला नाही. त्यामुळे हा सिद्धांत अपूर्ण वाटतो.

**५) पैशाचा भ्रमण वेग स्थिर नसतो:**

फिशरने आपल्या सिद्धांतात पैशाचा भ्रमण स्थिर आहे असे गृहीत धरले आहे. परंतु ते चुक आहे. कारण १९२३ मध्ये जर्मनीत पैशाचा भ्रमणवेग वाढल्यामुळे भाववाढ झाली होती.

**६) स्थितीशील सिद्धांत:**

फिशरचे विनियम समीकरण स्थितीशील असल्याने गतीशील अर्थव्यवस्थेतील बदलांचा अभ्यास करण्यास हे समीकरण उपयोगी पडत नाही.

**७) पैशाचे परिमाण व किंमत पातळीतील प्रत्यक्ष व प्रमाणशीर संबंध चुकीचा:**

मागणीतील वाढ, मक्तेदारी व साठेबाजी यामुळे ही वस्तुंच्या किंमतीत वाढ घडून येत असते याकडे मात्र फिशरने दुर्लक्ष केले आहे.

**८) वस्तु व सेवा यांचे परिमाण स्थिर नसते:**

लोकांच्या वास्तव उत्पन्न पातळीत वाढ झाल्यास लोकांचा उपभोग वाढतो. त्यामुळे लोकांचे खरेदी व्यवहार वाढतात. शिवाय पैशाच्या पुरवठ्यात वाढ झाल्यासही असे होते. परंतु वस्तु व सेवांचे प्रमाण स्थिर असते असे गृहीत धरणे चुकीचे आहे.

९) फिशरने पैशाच्या पुरवठ्यावर अवास्तव भरदेऊन पैशाच्या मागणीकडे दुर्लक्ष केले आहे.

१०) सर्वसाधारण मागणी व पुरवठा सिद्धांत पैशालाही लागू करण्यात आल्यामुळे नवीन असे काही या सिद्धांताने सांगितले नाही.

११) सर्वच व्यवहार रोख पैशात चालतातच असे गृहीत धरुन चुक केली आहे.

१२) या सिद्धांताने तेजी मंदी व वस्तुची किंमत पातळी यातील संबंध विचारात घेतलेला नाही.

१३) पैशाच्या मूल्यावर उत्पन्न बचत, राष्ट्रीय उत्पन्न, लोकसंख्या उपभोग इ. घटकांचा परिणाम होत असतो. हे फिशरने विचारत घेतले नाही.

## ८.३ पैशाच्या मागणीचा नवसनातनवादी दृष्टीकोन (NEO CLASSICAL APPROACH)

### ८.३.१ केंब्रीज समीकरणे किंवा रोख शिल्लक दृष्टीकोन (Cambridge equations or Cash Balance Approach) नवसनातनवादी दृष्टीकोन (New Classical Approach) :

रोख शिलक दृष्टीकोन इंग्लंड मधील केंब्रिज अर्थशास्त्रज्ञ डॉ. मार्शल, पीगू, रॉबर्टसन व प्रा केन्स यांनी मांडला.

रोख शिल्लक दृष्टीकोणानुसार पैशाचे मूल्य हे पैशाच्या मागणीवर किंवा रोख शिलकीवर अवलंबून असते. किंवा पैशात मूल्य संग्रह हा गुण असल्यामुळे ही पैशाला मागणी असते. केंब्रिज विचारसरणीनुसार पैशाचे मूल्य हे समाजाकडून रोख पैशाला असलेल्या मागणीवर अवलंबून आहे. समाजाने जर जास्त रोख पैशाची मागणी केली तर पैशाचे मूल्य हे वाढते आणि कमी पैशाची मागणी केली तर पैशाचे मूल्य कमी होते. सारांश पैशाचे मूल्य हे रोख पैशाला असणाऱ्या मागणीवर अवलंबून असते.

केंब्रिज विचारवंतांच्या मते समाजाकडून पैशाला असणारी मागणी ही विविध हेतूसाठी असते. परंतु ही पैशाची मागणी अनेक घटकांवर अवलंबून असते. उदा. समाजाकडून समाजाची उत्पन्नपातळी राष्ट्रीय उत्पन्नाची वाटणी, लोकसंख्या, व्यवहार पद्धती या घटकांवर हे प्रमाण अवलंबून असते. अशा प्रकारे पैशाचा पुरवठा स्थिर असताना पैशाची मागणी वाढल्याने पैशाचे मूल्य वाढते आणि पैशाची मागणी कमी झाल्यास पैशाचे मूल्य कमी होते. त्यांनी पैशाची मागणी आणि पैशाचा पुरवठा यामधील संबंध स्पष्ट करण्यासाठी विविध समिकरणे दिलेली आहेत. त्यानाच केंब्रिज समिकरणे असे म्हणतात.

केंब्रिज समिकरणे पुढीलप्रमाणे.

**१) डॉ. मार्शल यांचे समीकरण**

मार्शल यांनी आपले समीकरण पुढील प्रमाणे मांडले आहे.

$M = K Y$

येथे

M = एकूण पैसा (विधीग्राह्य पैसा + बँकेतील चालू ठेवी)

Y = वास्तव राष्ट्रीय उत्पन्न

K = एकूण वास्तविक उत्पन्नाचा असा भाग की जो लोक पैशाच्या स्वरुपात आपल्या जवळ ठेवू इच्छितात. मार्शलच्या समीकरणाच्या साहाय्याने पैशाचे मूल्य पुढील प्रमाणे शोधून काढता येते.

$$P = \frac{KY}{M}$$

डॉ. मार्शल यांच्या मते M पेक्षा K मधील बदल महत्त्वाचे असून ते किंमत पातळीवर अधिक प्रभाव पाडतात. मार्शलच्या मते जर K च्या आकारात वाढ झाली तर वस्तु आणि सेवांच्या मागणीत घट होते आणि म्हणून किंमतपातळी कमी होते.

## २) प्रा पिगू यांचे समिकरण:

$$P = \frac{KR}{M}$$

येथे

P = एका विशिष्ट वस्तूत मोजलेली पैशाची किंमत

M = एकूण कायदेशीर पैसा

R = एका विशिष्ट वस्तूच्या स्वरुपातील एकूण वास्तव उत्पन्न (उदा. तांदूळ)

K = वास्तव उत्पन्नाचा असा भाग की जो लोक आपल्या जवळ रोख शिल्लक स्वरुपात ठेवू इच्छितात त्याचे प्रमाण

वरील पिगू यांच्या समीकरणात पतपैशाचा विचार केलेला नाही. त्याचा समावेश करुन पिगुने दुसरे समीकरण मांडले तसेच पिगूच्या समीकरणातील P हे फिशरच्या समिकरणातील P हे फिशरच्या समिकरणातील P या अक्षराच्या बरोबर विरुद्ध अर्थाने वापरले आहे. त्यामुळे P हा M च्या व्यस्त प्रमाणात बदलतो.

## ३) रॉबर्टसनचे समीकरण

$$P = \frac{M}{KT}$$

येथे

P = किंमतीची पातळी

M = पैशाचा पुरवठा

T = वस्तु व सेवांच्या खरेदी व्यवहारातील संख्या

k = वास्तव उत्पन्नाचा असा भाग की जो समाज आपल्या जवळ ठेवू इच्छितो.

रॉबर्टसन याच्या मताप्रमाणे पैशाचा पुरवठा (M) स्थिर गृहीत धरल्यास K मध्ये होणाऱ्या बदलामुळे P मध्ये व्यस्त दिशेने बदल घडून येतो आणि K स्थिर गृहीत धरल्यास M मध्ये होणाऱ्या बदलामुळे P मध्ये समदिशेने बदल होतो.

फिशरच्या समीकरणाशी तुलना करण्यासाठी हे समीकरण उपयुक्त ठरते.

### **४) लॉर्ड केन्स यांचे समीकरण:**

लॉर्ड केन्स यांनी १९२३ मध्ये लिहीलेल्या (A Tract on Monetary Reforms) या ग्रंथात आपले समीकरण मांडले ते पुढील प्रमाणे

n = PK किंवा =

$$P = \frac{n}{K}$$

येथे

P = उपभोग्य वस्तुंची किंमत पातळी

n = लोकाजवळील एकूण पैसा (विधीग्राह्य पैसा १ बँकेतील ठेवी

K = रोख पैशाने खरेदी केले जाणारे वस्तूंचे परिमाण

लॉर्ड केन्स यांनी बँकेतील ठेवीचा विचार करण्यासाठी आपल्या वरील समीकरणात सुधारणा करुन ते पुढील प्रमाणे मांडले

$$n = P (K + rK^1)$$

येथे

n = एकूण पैसा

p = उपभोग्य वस्तूंची किंमत पातळी

K = रोख पैशाद्वारे खरेदी केले जाणारे वस्तूंचे परिमाण

r = रोख शिलकीचे बँकाजवळील ठेवीशी असलेले प्रमाण

K' = बँकेतील ठेवीच्या स्वरुपातील पैशाने लोक किती उपभोग्य वस्तू खरेदी करु शकतात त्याचे प्रमाण १

वरील समीकरणावरुन हे स्पष्ट होते की, केन्स यांचे समीकरण हे पिगूच्या समीकरणापेक्षा अधिक श्रेष्ठ आहे. वरील केन्सच्या समीकरणात $K_1$ $K_1$ आणि r हे घटक स्थिर राहतील तो पर्यंत किंमतपातळी पैशाच्या परिमाणात होणाऱ्या बदलाच्या प्रमाणात बदलत राहील. पैशाच्या परिमाणात वाढ झाल्यास किंमत पातळी वाढते आणि पैशाचे परिमाण कमी झाल्यास किंमत पातळी घटते.

### **टीका:**

केंब्रिज समीकरणावर करण्यात येणाऱ्या टीका पुढीलप्रमाणे

### **१. व्याजदराचा विचार केला नाही:**

केब्रिज समीकरणात पैशाची मागणी ठरवितांना त्याच्या दराचा विचार केला नाही. पैशाची मागणी निश्चित करण्यामध्ये व्याजदराची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. त्यामुळे हे समीकरण दोष मुक्त आहेत असे म्हणता येणार नाही.

**२. संकुचित दृष्टीकोन:**

लॉर्डकेन्स आणि पिगू यांनी मांडलेली समीकरणे फक्त उपभोग्य वस्तुच्या बाबतीतच पैशाची खरेदी शक्ती मोजतात इतर वस्तुंबाबत विचार न केल्यामुळे त्यांची समीकरणे संकुचित ठरली आहेत.

**३. अवास्तव गृहिते:**

रोकड शिल्लक दृष्टीकोनात K आणि T हे घटक स्थिर मानले आहे. त्यामुळे अवास्तव वाटते.

**४. व्यापर चक्राचे स्पष्टीकरण नाही:**

पैशाचा पुरवठा कायम असतांना तेजी मंदीच्या काळात वस्तुच्या किंमती कमी जास्त का होतात याचे स्पष्टीकरण रोकड शिल्लक दृष्टीकोनात दिलेले नाही.

**५. इतर घटकांचा विचार केलेला नाही:**

समाजाच्या पैसा जवळ बाळगण्याच्या सवयी, उत्पादन, किंमत पातळी, आर्थिक विकासाची पातळी इत्यादी घटकांचा पैशाच्या मागणीवर प्रभाव पडत असतो. परंतू या केंब्रिज समीकरणात त्याचा विचार केला नाही.

**६. बचत, गुंतवणूक व रोजगार पातळी इत्यादी घटकांचा विचार केलेला नाही:**

किंमतपातळीवर बचत गुंतवणूक व रोजगार पातळी या वास्तविक घटकांचा परिणाम होत असतो. हे या केंब्रिज समीकरणाने लक्षात घेतले नाही.

**७. पैशाच्या मागणीचे अपूर्ण विश्लेषण:**

केंब्रिज समिकरणानुसार पैशाची मागणी भक्त व्यवहार हेतू व दक्षता हेतू साठीच केली जाते. असे गृहीत धरले आहे पण सैंबांजीच्या हेतूसाठी पैशाची मागणी असते. याकडे मात्र या सिद्धांताने दुर्लक्ष केले आहे.

**८. पूर्ण रोजगाराचे चुकीचे गृहीते:**

अर्थव्यवस्थेत फक्त पूर्णरोजगार पातळीच असते असे गृहीत धरले आहे. पण वास्तविक पाहता पूर्ण रोजगार ही अवस्था अभावानेच आढळते त्यामुळे हे गृहीत अवास्तव वाटते.

वरील प्रमाणे रोख शिल्लक दृष्टीकोणावर टीका होत असल्यातरी हा सिद्धात महत्त्वाचा मानला गेला.

फिशर आणि केंब्रिज समीकरणांची तुलना (Comparison between fisher and cambridge equations)

**अ) साम्य :**

१) पूर्ण रोजगार पातळी दोन्ही समीकरणात गृहित धरण्यात आलेली आहे.

२) दोन्ही समीकरणानुसार पैशाचे मूल्य हे पैशाची मागणी व पैशाचा पुरवठा यावर अवलंबून असते.

३) दोन्ही समीकरणानुसार किंमत पातळीत होणारे बदल हे पैशाच्या परिणामातील बदलामुळे होतात असा निष्कर्ष निघतो.
४) दोन्ही समीकरणानुसार मिळणारे निष्कर्ष हे समान असतात.
५) दोन्ही समीकरणानुसार K आणि V हे घटक वेगळे असले तरी यामध्ये समन्वय होऊ शकतो.
६) समान समीकरणे म्हणजे फिशरचे आणि रॉबर्टसन यांचे होय.

उदा.

$P = \frac{MV}{T}$ हे फिशरचे तर

$P = \frac{M}{KT}$ हे रॉबर्टसनचे समीकरण होय.

**फरक/भेद:**

वरील दोन्ही समीकरणातील फरक पुढील प्रमाणे

१) फिशर यांनी पैशाच्या भ्रमणवेगावर अधिक भर दिला तर केंब्रिज अर्थशास्त्रज्ञांनी बचतीला अधिक महत्त्व दिले.
२) पैशाचे मूल्य निश्चित करताना फिशर यांनी पैशाच्या पुरवठ्याला अधिक महत्त्व दिले तर केंब्रिज अर्थशास्त्रज्ञांनी पैशाच्या मागणीला विशेष महत्त्व दिले.
३) पैशाबाबत फिश यांनि विनिमय माध्यम या कार्याला महत्त्व दिले तर केंब्रिज अर्थशास्त्रज्ञानी पैशाच्या मूल्य संग्रह या कार्यावर विशेष भर दिला.
४) फिशर यांनी सामान्य किंमत पातळीचा विचार केला तर केंब्रिज अर्थशास्त्रज्ञानी उपभोग्य वस्तूच्या किंमत पातळीचा विचार केला.
५) कुरीहारा व हॅनसन या अर्थशास्त्रज्ञांच्या मते फिशरची विचार सरणी संकुचित आहे. तर केंब्रिज विचारसरणी विस्तृत किंवा श्रेष्ठ आहे.
६) फिशर यांनी व्यक्तीच्या आर्थिक वर्तणुकीकडे दुर्लक्ष केले तर केंब्रिजशास्त्रज्ञांनी यांनी व्यक्तीचा आर्थिक वर्तणुकीला महत्त्व दिले.

वरील प्रमाणे केक्रिन व फिशरच्या समीकरणातील साम्य व भेद आपणास स्पष्ट करता येईल.

## ८.४ प्रस्तावना (INTRODUCTION)

पैसा हे सर्वसामान्य असे विनिमयाचे साधन आहे. पैशाच्या अंगी असलेल्या क्रयशक्ती या गुणामुळे अनेक वस्तू व सेवांची खरेदी करता येते. या त्यांच्या गुणावरुनच त्यांचे मूल्य ठरत असते.

या पैशाचे मूल्य अर्थव्यवस्थेत केव्हाच स्थिर नसते. त्यात वस्तुंच्या व सेवांच्या किंमतीतील वाढ व घटी नुसार सातत्याने बदल होत राहतात. अर्थात या सातत्याने होणाऱ्या बदलांमुळे अर्थव्यवस्थेत अस्थिरता निर्माण होते. अशा या अस्थिर परिस्थितीचे चलन वाढ आणि चलन घट असे दोन रुपे आहेत.

## ८.५ चलनवाढ (INFLATION)

अर्थव्यवस्थेत जर विविध वस्तु व सेवांच्या किंमतीत सातत्याने वाढ घडून येण्याची प्रवृत्ती आढळून येत असेल तर त्या स्थितीचे वर्णन अर्थशास्त्रात चलनवाढ, स्फीती, मुद्रास्फीती, भाववाढ, चलनविस्तार, चलनातिरेक, चलनवृद्धी, चलन विस्फोट अशा अनेक सार्थ शब्दानी केले जाते.

**व्याख्याः**

१) प्रा. क्राउथर, ''ज्या परिस्थितीत पैशाचे मूल्य कमी होत असते म्हणजेच किंमती वाढत असतात अशा परिस्थितीला चलनवाढ म्हणतात.''

२) प्रा. कोलबर्न, '' अत्याधिक मुद्रा अत्यंत कमी वस्तूचा पाठलाग करतात.''

३) हॉट्रे : ''चलनाचा अतिरिक्त पुरवठा म्हणजे चलनवाढ.''

४) प्रा. पिगू ''उत्पन्न प्राप्तीच्या क्रियेतील वाढीपेक्षा मौद्रिक उत्पन्नातील वाढ जास्त प्रमाणात होते. त्यावेळी चलनवाढ अस्तित्वात येते.''

५) ग्रेगरी, ''क्रयशक्तीच्या परिणामातील असामान्या वृद्धी म्हणजे स्फीती होय.''

६) प्रा. केमरर, ''देशात चालणाऱ्या व्यापाराच्या भौतिक परिमाणापेक्षा मुद्रेचे परिमाण जास्त असणे म्हणजे स्फीती होय.''

७) गोल्डन विजर : ''ज्यावेळी मौद्रिक रुपात राष्ट्रीय उत्पन्नवाढीचावेग वस्तुगत राष्ट्रीय उत्पन्नात होणाऱ्या वाढीच्या मानाने जास्त असतो. तेव्हा स्फीती निर्माण होते.''

८) प्रा. सॅम्युएलसन, ''किंमती आणि उत्पादनखर्च यांची सामान्य पातळी जेव्हा वाढते तेव्हा स्फिती निर्माण होते. ''

९) मिल्टनफ्रिडमन : ''देशातील किंमतपातळी मुद्रापुरवठ्यावर अवलंबून असते व मुद्रेचा पुरवठा वाढला की किंमतपातळी हळूहळू वाढू लागते. त्यामुळे स्फिती ही एक मौद्रीक घटना असुन ती सर्वत्र आढळून येते.''

१०) प्रा. पॉलइंजिग, ''चलनवाढ ही अशी असंतुलित अवस्था होय की ज्या अवस्थेत खरेदी शक्तीचा विस्तार झाल्यामुळे वस्तुच्या किंमती वाढतात किंवा किंमती वाढल्यामुळे खरेदी शक्तीचा विस्तार होतो.''

११) प्रा. केन्स ''अपूर्ण रोजगारीच्या अवस्थेत होणारी किंमत वाढ म्हणजे वास्तविक स्फिती नव्हे तर केवळ पूर्ण रोजगारीच्या अवस्थेत किंमतीत होणारी वाढ म्हणजे वास्तविक स्फिती होय.''

१२) प्रा. गार्डनर ॲक्ले - ''सामान्य किंमत पातळी किंवा किंमतीच्या सरासरी दीर्घकाळ अखंडपणे लक्षात येण्यासारखी घडून येणारी वाढ म्हणजे स्फिती होय.''

१३) लंडन एकॉनॉमिक्स' ने दिलेली व्याख्या ''वस्तुच्या पुरवठ्याची अंतिम मर्यादा गाठल्यानंतर पुरवठ्याच्या मानाने मागणीचे जे आधिक्य असते त्याला स्फिती असे म्हणतात.''

अशा प्रकारे चलनवाढीच्या काळात विविध वस्तु आणि सेवांची समाजाकडून असणारी एकूण मागणी पुरवठ्यापेक्षा जास्त असते. म्हणजेच मागणीचे पुरवठ्यावर आधिक्य प्रस्थापित होऊन असंतूलनाची अवस्था निर्माण होते.

## ८.६ भाववाढीचे / चलनवाढीचे प्रकार

भाववाढ कोणत्या कारणाने निर्माण होते त्यावरुन भाववाढ किंवा चलनवाढीचे विविध प्रकार पडतात. त्या विविध प्रकारांचे स्पष्टीकरण पुढील प्रमाणे.

### ८.६.१ वस्तूच्या किंमत वाढीच्या दरावरुन पुढील चार प्रकार पडतात (Inflation on the basis of Speed):

**१) रांगती भाववाढ (Creeping Inflation) :**

देशात वस्तु व सेवांच्या किंमतीमध्ये हळूहळू परंतु कमी दराने वाढ होत असेल तर अशा प्रकाराला रांगती भाववाढ असे म्हणतात. भाववाढीचा हा प्रकार सामान्य असून तो अर्थव्यवस्थेच्या विकासाला पोषक असतो असे काही अर्थशास्त्रज्ञांचे मत आहे. परंतू हीच स्थिती कायम राहील्यास कालांतराने देशात विशाल भाववाढीला तोंड द्यावे लागेल असेही काही अर्थशास्त्रज्ञानी सूचविले आहे. अशा भाववाढीचा वेग ५ ते १० टक्के असतो.

**२) चालती भाववाढ (Walking Inflation) :**


अशा प्रकारच्या भाववाढीचे मूळ रांगत्या भाववाढीत असते. रांगत्या भाववाढीमध्ये सातत्याने वस्तुंच्या किंमती वाढू लागल्यास चालती भाववाढ निर्माण होते. अर्थात रांगत्या भाववाढीपेक्षा चालत्या भाववाढीमध्ये वस्तू व सेवांच्या किंमती अधिक वेगाने वाढू लागतात. किंमत वाढीचा हा वेग ३० ते ४० टक्के पर्यंत वाढलेला असतो आणि यातूनच धावत्या भाववाढीला आमंत्रण मिळते.

**३) धावती भाववाढ (Running Inflation) :**

चालती भाववाढ रोखण्यास अपयश आल्यास अशा प्रकारची भाववाढ निर्माण होते. जेव्हा वस्तूच्या किंमती वेगाने वाढत असतात तेव्हा त्याला धावती भाववाढ असे म्हणतात. या भाववाढीच्या काळात कायमउत्पन्न असणाऱ्या वर्गाचे, मजुरांचे व दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रचंड हाल होतात. धावत्या भाववाढीच्या काळात वस्तुच्या किंमती ५०टक्के ते १०० टक्के पर्यंत वाढत असतात.

**४) विशाल भाववाढ (Hyper Inflation) :**

जेव्हा वस्तु व सेवांच्या किंमतीत अत्यंत वेगाने वाढ होत असते तेव्हा त्याला विशाल किंवा शीघ्र भाववाढ (Galloping Inflation) असे म्हणतात. या भाववाढीच्या काळात वस्तूच्या किंमती दररोज किंवा दरतासाला देखील वाढत असतात. असा अनुभव जगात अनेक देशात आलेला आहे. पहिल्या महायुद्धानंतर जर्मनीत वस्तूच्या किंमती १२,०००,०००,०००,००० इतक्या पटीने वाढल्या होत्या. जर्मनीतील लोक पिशवीतून पैसे घेऊन बाजाराला जात असत व येताना वस्तू शिखातून आणत असत. म्हणजे वस्तूपेक्षा पैशाचे ओझे जास्त असे. या भाववाढीच्या काळात वस्तूच्या किंमती कित्येक पटीने वाढतात.




**आकृती क्रमांक ८.२**

भाववाढीच्या वरील चारही प्रकाराला लहान बाळाच्या वाढीची उपमा दिल्यास वावगे ठरणार नाही. बाळजन्माला आल्यानंतर काही दिवसाने ते रांगते. त्यानंतर चालते, नंतर धावते व मोठे झाल्यावर शिघ्रतेने पळते. तसेच हे भाववाढीचे प्रकार आहेत. हे सर्व प्रकार वरील आकृतीत स्पष्ट करता येतील.

वरील आकृतीमध्ये OX अक्षावर कालावधी दर्शविलेला असुन OY अक्षावर किंमत पातळीतील वाढ दर्शविली आहे. तर A,B, C,D हे वक्र अनुक्रमे रांगती, चालती, धावती व विशाल भाववाढ दर्शवितात या वक्रावरुन आपणास भाववाढीची स्थिती चटकन समजते.

### ८.६.२ शासकीय हस्तक्षेपावरुन भाववाढीचे प्रकार (Inflation on the basis of Govt. Intervention)

यामध्ये पुढील दोन प्रकार पडतात.

**१) खुली भाववाढ (Open Inflation):**

जेव्हा शासनाचा अर्थव्यवस्थेतील वस्तू व सेवाच्या किंमतीवर कोणताही हस्तक्षेप नसतो तेव्ही जी भाववाढ निर्माण होते तीला खुली भाववाढ किंवा मुक्तभाववाढ असे म्हणतात. या भाववाढीच्या काळात शासन वस्तु व सेवांच्या किमतीवर कोणतेही नियंत्रण लावले जात नाही. बाजारातील वस्तु व सेवांच्या मागणी पुरवठ्यानुसार वस्तु व सेवाच्या किंमती निश्चित होतात. म्हणून अशा भाववाढीला मुक्त भाववाढ असे म्हणतात.

**२) दडलेली भाववाढ (Suppressed Inflation):**

जेव्हा शासन जीवनावश्यक वस्तु व सेवांच्या किंमतीवर बंधने घालते व अशा वस्तु व सेवाच्या किमती नियंत्रित ठेवते. त्याला दडलेली भाववाढ असे म्हणतात. उदा. स्वस्त धान्य दूकानातून वाटप होणारी साखर, गहू, तांदूळ, डाळ, रॉकेल इ. तसेच पेट्रोल, डिझेल, गॅस इत्यादी वस्तूच्या किंमती शासनाकडून नियंत्रित ठेवल्या जातात. जोपर्यंत शासन असे नियंत्रणे लादते तोपर्यंत या वस्तू व सेवांच्या किंमती मर्यादित राहतात. शासनाने या वस्तूंवरील नियंत्रणे काढून घेतल्यास दडलेल्या भाववाढीचे रुपांतर खुल्या भाववाढीत होते. भारतात पेट्रोल नियंत्रण मुक्त केलेले आहे. त्यामुळे पेट्रोलच्या किंमती सातत्याने वाढत असतात.

### ८.६.३ काळानुसार भाववाढ (Inflation on the basis of period):

### १) शांतता कालीन भाववाढ (Peace Period Inflation):

अर्थव्यवस्थेत शांततेच्या काळात नियोजनाच्या माध्यमातून आर्थिक विकास जलद गतीने साध्य करण्यासाठी शासन विविध क्षेत्रावर मोठ्या प्रमाणावर खर्च करते. शासनाचा खर्च म्हणजे लोकांच्या उत्पन्नात वाढ होय. परिणामी लोकांचे उत्पन्न वाढून मागणी वाढते. मागणीच्या मानाने पुरवठ्यात वाढ झालेली नसते. अशावेळी वस्तू व सेवांच्या किंमती वाढतात. याला शांतताकालीन भाववाढ असे म्हणतात.

### २) युद्धकालीन भाववाढ (War period Inflation):

जेव्हा एखाद्या देशाचे इतर देशांबरोबर युद्ध सुरु असते तेव्हा ते देश आपल्या देशातील उत्पादन घटक व साधनसामग्री युद्ध साहित्य व सामग्री निर्माण करण्यासाठी वापरतात. परिणामी जीवनावश्यक वस्तु व सेवांची टंचाई निर्माण होते. मागणी मात्र कायम असल्यामुळे देशात भाववाढ निर्माण होते. शिवाय युद्धाच्या काळात शासनाचा खर्च मोठ्या प्रमाणावर वाढलेला असतो. त्यामुळे देखील भाववाढ मोठ्या प्रमाणावर निर्माण होते. त्यालाच युद्धकालीनभाववाढ असे म्हणतात.

### ३) युद्धोत्तर कालीन भाववाढ (Postwar Inflation):

युद्धोत्तर कालीन भाववाढ म्हणजे युद्धकाळाचा परिणाम होय. युद्ध थांबल्यानंतर अर्थव्यवस्थेवर विकासालागती देण्यासाठी शासन देशातील विविध क्षेत्रात उदा. शेती उद्योग, व्यापार, वाहतुक, दळणवळण, संशोधन गुंतवणूक वाढविते त्यामुळे लोकांचे उत्पन्न वाढून मागणी वाढते शिवाय युद्ध काळात अनेक वस्तू व सेवांचे उत्पादन बंद केलेले असते. या सर्वांचा परिणाम म्हणून युद्धोत्तर काळात वस्तू व सेवांच्या किमती वाढून भाववाढ निर्माण होते. तीलाच युद्धोत्तर कालीन भाववाढ असे म्हणतात.

### ड) मागणी प्रेरित आणि खर्च प्रेरित भाववाढ (Demand pull and Cost push Inflation):

चलनवाढीच्या विविध प्रकारात या दोन प्रकारांचा म्हणजेच मागणी प्रेरित आणि खर्च प्रेरित चलनवाढीचा समावेश होतो. अर्थव्यवस्थेत चलनवाढ का होते याबाबत दोन विचार प्रवाह दिसून येतात. एका विचार प्रवाहानुसार मागणीतील वाढीमुळे चलनवाढ होते. तर दुसऱ्या विचारप्रवाहानुसार उत्पादन खर्चातील वाढीमुळे चलनवाढ निर्माण होते त्याचे सविस्तर स्पष्टीकरण पुढील प्रमाणे

### ८.६.४ मागणी प्रेरित (Demand Pull Inflation):

चलनवाढीचे सिद्धांत म्हणूनही यांचा विचार केला जातो. या प्रकारात वर्तमान काळात वस्तूंची जी किंमत असेल त्या चालू किंमतीला वस्तू व सेवांची जी मागणी असेल ती पुरवठ्यापेक्षा जास्त असते. त्यामुळे पुरवठ्यावर मागणीचे अधिक्य निर्माण होते. परिणामी मागणी जास्त आणि पुरवठा कमी यामुळे वस्तूच्या किंमती वाढतात. व्याख्या, ''मागणीतील वृद्धीमुळे जी चलनवाढ निर्माण होते तिला मागणी प्रेरित चलनवाढ असे म्हणतात.'' भाववाढीत जे मागणीचे पुरवठ्यावर अधिक्य निर्माण होते ते अनेक कारणामुळे निर्माण होते. ती कारणे पुढीलप्रमाणे.

**१) पूर्णरोजगार:**

अर्थव्यवस्था जर पूर्ण रोजगार पातळीवर असेल तर वास्तव उत्पन्नात वाढ घडून येत नाही व त्यामुळे किंमती वाढतात व मागणी प्रेरित चलनवाढ निर्माण होते.

**२) गुंतवणूक खर्च जास्त**

अर्थव्यवस्थेतील सार्वजनिक क्षेत्रात किंवा खाजगी क्षेत्रात जी उत्पादन शक्यता असते. त्यापेक्षा गुंतवणूक खर्च जास्त झाल्यास लोकांचे उत्पन्न वाढून खरेदीशक्तीत वाढ होते. परंतु उत्पादन त्या प्रमाणास वाढले नाहीतर चलनवाढ होते.

**३) जादा चलन निर्मिती :**

समजा सरकारने नवीन चलनाची निर्मिती केलीतर अर्थव्यवस्थेतील पैशाचा पुरवठा वाढतो परंतु त्या प्रमाणात उत्पादन वाढत नसल्याने चलनवाढ होते.

**४) पतनिर्मिती:**

व्यापारी बँकामार्फत होणाऱ्या पतपैशांच्या निर्मितीमुळे सुद्धा अर्थव्यवस्थेतील पैशाचा पुरवठा जादा होतो. उत्पादन मात्र त्या मानाने वाढत नाही. परिणामी चलनवाढ होते.

**५) युद्ध कालीन परिस्थिती:**

युद्ध काळात देशातील उत्पादन सामग्री युद्धसाहित्याच्या निर्मितीसाठी वापरल्यामुळे उपभोग्य वस्तुंचे उत्पादन कमी होते. परंतु सरकारच्या युद्ध खर्चामुळे लोकांचे उत्पन्न वाढते. परिणामी पुरवठ्यापेक्षा मागणी जास्त होऊन चलनवाढ होते.

**६) युद्ध पश्चात :**

युद्धसमाप्तीनंतर विस्कळीत झालेल्या अर्थव्यवस्थेत लगेच उत्पादन सुरु करता येत नाही. परंतु याबाबत (युद्धकाळात) समाजाच्या दबलेल्या मागणीचा उद्रेक होऊन मागणी जास्त व पुरवठा कमी असल्याने चलनवाढ होते.

**७) भांडवलाची सीमांत लाभक्षमता :**

भांडवलाच्या सीमान्त लाभक्षमतेत वाढ झाल्यावरही मागणीचे पुरवठ्यावर अधिक्य निर्माण होऊन मागणी प्रेरित चलनवाढ निर्माण होते.

**८) संरक्षण खर्च :**

सरकार देशाच्या संरक्षणावर मोठ्या प्रमाणात खर्च करते. त्यामुळे लोकांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्यांची खरेदीशक्ती वाढते. परंतु ज्या प्रमाणात मागणी वाढते त्या प्रमाणात उत्पादन वाढत नसल्याने चलनवाढ होते.


**९) तुटीचे अंदाजपत्रक:**

तुटीच्या अंदाजपत्रातील तुट भरुन काढण्यासाठी व उत्पन्न आणि खर्च यांच्यात मेळ साधण्यासाठी शासन तुटीच्या अर्थभरण्या अंतर्गत नवीन चलनांची निर्मिती करते. त्यामुळे देशातील पैशाचा पुरवठा वाढतो. परंतू उत्पादन त्या प्रमाणात वाढत नसल्याने वाढत्या मागणीचा परिमाण होऊन चलनवाढ होते.

**१०) वाढती निर्यात :**

परकीय चलन मिळविण्यासाठी निर्यात वाढविली जाते. परिणामी देशातील वाढत्या लोकसंख्येच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी वस्तुंची कमतरता निर्माण होऊन शेवटी चलनवाढ होते.

वरील सर्व कारणांमुळे मागणीचे पुरवठ्यावर आधिक्य निर्माण होऊन मागणी प्रेरितभाववाढ निर्माण होते. मागणीप्रेरित चलनवाढीची संकल्पना पुढील आकृतीच्या साहाय्याने अधिक स्पष्ट करता येईल.




**मागणी पुरवठा व उत्पादन**

**आकृती क्रमांक ८.३**

आकृतीमध्ये O-X अक्षावर मागणी पुरवठा व उत्पादन दर्शविले असून O-Y अक्षावर किंमत पातळी दर्शविलेली आहे. S- $S_2$ हा पुरवठा वक्र असून खालून वर म्हणजेच डावीकडून उजवीकडे सरकणारा धनात्मक उताराचा आहे. "E" बिदूच्या ठिकाणी अर्थव्यवस्थेत पूर्णरोजगार प्रस्थापित होऊन पुरवठा वक्र O-Y अक्षाला समांतर होतो.

सुरुवातीस DD हा मागणीवक्र SS या पुरवठा वक्राला E ह्या बिंदूत छेदतो. या संतुकन बिंदूच्या ठिकाणी ON इतक्या उत्पादनाची OP इतकी किंमत निश्चित होते व त्याच ठिकाणी अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार प्रस्थापित होतो.

समजा मागणीत वाढ झाली तर मागणी वक्र वरच्या दिशेने सरकुन नवीन D1- D1 हा मागणीवक्र SS या पुरवठा वक्रास E1 याबिंदूत छेदेल या नवीन संतुलन बिंदूचा ठिकाणी एकूण उत्पादनात कोणत्याही प्रकारचा बदल न होता किंमत पातळी OP वरुन OP1 पर्यंत वाढते.

समजा मागणीत आणखी वाढ झाली तर मागणी वक्र वरच्या बाजूला सरकून नवीन $D_2D_2$ हा नवीन मागणी वक्र S. या पुरवठ्या वक्राला $E_2$ या बिंदूत छेदेल. या नवीन संतुलन बिंदूच्या ठिकाणी उत्पादनात कोणत्याही प्रकारची वाढ न होता किंमत मात्र O-$P_2$ पर्यंत वाढेल. म्हणजेच E या पूर्णरोजगाराच्या बिंदूनंतर मागणीत वाढ झाल्यास उत्पादन न वाढता फक्त किंमत पातळी वाढून जी चलनवाढ दिसून येते ती म्हणजेच मागणी प्रेरित चलनवाढ होय.

### ८.६.५ खर्च प्रेरित चलनवाढ / भाववाढ (Cost push Inflation)

अतिरिक्त मागणी नसतानाही चलनवाढ होऊ शकते हा दृष्टीकोन खर्चप्रेरित चलनवाढ सिद्धांतात मांडला आहे. १९५० च्या दशकात करण्यात आलेल्या या प्रकारावर विवेचनानुसार उत्पादन खर्चातील वाढीमुळे किंमतवाढ निर्माण होते. ही किंमतवाढ दोन प्रकारची असू शकते.

१) वेतन प्रेरित
२) नफा प्रेरित

### १. वेतन प्रेरित (Wage Push) :

श्रमीक संघटना आपल्या संघटीत शक्तीच्या बळावर आपल्या वेतनात वाढ घडवून आणू शकतात. श्रमिकाच्या वेतनात वाढ झाल्याने उत्पादन खर्च वाढतो. वस्तुच्या किंमती वाढतात. परंतू उत्पादनात मात्र त्या प्रमाणात वाढ होत नाही.


संघटनशक्तीच्या जोरावर श्रमिकांचे जे वेतन वाढलेले असते. त्यांचा परिणाम त्यांची विविध वस्तू आणि सेवा साठी असलेली मागणी वाढते. परंतू श्रमिकांच्या उत्पादन क्षमतेत वाढ झालेली नसल्याने एकूण उत्पादन न वाढल्यास किंमती वाढतात.

अशा किंमती वाढू लागल्या की श्रमिक पुन्हा वाढीव वेतनाची मागणी करतात. यातूनच वेतनातील वाढीमुळे किंमतवाढ व किंमतील वाढी मुळे पुन्हा वेतनवाढ अशी प्रक्रिया सातत्याने चालू राहून खर्च प्रेरित चलनवाढ निर्माण होते.

### ९)नफा प्रेरित (Profit Push):

उत्पादकही आपल्या मक्तेदारी प्रभावामुळे किंमतीत वाढ करुन अधिकाधिक नफा मिळविण्याचा प्रयत्न करतात व त्यातून अशा प्रकारची चलनवाढ निर्माण होते.

अर्थात नफा हा एकूण किंमतीचा अल्पसा भाग असल्याने उत्पादन खर्चातील वाढीला कारणीभूत ठरणारा घटक म्हणून नफ्यापेक्षा वेतन वाढ हा घटक महत्त्वाचा मानला आहे. ही संकल्पना पुढील आकृतीच्या साहाय्याने अधिक स्पष्ट करता येईल.




**आकृती क्रमांक ८.४ : मागणी पुरवठा व उत्पादन**

वरील आकृतीमध्ये OX अक्षावर मागणी पुरवठा व उत्पादन तर OY अक्षावर किंमत पातळी दर्शविलेली आहे. SS हा पुरवठावक्र असुन तो ON या पूर्ण रोजगार उत्पादन पातळीनंतर O-Y अक्षाला समांतर आहे. DD हा सुरुवातीचा मागणी वक्र एए पुरवठा वक्रास E बिंदूत छेदतो या संतुलन बिंदूच्या ठिकाणी O.N इतक्या उत्पादनाची O.P इतकी किंमत निश्चित होते समजा श्रमिकांच्या वेतनात वाढझाल्यास $S_1S$ हा पुरवठा वक्र DD मागणी वक्राला E1 या बिंदूत छेदेल व या समतोल बिंदूच्या ठिकाणी OP1 इतकी किंमत ON1 इतके उत्पादन निश्चित होईल. म्हणजेच उत्पादन व रोजगारात घट होते.

समजा सरकारने पूर्ण रोजगार टिकवून ठेवण्यासाठी आपल्या खर्चात वाढ केली. त्यामुळे मागणी वक्र $D_1$ $D_1$ हा नवीन मागणी वर्क $S_1S$ या पुरवठावक्रास $E_2$ या बिंदूत छेदतो. या नवीन संतुलन बिदूच्या ठिकाणी पूर्वीपेक्षा जास्त किंमत निश्चित होईल ती OP2 इतकी असेल. परिणामी श्रमिक अधिक वेतनाची मागणी करतील.

श्रमीकांच्या वाढत्या वेतनवाढीच्या मागणीमुळे उत्पादन खर्चात वाढ होऊन पुरवठा वक्र $S_2S$ हा मिळेल हा पुरवठावक्र $D_1D_1$ मागणी वक्रात $E_3$ ह्या बिंदूत छेदेल या संतुलन बिंदूच्या ठिकाणी $OP_3$ इतकी किंमत निश्चित होईल.

पुन्हा शासन पूर्ण रोजगार टिकवून ठेवण्यासाठी आपल्या खर्चात वाढ करेल. त्यामुळे $D_2D_2$ हा नवीन मागणी वक्र $S_2S$ या पुरवठा वक्रास $E_4$ या बिंदूत छेदेल या संतुलन बिंदूच्या ठिकाणी O-$P_4$ इतकी किंमत निश्चित होईल.

एकूणच वेतनवाढ उत्पादन खर्चात वाढ व किंमतवाढ व पून्हा वेतनवाढ असे चक्र सुरू राहून खर्च प्रेरित चलनवाढ अस्तित्वात येते.

## ८.७ चलनवाढीची कारणे (CAUSES OF INFLATION)

चलन वाढ ही प्रामुख्याने वस्तुच्या मागणी व पुरवठ्यात बदल झाल्यामुळे होत असते आणि मागणी आणि पुरवठ्यात पुढील कारणांमुळे बदल होतात.

### १) सरकारी धोरण

पैशाच्या पुरवठ्यावर सरकारचे नियंत्रण असते. समजा शासनाने अर्थव्यवस्थेतील पैशाचे प्रमाण वाढविले म्हणजे विविध मार्गानी नवीन पैसा अर्थव्यवस्थेत आणला तर मागणीपेक्षा पुरवठा वाढल्याने चलनवाढ होते.

### २) कर्जाचे धोरण / कर्जरोख्यांची खरेदी

शासन समाजाचा वाढता खर्च भागविण्यासाठी विविध मार्गानी भांडवलाची किंवा पैशाची उभारणी करीत असते. त्यातील जनतेकडून घेतले जाणारे कर्ज हा सुद्धा एक मार्ग आहे. समजा शासनाने जनतेकडून केली जाणारी कर्जाची मागणी कमी केली. तसेच मध्यवर्ती बँकेने खुल्या बाजारात कर्ज रोख्यांची खरेदी सुरु केली तर समाजाचे पैशातील उत्पन्न वाढून चलनवाढ होते.

**३) करकपात:**

शासनाने कर कमी केल्यामुळे लोकांचे उत्पन्न वाढून त्यांची प्रभावीमागणी वाढते. परंतु उत्पादनातील वाढीच्या अभावामुळे चलनवाढ होते.

**४) सार्वजनिक खर्चात वाढ:**

सामाजीक कल्याणासाठी शासनाला आपल्या खर्चात सातत्याने वाढ करावी लागते. वाढत्या खर्चाबरोबरच लोकांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्यांची खरेदी शक्ती वाढते. परंतू अर्थव्यवस्थेत उत्पादन तेवढ्या प्रमाणात वाढत नसल्याने चलनवाढ होते.

**५) तुटीचा अर्थभरणा:**

युद्ध, आर्थिक नियोजन तसेच इतर अनेक सामाजिक कल्याणाच्या योजनासाठी शासनाला आपल्या खर्चात वाढ करावी लागते. परंतु हा खर्च पूर्ण करण्यासाठी उत्पन्न मात्र अपुरे पडते. अशा वेळी तुटीच्या अर्थभरणाच्या साहाय्याने नवीन चलन अर्थव्यवस्थेत आणले जाते. परिणामी पैशाचे प्रमाण वाढून मागणी वाढते. परंतु ती उत्पादनापेक्षा जास्त होऊन चलनवाढ होते.

**६) पतपुरवठा :**

तेजीच्या काळात एकूण वातावरण आशावादी असते. त्यामुळे बँका आणि इतर वित्तीय संस्था मोठ्या प्रमाणावर कर्ज पुरवठा करतात. व्यापारी बँकामार्फत होत असलेल्या पतपैशाच्या निर्मितीमुळे चलनवाढ घडून येते.

**७) कर वाढीचे धोरण:**

सरकारने वस्तूवरील करांच्या प्रमाणात वाढ केल्यास त्याचा परिणाम अनिष्ट होतो. कारण त्यामुळे उत्पादनात घट होऊन वस्तूंची टंचाई निर्माण होण्याची शक्यता असते. परिणामी चलनवाढ होते.

**८) उत्पादन खर्च:**

प्रभावी कामगार संघटना जादा वेतनाची मागणी करतात. वाढत्या वेतन दराबरोबरच उत्पादन खर्चात वाढ होते. तसेच युद्धकाळ, आर्थिक विकासाचे कार्यक्रम इ. मुळे उत्पादन खर्चात वाढ होऊन चलनवाढ होते.

**९) वेतनवाढ:**

कामगार संघटना प्रभावी असतील तर त्या वाढीव वेतनदराची मागणी करु शकतात की ज्यामुळे मजूराचे वेतन वाढवून त्यांची खरेदी शक्ती वाढण्यास मदत होते. परंतु उत्पादन त्या प्रमाणात वाढत नसल्याने चलनवाढ होते.

**१०) उत्पादनाचे प्रमाण :**

देशातील उत्पादनाचे प्रमाण मागणीच्या तुलनेने कमी असल्यास वस्तूंची टंचाई निर्माण होऊन किमंतपातळी वाढून चलनवाढ होते.

**११) युद्धस्थिती :**

युद्धकाळात देशातील उपभोग्य वस्तुंचे उत्पादन कमी होऊन युद्धसामग्रीचे उत्पादन वाढू लागते. तसेच आयात सुद्धा घटलेली दिसून येते. परिणामी अंतर्गत पुरवठा कमी होतो. परंतु शासनाच्या या काळातील वाढत्या खर्चामुळे लोकांचे उत्पन्न वाढत असल्याने मागणी वाढून चलनवाढ होते.

**१२) मक्तेदारी संघटना :**

देशातील मक्तेदारी संघटना साठेबाजी करुन अेनक वस्तुबाबत कृत्रिम टंचाई निर्माण करतात त्यामुळे चलनवाढ घडून येते.

**१३) खाजगी गुंतवणूक खर्चात वाढ :**

वाढत्या औद्योगिक प्रगतीमुळे संयोजकाना गुंतवणूकीची प्रेरणा मिळते. परिणामी उत्पादन साधनांची मागणी वाढते. परंतु रोजगारीच्या परिस्थितीमुळे उत्पादनाची साधने उपलब्ध होत नाहीत. परिणामी त्यांच्या किंमतीवाढून त्यांच्या उत्पन्नात वाढ होते. या घटकांकडून केली जाणारी मागणी वाढते. परंतू उत्पादन त्या प्रमाणात वाढ नसल्याने चलनवाढ होते.

**१४) उत्पादक साधनांची टंचाई :**

भूमी, श्रम, भांडवली साधने व कच्चामाल इ. उत्पादनाचे घटक उपलब्ध नसल्यामुळे वस्तूचे उत्पादन वाढविता येत नाही. अशा वेळी चलनवाढ ही पुरवठा कमी असल्यामुळे होते.

**१५) निर्यात वाढ :**

परकीय चलन मोठ्या प्रमाणात मिळविण्यासाठी जर निर्यात वाढत ठेवली तर देशात वस्तुची टंचाई निर्माण होऊन मागणीच्या प्रमाणात पुरवठा न झाल्याने चलनवाढ होते.

**१६) बँकांचे धोरण:**

अलिकडील काळात बँका उपभोग्य वस्तुच्या खरेदीसाठी हप्तेबंद व सवलतीच्या दराने कर्ज पुरवठा करतात. परिणामी लोकांची खरेदीशक्ती वाढून चलनवाढ होते.

**१७) देण्याघेण्याचा समतोल:**

जर देशाच्या आंतराष्ट्रीय व्यापाराचा देण्याघेण्यातील समतोल बिघडला तर आयातीच्या वाढत्या प्रमाणामुळे व निर्यातीच्या घटत्या प्रमाणामुळे चलनवाढीस प्रेरणा मिळते.

**१८) व्यापारी कारणे:**

कच्चामाल, रसायने इंधन यांचा पुरवठा कमी झाला तर व्यापाराचे प्रमाण कमी होते. परंतू व्यापारी वस्तूंना अधिक मागणी असल्याने चलनवाढ घडून येते.

**१९) पैशाचा भ्रमणवेग:**

अर्थव्यवस्थेत पैशाचा भ्रमणवेग वाढला म्हणजे लोकांची रोकड प्राधान्य प्रवृत्ती कमी होऊन खर्च वाढतो. परिणामी चलनवाढ होते.

### २०) पूर्णरोजगार:

देशात पूर्णरोजगार प्रस्थापीत झाल्यास लोकांचे उत्पन्न वाढेल परंतु ह्या प्रमाणात श्रमिकांची उत्पादनक्षमता वाढत नसल्याने उत्पादन वाढी अभावी चलन वाढ होते.

### २१) वाढत्या खर्चाचा सिद्धांत:

पूर्णतः पर्यायी असलेली उत्पादनाचे घटक उपलब्ध होत नसल्यास वाढत्या खर्चाचा नियम कार्यान्वित होऊन वस्तूंच्या उत्पादनात वाढ होऊ न शकल्याने चलनवाढ होते.

### २२) नैसर्गिक आपत्ती:

विकसनशील देशांमध्ये दुष्काळ, महापूर, भूकंप रोगराई, वाईट हवामान इ. नैसर्गिक आपत्तीच्या काळात विविध वस्तूंची टंचाई निर्माण होऊन चलनवाढ होते.

### २३) आर्थिक विकास:

आर्थिक विकासाच्या प्राथमिक काळात कायमस्वरुपी विकास साधण्यासाठी विविध प्रकारच्या सामाजिक/आर्थिक सुविधा निर्माण कराव्या लागतात. अर्थात या सुविधांचा फलधारणा कालावधी दीर्घ असल्यामुळे मध्यंतरीच्या काळात उपभोग्य वस्तूंची टंचाई निर्माण होऊन चलनवाढ होते.

### २४) इतर घटक:

संप - टाळेबंदी, हरताळ, सरकारचे आयात-निर्यात धोरण इत्यादी. घटकाचा पुरवठ्यावर प्रभाव पडून चलन वाढ घडून येते.

वरील विविध कारणामुळे अर्थव्यवस्थेत चलनावाढ घडून येत असते. स्थिर आर्थिक विकासासाठी अर्थात ह्या अतिरेकी चलनवाढीवर नियंत्रण ठेवणे आवश्यक असते.

## ८.८ चलनवाढीचे परिणाम (EFFECTS OF INFLATION)

चलनवाढीमुळे पैशाचे मूल्य कमी होऊन त्यांचे अर्थव्यवस्थेतील विविध घटकांवर विविध प्रकारचे परिणाम होतात. त्यानुसार ठळक असे परिणाम पुढील प्रमाणे.

A आर्थिक परिणाम
B सामाजिक परिणाम
C राजकीय परिणाम
D नैतिक परिणाम

### अ) आर्थिक परिणाम:

चलनवाढीचे उत्पादन रोजगार वितरण आणि आर्थिक विकासावर पुढीलप्रमाणे परिणाम होतात.

**I) उत्पादनावरील परिणामः**

आर्थिक परिणामात उत्पादनावरील परिणाम महत्त्वपूर्ण ठरतात. अवास्तव चलनाहीमुळे उत्पादनावर अनिष्ठ परीणाम देतात. ते पुढील प्रमाणे.

**१. उत्पादन घटः**

संथ चलनवाढ उत्पादनवाढीला पोषक असली तरी जेव्हा वेगवान होते तेव्हा उत्पादनावर तिचा प्रतिकूल प्रतिमान होऊन उत्पादनात घट होते.

**२. बचत गुंतवणूकः**

चलनवाढीमुळे पैशाचे मूल्य कमी होऊन पैशाची खरेदी शक्ती कमी होते. त्यामुळे बचतीचे प्रमाण कमी होऊन भांडवल संचायाचा वेग कमी होण्यास सुरुवात होते. परिणामी भविष्य काळात भांडवल पुरवठा कमी होण्याचा धोका संभवतो तसेच गुंतवणूकही फायद्याची ठरत नाही.

**३. अनावश्यक उत्पादनः**

चलनवाढीमुळे उत्पादनाची अयोग्य वाटणी होऊन श्रीमंत अधिक श्रीमंत तर गरीब अधिक गरीब होऊन श्रीमंताकडून मागणी असलेल्या अनावश्यक अशा चैनीच्या वस्तुंचे उत्पादन वाढून उत्पादन पद्धतीवर अनिष्ठ परिणाम होतो.

**४. किंमत अस्थैर्यः**

अर्थव्यवस्थेतील चलन वाढीच्या प्रक्रियेमुळे किंमत ठरविण्याची क्रिया बिघडते. परिणामी किंमत अस्थैर्य प्रस्थापीत होऊन आर्थिक विकासावर अनिष्ट परिणाम होतो.

**५. काळा बाजार साठेबाजीः**

अतिरेकी चलनवाढीमुळे काळाबाज व साठेबाजीला चालना मिळते. साठेबाजीतून वस्तूची कृत्रिमटंचाई निर्माण होते व प्रत्यक्ष उत्पादन कार्याकडे दूर्लक्ष केले जाते.

**६. अर्थव्यवस्थेत अस्थैर्यः**

श्रीमंत व्यक्तीचे उत्पन्न चलनवाढीच्या काळात वाढत असल्याने व त्यांची चैनिच्या वस्तुसाठी मागणी वाढत असल्याने सर्वसामान्यासाठी आवश्यक ठरणाऱ्या आवश्यक वस्तूंचे उत्पादन घेण्यासाठी लागणारी साधनसामग्री कमी पडते. किंमत यंत्रणेतील बिघाड, काळाबाजार साठेबाजी, व इतर विविध कारणामुळे अर्थव्यवस्थेत अस्थैर्य निर्माण होते.

**७. विक्रेत्यांचे वर्चस्व :**

श्रीमंताच्या उत्पादनात होणाऱ्या वाढीमुळे उत्पादनाची मागणी वाढत जाऊन उत्पादन व्यवस्थेत विक्रेत्यांचा प्रभाव वाढू लागतो. परिणामी बाजारात कोणत्याही प्रकारची वस्तू विकली जाण्याची शक्यता निर्माण होते.

**८.वस्तूचा दर्जाः**

चलनवाढीच्या काळात वस्तूची मागणी वाढत असल्याने कोणत्याही वस्तूला बाजारपेठ उपलब्ध होत असल्याने वस्तूच्या दर्जाकडे दुर्लक्ष होऊन वस्तुंचा दर्जा खालावतो.

**९. पैशाचा भ्रमणवेग:**

चलनवाढीचा काळात पैशाची खरेदीशक्ती वेगाने कमी होत असल्याने साहजिकच लोक आपली रोख शिल्लक बाहेर काढतात. या काळात पैशाचा भ्रमणवेग अपेक्षेपेक्षा अधिक प्रमाणात वाढल्याचे आढळते.

**१०. दीर्घकालीन परिणाम:**

लोकांची प्रवृत्ती अत्याधीक श्रीमंत होण्याची असते व नफा मिळविण्याची असते. परिणामी दीर्घकाळात फलदायी ठरणारी गुंतवणूक कमी होऊन अल्पकाळातील गुंतवणूक वाढते. परंतु त्यामुळे दीर्घकाळात उत्पादन कमी होण्याची शक्यता असते.

**११. उत्पादन तंत्र:**

उत्पादन तंत्रात सतत बदल करुन जास्तीजास्त फायदा मिळविण्याचा प्रयत्न या काळात केला जातो. परिणामी या स्पर्धेत टिकाव धरु न शकणारे उद्योग बंद पडतात.

**II) रोजगारीवरील परिणाम:**

चलनवाढीचा रोजगारीवर अनुकूल परिणाम होतो. वस्तूच्या किंमती सतत वाढत असल्याने संयोजक नफ्याच्या अपेक्षेने गुंतवणूक वाढवितात. अर्थव्यवस्थेत जुन्या उद्योगांचा विकास व नविन उद्योजकांना उद्योग स्थापनेची प्रेरणा मिळत असल्याने उत्पादकाच्या साधनाची मागणी वाढते. त्यामुळे अर्थव्यवस्थेत बेकार असलेल्या साधनांना काम मिळते व अर्थव्यवस्थेत पूर्णरोजगाराची परिस्थिती निर्माण होते.

**III) वितरणावरील परिणाम:**

उत्पन्नाचे वितरण समाजातील निरनिराळ्या लोकामध्ये होत असते. चलनवाढीमुळे काही वर्गाला अनपेक्षितपणे फायदा होतो तर काहीना नुकसान सहन करावे लागते.

**१) स्थिर उत्पन्न वर्ग:**

समाजातील काही लोकांचे उत्पन्न स्थि असते. उदा ठराविक वेतनावर काम करणारे शिक्षक, पेन्शनर, सरकारी कर्मचारी, ठराविक व्याजमिळविणारे इ. चलनवाढीच्या काळात वस्तूंच्या किमती वाढल्या की ह्या लोकांचे वास्तविक उत्पन्न कमी होते व राहणीमान खालावते.

**२) अस्थिर उत्पन्नवर्ग:**

समाजातील काही लोकांचे उत्पन्न अस्थिर असते. उदा. व्यापारी, उत्पादक, श्रमिक, दलाल, सैंबिंज इ. चा चलनवाढीच्या काळात फायदा होतो. कारण या काळात त्यांचे उत्पन्न वाढते तसेच अनपेक्षितपणे नफा सुद्धा मिळतो.

**३) धनको:**

धनकोला किंवा रक्कम कर्जाऊ देणाऱ्या वर्गाला चलनवाढीच्या काळात तोटा होतो. कारण त्यांना पूर्वी इतकीच रक्कम व्याजासहित परत मिळते व त्या रकमेची क्रयशक्ती फार कमी असते. परिणामी वास्तव उत्पन्न कमी राहते.

**४) ऋणको:**

ऋणकोला चलनवाढीच्या काळात फायदा होतो कारण त्याने जेव्हा कर्ज घेतलेले असते तेव्हा पैशाची खरेदी शक्ती जास्त असते. जेव्हा तो पैसा परत करतो तेव्हा पैशाचे मूल्य कमी झालेले असल्याने खरेदीशक्ती कमी झालेली असते परिणामी कमी वस्तूंची विक्री करुनही कर्ज फेड होऊ शकते.

**५) उत्पादक:**

उत्पादक वर्गाला चलनवाढीच्या काळात फायदा होतो. तो आपले पूर्विचे उत्पादनही समाजात जास्त किंमतीला विकू शकतो. वस्तुच्या उत्पादनासाठी येणारा खर्च आणि विक्री करुन मिळणारी किंमत यात मोठी तफावत असल्यामुळे अतिरिक्त नफा मिळतो.

**६) विक्रेते:**

चलनवाढीच्या काळात विक्रेत्यांना खूप फायदा होतो. कारण कोणत्याही प्रकारच्या उत्पादनाला मोठी किंमत मिळत असते.

**७) उपभोक्ते :**

उपभोक्त्यांचे चलनवाढीच्या काळात नुकसान होते. कारण त्याला पूर्वी इतक्याच वस्तू त्याच्या स्थिर उत्पन्न काळात मिळत नाहीत परिणामी त्याला आपल्या उपभोगात घट करावी लागते.

**८) कामगार:**

कामगार वर्गाला चलनवाढीचा फायदा होत नाही. कारण त्यांना मिळणारे वेतन पूर्वीच्या कराराप्रमाणे असते. परंतु बाजारात वस्तूच्या किंमती वाढलेल्या असल्याने त्याला अधीक किंमत द्यावी लागते. अर्थात एक फायदा कामगारांना होतो तो म्हणजे वाढत्या रोजगाराच्या संधीमुळे बेकारी कमी होण्यास मदत होते.

**९) शेतकरी :**

चलनवाढीच्या काळातील वाढत्या किंमतीचा शेतकऱ्यांना मोठा फायदा होतो. त्यामुळे त्याला आपल्या पूर्वीच्या कर्जाची परतफेड सुद्धा करता येणे शक्य होते.

**१०) गुंतवणूक करणारा वर्ग:**

कर्जरोखे, डिबेंचर्स मध्ये गुंतवणूक करणाऱ्या लोकांना तोटा होतो. कारण त्यांच्या गुंतवणुकीचे मूल्य कमी होऊन मध्यवर्गीयांची बचतप्रवृत्ती कमी होते. मात्र शेअर्स मधील गुंतवणूक फायदेशीर ठरते.

**११) सरकार:**

सरकारच्या उत्पन्नातील कर हे एक महत्त्वाचे साधन आहे. चलनवाढीच्या काळात पूर्वी निश्चित केलेली कराची रक्कम वाढत नसल्याने या स्थिर कररकमेचा शासनाला फायदा होत नाही.

**१२) आयात दार :**

चलनवाढीमुळे देशातील वस्तु परदेशी वस्तुच्या तुलनेने महाग ठरत असतील तर आयात दरांना आयात वाढवून आपला व्यवहार वाढविणे व फायदा मिळविणे सहज शक्य होते.

IV आर्थिक विकास

अनेक अर्थशास्त्रज्ञांच्या मते अल्पप्रमाणात व सावकाश होणारी किंमतवाढ ही आर्थिक विकासाला अनुकूल ठरणारी असते. काही प्रसंगी तीचे वाईट परिणामही पुढीलप्रमाणे होतात.

**१) असमान वितरण:**

चलनवाढीच्या काळात उत्पन्नाचे विविध घटकांमध्ये समान वितरण होते. उत्पन्नाचा मोठा हिस्सा नफा मिळविण्याच्या वर्गाकडे जाऊन त्यांची सीमांत बचत वाढते. ज्या वर्गाला तोटा सहन करावा लागतो त्यांची बचत प्रवृत्ती कमी होते.

**२) भरभराट:**

चलनवाढीच्या काळात ज्या वर्गाला फायदा होऊन बचत प्रवृत्ती वाढते, या वाढत्या बचतीचा संयोजक वर्ग गुंतवणूकीसाठी उपयोग करुन घेतात. त्यामुळे उत्पादन, उत्पन्न रोजगार यात वाढ होऊन अर्थव्यवस्थेत भरभराट होते.

**३) उत्पादन वाढ :**

या काळात नफ्याचे प्रमाण वाढत असल्यामुळे उत्पादनात वेगाने वाढ होऊन आर्थिक विकासाचा वेग वाढतो.

**४) अनपेक्षित परिणाम:**

चलनवाढ अनपेक्षित असेल तर बचत, गुंतवणूक, रोजगार, उत्पन्न यावर तिचे अनुकूल परिणाम होऊन आर्थिक विकासास मदत होते असे अनेक अर्थशास्त्रज्ञांचे मत आहे.

**५) अपेक्षित परिणाम :**

जर चलनवाढ अपेक्षित असेल तर लोकांची बचत प्रवृत्ती दुर्बल होते. पैशाची खरेदी शक्ती कमी होत असल्याने लोक बचत करण्यापेक्षा खर्च करण्यास प्रवृत्त होतात. परिणामी भांडवल निर्मिती कमी होत जाऊन आर्थिक विकासावर अनिष्ट परिणाम होतो.

**ब) सामाजिक परिणाम:**

चलन वाढीच्या परिस्थितीमुळे अनेक सामाजिक परिणाम सुद्धा घडून येतात. वाढत्या किंमती बरोबर उत्पादन, रोजगार, उत्पन्न यात वाढ होऊन सर्वत्र उत्साहाचे व चैतन्याचे वातावरण निर्माण होते.व विविध प्रकारच्या सामाजिक संस्था उदा. शाळा, विविध प्रकारचे मंडळे क्लब इ. संस्था उदयाला येऊन त्यांचा विकास होतो. त्यातूनच लोकांची विधायक कार्याची प्रवृत्ती वाढत जाते.

अर्थात समाजातील काही वर्गावर चलनवाढीचे अनिष्ट परिणाम सुद्धा होत असतात.

**क) राजकीय परिणाम:**

चलनवाढीच्या काळात वाढत्या किंमतीमुळे लोक शासनावर टिका करु लागतात. श्रीमंत अधिक श्रीमंत तर गरीब अधिक गरीब होऊन आर्थिक विषमता निर्माण होते. भ्रष्टाचार, काळाबाजार वाढतो. उत्पादनांचा दर्जा खालावतो, लोकांची नितीमत्ता खालावते, वाढत्या भेदभावांमुळे अराजकता माजून राजकीय वातावरण दुषित होते.

**ड) नैतिक परिणाम:**

चलनवाढीच्या काळात व्यापारी वर्ग जास्तीत जास्त फायदा मिळविण्यासाठी काळाबाजार करतात. भेसळ, सट्टेबाजी अशा अनैतिक प्रवृत्तींचा जोर वाढतो. लोकांच्या हातातील पैसा वाढून त्यांना अनेक प्रकारची व्यसने लागतात की ज्यातून मानवी मूल्यांचा ऱ्हास होऊ लागतो. सरकारी अधिकाऱ्यांची नैतिक पातळी घसरु लागते. अशा अनेक प्रकारचे अनिष्ट परिणाम चलनवाढीच्या काळात दिसून येतात.

अशा प्रकारे वरील आर्थिक सामाजिक, राजकीय व नैतिक स्वरुपाचे इष्ट अनिष्ट परिणाम अर्थव्यवस्थेत होताना दिसून येतात. अर्थात याचा अर्थ अर्थव्यवस्थेत चलनवाढ घेऊ नये असे नव्हे. अर्थव्यवस्थेत उत्पादन क्षेत्रात आशावादी वातावरण ठेवण्यासाठी, आर्थिक विकासाला गती देण्यासाठी, अल्पप्रमाणात चलनवाढ होणे आवश्यक असते. परंतु तिचा अतिरेक झाल्यास इष्ट परिणामाऐवजी अनिष्ठ परिणाम दिसून येतात.

## ८.९ चलनवाढ नियंत्रण (CONTROL OF INFLATION)

चलनवाढीचे अर्थव्यवस्थेवर अनेक अनिष्ठ परिणाम होत असतात. समाजाचे राजकीय सामाजिक आर्थिक जीवन विस्कळीत होत असते. त्या दृष्टीने चलनवाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी विविध उपाय केले जातात. ते पुढील प्रमाणे -

अ) चलन विषयक / मौद्रीक उपाय
ब) राजकोषीय / राज वित्तीय उपाय
क) इतर उपाय

या विविध उपायाचे सविस्तर स्पष्टीकरण पुढील प्रमाणे.

### ८.९.१ चलनविषयक /मौद्रिक उपाय (Monetary Measures) :

चलनवाढीच्या काळात अर्थव्यवस्थेतील पैशाचे प्रमाण वाढून एकूण खर्चाचे प्रमाण वाढलेले असते. अशा वेळी देशातील मध्यवर्ती बेंकेमार्फत चलनविषयक उपयांचा अवलंब करुन लोकांची खरेदी शक्ती कमी व्हावी यासाठी अनेक उपाय केले जातात. ते पुढील प्रमाणे.

**१) बँक दर:**

मध्यवर्ती बँक ज्या व्याजाच्या दराने व्यापारी बँकांना कर्जे देतात किंवा ज्या दराने त्या व्यापारी बँकांच्या हुंड्यांचे पुनर्वसन करतात त्या दराला बँक दर असे म्हणतात. ज्यावेळी अर्थव्यवस्थेत चलनवाढीची परिस्थिती असते तेंव्हा मध्यवर्ती बँक अर्थव्यवस्थेतील वाढत्या पैशाचे प्रमाण कमी करण्यासाठी बँक दरात वाढ करते. परिणामी व्यापारी बँकांना मिळणारे कर्ज

महाग होत असल्याने ते इतरांना सुद्धा अधीक व्याजदर आकारून कर्ज देतात. अर्थात यामुळे कर्जाची मागणी कमी होते. उत्पन्नाच्या अभावामुळे वस्तूंची मागणी कमी होऊन वस्तूंच्या किमती हळूहळू कमी होत जातात. अशा प्रकारे मुद्रेच्या एकूण पुरवठ्यावर प्रभाव पडून चलनवाढीवर नियंत्रण ठेवता येते.

**२) खुल्या बाजारात कर्ज रोख्यांची विक्री:**

अर्थव्यवस्थेतील चलनवाढ रोखण्यासाठी मध्यवर्ती बँक कर्ज रोखे विक्रीस काढते. या कर्ज रोख्यांची खरेदी बँक इतर आर्थिक संस्था आणि व्यक्ती मार्फत केली जाते. कर्जरोख्यामध्ये रोखता, सुरक्षितता व लाभता अधिक असल्याने त्यांची खरेदी मोठ्या प्रमाणात विविध घटकांमार्फत होत असते.

अर्थात या ठिकाणी एक महत्त्वाच गोष्ट होते ती म्हणजे कर्ज रोख्यांच्या विक्रीमुळे अर्थव्यवस्थेतील मोठ्या प्रमाणातील पैसा मध्यवर्ती बँकेकडे गोळा होतो. बाजारातील एकूण पैशांचे प्रमाण कमी होऊन खरेदीचे व्यवहार मंदावतात. परिणामी चलनवाढीवर नियंत्रण प्रस्थापित होते.

**३) राखीव निधीच्या प्रमाणात वाढ :**

देशातील प्रत्येक बँकेला आपल्याकडे जमा होणाऱ्या ठेवीच्या विशिष्ट अशा प्रमाणात निधी मध्यवर्ती बँकेकडे राखीव स्वरुपात ठेवावा लागतो. चलनवाढीच्या काळात मध्यवर्ती बँक या राखीव निधीच्या प्रमाणात वाढ करीत असल्याने बँकांची कर्जपुरवठ्याची क्षमता कमी होऊन पतनिर्मितीवर मर्यादा पडते व चलनवाढीवर नियंत्रण ठेवता येते.

**४) कर्ज व तारण यांतील सीमा वाढविणे:**

व्यापारी बँका कर्जपुरवठा करीत असताना तारण स्विकारत असतात. चलनवाढीच्या काळात मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांना सुचना देते की स्विकारलेल्या तारणावर पुर्वीपेक्षा कमी कर्ज दिले जावे. परिणामी कर्ज व्यवहार कमी होऊन पतनिर्मितीवर मर्यादा पडतात. पर्यायाने चलनवाढीवर नियंत्रण ठेवता येते.

**५) उपभोग्य कर्जावर नियंत्रण:**

मध्यवर्ती बँक व्यापारी बँकामार्फत दिल्या जात असलेल्या उपभोग्य कर्जावर नियंत्रण लादतात. त्यामुळे अर्थव्यवस्थेत कर्ज पुरवठा नियंत्रित झाल्याने पतनिर्मितीवर मर्यादा पडून चलनवाढ नियंत्रित होते.

**६) विधिग्राह्य पैसा:**

चलननिर्मितीची मक्तेदारी मध्यवर्ती बैंकेकडे आहे. परंतु अर्थव्यवस्थेतील चलनवाढ रोखण्यासाठी मध्यवर्ती बँक चलननिर्मिती कमी करते. काही वेळेस सरकारकडूनही जास्त किमतीच्या नोटा रद्द केल्या जातात. त्यामुळे अर्थ व्यवस्थेतील पैशांचे प्रमाण कमी होऊन चलनवाढ नियंत्रित होते.

### ८.९.२ राजकोषीय /राज्यवित्तीय उपाय (Fiscal Measures):

सरकारचा उत्पन्न व खर्च व्यवहारांशी संबंधित उपाययोजना म्हणजे राज्यवित्तीय उपाय होय. चलनवाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी या अंतर्गत पुढील उपाययोजना केल्या जातात.

**१. करात वाढ:**

कर हा शासनाच्या उत्पन्नाचा प्रभावी मार्ग आहे. चलनवाढीच्या काळात शासन वस्तुवरील करांच्या दरात वाढ करुन किंवा नवीन कर आकारुन लोकांचे उत्पन्न कमी करुन त्यांची खरेदीशक्ती कमी करु शकते.

**२. सरकारी खर्चात कपात:**

सरकारला सामाजिक कल्याणासाठी आपल्या खर्चात सतत वाढ करावी लागते. परंतु चलनवाढीच्या काळात शासनाने आपल्या सार्वजनिक खर्चात कपात केली तर लोकांचे उत्पन्न कमी होऊन त्यांची खरेदीशक्ती कमी होण्यास व किंमत नियंत्रित ठेवण्यास मदत होईल.

**३. कर्ज :**

चलनवाढीच्या काळात अर्थव्यवस्थेतील पैशाचे प्रमाण कमी करण्यासाठी शासनाने लोकांकडून कर्ज घेतल्यास लोकांची खरेदीशक्ती कमी होऊन किंमतीवर नियंत्रण प्रस्थापित होईल.

**४. अधिक्यांचे अंदाजपत्रक :**

चलनवाढीच्या काळात शासनाने अधिक्याचे अंदाजपत्रक करुन आपले उत्पन्न हे खर्चापेक्षा जास्त आहे असे दाखविले. तर अर्थव्यवस्थेतील पैशाचे प्रमाण नियंत्रित ठेवता येऊन चलनवाढ रोखता येते.

**५. बचत वाढ:**

सरकारने बचतीस प्रेरणा व प्रोत्साहन दिल्यास लोकांची बचत वाढून त्यांची खरेदीशक्ती कमी होण्यास व पैशाचा भ्रमणवेग कमी होऊन चलनवाढ नियंत्रित करण्यास मदत होते.

**६. कर्जफेड लांबविणे:**

सरकारने पूर्वी लोकांकडून घेतलेल्या कर्जाची मुदत संपली तरी अशा कर्जाची परतफेड न करता अशा व्यवहाराचे नुतनीकरण करुन कर्जफेड लांबणीवर टाकून चलनवाढीवर आळा घालता येतो.

**८.९.३ इतर उपाय (Other Measures) :**

या अंतर्गत पुढील उपायांचा समावेश होतो.

**१. किंमत नियंत्रण:**

किंमत नियंत्रणा अंतर्गत वस्तुंच्या किंमतीची अधिकतम सीमा निश्चित झाल्यानंतर त्या पेक्षा जास्त किंमती घेणे कायदेशीररित्या गुन्हा समजला जातो. या उपायामुळे अर्थात चलनवाढीवर आळा बसतो.

**२. उत्पादन वाढविणे:**

चलनवाढ रोखण्यासाठी उत्पादनात वाढ करण्यासाठी उत्पादन साधनांचा कार्यक्षम वापर केला जातो. या अंतर्गत अनावश्यक उत्पादनावर नियंत्रण टाकले जाते. ज्या क्षेत्रात

किमतवाढीचा धोका अधिक असतो. त्या क्षेत्रात गुंतवणूक वाढविण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. मक्तेदारी विरुद्ध उपाय केले जातात. उत्पादन तंत्रात सुधारणा, उपक्रमशीलतेला प्रोत्साहन, औद्योगिक शांततेला महत्त्व, टंचाई भासणाऱ्या वस्तूंची आयात, इत्यादी विविध उपायामुळे देशातील उत्पादनाचा पुरवठा वाढून किंमत वाढीला आळा बसतो.

**३. वेतन दर:**

चलनवाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कामगाराला दिले जाणारे वेतन हे त्यांच्या कार्यक्षमतेनुसार दिले जाते. वेतन वाढीची रक्कम बचत व कर्जाच्या रुपाने काढून घेतली जाते.

**४. वाटप:**

टंचाई असणाऱ्या परंतू आवश्यक असणाऱ्या वस्तूंचे वाटप योग्य किंमतीला व्हावे यासाठी खास व्यवस्था केली जाते. यासाठी देशव्यापी यंत्रणा उभारावी लागते. अर्थात ही पद्धत फक्त काही ठराविक वस्तूंपूरतीच मर्यादित ठेवावी लागते. त्यामुळे चलनवाढ रोखता येते.

एकूणच चलनवाढ रोखण्यासाठी कोणत्याही एका उपायाचा अवलंब करुन चालत नाही. मौद्रिक, राजकोषिय व इतर उपाय या सर्वाचाच एकत्रित उपयोग करणे आवश्यक असते. या सर्व उपायांवर जरी मर्यादा पडत असल्यातरी सुद्धा त्यांचा प्रभाव कमी होत नाही.

## ८.१० सारांश (CONCLUSION)

अर्थव्यवस्थेत वस्तू व सेवांच्या किंमती सतत वाढल्यामुळे उद्‌भवणारी स्थिती म्हणजे भाववाढ/चलन विस्तार होय. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेबरोबर ती सतत होत असतांना जाणवते. अर्थात ती कोणत्या कारणामुळे होते त्यानुसार तिचे विविध प्रकार दिसून येतात. अशी ही भाववाढ अर्थव्यवस्थेत वस्तूच्या मागणी व पुरवठ्यात ज्या विविध कारणांमुळे बदल घडून येतात. त्यामुळे होताना दिसून येते. मर्यादीत चलनवाढ ही अर्थव्यवस्थेच्या हिताची असते परंतू तिचा अतिरेक झाला की त्याचे अनेक दुष्परिणाम अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रावर दिसून येतात. अर्थात ह्या दुष्परिणामावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक देश मौद्रिक व राजकोषिय उपाय करीत असतात. याशिवाय इतर ही काही उपाय करुन ती नियंत्रीत करता येते.

## ८.११ प्रश्न

१) चलनवाढ म्हणजे काय? वस्तुच्या किंमती वाढीनुसार चलनवाढीचे विविध प्रकार स्पष्ट करा.

२) शासकीय हस्तक्षेप व काळानुसार भाववाढीचे कोणते प्रकार पडतात ?

३) चलनवाढीच्या विविध कारणांची चर्चा करा.

४) चलनवाढीच्या विविध परिणामांवर आपले मत मांडा.

५) चलनवाढ रोखण्याचे मौद्रिक उपाय स्पष्ट करा.

६) चलनवाढीवर राजकोषिय धोरणातर्गत कोणते नियंत्रणात्मक पाऊले उचलता येतात?

७) पैशाच्या मागणी बाबत सनातनवादी दृष्टीकोन स्पष्ट करा.

८) पैशाच्या मागणीबाबत असलेल्या नवसनातनवादी दृष्टीकोनाची चर्चा करा.

९) रोखता पसंती म्हणजे काय ? रोख रक्कम बाळगण्यामागे लोकांचे हेतू कोणते असतात ?

१०) फ्रिडमन यांची पैशाच्या मागणीची संकल्पना स्पष्ट करा.

११) फरक स्पष्ट करा

१. मागणी प्रेरित व खर्च प्रेरित भाववाढ

२. पैसा या संकल्पनेबाबत सनातनवादी दृष्टीकोन व केन्सचा दृष्टीकोन.

१२) टिपा लिहा

१. रोखतेचा सापळा

२. व्यवहार हेतू

३. दक्षता हेतू

४. परिकल्पन हेत

५. वेतन प्रेरित नफा प्रेरित भाववाढ

६. चलनवाढीचे आर्थिक परिणाम

७. चलनवाढीवरील मौद्रीक उपाय

८. चलनवाढीवरील राजकोषिय उपाय

❖❖❖❖